Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५६ग
१०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रण प्रकाश

१०० वा अंक
जानेवारी १९५२

मुद्रण कलेस वाहिलेलें मराठी भाषेंतील एकमेव मासिक

CHECKED 1973
Initial

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

किंमत ३ रुपये

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्
पुस्तक संख्या .....
पञ्जिका संख्या .....
पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रण प्रकाशच्या

शतमांकापर्यंत ज्या ज्या राष्ट्रघटकांनीं ह्या मासिकाच्या प्रकाशनार्थ निःस्वार्थ बुद्धीनें मनःपूर्वक सेवा केली अशा सर्व लहान थोर मित्रांना

गुजराती टाईप फौंड्रीचें

हार्दिक धन्यवाद

मुद्रणालयांना लागणारें साहित्य व मजबूत टिकाऊ टाईप पुरवून मुद्रणधंद्याची विविध रीतींनें सेवा करणें हेंच गुजराती टाईप फौंड्रीचें ध्येय आहे.

लिहा वा भेटा, १९६ गायवाडी, गिरगांव मुंबई ४.

सुविख्यात प्रगतिशील

गिरणी गटाचा

कागद

टिटाघर पेपर मिल्स लि.
बेंगॉल पेपर मिल्स लि.
इंडिया पेपर मिल्स लि.
कलकत्ता

यांचे

सर्व प्रकारचा सर्वोत्तम देशी कागद
महाराष्ट्रांतील एकमेव विक्रेते

श्री. माधव रामचंद्र जोशी, बी. ए.
रामनिवास, लक्ष्मीरोड, पुणें २.

भारतका गौरव !

• हमारे यहांपर अलिगड का बढियां और मजबूत ताले,

• ऑफीस, स्टोअर्स, वर्कर्स, केसेस, सेफ्स, वगैरहके लिये परदेशसे अधिक बढकर मिल सकते हैं ।

• कागद छपनेवाली एम्बोसिंग मशीन, नेम प्लेट्स और मेटलके बॅजेस वगैरह मिलते हैं ।

हर जगह एजंटोकी आवश्यकता है।

लिखो

सी. डी. शर्मा अँड कंपनी
पडाव डुबे, अलिगड (यु. पी.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्टँडर्ड टाईप फौंड्री

जी. पी. ओ. समोर

कोठारी मॅन्शन, मुंबई १

यांचेकडे

- टाईप प्रिंटर्स
- लिथो प्रिंटर्स
- ऑफसेट प्रिंटर्स
- ब्लॉक मेकर्स

यांना लागणारी सर्व प्रकारची साधन-सामुग्री, यंत्रसाहित्य मिळूं शकतें. चौकशी करावी.

दैनिकें, मासिकें व पुस्तकें यांकरितां

अखंड मोनो टाईप

☆ हिंदी व मराठी पायका, १४ पॉइंट, ब्लॅक व साधा ग्रेट, मोनो पद्धतीचा तयार मिळेल.

☆ पायका, इं. बॉडी, ग्रेट, वन्निक डिग्री पद्धतीचा पाडून मिळेल.

☆ १० ते ३६ पॉइंट इंग्रजी टाईप, बॉर्डर्स, लेड्स, रुळा यांचा भरपूर सांठा तयार आहे.

भाव अत्यंत माफक !

आजच मागणी नोंदवा.

प्रकाश टाईप फौण्ड्री

४९५ नारायण पेठ, पुणें २

विन्स्टन

छापण्याच्या शाया

टाइप, ब्लॉक, लिथो व ऑफसेट छपाईसाठीं

प्रमुख विक्रेते

VOLKART

व्होलकार्ट ब्रदर्स, पो. बॉ. १९९, मुंबई

RAS

नाईक अँड सन्स

छापखान्यास लागणाऱ्या सर्व साहित्याचे व्यापारी

आणि

रिस्ट वॉचेस, वॉल क्लॉक व फाउंटनपेन्स हा माल ठोक व किरकोळ मिळेल.

२५७ क, बुधवार

फरासखाना हौदासमोर

पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिली सुविख्यात टाईप फौंड्री

जावजी दादाजी ★ कल्पक मालक

राणू आरू ★ कुशल कारागिर

• यांचेमधील सर्वोत्तम सहकार्यानें घडलेलें कार्य !
• आज ८५ हून अधिक वर्षे सर्वोत्कृष्ट मराठी टाईप जगभर पुरविण्याचें कार्य चालू आहे.
• सर्व आधुनिक यंत्रसामुग्रीनें सुसज्ज झालेली टाईप फौंड्री.

आमच्या फौंड्रीमध्यें उत्तम अलॉय मेटलचें इंग्रजी, मराठी, संस्कृत, गुजराथी, हिंदी, कानडी, जैनी, हिंदू, उर्दू या भाषांचे सर्व जातींचे टाईप, चेसेस, क्वाड्रेट्स, सर्व प्रकारच्या बॉर्डर्स, वेगवेगळे स्टिरिओ ब्लॉक्स अगदीं माफक किंमतींत मिळतात. टाइपाची खूटही मिळते.

ना ग री टा इ पां ती ल म ह शू र

निर्णय सागर प्रेस व जावजी दादाजी टाईप फौंड्री

२६–२८ कोलभाट स्ट्रीट, मुंबई २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कै. चिपळूणकरांच्या चित्रशाळेचें वर्षानुवर्षांचे ग्राहक

आमचेकडून

- मराठी, इंग्रजी, गुजराथी, कानडी, हिंदी भाषेंतील सर्व प्रकारच्या जॉब्जची कंपोज व छपाई करून घेतात.
- सर्व प्रकारचें बुकवर्क व इतर अवघड कामें करून घेतात.
- लिथोवरील एक वा अनेकरंगी उत्तमोत्तम लेटर वा पिक्चर पोस्टर्स करून घेतात.
- डिझाईन्स, एक वा अनेकरंगी, झिंक वा कॉपरवरील ब्लॉक्सची कामें करून, घेतात.
- पुठ्ठा, कापड वा कातडें यांतील सर्व प्रकारचें बाइंडिंग तसेंच रूलिंग, टिनिंग, क्लॉथ माऊंडिंग, पंचिंग करून घेतात.
- मुद्रकग्राहक आमचेकडून सर्व प्रकारचा टाइप, स्टिरिओज, सुरीची धार, शाई, फर्निचर स्टिक्स, कॉइन्स, काज, ब्रेसेस इत्यादि मुद्रण साहित्यही घेतात.
- आमचीं उत्तमोत्तम प्रकाशनें, जुने सर्व विषयावरील ग्रंथ, तक्ते, चित्रें व नकाशे यांची विक्री रोज चालू असते.

आमची यंत्रसामुग्री विविध प्रकारची व अद्ययावत् असून समाधानकारक काम देणें हेंच आमचें ध्येय आहे.

आपल्या कामाकरितां लिहा वा भेटा.

चित्रशाळा प्रेस—पुणें २.

आपल्या संग्रहीं अवश्य ठेवा !

मुद्रणधंद्यावरील

मराठी वाङ्मय

१ प्रात्यक्षिक शिक्षणाचे धडे
२ रुपये. ट. ख. १० आणे

२ मुद्रणप्रवेश
२ रुपये ट. ख. १० आणे

३ मुद्रणकला
३ रुपये. ट. ख. १० आणे

४ पुस्तक-बांधणी
६ रुपये. ट. ख. १२ आणे

५ मुद्रणविषयक कायदे
२ रुपये ट. ख. १० आणे

६ कागद
१॥ रुपया ट. ख. १० आणे

७ अंदाजपत्रक व हिशोबपद्धत
१२ आणे. ट. ख ६ आणे

८ मुद्रणालयांतलि दरआकारणी
१ रु. ट. ख. ६ आणे

९ मुद्रणदरांचें पत्रक (१९५१अखेर)
८ आ. ट. ख ४ आ.

१० छपाई खिळ्यांची घडण
६ आणे. ट. ख. ३ आणे

११ तक्ते-प्रूफदुरुस्ती व केसभरणी
मराठी व इंग्रजी प्रत्येकीं
२ आणे. ट.ख. १ ते २ आणे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्ष ९ अंक १०० वा

मुद्रणप्रकाश

जानेवारी-फेब्रुवारी-मार्च १९५२

१ आत्मनिवेदन	...	१
२ गेल्या शतकांतील छापखाने	चिं. ग. कर्वे ...	४
३ इतिहासज्ञांच्या भांडारांतून	पोतदार व फाटक ...	९
४ जगद्धितेच्छु छापखाना ...	श्री. ज. गानू ...	१२
५ शं. ब. सहस्रबुद्धे... ...	नवपरिचित ...	१९
६ शं. स. दाते इत्यादि ...	संशोधक	२५
७ दैनिक वृत्तपत्रें	य. गो. जोशी ...	३०
८ टाईप निवडींतील धागेदोरे...	शि. का. संत ...	३७
९ रोलर कांपोझिशन व संशोधन...	परिचित	४३
१० भारतीय रसायनशाळेंतील कार्य	... ...	४६
११ डेक्कन पेपर मिल–वृत्तांत...	... ...	४८
१२ पुण्याचा शाई कारखाना...	... ...	५२
१३ जाहीरात कंपन्या व त्यांचें कार्य	ना. तु. ठाकूर ...	५५
१४ ऑफसेट कीं अक्षर मुद्रण...	ज. ग. देवकुळे ...	५९
१५ सायक्लोस्टाइलिंग ...	द. गो. जोशी ...	६२
१६ टाईपांचें संशोधन ...	शं. रा. दाते... ...	६४
१७ काल आणि आज... ...	ग. वि. तांबे ...	६८
१८ अर्जदाराचें माहिती पत्रक...	... ...	७१
१९ पुण्यांतील जुने व नवे चित्रकार	... ...	७२
२० मुद्रण व संलग्न संस्थांचा परिचय	... ...	७४
२१ व्यावसायिक आत्मपरीक्षण–संपादकीय	... ...	७७
२२ आभार	... ...	९२

परिशिष्ट

१. २० वर्षांहून जास्त काळ मुद्रणव्यवसायांत असलेल्यांची यादी ९३

महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितिची विनंति ... १००

२. मुद्रक प्रकाशकादिकांची जंत्री ... १ ते १८ पृष्ठें

एकूण पृष्ठें १५०

वार्षिक वर्गणी ६ रु. किरकोळ अंक १० आणे

१०० व्या अंकाची किंमत ३ रु.

★

कृपा कर जरूर पढिये

देखिये इसमें कुछ खास जरूरतकी मशिने होगी।

(१) डबल क्राउन सिलेन्डर मशीन फरनिवल.

(२) कार्डबोर्ड बाक्सें बनानेवाली स्कोरिंग बेन्डिंग और बॉक्स स्टिचिंग.

(३) ट्रेडल और हॅन्ड प्रेसिस

(४) ऑटोमेटिक और हाथसे चलानेवाले रूलिंग.

(५) लिफाफे और लेबिल काटनेवाले पंचिंग ।

(६) इन्डेक्स कटिंग और कॉरनर राउंडिंग.

(७) दोरे और तार की मशीनें

(८) कारबन आर्क लॅम्प्स.

(९) ब्लॉकोके लकडी काटनेवाली रोटरी ट्रिमर.

(१०) गिल्डिंग और बुक राउंडिंग-मशिनें.

(११) सिलेन्डर और चालू रोलर प्रुफ प्रेसिस.

(१२) लिफाफे या छोटे लेटर-हेड छापने की ॲटोमेटिक मशीन कयी नवे रीबिल्ट और कम वापरे हुवें.

लिखोः—गुजराथी टाईप फौंड्री

१९६ गायवाडी–गिरगांव मुंबई ४

★

व्यवस्थापक व प्रकाशक—व. ग. देवकुळे, मुद्रणप्रकाश पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंकांतील जाहिरातदार

	पृष्ठ	
१ सावळे आणि कंपनी	३१	१९ इंपीरियल स्टे. मार्ट
२ दाभोळकर ब्रदर्स	३३	२० युनायटेड इंक वार्निश कंपनी
३ सावळे आणि कंपनी	४२	२१ एम्. विजय एजन्सीज
४ सकाळ प्रिं. प्रेस	४२	२२ मा. रा. जोशी
५ दाण्डेकर बंधू, सांगली	४५	२३ सी. डी. शर्मा अँड कंपनी
६ मॉडर्न पेपर मार्ट पुणें	४५	२४ स्टँडर्ड टाईप फौंड्री
७ दाभोळकर ब्रदर्स पुणें	४७	२५ प्रकाश टाईप फौंड्री
८ सावळे आणि कंपनी	५०	२६ व्होलकार्ट ब्रदर्स
९ प्रदीप प्रिंटर्स पुणें	५८	२७ नाईक अँड सन्स
१० ईस्ट एशियाटिक कंपनी	५८	२८ निर्णय सागर प्रेस
११ किशोर मुद्रणालय लोणंद	६३	२९ प्रतिभा प्रेस
१२ देवनागरी टाईप फौंड्री	७६	३० चित्रशाळा प्रेस
१३ गुजराथी टाईप फौंड्री	...	३१ रघुनाथ के. जोगळेकर
१४ टेक्स्टाईल ब्रश मॅ. कंपनी	...	३२ राजगुरु प्रेस
१५ यशवन्त म्युचुअल इन्शु. कंपनी		३३ नवीन किताबखाना
१६ न्यू जॅक प्रिं. वर्क्स	...	३४ आर्यभूषण प्रेस
१७ दी ब्लॅक अँड व्हा. कंपनी कानपूर		३५ डेक्कन पेपर मिल्स–४ थें मलपृष्ठ
१८ रामकृष्ण आर्ट प्रिं. प्रेस		३६ लोकसंग्रह प्रेस
		३७ बन्सी आणि कंपनी

छायाचित्रें एकूण ६५

सुरवातीस–वंदना
पृष्ठ ८–प्रिम्स्टो लेटरहेड स्पर्धेचा निकाल
पृष्ठ १२–रावजी श्रीधर इत्यादि ६
पृष्ठ १६–जगद्धितेच्छु छापखाना १९२१इ. १
पृष्ठ २०–वि. ह. बर्वे, खांडेकर इत्यादि ९
पृष्ठ ३२–ज. श्री. टिळक इत्यादि ९
पृष्ठ ४४–डॉ. कृ. खं. काळे इत्यादि ९
पृष्ठ ४८–कै. वासुकाका जोशी इत्यादि ८
पृष्ठ ६४–शि. का. संत इत्यादि ७
पृष्ठ ८८–आ. रा. भट इत्यादि ९
पृष्ठ ९२–वि. अ. पटवर्धन इत्यादि ५
एकूण पृष्ठें २२

मुद्रक–दा. त्र्यं. जोशी, बी. ए. (टिळक), चित्रशाळा प्रेस १०२६ सदाशिव पेठ पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गतात्मे

गणपत कृष्णाजी
राणू आरू
रामचंद्र नारायण
नारायण सोनू
तुकाराम पाटील
गणेश अनंत सोळस्कर

वरील सर्व पंचमेकर साहसी, निराभिमानी होते. शिक्षण नव्हतें. हस्ताक्षर वाईट होतें. तरीही त्यांनीं मराठी मुद्रणाकरितां जे पंच करून देऊन मुद्रणकलेची सेवा केली त्याबद्दल १०० व्या अंकाच्या निमित्तानें

सर्वांना सादर वंदन

सूचक–मणिलालजी मोदी मुंबई ४



मराठी मोनो पद्धतीचें जुळणी यंत्र

प्रकाशन व पुस्तकविक्री करणाऱ्या चार पिढ्या !

या व्यवसायांत ४ पिढ्या घालविणारे पुण्यांतील गोडबोले कुटुंब

• संस्थापक—नारो आप्पाजी गोडबोले यांनीं वृत्तप्रसारक छापखाना व पुस्तकविक्रीचें दुकान उत्तम चालविलें.

• त्यांचे तीन चिरंजीव—भास्कर नारायण, विष्णु नारायण व लक्ष्मण नारायण

• पैकीं भास्कर नारायण यांचेकडे 'नारो आप्पाजी गोडबोले' हा बुकडेपो गेला.

• भास्कर नारायण यांचे एक चिरंजीव वासुदेव महादेव तो चालवितात.

• विष्णु नारायण यांनीं वांस्याचे पैसे घेऊन पंढरपुरास बुकडेपो सुरू केला, तो आज वामन विष्णु चालवीत आहेत.

• लक्ष्मण नारायण यांनीं मात्र उत्तम धंदा केला व नांवारूपाला आणला. त्यांचे एकुलते एक चिरंजीव सीतारामपंत यांनींही तो चालविला.

• सध्यां सीतारामपंतांचे चिरंजीव विठ्ठल सीताराम हे गोडबोले ग्रंथभांडार हें नवें पुस्तक दुकान चालवीत आहेत.

• लक्ष्मण नारायण यांचा मोठा बुकडेपो कोंडो भास्कर व ज्ञानेश्वर सीताराम हे भागीमध्यें उत्तम चालवीत आहेत.

• ज्ञानेश्वर व विठ्ठल हे चौथ्या पिढीचे लोक. लक्ष्मण नारायण ऊर्फ दादा गोडबोले यांनीं सुमारें ६० वर्षें पुस्तकविक्री दुकान सचोटीनें व नेकीनें चालवून मोठा मान मिळविला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकसंग्रहांत तयार होणारे टाईप

☆ मोनो टाईपपद्धतीचा मराठी पायका, पायका ब्लॅक, इंग्लिश बॉडी (१४ पॉईंट) व ग्रेट टाईप पाडून मिळेल.

☆ विविध वळणांचे, निरनिराळ्या पॉईंट बॉडीवरचे मराठी हेडिंग टाईप, पेंटर टाईप, बॉर्डरी, सुटीचें साहित्य इ. मिळेल.

दराकरितां लिहा—

लोकसंग्रह कारखाना, पुणें २

नौकरी नसलेल्या वा चांगली नौकरी हवी असणाऱ्या वाकबगार व कुशल कंपॉझिटर, प्रेसमन, थ्रीकलर प्रिंटर, लिथो आर्टिस्ट, लिथो प्रेसमन, लिथो मशिनमन, ब्लॉक मेकर यांनीं आपलें नांव, पूर्ण पत्ता, कामाचे अनुभव याबद्दल खालील पत्त्यावर कळवावें. पत्रासोबत ८ आणे तिकिटरूपानें पाठवावे.

C/o पोस्ट बॉक्स नंबर ५९३, पुणें २.

मुद्रणप्रकाशाचे वर्गणीदार वाढवून

मुद्रणधंद्याची माहिती जनतेस पटवा.

प्रिंटिंग प्रेससाठीं

स्वस्त, टिकाऊ, टोयोडा जपान मेक

★

सिलेण्डर मशीन्स

रु. : ३३००आणि अधिक

८"×१२" ट्रेडल : रु. १४५०

★

हँड प्रिंटिंग मशीन

रु. ४०० तसेंच हरेक जातीच्या मशीनरीसाठी

बन्सी एण्ड कंपनी

४१३ काळबादेवी, मुंबई २.

वायरस्टिचिंग मशीन्स व स्टिचिंग वायर

नवीन $\frac{३}{१६}$" $\frac{५}{१६}$" व $\frac{१}{२}$ पायानें व हातानें चालविण्याची

नवीन $\frac{५}{१६}$" व १$\frac{१}{४}$ पॉवरवर चालणारी

चालू स्थितींत $\frac{५}{१६}$" व १" इंच उत्तम

पायाचें पावरचें

इंग्लिश मेक स्टिचिंग वायर नं. १८-२०-२२-२४ व २६ स्टॉकमधून तयार मिळूं शकेल.

गुजराथी टाईप फौंड्री

गायवाडी गिरगांव, मुंबई नं. ४

★

Directories of Presses for Sale

(1)

Poona Printing & allied Trades in Deonagari Rs. 2-0-0 Postage 0-8-0 No. V. P.

(2)

Five hundred & more presses from Bombay, Madhya Pradesh States except Poona.

Rs. 5-0-0

Postage 0-12-0 No. V. P.

Write & send M. O. s. to Mudran Prakash, Poona 2

लंडन रीबिल्ट

डबल क्राउन लेटर प्रेस

सिलेन्डर मशीन (फरनीवल)

मोल्ड, स्टॉक्स व पंख्यासह

गुजराती टाईप फौंड्री

गायवाडी गिरगांव

मुंबई ४

★

मुद्रण प्रकाशाचा उल्लेख करा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रणकलेचा संशोधक जॉन गटेनबर्ग

विष्णुशास्त्री चिपळूणकर आदि सर्व मुद्रणाधिकारी

यांना

सादर वंदन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजमुद्रा

लोकशाहीप्रधान स्वतंत्र भारताच्या
पहिल्या महत्त्वपूर्ण निवडणुकीमध्यें
यशस्वी होऊन लोकसेवेसाठीं उत्सुक
झालेल्या सर्व आमदार बंधूंचें

☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆

☆ म नः पू र्व क अ भि नं द न ! ☆

☆ ☆ ☆ ☆ ☆ ☆

★ निवडून आलेल्या सर्वांना राष्ट्रसेवेची व जनसेवेची पहिली खरी संधि मिळणार आहे.

★ आपल्या देशांत इतरही राष्ट्रभक्त आहेत व तद्व्यतिरिक्त राहिलेल्या सर्वांना राष्ट्रभक्त करावयाचें आहे, हें लक्षांत ठेवून यच्चयावत् राष्ट्रघटकांशीं केवळ राष्ट्रीय भूमिकेवरून वागावें.

★ मुद्रणधंद्याचें प्रसारात्मक व राष्ट्रीय प्रगति करणारें स्वरूप लक्षांत घेऊन राज्यसरकारांनीं मुद्रण धंद्याच्या प्रगतीसाठीं शिक्षण, संशोधन व इतर सुधारणा घडवून आणाव्या.

एवढीच मुद्रण प्रकाशची नम्र प्रार्थना.

२६ जानेवारी १९५२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



अंक १०० वा जानेवारी १९५२

टाईप फौंड्री, छपाई, बाईंडिंग ब्लॉक-मेकिंग यांसारख्या व्यवसायांत शास्त्राभ्यासानेंच प्रगति होणें शक्य असतें हें लक्षांत घेऊन पुढील काळांत सुशिक्षित तरुण मंडळींनीं मराठी मुद्रणव्यवसायांत आपलें तनमन घालून त्याची सर्वांगीण प्रगति करावी हाच माझा संदेश.

आ त्म नि वे द न

तोच मी शंभरावा अंक ! माझा जन्म एकाएकीं झाला नाहीं ! थोर पुरुषांच्या जन्माला ज्याप्रमाणें पूर्वसूचित व पूर्वानुकूल वातावरण असतें तद्वत् माझ्याही जन्माला असल्यास न कळे ! १९३८ सालापासून भारतांतील देवनागरी भाषेंत मुद्रणप्रकाश त्रैमासिक म्हणून सुरू झालें. मुद्रण-तपस्वी बाबुराव सहस्रबुद्धे यांनींच प्रथम त्याची जबाबदारी घेऊन तें चालविलें. मुद्रणविषयावरील सुव्यवस्थित असें भारताच्या खास भाषेंतील पहिलें नियतकालिक हेंच होय. त्यानंतर देवनागरी मोनो टाइपाचे निर्माते शं. रा.दाते यांनीं त्याचें लालनपालन केल्यानंतर मासिक या स्वरूपांत मुद्रणप्रकाश श्री. वि. अ. पटवर्धन व कागदव्यापारी मा. रा. जोशी यांनीं १९४१ ते १९४४ वाढविला.

मुद्रकप्रकाशकांना विचार करावयास लावून स्वतःच्या ज्ञानाची व अनुभवाची पद्धतशीर मांडणी करण्याची बुद्धि या उपक्रमानें निर्माण होऊं लागली.

१९४४ नंतर दोन वर्षें पेपर कंट्रोल (इकॉनमी) ऑर्डर व तत्सम आपत्तीमुळें मुद्रणप्रकाशाचें प्रकाशन स्थगित झालें व त्यानंतर तें प्रकाशन पुन्हां होण्यासारखी परिस्थिति दिसेना.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तथापि १९४४ सालीं मुद्रणप्रकाश सुरू करण्याचा प्रश्न पुणें प्रे. ओ. असोसिएशनमध्यें सभासद श्री. घारे व श्री. व. ग. देवकुळे यांनीं काढला व आपापल्या योजना स्वतंत्रपणें सादर केल्या. त्यापैकीं श्री. देवकुळे यांची योजना ८–९ महिन्यांच्या दीर्घ चर्चेनंतर मान्य करण्यांत आली व विविध अडचणींतून शेवटीं १९४६ पासून मुद्रणप्रकाशाचा अंक नियमितपणें दरमहा प्रसिद्ध होऊं लागला. तींच माझीं भावंडें !

वाचकहो, १९४६ जानेवारीपासून माझ्या भावंडांचें स्वरूपही पालटलें गेलें. कोट्यवधि राष्ट्रघटकांना जागृत करणारा–नव्हे त्याकरितांच चालणारा मुद्रणधंदा करणारे मुद्रक ! त्यांना मात्र पुरेशा प्रमाणांत माझ्या कायापालटाची जाणीव झाली नाहीं. १९४६ पासून गांगल, चाफेकर यांनीं देवकुळे यांना संपादकीय कामांत साहाय्य सुरू केलें. श्री. देवकुळे यांनीं अनेकांचें सहकार्य घेऊन मुद्रणप्रकाशाला धंद्यास शोभणारें स्वरूप प्राप्त करून देण्याचा निश्चय प्रकट केला. १९४६ सालचे पहिले ७-८ अंक निर्बंध पाळून प्रसिद्ध केलें परंतु सरकारी अधिकाऱ्यांनीं त्याबाबत निर्बंधभंगाचीच फिर्याद ठोकली. दरम्यान सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पद्धतशीर खटपट केल्यानंतर मासिकाच्या प्रकाशनास परवानगी मिळून बरीच सुलभता प्राप्त झाली. परंतु खरी अडचण मुद्रकांच्या मान्यतेची व वर्गणीदार होऊन मासिकप्रकाशनास सक्रिय साहाय्याचीच !

मुद्रणधंद्याबाबत दरमहा चर्चा करणें, सर्व मराठी मुद्रणालयांचें एक कुटुंब समजून त्यांना सल्लामसलत देणें, धंद्यांतील अनुभव प्रकट करून धंद्याबाबत मार्गदर्शन हीं कामें सुरू झालीं व जागरूक मुद्रकाकडून साहाय्याचें प्रमाणही किंचित् वाढलें. मुंबईचे श्री. वि. शं. दाते यांनीं पूर्ण एक वर्षाच्या कागदाचा खर्च देऊन मुद्रणप्रकाशाला फार मोठें उत्तेजन दिलें. असल्या क्वचित् प्रोत्साहनानें मुद्रणप्रकाश कशाही स्थितींत चालू ठेवण्याची उमेद मात्र वाढली.

१९४९ चे जानेवारींत महाराष्ट्र मुद्रण परिषदेचें अधिवेशन पुण्यास झालें. त्याच्या वृत्तांताचा १०० पानी खास अंक प्रसिद्ध करण्याची संधि मिळाली व त्यामुळें अनेकांच्या डोळ्यांसमोर मुद्रणप्रकाश आला.

मुद्रणप्रकाश मासिक हें केवळ मुद्रणधंद्याकरितां असून त्यामध्यें मुद्रण, प्रकाशन, विक्री, मुद्रणकामगार, व्यवस्थापक, मालक यांचेसाठींच लेख, सूचना दिल्या जातात. गेल्या १०० वर्षांत असा प्रयत्न कसून केला गेला नव्हता हें त्या काळाचा ज्ञात इतिहासच सांगतो. १९५० सालीं नागपूर येथील अधिवेशनाचा विशेष अंक, १९५१ जानेवारीचा अंक 'मुद्रणमसी संशोधन प्रदर्शनाचा खास अंक' काढला गेला व जुलै १९५१ मध्यें मुंबई राज्य शालेय पुस्तक परिषदेची साद्यन्त हकीकत देऊन ह्या मासिकानें आपलें प्रकाशकाबाबतचें कर्तव्य बजावलें.

प्रत्येक धंद्यामध्यें असलेले राष्ट्रीय हितसंबंध प्रस्थापित करण्यासाठीं त्या त्या धंद्याबाबतच्या नियतकालिकाद्वारें केलेले प्रयत्न जास्त उपयोगी पडतात. नियतकालिकाद्वारें सहकार्यानें झालेल्या कार्याची माहिती देतां येऊन त्याचें अनुकरण करण्याची शक्यता असते. या दृष्टीनें मुद्रणप्रकाश मासिकांत मराठी मुद्रकांच्या व्यवहारांतील लहानसहान घडामोडींपासून सर्व बातम्या देण्याची पद्धत अवलंबिली. या बातम्या देण्याचा उद्देश सर्वस्वीं एकच कीं वाचकांना सर्व घडामोडी अवगत असाव्या; धंद्याची सुधारणा निदान अनुकरणानें कां होईना पण करण्याची इच्छा व्हावी.

अशा तऱ्हेनें या मासिकाची सेवा चालू असतांना माझ्या संभाव्य अवस्थेचा विचार ऑगस्ट महिन्यांतील पुणें मुद्रक संघाच्या पाक्षिक सभेंत मांडण्यांत आला. श्री. वि. अ. पटवर्धन व य. गो. जोशी (आनंद) यांनीं श्री. देवकुळे यांच्या बरोबर विचार करून माझ्या स्वरूपाची रूपरेषा ठरविली व दिनांक २५-९-५१ या दिवशीं पुणें मुद्रक संघाचे कांहीं सभासद व पुण्यांतील इतर मुद्रणव्यवसायी यांनीं प्राथमिक तयारीसाठीं पुणें शहराचे भाग वाटून घेऊन छापील फॉर्म भरून आणण्याची योजना केली.

पुणें शहरांतील मुद्रणव्यावसायिकांच्या माहितीनें माझी सजावट करावी व शिक्षणांत पुढारलेल्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यनगरींतील मुद्रणविषयक कामगिरीचा परामर्ष घेण्याची कल्पना हें माझें स्वरूप ठरल्यानंतर तसे प्रयत्न सुरू झाले. इतिहासज्ञ चिं. ग. कर्वे यांनीं तर अत्यंत परिश्रमपूर्वक १९ व्या शतकांतील छापखान्यांची सुसंगत हकीकत लिहून दिली. म. म. द. वा. पोतदार व प्रा. न. र. फाटक यांनीं मुद्रणविषयक जुनी माहिती अत्यंत आनंदानें आपला अमूल्य वेळ खर्च करून पुरविली. माझें वैशिष्ट्य यामुळें ठळकपणें उठून दिसतें. या इतिहासज्ञांचा मी कृतज्ञ आहें.

कोणाकडून कांहींही पैसे न घेतां जमविलेल्या पुणें शहरांतील मुद्रण व तदनुषंगिक सर्व व्यावसायिकांच्या त्रोटक माहितीनें मला भूषणच दिलें आहे.ती माहिती जमा करण्यांत बं. वि. गोरे, श. मेहेता,व. रा. ओतुरकर, वि. ना. दाते, श्री. ज. गानू, वि. अ. बडवे, व. वि. आपटे, क. ला. मुनोत, मा. ध. गुर्जर, द. कृ. काकनूरकर, य. गो. जोशी, ना. ब. ओक, म. ना. चाफेकर, व. ग. देवकुळे यांनीं फारच मेहनत घेतली. पुणें शहरांतील मुद्रक, प्रकाशक, लिथो प्रेसेस, साहित्यविक्रेते, बुकसेलर्स, ग्रंथालयें, वाचनालयें यांची कसोशीनें माहिती देण्यांत माझें वैशिष्ट्य आहे. संस्था वा धंद्याची सूचि करतांना जे माहिती पाठवतील त्यांचींच नांवें घातलीं जातात, परंतु ह्या सूचीमध्यें मुद्दाम पुण्यनगरींतील प्रत्येक रस्त्यारस्त्यानें हिंडून संस्थांची माहिती जमा केली आहे. लहानसहान धंदेवाल्यासही सोडलेलें नाहीं. याचा फायदा या धंद्यांतील प्रत्येकाला होईलच पण अभ्यासूंना तसेंच नवीन धंदा करणारांना याचा फायदा घेतां येईल.केवळ एका शहराची ही पाहणी होत असतांना धंदेवाले अशा गोष्टीबद्दल अत्यंत उदासीन असतात असें आढळून आलें आहे. ह्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं, धंदेवाल्यांची आपसांत फार स्पर्धा असते व ह्या स्पर्धेमुळें धंदा चालणें कठीण होतें. ही वस्तुस्थिति थोड्या जास्त विचारांतींच नष्ट होणें शक्य आहे.

माझ्या जन्मामुळें पुण्यांतील मुद्रणधंदेवाल्यांमध्यें कौटुंबिक एकत्वाची भावना उत्पन्न व्हावी अशी माझी अपेक्षा आहे. अद्भून राहिलेल्या सुधारणा, दरदामाची सुधारणा, चांगल्या कामगारांच्या निर्मितसाठीं शिक्षणयोजना, चांगल्या साहित्याच्या निर्मितीसाठीं संशोधन इत्यादि कामें सुरू व्हावींत. **माझ्या जन्मनिमित्तानें** पुण्यनगरींतील जुन्या मुद्रणसंस्थांचा नवा परिचय सर्वांना होत असून त्यांचे विद्यमान चालक मुद्रणधंद्याच्या वाढीबद्दलच्या योजना समोर घेतील अशी मी आशा करतों.

मजला वस्त्राभरणें चढविण्याच्या प्रयत्नांत सर्व बाजूंनीं प्रयत्न झालेले आहेत. गेलीं सहा वर्षें सातत्यपूर्ण प्रकाशन झालें असल्यानें मला 'शंभरावा अंक' म्हणून प्रकट होतांना अभिमान वाटत आहे. **माझें लालनपालन करणाऱ्यांना किती त्रास होतो याची लेकुरवाळ्या मातांनाच खरी कल्पना येईल, असें मला आज तरी वाटतें. मुद्रणव्यावसायिक जाणतील तो सुदिन !**

ज्यांनीं २० वर्षांवरचा म्हणजेच दीर्घकाल मुद्रणधंद्यांत घालविला अशा कामगारांची यादी देणें हाही **माझा विशेष अलंकार** ठरला आहे. एकाच धंद्यांत सतत काम करणें हें खरोखर राष्ट्रीय कर्तव्य आहे, नव्हे अशा लोकांमुळें धंदा चालतो. आज पुण्यांतील कित्येक मुद्रणसंस्था ह्या त्यांतील जुन्या कामगारांमुळें टिकलेल्या आहेत. ह्या सर्व कामगारबंधूंना माझे शतशः प्रणाम ! त्यांनीं ह्या धंद्याची प्रामाणिक सेवा करावी. ज्यांचीं नांवें नसतील त्यांनीं मजवर रागावू नये.

ज्या पुण्यनगरींत माझा जन्म होत आहे त्या पुण्यनगरींत मुद्रणधंद्याचे सर्व प्रकार असून त्या सर्वांची माहिती मजमध्यें ग्रथित करण्यांत आलेली आहे. प्रत्येक मुद्रण-व्यावसायिकाला अभिमान वाटावा अशाच तऱ्हेचे माझे रूपगुण आहेत व मी पुण्यनगरींतील सर्व लहानथोर दिवंगत व विद्यमान मुद्रक, चित्रकार, प्रकाशक, बाइंडर्स, टाईप फौंड्रीवाले, जाहिरात कंपनीवाले, ब्लॉकमेकर्स, बुकसेलर्स, ग्रंथालय व वाचनालय चालक, रूलर्स, कागद गिरणी कामगार, लोकमान्य शाई कारखाना कामगार व मुद्रण धंद्यांतील सर्व कामगार यांना सादर नमस्कार करून आशीर्वाद मागतों.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेल्या शतकांतील पुण्याचे छापखाने

लेखक : श्री. चिंतामण गणेश कर्वे,
कोशसंपादक, पुणें.

१८१७ सालांतील बायबलच्या पुस्तकांतील उतारा

पर्व ॥ ११ ॥ मात्थी २९

र माझे जोकड घ्या आणि मजपासीं शिका कां तर अंत:करण्
मध्यें मी नम्र आणि लीन आहें आणि तुह्मी आपले मनांम
३० ध्यें विसांवां पावाल ॥ यांस्तवकीं माझें जोकड सोपें आणि माझें
वोझें हलकें आहे ॥
पर्व ॥ १२ ॥ त्या समईं येशू शाब्बाथांमध्यें दाण्याचे शेतां
तून जात असतां त्याचे शिष्ये भुकेले होउन कणसें मोडून खाउं

FACSIMILE OF MATT. 11,29—12,1.

Scripture tract of octavo pages

—A Century in India
(American Marathi Mission)

या वेळचा टाइप सर्व सारखा नसल्यानें चाकूंनीं तो खरवडून काढीत. तथापि हा बोजडच दिसे. विरामाचिन्हें नसल्यानें वाक्य पूर्ण झालें म्हणजे संस्कृतांतल्याप्रमाणें दोन उभ्या समांतर रेघा ठेवीत. मुंबई प्रांतांतील हें पहिलें बाळबोधी मुद्रण म्हणतां येईल.

मुद्रणकलेचा भारतांत प्रवेश—मुद्रणकला ही चीन-जपान-कोरिया यांसारख्या प्राच्य राष्ट्रांत दोन हजार वर्षां-पूर्वींपासून दिसून येते. ठशांनीं व खिळ्यांनींहि पुस्तकें छापलीं जात. युरोपांत मात्र १५ व्या शतकांत ही कला अवगत झाली व यंत्रें निघालीं. हिंदुस्थानांत चिनी प्रवासी फार प्राचीन काळापासून येत होते तरी त्यांनीं येथें मुद्रणाचा प्रवेश करून दिला नाहीं ही गोष्ट चमत्कारिक दिसते पण खरी आहे. धाडसी पोर्तुगीज व्यापारी मलबार किनाऱ्यावर जेव्हां येऊन पाय रोंवून राहिले तेव्हां त्यांच्या-बरोबर खिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं मिशनरी होतेच. त्यांनीं देशी भाषा शिकून त्या भाषांतून धार्मिक ग्रंथ छापून काढण्यास सुरुवात केली. १६५५ त रोमन लिपींत पण कोंकणी भाषेंत छापलेलें सेंटपीटरचें चरित्र आढळतें. देशी भाषेंत युरोपियनानें संपादलेलें हें हिंदुस्थानांतलें पहिलेंच पुस्तक होय.

मिशनऱ्यांचे उपकार—खिस्ती मिशनरी लोकांनीं हिंदु-स्थानांतील विद्याभिवृद्धीस मोठें उत्तेजन दिलें यांत संशय नाहीं. त्यांचे आपणावर मोठे उपकार आहेत हें नाकबूल करतां यावयाचें नाहीं. कृतघ्नपणा दिसेल. बहुतेक सर्व देशी भाषांतील पहिले कोश व व्याकरणें त्यांनीं संपादलेलीं व छापलेलीं आहेत. धर्मप्रचारासाठीं त्यांना स्थानिक भाषा चांगल्या अवगत करून घ्याव्या लागत व ते फार कष्ट घेऊन परकीय भाषा शिकत व त्यांच्या द्वारें धर्मोपदेश करीत. त्यांच्या स्वार्थांत परार्थहि भरला होता. असो.

पहिला मराठी छापखाना—कलकत्त्याजवळच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीरामपूरच्या डॉ. कॅरे यानें १८०७ सालीं मोडी मराठींत 'नवा करार' छापून प्रसिद्ध केला. त्यापूर्वी दोन वर्षें (१८०५) वैजनाथ शर्मा या नागपुरी पंडिताची मदत घेऊन त्यानें देवनागरी लिपींत मराठी भाषेचें व्याकरण काढलें होतें. त्यानें १८०० सालींच श्रीरामपूर येथें देशी भाषांतून धार्मिक पुस्तकें काढण्यासाठीं एक छापखाना उभारला होता. हिंदुस्थानांतील हा पहिला मराठीचा छापखाना म्हणावा लागेल.

देशी लोकांचे प्रयत्न—आपल्या मुंबई प्रांतांत इंग्रज शिरल्यापासून छापण्याची कला आली. साहेबाची ही युक्ति पाहून आपल्याकडील लोकांनाहि छापखाने घालावे असें वाटूं लागल्याचें दिसतें. कारण १६७१ सालीं भीमजी पारख नांवाच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या एका दलालानें आपल्याकडील कांहीं धार्मिक ग्रंथ छापण्यासाठीं इंग्लंडांतून एक छापणारा माणूस मागितला. तो माणूस, छापण्याचें यंत्र व कागद या गोष्टी तीन वर्षांनीं मुंबईस त्याच्यासाठीं आल्याचें सुरतेच्या कंपनी रोजनिशींत ३ एप्रिल १६७४ रोजीं नमूद आहे. या युरोपियन मुद्रकाचा पगार सालीना ५० पौंड ठरला होता. चित्रें, रांगोळ्या वगैरेंचे ठसे आपल्याकडे जुनेच आहेत. गीतेंतील एकेक श्लोकाचे तांब्याचे ठसे करून गीता छापण्याचा उद्योग १८०५ सालीं मिरजकर संस्थानिकांनीं केलेला होता. हे तांब्याचे सर्व ठसे हल्लींच्या तात्यासाहेब मिरजकरांनीं भारत-इतिहास-संशोधक मंडळास नजर केले आहेत. ते मंडळाच्या प्रदर्शन-विभागांत पाहावयास मिळतात.

मुंबईस पहिला मराठी छापखाना—मुंबईच्या अमेरिकन मराठी मिशनला खिस्ती धार्मिक ग्रंथ मराठींत करण्याची फार जरूरी भासून, मराठी चांगलें शिकण्यासाठीं त्यांतील मि. हाल व मि. नॉट या मिशनऱ्यांनीं कसून प्रयत्न केला. दरमहा २५ रुपयांवर एक ब्राह्मण शिक्षक ठेवला. रोज तीन चार तास धडे घेऊन मग रस्त्यांतून लोकांशीं ते मोडकेतोडके बोलत जात व जाणाऱ्यायेणाऱ्यां-कडून आपलें बोलणें शुद्ध करून घेत. त्यांनीं मराठींत केलेल्या भाषांतराचें उतारे ते लोकांना उपासनेच्या वेळीं वाचून दाखवीत व चुका दुरुस्त करीत. मजकूर छापण्या-लायक वाटला तेव्हां त्यांनीं छापखान्याची सोय केली. १८१६ सालीं कलकत्याहून छापखाना व टाईप मागवून स्वतः जुळणी केली व तीन महिन्यांत एका अष्टपत्री आकाराच्या पुस्तकाच्या १५०० प्रती बाहेर काढल्या. अशा तऱ्हेचे कष्टाचे निरलस उद्योग केवळ धर्मभावनेनें मिशनऱ्यांनीं केले म्हणून तर आपल्याला मुद्रणकला लवकर हस्तगत करतां आली.

पुणें पाठशाळा छापखाना—महाराष्ट्रीय मुद्रण-कलेचे जनक गणपत कृष्णाजी हे अशाच एका मिशनरी छापखान्यांत प्रथम टाईप घासण्याच्या कामावर दरमहा २ रुपये घेऊन होते. पुढें त्यांनीं स्वतःच लाकडी यंत्र तयार करून व शाई बनवून छापखाना काढला. नंतर शिळा छापखाना सुरू करून १८३१ सालीं पहिलें मराठी पंचांग छापून काढलें. त्याच सालीं इकडे पुण्यास सरकारी पाठशाळेचा छापखाना निघाला. पेशवाईंत श्रावणमास दक्षिणा जी लाखांनीं वांटण्यांत येऊन अप्रत्यक्ष विद्योत्तेजन होत असे त्या दक्षिणानिधीची परंपरा चालू ठेवून हिंदु प्रजेला प्रत्यक्ष विद्यादान करावें या उच्च हेतूनें एलफिन्स्टन साहेबानें १८२१सालीं पुण्यास विश्रामबाग वाड्यांत एक संस्कृत पाठशाळा सुरू केली. या पाठशाळेंतून नंतर इतर शाळा व कॉलेज निघालें. या शाळेला जोडून पाठ्य पुस्तकें तयार करण्यासाठीं त्यानें एक छापखानाहि सुरू केला. या छापखान्यांतूनच 'बोधकथा' (१८३१), 'नीतिज्ञानपरिभाषा' (१८३१), 'महाराष्ट्र भाषेचा कोश–पुरवणी' (१८३१), 'भूगोल खगोल विषयक संवाद' (१८३२), 'महाराष्ट्र देशाचें वर्णन' (१८४०), 'मिताक्षरा व्यवहाराध्याय' (१८४४), इत्यादि पुस्तकें निघालेलीं आहेत. सुपरिंटेंडेंट कँडीलसाहेब यानें 'वाचनपाठमाला' १८५० त सुरू केली. १८५१ सालीं संस्कृत पाठ-शाळेला नॉर्मल क्लास व प्राथमिक शाळा जेव्हां जोडण्यांत आली तेव्हां 'पूना कॉलेज' असें पाठशाळेला नांव मिळालें. तव्हां साहजिकच 'पुणें पाठशाळा छापखाना' हा 'पूना कॉलेज प्रेस' या नांवांत रूपांतर पावला व कांहीं पुस्तकांवर छापखान्याचें हें नवें नांव दिसूं लागलें(उदाहर-णार्थ, १८५७ सालांतील परशुराम तात्या गोडबोले यांचें वेणीसंहार नाटक). हीं पुस्तकें सर्व शिळाछापाचींच होतीं.

ज्ञानप्रकाश छापखाना— यानंतरचा पुण्यांतील छापखाना 'ज्ञानप्रकाशा' चा होय. 'ज्ञानप्रकाश' साप्ताहिक १८४९ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत सुरू झालें. शुक्रवार पेठेंत रामेश्वराजवळ बारामतकरांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाड्यांत हा छापखाना होता. प्रथम हा शिळा छापखाना होता; पुढें १८७४ मध्यें टाइपांवर छापण्यास सुरुवात झाली. ज्ञानप्रकाश छापखान्याचे मालक कृष्णाजी त्र्यंबक रानडे नांवाचे होते. 'ज्ञानप्रकाश' निघण्यापूर्वी 'क्रॉनिकल' नांवाचें एक इंग्रजी पत्र पुण्यास निघत होतें; तें १८५१ सालीं बंद पडलें. ज्ञानप्रकाश छापखान्यांत शिळाछापावर चांगलीं पुस्तकेंहि निघत. १८४९ सालांतच 'लोकहितवादी,' गोपाळ हरि देशमुख यांचें 'लक्ष्मीज्ञान' हें क्लिफ्टकृत Political Economy च्या आधारें लिहिलेलें अर्थशास्त्रावरचें पुस्तक या छापखान्यांतलें आहे. 'लेखनपद्धतीचें पुस्तक' (१८५०), 'यंत्रशास्त्र' (१८५०), 'भरतखंडपर्व' (१८५१), 'साक्रेटिसचा इतिहास' (१८५२), वगैरे पुस्तकें या छापखान्यांतून निघालीं.

नंतरचे कांहीं छापखाने—विठ्ठल सखाराम अग्निहोत्री यांचा छापखाना मुंबईस होता तो त्यांनीं पुण्यास आणलेला दिसतो. कारण नामदेव तीर्थावळीचे अभंग १८६२ सालीं या छापखान्यांतले आहेत. नारो रामचंद्र ठकार यांचा एक छापखाना होता. १८५५ च्या कँडी यांच्या 'वाचनपाठमालेच्या' दुसऱ्या आवृत्तीवर पाठशाळा छापखान्याच्या बरोबरीनें याचें नांव आहे. बाळकृष्ण रामचंद्र ठकार यांच्या नांवानेंहि एक छापखाना दिसतो. कारण 'भावदीपिका म्हणजे गीतगोविंदाची समश्लोकी प्राकृत टीका' हें भावाचार्य अष्टपुत्रे यांचें पुस्तक १८६० सालीं या छापखान्यांतलें आहे. कदाचित् नारो रामचंद्रानंतर हे त्यांचे बंधु पुढें सरले असावेत. नारो आपाजी गोडबोले यांचा छापखाना ('वृत्तप्रसारक') याच सुमारचा आहे. गेल्या शतकांतील प्रसिद्ध कोशकार रघुनाथ भास्कर गोडबोले यांनीं रचलेला जुन्या काव्यांतील कठिण शब्दांचा 'हंसकोश' १८६३ सालीं या छापखान्यांतून प्रसिद्ध झालेला आहे. नारो आपाजी गोडबोले हे जुने प्रकाशक म्हणून पुष्कळांना माहीत आहेत. त्यांनीं संतवाङ्मय बरेंच पुढें आणलें. त्यांचीं पुस्तकविक्रीचीं दुकानें पुण्यास व पंढरपुरास आहेत. नारायण मोरेश्वर केळकर यांचा 'वृत्तप्रकाश' छापखाना (१८६२), 'बुद्धिप्रकाश' छापखाना (१८६३), आपाजी बापूजी पाच्छापूरकर छापखाना (१८६३) व 'वृत्तप्रसारक' छापखाना (१८६६) असे आणखी कांहीं पुण्यांतले छापखाने ग्रंथसूचीवरून पाहतां आढळतात. त्यांची इतर माहिती उपलब्ध नाहीं.

ज्ञानचक्षु छापखाना—भाऊ गोविंद सापकर व गंगाधर गोविंद सापकर यांचा 'ज्ञानचक्षु' छापखाना पुण्यास १८६१ सालापासून आढळतो. 'ज्ञानचक्षु' वर्तमानपत्र १८६६ सालापासून निघत असावें. सापकरबंधूंचा व्याप फार मोठा होता. त्यांनीं अनेक शालोपयोगी पुस्तकें व रोजनिशा काढल्या आहेत. 'उपयुक्त चमत्कारसंग्रह' (गैब्रि एलम) याचे १० भाग आहेत. उपयुक्त अशा नाना प्रकारच्या युक्ति, औषधसंग्रह, खेळ, लहान धंदे यांची यांतून माहिती दिलेली आहे. हा एक छोटा ज्ञानकोशच म्हणतां येईल. १८६४ सालीं पुण्यास सुमारें दहा शिळा छापखाने होते.

जगद्धितेच्छु छापखाना—रावजी श्रीधर गोंधळेकर यांचा जगद्धितेच्छु छापखाना १८६७ सालीं निघाला. या छापखान्याचा लौकिक फार मोठा होता. याला पुण्यांतील निर्णयसागर म्हणत; इतकें सुबक काम यांत निघत असे. आरंभीं बरेचसें संतवाङ्मय या छापखान्यांतून निघालें. नंतर चांगलें विविध विषयांवरील इंग्रजी–मराठी ग्रंथ निघूं लागले. जगद्धितेच्छु साप्ताहिक भरपूर बातम्या देत असे व लोकप्रियहि झालें होतें. १९०५ च्या सुमारास हें बंद पडलें. पुण्यांत पाहिलें छापील पंचांग १८७० सालीं या छापखान्यांतच निघालें.

सन १८७५–७६ सालीं पुण्यास खालील २३ छापखाने होते—

१. विठ्ठल सखाराम अग्निहोत्री.
२. पूना ऑब्झरवर.
३. डेक्कन हेरल्ड.
४. ज्ञानप्रकाश प्रेस.
५. ज्ञानचक्षु.
६. कष्टविलासिनी.
७. श्री शिवाजी–प्रभा पत्रिका.
८. सत्यशोधक.
९. बुद्धिप्रकाश.
१०. जगद्हितेच्छु.
११. वृत्तप्रसारक.
१२. वृत्तप्रकाश.
१३. वृत्तसूचक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१४. चंद्रोदय.
१५. ठकार.
१६. सिटी प्रेस.
१७. सुविद्य प्रकाश प्रेस.
१८. विश्वब्रह्मा प्रेस.
१९. रानडे प्रेस.
२०. दी रेव्हुनी सर्वे प्रेस.
२१. फोटो झिंको प्रेस.
२२. सिटि जेल प्रेस.
२३. म्युनिसिपल प्रेस.

शेवटचे चार सरकारी होते.

[-G. A. report 1875-76

पुण्यांत निघत असलेलीं जुनीं मासिकें

(सन प्रारंभाचे आहेत)

१८६१—पुणें शालापत्रक.
१८७३—सत्यदीपिका.
१८७४—निबंधमाला
१८७६—शिल्पकलासंग्रह. ज्ञानसागर. सर्वसंग्रह. शेतकीसुधारणा. काव्येतिहाससंग्रह.
१८७८—षड्दर्शनचिंतनिका.
१८८२—सार्वजनिक सभेचें मासिक. राजहंस.
१८८३—मालिका. निबंधचंद्रिका. तत्त्वविवेचक.
१८८४—कादंबरीकलाप. ऐतिहासिक नाट्यकथावली. आर्यमित्र. काव्यार्थप्रकाश. विद्यानंद.
१८८५—धन्वंतरी.
१८८६—संगीतमीमांसक. कुमुदिनी. ज्योतिषप्रकाश. काव्येंदुशेखर. मनोरंजक.
१८८७—शिल्पकलाविज्ञान.
१८८८—दीनामित्र.
१८९०—मराठी शालापत्रक.
१८९४—भाषांतर.

चित्रशाळा छापखाना—गेल्या शतकाच्या उत्तरार्धांत महाराष्ट्राला नवचैतन्य देणारा थोर राष्ट्रभक्त म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर होत. निबंधमाला, न्यू इंग्लिश स्कूल, आर्यभूषण छापखाना व केसरी–मराठा हीं वृत्तपत्रें काढून त्यांनीं ज्ञानाचा प्रसार जसा आरंभला तसाच शिक्षणांत चित्रांचें महत्त्वाचें स्थान ओळखून त्यांनीं चित्रें काढवून छापण्यासाठीं ‘ चित्रशाळा ’ हा शिळा छापखाना १८७७ सालीं काढला. या चित्रशाळेंत शिळेवर जशीं चित्रें काढीत तशीं मोडी व बाळबोध पुस्तकेंहि काढण्यांत येऊं लागलीं. हीं चित्रें व पुस्तकें विकण्यासाठीं स्वतंत्र योजना पाहिजे म्हणून १८७९ सालीं त्यांनीं ‘ किताबखाना ’ उघडला. शास्त्रीबोवांच्या तालमींत तयार झालेले कै. वासुकाका जोशी यांनीं ‘ चित्रशाळा ’ मोठ्या नांवरूपास आणून तिचा व्याप फारच वाढविला. आज पुण्यांत आर्यभूषण आणि चित्रशाळा हे विष्णुशास्त्र्यांनीं काढलेले छापखाने पहिल्या प्रतीचे म्हणून यथार्थतेनें गणले जातात.

चंद्रिका छापखाना—मालक बाळाजी दादाजी गुंड. १८८६ मध्यें ‘गदारि’ (रोगांचा नाश करणारा) या नांवाचें साप्ताहिक काढण्याकरितां काढलेला छापखाना. आयुर्वेदांतील उपचार व औषधतंत्राची माहिती देणारे लेख यांत येत असत.

अंबाप्रसाद छापखाना—१८८८ मध्यें चालू होता. यांत पुणें शहर भाग २रा हें पुस्तक छापले गेलें होतें.

आर्यभूषण छापखाना—‘ पुणें वैभव ’ नांवाचं वर्तमानपत्र १८८० सालीं निघालें. त्याचा स्वतःचा छापखाना होता. आठ दहा वर्षें चालून हें बंद पडलेलें दिसतें. या छापखान्याच्या आधीं कृष्णराव पांडुरंग भालेकर यांचा ‘ दनिबंधु ’ छापखाना होता. लो. टिळकांचे सहकारी माधवराव नामजोशी यांनीं ‘ किरण ’ व ‘ डेक्कन स्टार ’ हीं पत्रें चालविलीं होतीं. त्यांचा ‘ किरण ’ नांवाचा छापखाना होता व मांडे यांचा ‘श्री-शिवाजी ’ छापखाना होता. गहाण पडलेल्या ‘ किरण ’ छापखान्याचीं यंत्रें चिपळूणकर–टिळकप्रभृति ‘ केसरी ’ पत्र काढण्यास निघालेल्या उत्साही मंडळींनीं विकत घेऊन मोरोबादादाच्या वाड्यांत ‘ आर्यभूषण ’ छापखाना सुरू केला. १८८१ सालीं ‘ केसरी ’ व ‘ मराठा ’ हीं पत्रें या छापखान्यांत प्रसिद्ध होऊं लागलीं. नामजोशांचें ‘ डेक्कन स्टार ’ हें इंग्रजी पत्र ‘ मराठा ’ पत्रांत समाविष्ट करण्यांत आलें होतें. (The Maratha with which is incorporated the Deccan Star ” असें दर्शनी छापलेलें आढळतें). १८८७ पर्यंत हा छापखाना व पत्रें डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या मालकीचीं असत. ‘ केसरी ’ पुढें फक्त एकट्या टिळकांकडेच आल्यावर त्यांनीं ‘ आर्यभूषण ’ छापखान्याच्या फौंडरींत सुधारणा करून ग्रेट प्रायमरऐवजीं पायका टाइपांत केसरींत जास्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मजकूर देण्याची तरतूद केली. १९०५ सालीं आर्यभूषण प्रेस सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीकडे गेल्यावर टिळकांनीं स्वतंत्र 'केसरी' छापखाना काढला.

वेदान्तविषयक ग्रंथ छापण्यासाठीं 'वेदान्तप्रकाश' नांवाचा एक शिळा छापखाना १८८२ सालीं होता असें दिसतें. 'ज्ञानारविंद' पत्र 'सौजन्यमित्र' छापखान्यांत निघे. रावजी श्रीधर गोंधळेकर यांचे पुतणे गंगाधर गोविंद गोंधळेकर यांनीं 'भारतभूषण' छापखाना काढला होता तो १९१६ मध्यें विकला गेला. प्रि. गोपाळ गणेश आगरकर यांनीं 'केसरी' शीं संबंध सोडून १८८८ सालापासून 'सुधारक' पत्र सुरू केलें. रामचंद्र विष्णु फडतरे यांच्या मालकीचा सुधारक छापखाना असून तो १९२० सालीं विकला गेला.

आर्यविजय प्रेस—पुण्यास बुधवारांत बालाजीच्या देवळाजवळ शिराळकर बुकसेलर यांचें दुकान जुन्या मंडळींच्या आठवणींत असेल. या दुकानांत एक दुर्मुखलेले व चिडचिडे म्हातारे गृहस्थ त्यांनीं पाहिले असतील. दुकानांत कॉलेजांत लागणारींच पुस्तकें असत. या शिराळकरांनीं प्रि. वामन शिवराम आपटे यांचा संस्कृत इंग्रजी कोश छापण्यासाठींच म्हणून आर्यविजय छापखाना सुरू केला. कारण, आर्यभूषण छापखान्यांत श्री. लक्ष्मण रामचंद्र वैद्य यांचा असाच कोश छापणें चाललें होतें. या दोन छापखान्यांच्या चढाओढीमुळें आगाऊ ग्राहकांस एक रुपयास हे भारी कोश मिळूं शकले. हा छापखाना व पुस्तकांचें दुकान मालकाच्या मृत्यूनंतर बंद पडलें.

शेतकरी व न्यायाश्रय प्रेस—गणेश नारायण घोटवडेकर यांनीं श्री शेतकरी छापखाना 'शेतकी आणि शेतकरी' मासिक छापण्यासाठीं काढला होता. मराठी नाटकांची सुधारणा करण्यासाठीं झटणारे अनंत वामन बरवे यांचें 'पैसा मिळविण्याची युक्ति' हें पुस्तक १८९३ सालीं या छापखान्यांत निघालें आहे. १८९५ सालीं घोटवडेकर 'मंत्री' नांवाचें एक वर्तमानपत्र काढूं लागले. या स्थानिक पत्रांत पुण्यांतील न्यू इंग्लिश स्कूल, नेटिव्ह इन्स्टिट्यूशन व इतर शाळांतील अव्यवस्था, पुण्यांतील घडामोडी वगैरेंची माहिती सटीक येत असे.

पुण्याचे एक प्रसिद्ध सरदार त्रिंबक नारायण राजमाचीकर यांनीं मुंबई हायकोर्टांतील निवाडे प्रसिद्ध करण्याचा उद्योग शिवराम हरि साठे यांच्या समवेत १८६७ पासून सुरू केला होता. प्रथम जगद्धितेच्छु व नंतर 'पूना सिटी प्रेस' (१८७२) या छापखान्यांत ते पुस्तकें छापून घेत. त्यांचे चिरंजीव नरहर त्रिंबक यांनीं तो उद्योग पुढें चालू ठेवून त्याच्या जोडीला कायद्याचीं मराठीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याचें आरंभिलें. यासाठीं १८९१ सालीं त्यांनीं स्वतंत्र 'न्यायाश्रय प्रेस' काढला तो अद्यापि चालू आहे.

'काळा'चा मनोहर छापखाना—वृत्तपत्राच्या साधनानें टिळक आणि आगरकर यांनीं जें लोकजागृतीचें भरीव कार्य चालविलें होतें, तें पद्धीचे साहित्यिक व वक्ते शिवराम महादेव परांजपे यांनीं १८९८ सालीं पाडव्यास 'काळ' सुरू करून जोमानें पुढें नेलें. पहिल्या वर्षी 'काळ' जगद्धितेच्छु छापखान्यांत निघत असे. पण त्याला आपली बाधा लागूं नये म्हणून परांजपे यांनीं स्वतःचा 'मनोहर' छापखाना घातला. १९०८ सालीं 'काळ' बंद पडलें. पुढें या छापखान्यांत ते 'स्वराज्य' पत्र काढीत. शेवटीं या छापखान्याचें 'गोवर्धन' मध्यें रूपांतर झालें.

याप्रमाणें १९ व्या शतकांतील पुण्याच्या छापखान्यांचा त्रोटक इतिहास दिला आहे. हा देतांना पुरेशा माहितीचा व साधनांचा अभाव फार जाणवला. श्री. शंकर गणेश दाते यांनीं इ. स. १८०० ते १८३७ पर्यंतच्या मराठी ग्रंथांची जी मोठी सुमारें १५०० पृष्ठांची सूची साक्षेपानें संपादून प्रसिद्ध केली आहे, ती चाळून छापखान्यांची यादी तयार करावी लागली. १८६७ सालीं मुद्रित वाङ्मयाच्या तीन प्रती सरकारकडे पाठविण्याचा कायदा झाला. तेव्हां या सालानंतरच्या ग्रंथांची आणि छापखान्यांची समग्र माहिती सरकारी कचेऱ्यांतून मिळण्यासारखी आहे; पण त्यासाठीं परिश्रम घेऊन संशोधन केलें पाहिजे. चालू शतकांतील गेल्या ५० वर्षांतील छापखान्यांचा इतिहास लिहावयाचा झाल्यास तो फार मोठा होईल. वाङ्मय प्रकाशन या पन्नाशींत फार वाढलें आहे; व त्याचा नुसता आढावा घेऊं म्हटलें तरी कितीतरी वेळ व अभ्यासाचे श्रम खर्च करावे लागतील. तेव्हां तूर्त एवढेंच पुरें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रिम्स्टो लेटरहेड स्पर्धेचा निकाल



पहिलें बक्षीस—कल्पकला प्रिं. प्रेस सोलापूर.

१ प्रथम इनामः-- रु. ५१ कल्पकला प्रिंटिंग प्रेस–सोलापूर एन्ट्री नं २४

२ द्वितीय इनामः--रु. ३० ताज प्रिंटिंग वर्क्स मुंबई एन्ट्री नं. ३७

(एम्पी कॉरपोरेशन लि.)

दुसरें बक्षीस—ताज प्रिं. वर्क्स मुंबई.

सार्टीफिकेट ऑफ मेरिटः—

१ कल्पकला प्रेस—एन्ट्री नं. २० Three Bells

२ कल्पकला प्रेस—एन्ट्री नं. १९ लेटरहेड Servie Ligne

३ न्यू जॅक प्रिं. वर्क्स मुंबई—एन्ट्री नं. ३९ इंडस्ट्रिअल —ॲंड रिसर्च इन्स्टिटयूट लि.

परीक्षक

(१) श्री. रतनबात्रा–प्रेसिडेंट कमर्शिअल आर्टिस्ट गिल्ड ॲंड प्रो. स्टूडीयो रतनबात्रा

(२) श्री. देवकुळे–राशनल आर्ट सर्विस

(३) श्री. बास्तानवाला–प्रो. ताज प्रिंटिंग वर्क्स मुंबई

(४) श्री. देशपांडे–जी. क्लेरिज ॲंड कं. मुंबई

(५) श्री. परमेश्वरी–न्यू जॅक प्रिंटिंग वर्क्स लि. मुंबई.

परीक्षक सभा हमारी ऑफीसमें ठीक ३॥ बजेसे ५॥तक हुई थी।

आज मै अपना प्रिम्स्टो कॉंपीटीशनमें उत्तीर्ण होनेवाले भाईओंका नाम और प्रथम और द्वितीय प्राईस लेनेवाली एन्ट्रीओ इस पत्रके साथ आपको भेजते हैं और सर्टिफीकेट ऑफ मेरिट सिर्फ ३ एन्ट्रीओंको देनेका ठराया है क्यूं के अपने को चाहिये इतना जादा रिस्पॉन्स मिला नही इस लिये जादा एन्ट्रीको सर्टिफीकेट ऑफ मेरिट देनेकू असंभवित हुआ है। मेरी पास कुल ४३ एन्ट्रीओ आई थी। उनमेंसे १७ स्टॅंडर्ड वर्क कॉं हिसाबसे चून गई और वो मूव्हिंग एक्भीबीशन के लिये रखनेका विचार है। मेरी ऐसी रांय है की उनमेंसे अच्छी अच्छी एन्ट्री निकालके उन्हीका एक प्रदर्शन भरा जाय और वो प्रदर्शन एक चलता प्रदर्शन (Moving exhibition) बने और जो जिल्हेंमे अपना संघटन है वहा भेज दिया जायं और वो प्रदर्शन देखनेका सब मेम्बरका अवसर दिया जाय।

इस कॉंपीटीशनमें अपनी परिषदके उत्साही कार्यकर्ताओंनें बिलकुलही भाग लिया नही इस वजेसे मुझे दुःख हुवा है। और हम सब काम करनेके लिये बडी बडी बातें करतें है। लेकिन उपदेश देनेवाले जब कार्यका मोका मिले तब चूपचाप बैठते हैं तब अपना कार्य कब आगे बढेगा।

—प्रतापराय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इतिहासज्ञांच्या भांडारांतून

प्राध्यापक म. म. द. वा. पोतदार व प्रा. न. र. फाटक यांची मुद्दाम मुलाखत घेतली. १९ व्या शतकांत पुणें शहरांतील विविध व्यक्ति मुद्रण व प्रकाशन याकडे कोणत्या दृष्टीनें पाहात असत तें कळून घेण्याचे दृष्टीनेंच उभयतांशीं विचारविनिमय केला. दिलेल्या माहितीबद्दल आम्ही उभयतांचे फार आभारी आहोंत.

—संपादक.

म. म. पोतदार यांची मुलाखत

म. म. पोतदार यांचा पुस्तकसंग्रह पुष्कळ मोठा व काळजीपूर्वक लावलेला असल्यानें त्यांची भेट होतांच त्यांनीं विश्रामबागवाडा सरकारी छापखान्यांत छापलेला १८३१ सालांतील ' शब्दकोश ' पुरवणीचा ग्रंथ दाखविला व तोच पुणें शहरांतील प्राप्त होऊं शकणारा पहिला ग्रंथ होय. हा एवढा ग्रंथ $\frac{1}{4}$ क्राऊनमध्यें शिळाप्रेसवर काढलेला आहे. ह्या ग्रंथाचे पहिले दोन भाग मुंबईस १८२९ त छापलेले आढळले.

त्यानंतर १८४१ त पूना कॉलेज प्रेस (विश्रामबागवाडा, पाठशाळा सरकारी छापखान्याचें नवें नांव) मध्यें छापलेला $\frac{1}{2}$ डेमी साईजचा ' भूगोल खगोलविषयक प्रश्नोत्तरात्मक ग्रंथ ' आढळला. १८३१ मध्यें ह्या ग्रंथाची पहिली आवृत्ति काढलेली दिसते. हा ग्रंथ १६२ पानांचा असून त्यांत सर्व शास्त्रांच्या माहितीचे पाठ दिसून येतात.

१८४४ तील मित्रोदय साप्ताहिकाचे अंकांत विषय सहा असून देशाबद्दलचेही विचार त्यांत दिसतात. २ मार्च १८४४ ला मित्रोदयाचा पहिला अंक पुण्यांत निघालेला आढळला.

बुधवार पेठेंतील ज्ञानचक्षु प्रेसमध्यें छापलेले कांहीं ग्रंथ आढळतात.

१८४९ त ज्ञानप्रकाश सुरू झाला. १८८६ मध्यें ' गदारि ' नांवाचें वृत्तपत्र निघूं लागलें. त्याचे अंक म. म. पोतदार यांनीं दाखविले.

१९ व्या शतकाच्या दुसऱ्या भागांत पुण्यांतील जागृतीसंबंधीं बोलतांना म. म. पोतदार म्हणाले कीं देशसेवेच्या कल्पनेचा अंकुर पुणें शहरांत वाढण्याचे दृष्टीनें श्री. कृष्णशास्त्री, आगरकर, विष्णुशास्त्री, जांभेकर, लोकहितवादी, ज्योतिबा फुले, रानडे, सार्वजनिक काका या मंडळींचे मित्रमंडळींत बसणें, उठणें, कल्पना बोलणें यामुळें व परस्पर सहकार्याच्या वृत्तीमुळें पुस्तकप्रकाशन, चित्रेंछपाई, वृत्तपत्रें ह्या गोष्टी सुरू झाल्या. व त्यामध्यें पुण्याचें वैशिष्ट्य दिसून येतें. मनामधील चांगल्या व शुद्ध हेतूमुळेंच त्या काळांतील उद्योग अजून टिकून आहेत. त्यांतल्या उद्योगाची हौस म्हणजे सरकारी खात्यांतील कामें करून रात्रीच्या वेळीं किंवा सुटीच्या दिवशीं विनावेतनही खाजगी संस्थांतील कामें केलीं जात असत ही गोष्ट त्या वेळच्या मंडळींना भूषणावह आहे.

१८८८ मध्यें अंबाप्रसाद या छापखान्यांत छापलेलें पुणें शहर वर्णन भाग २ रा हा ग्रंथ पाहून शहराची माहिती छापलेली असावी ह्या कल्पनेला गेल्या शतकांतही स्थान होतें असें दिसतें. म. म. पोतदार यांच्या जवळील ग्रंथसंग्रहावरून असें अनुमान काढतां येतें कीं १८३० ते १८५० पर्यंत लिथो प्रेसवर पुस्तकें काढलीं जात. त्यानंतर १८८० पर्यंत टाइपाचा प्रसार होता. त्यानंतर पुन्हां १९०० पर्यंत लिथो प्रेसवर पुस्तकें छापण्याची खटपट झाली. छापखान्याच्या प्रत्यक्ष तंत्राबद्दल वा साहित्याबद्दल वा व्यवस्थापनाबद्दल १९ व्या शतकांत विचार झाला नसावा असें वाटतें. वृत्तपत्रछपाईमध्यें मांडणी, टाईप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याबद्दलही औत्सुक्य दिसत नाहीं. १८९४ मध्यें सत्य-प्रकाश छापखान्यांत छापलेल्या विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या चरित्रग्रंथांत दिलेलीं चित्रें म्हणजे प्रत्यक्ष फोटोग्राफच्या म्हणजे ब्रोमाईड कागदावरील फोटो चिकटवून दिलीं आहेत. चरित्रांत फोटो हवेत, पण त्या वेळीं ब्लॉक्सची कल्पना अवगत नसल्यामुळेंच अशी खटपट करावी लागली.

मुद्रणधंद्याबाबतच्या पुण्यांतील घडामोडींबद्दल बोलतांना पोतदार म्हणाले कीं, '१८५० पासून पुढें पुण्यांत बरीच जागृति झाली व प्रामुख्यानें नवें शिक्षण सुरू झालें. त्यामुळें सर्व विषयांवरील ग्रंथ छापले गेले होते, असें दिसतें. वृत्तपत्राविषयीं आस्था वाढली.'

'पुण्यांत ज्ञानप्रकाश १०० वर्षें चालून बंद पडला ही गोष्ट मात्र पुणें शहराच्या कीर्तीला व कर्तृत्वाला कमी-पणाची झाली. आम्ही सर्वपक्षीय शिष्टमंडळ नेऊन चालू करण्याचा विचार केला, पण पुढें येऊन 'मी चालवितों म्हणणारा कोणी निघाला नाहीं.' मला पुण्यांतील ज्ञान-प्रकाश बंद पडण्याची घटना दुःखद वाटली.'

प्रा. न. र. फाटकांची मुलाखत

प्रा. न. र. फाटक ह्यांचा इतिहासकालाचा अभ्यास दांडगा! त्यांतील घडामोडींचें स्मरणही दांडगें! व कोणींही मांडलेल्या विषयाबद्दल आपलें मत निःस्पृहपणें खेळीमेळीनें बोलण्याची तयारीही विशेष! या सर्व गोष्टीं-मुळें चित्रमयजगत्चे श्री. देवगिरीकर यांनींच त्यांचें नांव सुचविलें. त्यांचेशीं बोलण्याभेटण्याची योजना विचारतांच ठरलेल्या दिवशीं त्यांनीं आपला वेळ मोकळा ठेवून आम्हांला सहज रीतीनें पुढील माहिती दिली.

त्यांचेशीं बोलण्यांतील प्रमुख विषय १९ व्या शतकां-तील पुढारी गणले गेलेल्या वा इतर मंडळींचा मुद्रण-धंद्याबद्दलचा दृष्टिकोण काय होता, त्याबाबत सुरुवात करतांना प्राध्यापक म्हणालेः—

इ. स. १७९५–१७९८ च्या दरम्यान पुण्यांत तांब्याच्या पत्र्यावर पंचोपाख्यानांचीं पानें कोरलेलीं आढळ-तात. पण त्यावरून प्रती काढण्याची कल्पना किंवा लोकां-मध्यें ज्ञानप्रसाराचा विचार पेशवे मंडळी करूं शकली नाहींत असें दिसतें.

नंतर पुण्यास स्थापन झालेल्या इंग्रज सरकारच्या छापखान्यांत पोटभरू लोक कामाला होते व सरकारी योजनेप्रमाणें यांचीं कामें चालत.

लोकहितवादी श्री. देशमुख हे सरकारी नौकर! परंतु त्या नौकरींतून ज्ञानप्रसाराची त्यांची चळवळ जोरांत होती. १८४८ त पुणें नगरवाचन मंदिर काढलें व त्या-नंतर प्रभाकर साप्ताहिकांत त्यांचे लेख होते. त्यांच्या बदलीच्या प्रत्येक गांवीं त्यांनीं वाचनालयें काढलीं. अहमदा-बादला तर त्यांच्या हातानें सुरू झालेल्या अनेक शिक्षण व वाचनालय संस्था आज हयात आहेत.

१८४९ मध्यें **कृष्णशास्त्री चिपळूणकरांनीं** ज्ञान-प्रकाश काढतांना मुद्रणाच्या उपयोगाबद्दल बराच अभ्यास केल्याचें त्यांच्या लेखनावरून दिसतें. हिंदुस्थानांत इंग्रज व पोर्तुगीज यांनीं घातलेल्या छापखान्याकडे त्यांचें फार बारीक लक्ष होतें. त्यांना प्रथम मिळालेल्या देवनागरी टाइपांत जोडाक्षरें नव्हतीं, तेव्हां जोडाक्षरें मिळेपर्यंत त्यांनीं ज्ञानप्रकाशमधील लेख बिनजोडाक्षरी लिहिले होते. त्यानंतर त्यावेळची सरकारी पुस्तकें ज्ञानप्रकाशमध्यें छापा-वयास स्वीकारलीं होतीं.

इतिहासाचे श्रेष्ठ व निस्सीम अभ्यासू विद्वान् **वि. का. राजवाडे** यांनीं इतिहासाच्या प्रस्तावनेंत स्पष्ट म्हटलें कीं, 'आम्ही मागें राहिलों याचें कारण जगांत निर्माण झालेल्या मुद्रणकलेचें ज्ञान आम्हीं करून घेतलें नाहीं. जगांतील विचारप्रसाराचें व ज्ञानप्रसाराचें हें महत्त्वाचें साधन आमच्यापासून फार काळ दूर राहिलें. हीच गोष्ट आमच्या मागासलेलेपणास प्रमुख कारण आहे. त्या कलेच्या वृद्धीचा बोध आम्हीं घेतला नाहीं.'

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं तर मुद्रणकलेच्या उपयोगाचें रहस्य सर्व बाजूंनीं जाणून शिक्षणाच्या नव्या योजना करून चित्राकरितां चित्रशाळा, ज्ञानप्रकाश वा इतर छपाईकरितां आर्यभूषण, पुस्तकविक्रीकरितां किताब-खाना ह्या आजही उत्तम स्थितींतील असलेल्या संस्था सुरू केल्या. त्यांची मुद्रणकला ही गस्तवाल्याप्रमाणें लोकांना नेहमीं जागरूक ठेवूं शकेल. कै. चिपळूणकरांनीं आपल्या मित्रमंडळींतूनच ह्या कार्याकरितां माणसें घेतलीं, हें विशेष होतें.

ह्याच काळांत श्री. माधवराव नामजोशी यांनीं किरण साप्ताहिक हें मराठी व डेक्कन हेरल्ड हें इंग्रजी साप्ताहिक सुरू केलें. हीं साप्ताहिकें फार काळ चाललीं नाहींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांकरितां काढलेला छापखाना कै. चिपळूणकरांनीं घेतला. तोच आर्यभूषण प्रेसचा पाया होता.

त्या वेळच्या श्री. शिराळकर नांवाच्या गृहस्थांनीं स्पर्धेसाठीं आर्यवैभव नांवाचा प्रेस काढला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत मुद्रणधंद्यामध्यें लक्ष घालणारी पुण्यांतील मंडळी अशा स्पर्धेनेंही धंदा करीत असत. ह्या मुद्रण धंद्याच्या द्वारें ज्ञानप्रसार झटपट होतो, याबद्दल प्रत्येक क्षेत्रांतील पुढारलेल्या माणसाला कल्पना होती. पुण्यांतच १८६० च्या सुमारास क्विनाईन हें औषध 'मंतरलेलें भस्म' म्हणून घेतलें जाई. आगगाडींत बसतांना एंजिनची खाणारळानें ओटी भरून गाडींत बसत. असल्या प्रकारचे भ्रम सुशिक्षित मंडळींतून नाहींसे होण्यास मुद्रणकलेचा उपयोग झाल्याचें प्रत्येक विद्वान् सांगत आला आहे. पुण्यांत १८९० नंतर खुळ्या लोकभ्रमांचा प्रसार आढळत नाहीं.

सर्वसाधारण लोकांबद्दल इतकेंच कीं धार्मिक ग्रंथ-वाचनाची आवड फार व त्यामुळें छापलेला ग्रंथ भक्ति-भावानेंच घेण्याची कल्पना जास्त ! आपल्या लोकांचा पुराणमतवादीपणा नष्ट होण्यास मात्र धार्मिक ग्रंथांच्या केवळ पारायणाचा उपयोग नव्हता. वास्तविक ज्ञानाचें भांडार असे संस्कृत वेद-ग्रंथ १८५७ सालांत इंग्लंडांत छापले. रशियांतही पिट्सबर्गला १८५५ ते १८७० च्या काळांत संस्कृत कोश इत्यादि ग्रंथ तयार झाले होते. ही गोष्ट पुण्यांतील अनेक पुढाऱ्यांनीं जाणली होती.

लोकमान्य टिळक या बाबतींत अग्रेसर होते. त्यांनीं मराठी टाइपाबाबत प्रयोग केले. सामाजिक सुधारणां-बाबत त्यांनीं दुर्लक्ष केलें. परंतु सार्वजनिक 'अन्नपूर्णागृह' यासारख्या सुधारणेबद्दल योग्य ते विचार त्यांनीं प्रकट केले होते. संस्कृत ग्रंथ छापल्यामुळें ते शूद्रांच्या हातांत जातात, असल्या ज्ञानप्रसाराला अडथळा आणणाऱ्या वृत्ति नष्ट करण्याची त्यांची खटपट फार ! लोकमान्य टिळकांच्या कल्पना फार मोठमोठ्या होत्या. केसरीच्या छपाईकरितां आणलेल्या नव्या छपाईयंत्राचें त्यांना पूर्ण ज्ञान होतें. त्यांनीं 'यंत्रकला' या विषयावर लिहिलेल्या इंग्रजी पुस्तकाचें गोरवपूर्ण परीक्षण मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडिया आलें होतें.

पुण्यांत महादेव चिमणाजी आपटे यांना स्वतःच्या उत्तरायुष्यांत उपरति होऊन केवळ संस्कृत वाङ्मयाच्या प्रसारार्थ त्यांनीं आनंदाश्रम या संस्थेची स्थापना केली व त्याची जाहिरात १८९३ च्या केसरींत दिली होती. या आनंदाश्रमामार्फत अनेक जुने संस्कृत ग्रंथ प्रकाशित झाले.

१८९४ चे पुढें बळवंत गणेश दाभोळकर नांवाचे गृहस्थ पुण्यांत प्रकाशक होऊन १२५ वर प्रकाशनें त्यांनीं केलेलीं आढळतात.

खंडेराव बेलसरे नांवाच्या गृहस्थांनीं पुण्यांतच शेक्स-पीयरच्या संबंध वाङ्मयावर परीक्षणात्मक वाङ्मय निर्माण करण्याचा मानस जाहीर करून उद्योग सुरू केला.

ग. व्यं. जोशी यांचा अर्थशास्त्रावरील लेखांचा संग्रह, त्याचप्रमाणें गणेश विष्णु चिपळूणकर यांचा भागवत भाषांतराचा उद्योग हे पुण्यांतील विशेष उद्योग आहेत.

गोपाळ कृष्ण गोखले यांनीं १९०५मध्यें सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीच्या स्थापनेनंतर आर्यभूषण प्रेस सोसायटी-कडे घेतला. तो चालविण्यासाठीं पुण्यांतील त्या वेळचे उत्तमोत्तम असे सव्वाशेंपर्यंत कामगार त्यांनीं कामावर घेतले. त्यांना पुरेसें काम नाहीं असें दिसतांच धार्मिक ग्रंथांचे छपाई कामाचा आधार त्यांनीं सर्वांना दिला. ते ग्रंथ थोडक्या किंमतीस देण्यासाठीं जास्त प्रती काढण्याचें त्यांनीं ठरवून दिलें.

मुद्रणालयाच्या तंत्राकडे लक्ष देणारे पुढारी फक्त लोकमान्य टिळकच दिसतात. बाकीच्या पुढाऱ्यांत ज्ञान-प्रसाराचें साधन म्हणून वृत्तपत्रें, नियतकालिकें, ग्रंथ यांच्या प्रकाशनाबद्दल सर्वसाधारण जागरूकता आढळते. पण या धंद्याच्या वाढीकरितां लागणारे प्रयत्न, संशोधनयोजना करण्याबाबत कसलीही योजना १९ व्या शतकांत विशेष-त्वानें झालेली सांगतां येणार नाहीं.

———

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जगद्धितेच्छु छापखाना

गोंधळेकर कुटुंबाच्या तीन पिढ्यांचें कार्य

इ. स. १८६० ते इ. स. १९२५

संग्राहक व लेखक–श्री. ज. गानू, राजगुरु प्रेस.

संस्थापक रावजी श्रीधर
चिरंजीव केशव रावजी
चिरंजीव दत्तात्रय केशव
चिरंजीव जनार्दन दत्तात्रय

आपलेकडे मुंबई येथें सन १८०५ ते १० चे सुमारास मुद्रणाची कला प्रथम कांहीं ख्रिश्चन मिशनरी लोकांनीं सुरू केली, व त्यांचेकडूनच ती आपले लोकांस अवगत झाली असें दिसतें.

त्यानंतर महाराष्ट्रांत जे छापखाने सुरू झाले त्यांत पुणें येथील जगद्धितेच्छु छापखाना हा एक प्रमुख असून सन १९२२ सालापर्यंत त्याचें स्थान पुण्यांत व महाराष्ट्रांत बरेंच श्रेष्ठ दर्जाचें असें होतें.

किर्लोस्कर नाटक मंडळी ही जशी अनेक कंपन्यांची जननी होती. छत्रे यांचे सर्कशींतून जशापुढें अनेक सर्कशी महाराष्ट्रांत निघाल्या, पैसाफंड कांचकारखान्यांतून शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनीं पुढें अनेक कांच-कारखाने महाराष्ट्रांत व महाराष्ट्राबाहेरचे प्रांतांत सुरू केले, त्याचप्रमाणें त्याकाळीं जगद्धितेच्छु छापखाना हें पुण्यांतील व पुण्याबाहेरील अनेक छापखान्यांचें स्फूर्ति-स्थान बनलें होतें. म्हणूनच त्याचा वृत्तांत आम्ही पुढें देत आहों.

कुलवृत्तान्त व मूळ ठिकाण

सदर छापखान्याचे मूळसंस्थापक कै. रावजी श्रीधर गोंधळेकर हे मूळचे कोंकणांतले असून ते त्या गांवचे खोत होते. त्यांचा जन्म मु. गोंधळें, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी येथें सन १८३१ सालीं झाला. त्यांचें जुन्या पद्धतीचें मराठी, संस्कृत व धार्मिक असें सर्व शिक्षण त्यांचे गांवींच झालें. त्यांस इंग्रजी मात्र येत नसे. तो काळ ब्रिटिश अमदानीचे सुरवातीचा असल्यामुळें, सरकारी नोकरी मिळणें हें सोपें व लोभनीय असें सुशिक्षित पांढरपेशाचे वर्गास वाटत असे. रा. रावजी श्रीधर हे वयाचे १९–२० वे वर्षी कोंकणांतून देशावर नोकरीसाठीं आले, व ठाणें जिल्ह्यांत दरमहा रु. ३ पगारावर सरकारी मोजणीखात्यांत त्यांनीं कारकुनाची नोकरी पत्करली.

आरंभींचा व्यवसाय

परंतु एवढ्यावरच संतुष्ट न राहतां कांहीं तरी उद्योग व्यवसाय करावा, व तोही विद्याव्यासंगाचा असावा, असें त्यांचे मनास वाटत असल्यामुळें प्रथम कांहीं दिवस नौकरी संभाळून व पुढें नौकरी सोडून देऊन मुंबईस गिरण्यांचे वस्तींत छोटीं छोटीं धार्मिक पुस्तकें, अभंग, पंचांगें अशांची विक्री करण्यास, त्यांनीं फेरीवाल्यापासून सुरुवात केली. या कामीं त्या काळचे मुंबईतील प्रकाशनव्यव-सायांतले पुढारलेले व श्रीमंत व्यापारी रा. हिंगिष्टे, जुगुष्टे व खातू अशा मंडळींचें त्यांस चांगलें साह्य व प्रोत्साहन मिळाल्यानें त्यांचा त्या व्यवसायांत बरा जम बसला. कांहीं वर्षे पंढरपूर वगैरेसारख्या क्षेत्रांच्या यात्रेच्या ठिकाणीं स्वतः भाड्याचे बैलगाडींतून पुस्तकें व पोथ्या, विक्री-साठीं नेऊन तेथें महिना पंधरा दिवस मुक्काम करून व विक्री करून परत येतां जातां वाटेंत ज्या ज्या गांवीं मुक्काम पडेल, त्या त्या ठिकाणीं ग्रंथांची विक्री केली, यामुळें त्यांस जनतेचे मनाची व धार्मिक प्रवृत्तीची ओळख होऊन या व्यवसायांत पुढें पाऊल टाकण्याची ईर्षा उत्पन्न झाली व धंदा-उद्योगासाठीं स्थायिक असें ठिकाण निवड-तांना, त्यांनीं पुणें शहराची निवड करून सन १८५८ चे सुमारास पुणें येथें बुधवार चौकांत रावजी श्रीधर गोंधळे-कर यांचा बुकडेपो, या नांवाचें पुस्तकविक्रीचें दुकान सुरू केलें.

कै. श्रीधर व्यंकटेश केतकर यांनींही आपले आजोबा हस्तलिखित जुने संस्कृत ग्रंथ व पोथ्या बरोबर घेऊन व बैलगाडीनें गांवोगावीं प्रवास करून ग्रंथविक्री करीत असत, असा उल्लेख एके ठिकाणीं केलेला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कै. रावजी श्रीधर गोंधळेकर
संस्थापक—जगद्धितेच्छु

★

कै. केशव रावजी गोंधळेकर
४० वर्षे छापखाना चालविला



४	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]	[illegible]
५.	७९	११	१०	११	१६१	[illegible]	९०	२५	५५	३२	१९३	३५	२७२	४२	२१०	४७	४८	५३	१०४
६	१९१																		

वाचकांस सूचना.

हें पुस्तक सांप्रतच्यांत वाचण्यास उपयोगी पडावें म्हणून कापिचे आईन जेथें नरवी घालतात त्या ठिकाणीं तुपाचा उपयोग करून छापण्याचा निश्चय केल्याप्रमाणें श्रीगुरुकृपें करून आज ग्रंथ समाप्त झाला. ही पुस्तकें फुलस्केप कागदावर छापली आहेत. त्याची किंमत रुपये ८ व डेमी जाड कागदावर छापली आहेत त्याची किंमत ६।८ या प्रमाणें ठेविली आहे. दोन्ही पुस्तकें [illegible] असून फक्त कागदाचें मानानें किंमतींत फरक आहे.
हें पुस्तक मुक्काम पुणें पेठ सदाशिव नंबर ५६९ चे वाड्यांत नारायण आपाजी गोडबोले याणीं आपले वृत्तप्रसारक छापखान्यांत छापिलें. आवृत्ति ४
शालिवाहन शके १७९३ प्रजापतिनाम संवत्सरे तारीख २१ माहे डिसेंबर सन १८७१ इसवी. ते दिवशीं श्रीगुरुचरित्र समाप्त.

पुण्यांतील इ. स. १८७१ मधील छपाई

त्या शाईंत छापलेलें गुरुचरित्र, ह्या पोथींतील मुद्रणालयाचें व प्रकाशकाचें नांव (शं. ह. मुळे यांच्या संग्रहांतील पोथीचा घेतलेला उतारा)

कै. अ. वि. पटवर्धन
आर्यभूषण प्रेस

गु. कै. विष्णु गोविंद काशीकर
उत्तम लिथो आर्टिस्ट



कै. ल. भा. कोकाटे
हनुमान छापखाना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रा. रावजी श्रीधर हे अशा ग्रंथविक्रीचे प्रवासास निघाले म्हणजे बरोबर २ बैलगाड्या (१ ग्रंथांचे पेटारे ठेवणेसाठीं व दुसरी माणसांस बसण्यासाठीं), १ कारकून १ गडी अशा पद्धतीनें प्रवास करीत. ज्या गांवीं मुक्काम पडेल त्या गांवचें एकादें प्रमुख अशा देवळांत ते जवळच्या विक्रीसाठीं असलेल्या ग्रंथांपैकीं एकाद्या ग्रंथाचें वाचन रोज सुरू ठेवून, गांवची मंडळी त्या निमित्तानें देवळांत जमली, म्हणजे आपलेपाशीं असलेल्या ग्रंथांची जाहिरात करीत व त्यानंतर विक्री सुरू होत असे. गांवची वस्ती लहान–मोठी असेल त्या मानानें तेथें मुक्काम कमीजास्त होऊन, पुढील मार्गक्रमणा सुरू होई. त्या प्रवासांतलें त्यांनीं स्वहस्तीं लिहिलेले कांहीं हिशोब आजही त्यांचे घरीं उपलब्ध आहेत.

पुण्यांत स्थायिक दुकान व प्रेस सुरुवात

पुण्यांत आल्यावर सुरवातीस त्यांचें राहण्याचें ठिकाण शनवारांत मेहुणपुऱ्यांतील श्रीमंत सरदार राजमाचीकर यांचा वाडा हें होतें. तेथेंच राजमाचीकर यांचे मदतीनें सन १८६० सालीं अत्यंत अल्प प्रमाणावर असा एक छोटा हातानें चालविला जाणारा शिळा प्रेस जगद्धितेच्छु या नांवानें सुरू करून, त्यांचे मनांत संकल्पित असलेलीं धार्मिक पुस्तकें छापण्याचें काम सुरू झालें, व त्याचें जोडीस श्रीमंत राजमाचीकर यांनीं नुकतेंच सुरू केलेल्या न्यायाश्रय मासिकाचे अंक छापणेंचें कामही सुरू झालें.

अंकांत काय वाचाल ?

- पुण्यांतील मुद्रणालयांचा इतिहास,
- थोर लोकांचीं मतें,
- मुद्रक वृद्धांच्या आठवणी,
- अनुकरणीय मुद्रणालयें,
- भारतीय रसायन शाळा,
- टाईप निवडींतील धागेदोरे ,
- ऑफसेट कीं अक्षरमुद्रण ?
- संशोधन कार्य, इत्यादि.

प्रकाशनें

याप्रमाणें छापखाना व पुस्तकविक्रीचें दुकान असे एक दुसऱ्यास पूरक असे व्यवसाय त्यांनीं मोठ्या जोमानें सुरू केले. सदर छापखान्यांतून सुरवातीस छापून प्रसिद्ध केलेल्या कांहीं ग्रंथांची यादी खालीं देत आहे. (१) सार्थ मत्स्यपुराण, (२) मार्कंडेय पुराणसार, (३) वामनपुराण, (४) लिंगपुराण, (५) भारतसार ३ भाग (मराठींत), (६) सूपशास्त्र, (७) शिवस्वरोदय, (८) व्रतराज शांतिकमलाकर, (९) वाक्यवृत्ति (वेदान्तपर ग्रंथ), (१०) कीर्तनतरंगिणी भाग १ ते ४, (११) दासबोध, (१२) हरिविजय, (१३) संस्कृत सटीक पंचदशी, (१४) गीताभाष्य (संस्कृत), (१५) सार्थपंचदशी (गर्दे कृत), (१६) योगतत्त्वामृत वगैरे. तसेंच देवादिकांचीं कांहीं ५।७ रंगांत छापलेलीं चित्रें हीं विक्रीसाठीं तयार केलीं. त्यांत मुख्यतः **रामपंचायतन**, शिवपंचायतन, बालाजी–मारुती अशीं चित्रें होतीं. याशिवाय अनेक लहानमोठे धार्मिक ग्रंथ, सालोसालचीं पंचांगें प्रथम कांहीं वर्षे शिळा प्रेसवर व पुढें टाइपांत छपाई करून प्रसिद्ध केलीं ; त्यांपैकीं कांहीं पुस्तकांच्या पुढें १०, १२ वा १५, अशाही आवृत्त्या निघाल्या.

दुकान मुंबई शाखा

गोंधळेकर बुकडेपोची एक शाखा मुंबईस काळबादेवी रामवाडीचे नाक्यावर होती व ती सुमारें ४०।५० वर्षे चालू होती. पुणें येथील धंद्याचा व्याप वाढल्यामुळें सन १९१५ सालीं रावजी श्रीधर यांचे मृत्यूनंतर मुंबईचें दुकान बंद करून पुण्यास आणलें गेलें.

पंढरपूर दुकान

पंढरपुरासही त्यांचें एक दुकान कायमचें घेऊन ठेवलेलें होतें, परंतु तें फक्त यात्रांचे दिवसांत वर्षातून २।३ वेळां १०–१५ दिवस चालू असे व इतर वेळीं तें बंद असे.

छापखाना व बुकडेपो यांची व्यवस्था नीट लागल्यावर सन १८७७ चे सुमारास जगद्धितेच्छु नांवाचें साप्ताहिक वर्तमानपत्र सुरू केलें व तें पुढें २५–३० वर्षे चालू होतें. तें दर शनिवारीं प्रसिद्ध होत असे.

जगद्धितेच्छु साप्ताहिक

सदर वर्तमानपत्राचीं २०" × २७" आकाराचीं ४ पानें असत, व प्रत्येक पानांत ७ कॉलम असत. मजकुरासाठीं ग्रेट प्रायमर टाइप वापरीत असत व येवढ्या मोठ्या वर्तमानपत्राची वार्षिक वर्गणी अवघी १ रुपया असे. (ट. ख. १३ आणे वेगळा.)

सदर साप्ताहिकाचें संपादकत्व केलेल्या कांहीं व्यक्तींचीं नांवें खालीं देत आहे.

(१) रा. नारायण धोंडदेव जोशी (वाई)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) रा. बळवंत रामचंद्र पाटील (हैदराबाद)
(३) प्रो. चिंतामण गंगाधर भानू (पुणें)
(४) रा. रामचंद्र वि. टिकेकर ऊर्फ धनुर्धारी(सोलापूर)
(५) रा. कृष्णाजी नारायण आठल्ये ऊर्फ केरळकोकिळ
(६) रा. हरी गंगाधर पतकी (शेवटचे)

सदर साप्ताहिकांत धार्मिक, सामाजिक व राजकीय अशा अनेक विषयांवर लेख व माहिती येत असे. व नुकसान सोसूनही रा. रावजी श्रीधर यांनीं लोकहितैक दृष्टीनें तें चालू ठेवलें होतें. शेवटीं कांहीं वर्षें त्याची वा. वर्गणी ०-८-० ही करून पाहिली. परंतु वर्गणीदारांची संख्या खूपच घटत गेल्यामुळें तें १९०७ सालीं बंद करण्यांत आलें.

टाईप फौंड्री

स्वतःची टाईप फौंड्री नसल्यामुळें प्रथमतः बरींच वर्षें दुसऱ्या फौंड्रीचा टाईप विकत घेऊन छपाईचें काम केलें जाई, नंतर मुंबई येथील सांज वर्तमानपत्रांतील बळवंत शहाजीराव देशमुख यांचेकडून फौंड्रीचें सामान तयार करून घेऊन ती पुण्यास आणली व १९०५ सालीं जगद्धितेच्छु प्रेसची स्वतःची टाईप फौंड्री सुरू झाली, १८९९ सालचे सुमारास बडोदा येथें ही फौंड्री तयार करण्याचा प्रयत्न केला गेला होता, परंतु तो फलद्रुप होऊं शकला नाहीं.

जगद्धितेच्छु फौंड्रींतील टाईप वळणांत सुबक व रेखीव असा असल्यामुळें अनेक फौंड्रींमध्यें त्याचा नंबर बराच वरचा लागे. महाराष्ट्रांतून व महाराष्ट्राबाहेरील अनेक प्रमुख शहरांतून त्यांचे टाइपास चांगली मागणी असे, व घरचें काम संभाळून ती पुरी पाडणें मोठें कठिण होत असे. (आज ही फौंड्री पुण्यांत रामेश्वर टाईप फौंड्री या नांवानें रानडे कॉन्ट्रॅक्टर हे चालवीत आहेत.)

प्रेस व राहण्यासाठीं जागा

राहातेघराशेजारींच राजमाचीकरांचे तोंडाशीं डाव्या कोपऱ्यावरील मोरोबादादा फडणीस यांचा वाडा असलेली जागा विकत घेऊन त्या ठिकाणीं छापखान्यासाठीं प्रशस्त अशी दुमजली इमारत बांधली व त्यांचे समोरचें दुसरें एक घर विकत घेऊन व त्याची जरूर ती दुरुस्ती करून रा. रावजी श्रीधर आपले स्वतःचे घरीं राहण्यास आले.

अशा तऱ्हेनें छापखान्यासाठीं व राहण्यासाठीं समोरासमोर अशा २ सुंदर इमारती स्वतःच्या मालकीच्या झाल्या–दुकान मात्र शेवटपर्यंत बुधवारांत भाड्याचेच जागेंत होतें. त्या काळीं पुण्यामुंबईबाहेर बडोद्यासारख्या राजधानीचे शहरीं देखील उत्तम छपाई करून मिळण्याचीं साधनें उपलब्ध नसल्यामुळें बडोदा दरबारतर्फें प्रसिद्ध होणारें बरेचसें काम पुण्यांतून जगद्धितेच्छु छापखान्यांतून करून घेतलें जात असे.

बडोदें संस्थान संबंध

श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांचे कारकीर्दीत **भारतसार** हा ग्रंथ सुबक छापून प्रसिद्ध केला. व रा. रावजी श्रीधर यांस बडोद्यास मुद्दाम बोलावून दसऱ्याचा दरबार भरल्याप्रसंगीं त्यांस सोन्याचा कंठा, शाल व रोख रुपये १५०० देऊन त्यांचा सन्मान करून त्यांचेबद्दल व छापखान्याबद्दल श्रीमंत मल्हारराव यांनीं प्रशंसोद्गार काढले. पुढें १८९० सालीं श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचा पुणें येथें मुक्काम असतांना रा. रावजी श्रीधर यांनीं त्यांस आपले घरीं पानसुपारीस बोलावून त्यांस छापखाना व प्रकाशनसंग्रह दाखविला व तो पाहून श्रीमंत सयाजीरावही फार खूष झाले. व या प्रसंगानें बडोदें संस्थानशीं असलेला छापखान्याचा संबंध दृढतर झाला.

बडोदा संस्थानांतील सर्व खात्यांतून लागणारे छपाई-काम त्यांचे स्वतःचे छापखान्यांतून (स्टेटप्रेस) करून घेतले जात असे, परंतु वरचा देखरेखीचा व ऑफिसचा खर्च होऊन तें काम बरेंच महाग पडे. त्यापुढें सर्व काम कॉन्ट्रॅक्ट पद्धतीवर देणेचें ठरवून पहिलीं ३ वर्षें सन १८९६ ते ९९ या मुदतींत तें कॉंट्रॅक्ट रा. रावजी श्रीधर यांस देण्यांत आलें. सरकारी शेड्यूल्ड दरापेक्षां ४१$\frac{1}{4}$ टक्के कमी दरानें करून देण्याचें कबूल करून त्यांनीं तें उत्तम प्रकारें पार पाडलें.

अशा तऱ्हेनें बडोदा दरबारशीं आलेला या छापखान्याचा संबंध पुढेंही अनेक वर्षें उत्तम प्रकारें चालू होता.

दिल्ली दरबार

सन १९११ सालीं त्या वेळचे गव्हर्नर जनरल लॉर्ड कर्झन यांनीं दिल्लीस एक मोठा दरबार भरविला होता व सर्व संस्थानिक व देशांतील बडे बडे सरदार व विद्वान् लोक यांस त्या प्रसंगीं निमंत्रण होतें. पुण्यांतून वर्तमान-पत्रांचे प्रतिनिधि म्हणून ज्ञानप्रकाश व जगद्धितेच्छु या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्राचे संपादकास निमंत्रण आलें, त्याप्रमाणें रा. रावजी श्रीधर यांनीं दिल्लीचे प्रवासाची तयारीहि केली होती, परंतु ऐन वेळीं वयोमानाप्रमाणें त्यांची प्रकृति बरीच बिघडल्यामुळें ते जाऊं शकले नाहींत. त्यांनीं आपले पत्राचे प्रतिनिधी म्हणून त्यांचे अत्यंत घरोब्याचे व निकटवर्ती स्नेही नुकतेच १९५१ सालीं कैलासवासी झालेले श्रीमंत सरदार नरहर त्रिंबक ऊर्फ दादासाहेब राजमाचीकर बी. ए. यांस संपादक म्हणून दिल्ली दरबारासाठीं पाठविलें. त्यांचेबरोबर शनवार पेठेंतील प्रसिद्ध व्यक्ती कै. काका मोडक हे सहसंपादक व कै. रा. मामा हसबनीस हे त्यांचे दिमतीस म्हणून गेले होते.

सन १९०२ चे सुमारास त्यांचे पुतणे रा. गंगाधर गोविंद ऊर्फ बाबुराव गोंधळेकर हे त्यांचेपासून वेगळे झाले, व पुढें १९०६ सालीं त्यांनीं भारतभूषण नांवाचा स्वतःचा छापखाना बुधवारांत पॅरामाऊंट टॉकीजचे अलीकडील बोळांत सुरू केला. तो ५।६ वर्षें चालू होता. त्यांचे प्रेसचे सर्व प्रकारचें पुस्तकांचें काम छापलें जात असे.

धंद्यांतून निवृत्त

रा. रावजी श्रीधर हे शेवटचीं ८।१० वर्षें छापखान्याचे व्यवहारांत विशेष लक्ष घालीत नसत. प्रकृति स्वास्थ्यासाठीं अधून मधून ते कोकणांत जाऊन राहात असत, त्यामुळें १९०१ सालापासून छापखाना, दुकान व प्रकाशन वगैरेंची सर्व व्यवस्था त्यांचे चिरंजीव रा. केशव रावजी गोंधळेकर ऊर्फ बाबासाहेब पाहूं लागले.

त्यांचें मराठी व इंग्रजी शिक्षण पुण्यास झाल्यावर फौंड्री कामाची जातीनें माहिती मिळविण्यासाठीं त्यांस कांहीं दिवस मुंबईस निर्णयसागर प्रेसमध्यें ठेवण्यांत आलें होतें. व त्या ठिकाणीं सर्व कामें स्वतः हातानें करून फौंड्रीसंबंधीं व छापखान्यासंबंधीं आवश्यक ती सर्व माहिती त्यांनीं मिळविली होती.

रा. केशवराव

रा. केशवराव यांस जवळची नात्याची मंडळी तान्ह्या मामा व बाहेरची मंडळी बाबासाहेब म्हणत असत. ते स्वभावानें कडक शिस्तीचे व करारी वृत्तीचे, स्वतः अत्यंत टापटिपीनें वागणारे व इतरांस तसें वागण्याबद्दल आग्रहानें सांगणारे व जुन्यानव्याचा दुवा सांधणारे असे होते. पांढरा शुभ्र पोशाख, डोक्यास पुणेरी लाल पगडी, पायांत पुणेरी जोडा, अंगावर उपरणें, मध्यम बांधा, गौरवर्ण, लाल गंध, डोळे घारे व किंचित् बारीक, त्यांस कोणीही पाहिलें असतां पाहणारावर छाप पडेल असा रुबाब असे. कामगार त्यांचे पुढें जाण्यास भीत असत, व घरांतील माणसेंही त्यांचेशीं अत्यंत अदबीनें वागत.

वडलांनीं सुरू केलेले सर्व व्यवहार संभाळून आपण २ पावलें पुढें जावें अशी मनीषा असल्यामुळें, त्यांनीं त्या दृष्टीनें धंद्याची वाढ करण्याचें ठरविलें. पुण्या–मुंबईचे दृष्टीनें उत्तरेकडील संस्थानांत व नागपूर वऱ्हाड या महाराष्ट्रीय प्रांतांत त्या वेळीं छापण्याची कला सुरू झालेली नव्हती. त्यामुळें तत्प्रांतीय जनतेचें, तसेंच सरकारीही बरेंचसें काम इकडून करून नेलें जात असे व हीच स्थिति सर्वसाधारणपणें १९३० सालापर्यंत होती. गेल्या १५–२० वर्षांत मात्र तिकडील भागांत नवीन चांगलें काम करणारे छापखाने सुरू झाले असून त्या भागांतील काम पुण्यामुंबईकडे येण्याचें कमी झालें आहे.

त्या दृष्टीनें नागपूर वऱ्हाडकडचें सरकारी रेव्हेन्यू खात्याचें एक मोठें काम मिळवून व तें २।३ वर्षें चालवून उत्तम प्रकारें पुरे करून दिलें व त्या कामीं किफायतही चांगली झाली. तसेंच पुणें येथील मे. गणेश विष्णु चिपळूणकर आणि मंडळीनें प्रसिद्ध केलेलें संपूर्ण महाभारत भाग १० छापून देण्याचें जोखमीचें काम पत्करून तेंही उत्तम तऱ्हेनें पुरे केलें.

रावजी श्रीधर यांचा अंत

सतत ५०–५२ वर्षें अविश्रांत श्रम करून एक धंदा स्वतः सुरू करून त्याचा भव्य विस्तार झालेला डोळ्यांनीं पाहून व अनुभवून अनेक संस्था व व्यक्ती यांचेशीं अत्यंत दृढतर असे प्रेमाचे व आपलेपणाचे संबंध निर्माण करून देवऋण पितृऋण, व समाजऋण उत्तम प्रकारें फेडून कर्तबगार चिरंजीव व नातू यांचेवर आपल्या आवडत्या धंद्याची जोपासना करण्याची जबाबदारी सोपवून रा. रावजी श्रीधर गोंधळेकर यांनीं सन १९१० च्या मार्च महिन्यांत पुणें येथें आपली इहलोकींची यात्रा समाधानानें संपविली व महाराष्ट्राच्या विद्याव्यवसायक्षेत्रांत आपलें व आपल्या घराण्याचें नांव अजरामर करून ठेवलें. त्यांचा स्वभाव करारी, कष्टाळू, चिकित्सक, हिशोबी व लोकसंग्राहक असा असल्यानें, ते आपल्या धंद्याचा एवढा मोठा पसारा निर्माण करून तो व्यवस्थितपणें चालवूं शकले व त्यांनीं अनेक लोकांकडून धन्यवाद मिळविले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरस्वती उत्सव

छापखाना व ग्रंथप्रकाशन या व्यवसायांचे आधिदैवत श्रीसरस्वती असून त्या दैवताबद्दल त्यांचे मनांत उत्कट भाव व श्रद्धा वसत असल्यामुळें रा. रावजी श्रीधर यांनीं धंद्याच्या सुरवातीपासूनच दरसाल दसऱ्याचे नवरात्रांत श्रीसरस्वतीचा उत्सव साजरा करण्याची प्रथा चालू केली होती, व ती तशी अनेक वर्षे त्यांचे पश्चातही चालू होती.

लोकमान्य टिळक व केसरीचे संबंध

लोकमान्य टिळकांचा केसरी कांहीं वर्षें रविवारांत फडके यांचे वाड्यांत असलेल्या श्री विठ्ठल छापखान्यांत छापला जात असे. त्यास सन १८९७ सालीं आग लागून तो छापखाना जळाल्यानंतर सुमारें ४।६ महिने केसरीची छपाई जगद्धितेच्छु छापखान्यांत केली जात असे.

लोकमान्य टिळकांचे वडील निवर्तले त्या वेळीं ते अज्ञान होते, त्यांचे वडलांनीं आपले पश्चात जी व्यवस्था करून ठेवली होती त्यांत रा. रावजी श्रीधर गोंधळेकर यांस चि. बाळ गंगाधर टिळक यांचे पालक नेमले होते व ती जबाबदारी त्यांनीं उत्तम प्रकारें पार पाडली.

रा. कृष्णाजी आबाजी गुरुजी यांनीं लोकमान्यांचे हयातींतच त्यांचें एक छोटेसें चरित्र लिहून प्रसिद्ध केलें होतें, त्यांत या गोष्टीचा उल्लेख आलेला आहे, व त्यांत रावजी श्रीधर यांचें छायाचित्रही त्या अर्थानें दिलेलें आहे.

बी. बी. सी. आय्. कॉंट्रॅक्ट

श्री. केशवरावांनीं सन १९१७ सालीं बी.बी.ॲण्ड सी. आय्.रेल्वेचें छपाई टेंडर १० हजार रुपये अनामत भरून कॉंट्रॅक्ट मिळविलें त्या वेळचे दरानें दरसाल सुमारें २॥ ते ३ लाख किंमतीचें काम होत व पुढें ६–७ वर्षेपर्यंत तें अव्याहत चालू असे.तें काम करण्यासाठीं छापखान्यांत डबल रॉयल साइजचीं २ नवीन सिलेंडर्स आणलीं, तसेंच ताबडतोबीचीं कामें मुंबईसच करून देतां यावीं व ऑफिसशीं संबंध ठेवण्यास सोपें जावें म्हणून छापखान्याची एक छोटीशी शाखा मुंबईस बनामा हॉल लेन, गिरगांव येथें सुरू केली. तेथील व्यवस्था पाहण्यासाठीं रा. केशवरावजी हे स्वतः मुंबईसच राहाण्यास गेले व पुणें येथील छापखान्याची संपूर्ण जबाबदारी रा. दत्तात्रय केशव ऊर्फ नानासाहेब गोंधळेकर यांजकडे सोंपविण्यांत आली.तत्पूर्वी त्यांनीं आपले वडलांचे देखरेखीखालीं सन १९१०–११ पासूनच कामाची माहिती घेण्यास सुरुवात केली होती, व ते त्यांत तरबेज झाले होते.

रा. केशवरावजी अधून मधून कारणपरत्वें पुण्यास येत असत, व रा. नानासाहेब दरमहा १–२ वेळां मुंबईस जात असत, त्यामुळें पुणें येथील सर्व व्यवहाराची माहिती रा. केशवरावजी यांस नेहमीं कळत असे.

रा. नानासाहेब यांनीं छापखान्याचा चालू व्याप व्यवस्थितपणें सुरू ठेवून व बी. बी. ॲंड सी. आय. रेल्वे कंपनीचें नवीन पत्करलेलें कामही वेळेवर पार पाडतां येईल अशी यंत्रसामुग्रीची योजना करून त्या वेळपर्यंत पुण्यांत कोणी न आणविलेलें असें इंग्रजी मोनो टाइप कास्टिंग मशीन आणून तें चालू केलें व त्यावर रा. डी. व्ही. आठल्ये बी. ए. यांनीं लिहिलेलें लोकमान्य टिळक यांचें चरित्र व महात्मा गांधी यांचें चरित्र हीं दोन,तसेंच डॉ. बेलवलकर व प्रो. आर. डी. रानडे यांचे तत्त्वज्ञानावरील २ ग्रंथ अशीं ४ पुस्तकें छापून दिलीं. अशा प्रकारें पुण्यांतील छापखान्यांचे प्रगतींत एक पाऊल पुढें पडलें.

मोनो मशीन चालविण्यासाठीं लागणारी वीज निर्माण करण्यासाठीं डायनामोही आणावा लागला, त्यामुळें अनायासें वीज तयार झाली व सर्व छापखान्यांचे इमारतींत इलेक्ट्रिक फिटिंग करून इंजिन चालू असेपर्यंत दिवसा व रात्रीं विजेचे दिवे लागूं लागले, त्या वेळीं पुण्यांत इलेक्ट्रिसिटी आलेली नव्हती. दि. ब. गोडबोले यांनीं पुढें १–१॥ वर्षांनें वीज कंपनी सुरू केली,त्यामुळें पुण्यांत इलेक्ट्रिक दिवे प्रथम जगद्धितेच्छु छापखान्यांतच सुरू झाले.

हें मोनो मशीनच नव्हे तर छपाई क्षेत्रांत ज्या ज्या वेळीं जें जें नवीन असें यंत्र मिळूं लागलें–मग तें ट्रेडल असो, सिलिंडर मशीन असो, पॉवर कटिंग मशीन असो, अगर इंजिन असो–तें प्रथम मागवून सुरू करण्याचा एक प्रकारचा पुढारीपणाचा मान जगद्धितेच्छु छापखान्याकडेच आहे, असे उद्गार सदर छापखान्यांचे चालकांकडून अनेक वेळां ऐकले आहेत.

याच सुमारास नागपूर येथें रा. व्ही. व्ही. चितळे यांनीं ऑल इंडिया रिपोर्टर मासिक सुरू करण्याचें ठरवून त्यांचे छापखान्यासाठीं इंग्रजी टाईप खरेदी करण्यास ते पुण्यांत आले व त्यांचे पहिल्या एक दोन अंकांचे सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९२१ मधील छायाचित्र



या छायाचित्रांत संस्थापकानंतरच्या तीन पिढ्या, **श्री. ज. गानू,** याशिवाय **दळवी** (चित्रशाळा), **मोरे** (लोकसंग्रह), **देव** (राजगुरु), **जोरी** (समर्थभारत), **यादव** (स्वतंत्र नंबरिंग), **निमकर** (राजगुरु), **शिंदे** (राजगुरु), **पोतनीस** (टाईप फौंड्री मालक.), **गोळे** (प्रतिभा) हे कामगार; याशिवाय पंचमेकर, मोनो टाईप की व मशिन ऑपरेटर अशा अनेक व्यक्ती आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पानांचा कंपोज मात्र मोनो मशीनवर होऊन तो नागपुरास रवाना करण्यांत आला. पहिली छपाई झाल्यावर तोच टाईप सोडवून पुढील कंपोज तेथेंच करून मासिकाची छपाई चालू होती.

सन १९१९ सालीं केसरी छापखान्याचे कागद-गुदामास आग लागून बरेंच नुकसान झालें. कागदाचीं बहुतेक रिळें थोड्याफार प्रमाणांत जळून तीं अंकाचे छपाईस निरुपयोगी झालीं. रा. नानासाहेब यांनीं तो सर्व जळका कागद विकत घेतला, व राहतें घरांत नेऊन सांठविला. नुकतेंच पाहिलें महायुद्ध होऊन गेलेलें असल्यामुळें कागदाची बरीच चणचण होती. घरांत व छापखान्यांत जिकडे पाहावें तिकडे जळक्या कागदाचे कपटे वाऱ्यानें उडलेले-विखुरलेले-दिसत. ५–६ महिन्यांपर्यंत तीं रिळें हातानें कापून व त्यांतून साइजवारी रिळें व निरनिराळे आकारांचे तुकडे कटिंगवर करणें व त्यांची विक्री करणें हें काम सारखें चालू होतें. अनेक छापखान्यांस कागद विकत दिला. व कचरण विकत घेण्यासाठीं सकाळीं दारापुढें अक्षरशः रांग लागे, व घेवारी हरिजन लोक कचरण आपणास मिळावी म्हणून आदले दिवशीं पैसे देऊन व पोतीं ठेवून जात. कागदाचे दर वाढले असल्यामुळें या व्यवहारांत छापखान्यास फायदाही चांगला झाला.

१९२० सालीं टिळक पंचांग केसरी संस्थेतर्फे मोठ्या प्रमाणावर प्रसिद्ध करण्याचें टरलें, व तें कामही जगद्धितेच्छु छापखान्यानें पत्करून योग्य मुदतींत पुरें करून दिलें. त्यासाठीं कांहीं दिवस मुंबईचा एक पंचमेकर रा. माधवराव यांस मुद्दाम आणवून त्यांचेकडून अखंड जोडाक्षरांचें वगैरे पंच तयार करून घेऊन पंचांगास लागणाऱ्या स्पेशल टाइपाची जुळवाजुळव करण्यांत आली.

रा. नानासाहेब यांच्या वागण्यांत अत्यंत साधेपणा असे. रेशीमकांठी धोतर, पांढरा कडक इस्त्रीचा शर्ट, सोन्याच्या गुंड्या, बुलनचा कोट, घडीची टोपी, पायांत जोडा व तोंडांत कायमचा विडा असे. सहज पाहणाऱ्या माणसांना त्यांजबद्दल आपलेपणा व आदर वाटे; परंतु त्यांचे स्वभावाबद्दल सहज अटकळ बांधतां येत नसे. बोलण्यांत ते अत्यंत गोड व प्रेमळ वाटत. कामगारांवर ते क्वचितच रागावत, व त्यांचेशीं बोलतांना कामगारास भीति न वाटतां आपलेपणा वाटे.

त्यांनीं प्रकाशनव्यवसायाकडे विशेष लक्ष न देतां नवीन अशीं फारच थोडीं पुस्तकें प्रसिद्ध केलीं. अनेक नामांकित व प्रतिष्ठित अशा लेखकांचें छपाई काम आपलेकडे ओढून घेऊन तें उत्तम प्रकारें पार पाडून छापखान्याच्या नांवलौकिकांत चांगलीच भर टाकली. त्यांनीं जोडलेल्या नवीन गिऱ्हाइकांचे व त्यांचे कामाबद्दल थोडीशी माहिती खालीं देत आहे.

त्यांच्या मान्यवर गिऱ्हाइकांत कै. तात्यासाहेब केळकर, कै. चिंतामणराव वैद्य, प्रो. रानडे, कै. गडकरी, डॉ. केतकर (ज्ञानकोषकार) वगैरेंचा समावेश असे.

पुण्यांतील बऱ्याच छापखान्यांच्या उभारणींत जगद्धितेच्छु छापखान्याकडून मदत अगर सल्लामसलत दिली गेली आहे. (१) हनुमान प्रेस, (२) इंदिरा प्रेस, (३) विजय प्रेस, (४) ज्ञानकोश छापखाना, (५) हिंदसेवक छापखाना, (६) आनंद प्रेस, (७) राजगुरु प्रेस, (८) रा. कोठारी यांचा पहिला छापखाना, (९) रा. शेंब्रेकर, एस्क्वायर प्रेस, मुंबई.

जगद्धितेच्छु छापखान्यांत छापलेलें कोणतेंही पुस्तकाचें लहान मोठें काम अगर किरकोळ जॉब काम जरी पाहिलें (मुख्य भर पुस्तकांचे कामावरच असे) तरी त्यांत एक प्रकारचें वैशिष्ट्य दिसून येई. स्पष्ट व सुवाच्य व नीट छपाई, चुकांचें प्रमाण अत्यंत कमी, बांधणी मोहोरेदार, दाब व शाई सर्व पुस्तकभर सारखी व सर्वच बाजूंनीं आकर्षक असें काम केलेलें असे.

पुस्तकाची छपाई करतांना, कागद ग्लेज असो अगर रफ (न्यूजप्रिंट) असो, तो आदले दिवशीं सायंकाळीं पाण्याचा हबका मारून ५–१० कागदांच्या चवडी एकावर एक जुळवून ठेवून खालींवर फळी ठेवून व त्यावर दगडाचें ओझें ठेवून दुसरे दिवसापर्यंत तो मुरूं दिला जात असे. ही पद्धत जगद्धितेच्छु प्रेसमध्यें शेवटपर्यंत चालू होती.

कागद भिजवल्यामुळें त्यावर छपाई स्पष्ट व सुवाच्य अशी होते; तो शाईही चांगली घेतो तसेंच थोडासा झिजका टाईप जरी असला तरी तो स्पष्ट न उठल्याची तक्रार येत नाहीं. त्याचबरोबर तो मशीनला सावकाश लावावा लागतो, व छपाई करतांना लौकर सुटतही नाहीं, त्यामुळें आजचे जमान्यांतील ॲटोमेटिक प्रिंटिंगला तो मुळींच चालणार नाहीं; छपाईनंतर १–२ दिवस फॉर्म वाळल्यावर कापून व मोठ्या दाबप्रेसांत बूट्या म्हणून गुळगुळीत, चिवट जाड टणक अशा कागदांत १५–२०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छापलेले कागद भरून त्यास दाब दिला जात असे, व तो दाब १२ तासांनंतर काढला जाई व मग फॉर्म मोडणी-साठीं दिला जाई.

कागद जास्त प्रमाणांत भिजवला गेला, तर छपाई करण्यास तो लगेच दुसरे दिवशीं घेतां येत नसे. व कमी भिजवला गेला व दुसरे दिवशीं ठराविक वेळीं तो छापला गेला नाहीं, तर पुन्हां थोडा भिजवावा लागे.

आज आम्ही करीत असलेली पुस्तकांची छपाई या पद्धतीनें करावयाची म्हटलें तर तें काम करणारीं माहित-गार माणसेंही नाहींत. श्रमाचे व किंमतीचे देण्यानेंही तें परवडणार नाहीं. परंतु आजच्या अनेक मुद्रकांना ही गोष्ट माहीतही नसेल म्हणून खुलाशानें लिहिली आहे.

कोणतेंही पुस्तक जुळणी केल्यानंतर तें तपासल्याशिवाय बांधणीसाठीं दिलें जात नसे, त्यामुळें पुस्तकांत उपयुक्त पानें कमी अगर जास्ती अशा तक्रारी फारच थोड्या येत व ही बाब मोठ्या कटाक्षानें पाळली जात असे.

मुख्य दरवाजावर एक जुना अनुभविक टाइमकीपर कायमचा असून छापखान्यांतून बाहेर जाणारे व बाहेरून आंत येणारे प्रत्येक वस्तूची खुलासेवार नोंद त्याचे डायरी बुकांत तारीखवारी केलेली असे,व त्याचा फार फायदा होई.

त्या काळीं छापखान्यास सुट्या फारच थोड्या असत व ज्या असत त्यांपैकीं बऱ्याच अर्ध्या दिवसाच्या असत, रविवार ½ सुट्टी असे व ४ तास काम झाल्यानंतर ज्या त्या खात्यांतील लोकांनीं, आपल्या खात्याची स्वच्छता करावयाची असा दंडक असे. कामगारांस संस्थेबद्दल महत्त्व व छापखानदारांस कामगाराबद्दल प्रेम वाटे व उभयतांचे संबंध फारच सलोख्याचे असत.

दुसऱ्या ठिकाणीं ५।४ रुपये पगार जास्त मिळतो म्हणून पहिलें ठिकाण सोडून दुसरीकडे जाणाऱ्या माणसांचें प्रमाण फारच थोडें असे;त्यामुळें एकाच ठिकाणीं वयाचीं ४०-५० वर्षे काढलेलेही कामगार बरेच असत. नव्या पिढींत या गोष्टीचा संपूर्ण अभाव दिसतो;अर्थात् दिवसमान फारच बदललें आहे हें त्याचें कारण असूं शकेल.

जगद्धितेच्छु छापखान्यांत २५-३०-३५-४०-५० वर्षेंही सतत काम करणारे असे कामगार सर्व शाखांत होते, व हीं सर्व माणसें आपापल्या कामांत अत्यंत निष्णात व आपल्या हातून होणाऱ्या चुकांची चीड येणारीं अशीं होतीं.

वर वर्णन केलेल्या काळांत फॅक्टरी ॲक्ट अगर शॉप ॲक्ट अस्तित्वांत आलेले नव्हते, तसेंच आज कागद-नियंत्रण, कामाचे तास, शिफ्टचें ओव्हरलॅपिंग, लहान मुलें कामावर न लावणें, सहामाही व वार्षिक पत्रकें सर-कारकडे पाठविणें, फॅक्टरी राजिस्टर करणें, व इतर अनेक सरकारी बंधनांपैकीं छापखान्यांचे मागें कांहींही भानगडी नव्हत्या. त्यामुळें छापखाना चालक निश्चिंत असत.

रेल्वेचे कॉंट्रॅक्ट ३।३ वर्षांचे असे. २ कालखंड संपून (१९२३ सालीं) तिसरा सुरू झाला.याच सुमा-रास हिंदुस्थान सरकारनें जी काटकसर कमिटी लॉर्ड इंचकेप यांचे अध्यक्षतेखालीं नेमली होती, तिनें अनेक खात्यांप्रमाणें रेल्वेचे कारभारांत ज्या कांहीं काटकसरीच्या योजना सुचविल्या होत्या त्यांत रेल्वेकडील छपाई कामाच्या १ ते १॥ वर्षांचा स्टॉक कायमचा ठेवला जात असे,तो तसा न ठेवतां फक्त ६ महिन्यांपुरताच ठेवावा, असें सुचविलें. तसेंच अनेक लहान मोठ्या बाहेरगांवच्या छाप-खान्यांकडे दिलेलें छपाई कामाचें कॉन्ट्रॅक्ट बंद करून फक्त टाइम्ससारख्या निम सरकारी छापखान्याकडून तें करून घ्यावें असें सुचविल्यामुळें जगद्धितेच्छु छापखान्याचें काम एकदम बंद केलें गेलें, व कंपनीनें प्रेसला तसें कळविलें. कंपनीशीं झालेल्या करारांत या आपत्तींतून मार्ग निघेल अशा कांहींच सवलतीच्या अटी नसल्यामुळें अर्ज-विनंत्या करून व समक्ष भेटूनही कांहीं उपयोग झाला नाहीं. बिलांच्या रकमा येणें लांबलें. संपूर्ण निकाल होईतों डिपॉ-झिटची मोठी रक्कमही अडकून पडली. सुमारें ऐंशीं हजार रुपये किंमतीचा छपाई कामासाठीं घेऊन ठेवलेला विशिष्ट वजन व साइजचा कागद कागदाचे भाव उतर-ल्यानें खूपच नुकसान सोसून अत्यंत हलक्या दरानें विकून टाकावा लागला. कॉन्ट्रॅक्ट चालू असतां त्या वेळीं कांहीं पैशाचे योजनेसाठीं देवघेवीचे जे कांहीं व्यवहार केले होते त्या मंडळींनीं ही उचल खाल्ली व दिवसेंदिवस धंद्याची परिस्थिति बिकट होऊन शेवटीं १९२५ सालीं नाइला-जानें ७५ वर्षे चालू असलेला छापखाना बंद झाला. त्याच सुमारास आगें मागें पुस्तकांचें दुकानही विकलें गेलें.

रा. केशवराव पुणें येथें सन १९४९ सालीं वयाचे ८२ वे वर्षी कैलासवासी झाले.

रा. नानासाहेब हे सध्यां पुण्यांतच राहून संस्कृत व वैदिक वाङ्मयावरील दुर्मिळ ग्रंथ जगांतील अनेक राष्ट्रां-तील विद्यापीठांना पुरविणेचें काम करीत असतात. त्यांचें वय आज ६५ चे सुमारास आहे.गोंधळेकरांचा प्रेस पुन्हा पुण्यांत दिसू लागावा हीच अनेकांची इच्छा !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांहीं मुद्रकांच्या आठवणी

- शं. ब. सहस्रबुद्धे
- शं. स. दाते
- बा. भा. जोशी
- कै. ल. भा. कोकाटे

इत्यादि

मुद्रण महर्षि शं. ब. सहस्रबुद्धे

लेखक—नवपरिचित एम्. ए.; बी. टी.

'They call us *Printers* ! But we grease the wheels of Commerce and Industry with the most Modern Printing and Allied Processes and we help with Attractive Layout and original novel Ideas to increase *Your Sale*.'

(१९३२ मधील सहस्रबुद्धे यांनीं दिलेलें एक अवतरण)

मुद्रण धंद्याविषयीं आपुलकीनें संपूर्ण आयुष्य वेंचणाऱ्या व आपल्या ध्येय प्रातीसाठीं आर्थिक प्रतिष्ठेच्या समोर आलेल्या मोहाची तमा न बाळगणाऱ्या विरळ व्यक्तींपैकीं श्री. बाबूराव सहस्रबुद्धे एक होत. मुद्रण धंद्याशीं संबंध असलेल्या निरनिराळ्या वस्तूंबाबत श्री. बाबूराव यांनीं अनेक प्रयोग केले आहेत व करीत आहेत. मुद्रणप्रकाशच्या विशेषांकांचे निमित्तानें श्री. बाबूरावांचा परिचय व्यवसायबंधूंना देतां आल्यास पहावा या हेतूनेंच मीं त्यांची भेट घेतली.

श्री. शंकर बळवंत ऊर्फ बाबूराव सहस्रबुद्धे यांचा जन्म ता. ३१।१२।१८८६ रोजीं झाला. वयाच्या चौदाव्या वर्षी मॅट्रिक व १८ व्या वर्षी बी. ए. ची परीक्षा दिल्यानंतर श्री. बाबूराव यांनीं इंटरसायन्समध्यें नांव दाखल केलें. त्याच वेळेस लोकमान्य टिळकांशीं वैयक्तिक परिचय आला. श्री. जिनसीवाले व श्री. वासुदेवशास्त्री अभ्यंकर यांचेकडे संस्कृत शिकण्याचेंही काम त्यांनीं अंगावर घेतलें. राष्ट्रीयतेची लाट देशांत जोरानें उसळली होती, तिचा परिणाम श्री. बाबूराव यांचेवर झाल्याशिवाय कसा राहील ? राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यात पडण्याच्या ध्येयानें प्रेरित होऊन आय्. सी. एस्. कडे जाण्याची संधि सोडून दिली. त्या वेळच्या कांहीं आठवणी श्री. बाबूराव मोठ्या आनंदांत सांगतात.

आजच्याप्रमाणें त्या वेळेस प्रवासाची सोय इतकी अद्य यावत् नव्हती. तेव्हां आमचे बाबूराव कांहीं मित्रांना घेऊन कार्लें, रायगड (पुण्याहून ५६ मैल) वगैरे ठिकाणीं पायीं सफरी करीत असत. महिन्यांतून एकदां सिंहगडावर सफर मारण्याचा त्यांचा नित्यक्रम असे. फर्ग्युसन कॉलेज त्या वेळेस गांवापासून तुटलेलें व वेगळें होतें. बरोबरीच्या सहाध्यायांमध्यें त्या वेळेस फक्त १ च दुचाकी होती व ती त्या वेळचे प्रख्यात क्रिकेटपटु श्री. एन्.एल्. समेळ ह्यांची होती. व श्री. राजमाचीकर हे घोड्यावरून कॉलेजमध्यें येत असत. हे दोन अपवाद सोडल्यास बहुतेक विद्यार्थी पायींच कॉलेजला जात.

सामूहिक जीवनाची आवड बाबूरावांना अगदीं लहानपणापासून होती. आपल्या राहत्या घराचे तिसऱ्या मजल्यावर ३५-४० मंडळी जमवून निरनिराळ्या विषयांवर चर्चा करणें हा त्यांचा आठवड्यांतून बरेच वेळचा कार्यक्रम असे.

प्राणायामाचेंही श्री. बाबूरावांना वेड होतें. १९०६ सालीं रोज ५ तास प्राणायाम ते करीत असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिप्नॉटिझमचाहि त्यांनीं खूप अभ्यास केला होता. या शास्त्राच्या साहाय्यानें रोग बरे करणें वगैरे प्रयोग नेहमीं करीत असत.

बाबूराव तीन व्यक्तींचा आपले गुरु म्हणून मोठ्या अभिमानानें उल्लेख करतात—त्यांचे वडील, त्यांचे आजोबा श्री. भिडे व इंग्लंडमधील प्रसिद्ध ग्रॅहॅम कंपनीचे हिंदुस्थान-साठींचे खरेदीचे एकमेव मुख्य श्री.माडगांवकर. आपल्या आयुष्यांतील महत्त्वाच्या गोष्टी घडविण्याचें मूळ या तिघां-व्यक्तींकडूनच आपणांस प्राप्त झालें असें ते सांगतात.

श्री. माडगांवकर यांची अभ्यासू वृत्ति त्यांच्या सम-कालीन लोकांना चांगलीच माहीत होती. रामदास—तुका-राम टाइपांत प्रथम त्यांनीं छापला. श्री. पंडित, श्री. माडगांवकर, न्यायमूर्ति तेलंग यांचा एक क्लब होता. या क्लबांत नेहमीं साहित्यिक चर्चा चाले. श्री. राजवाडे यांच्या संपादित ज्ञानदेवीपेक्षांही पूर्वीच्या अशा हस्तलिखित पोथीचें व्याकरण व कोशासह भाषांतर करण्याचा श्री. माडगांवकर यांचा मानस होता या कामीं संस्कृत ग्रॅज्युएट मदतनीस म्हणून धोंडोपंत कर्वे यांच्या मध्यस्थी-पणानें व प्रि. रँगलर परांजपे यांच्या शिफारसपत्रामुळें बाबूरावांची योजना झाली. विलायतेस जातांना बाबू-रावांची इच्छा एखादा रासायनिक उद्योग शिकून परत येण्याचा होता. १९०७ मध्यें बाबूराव इंग्लंडला रवाना झाले.इंग्लंडला गेल्यानंतर माडगांवकरांचें राहण्याचें ठिकाण मँचेस्टरपासून ५० मैलांवर असल्यामुळें व ज्ञाने-श्वरीचें काम पाहून इतर अभ्यास करण्याची मनीषा मात्र बाबूरावांना दाबून ठेवावी लागली; कारण भरपूर काम करणें व इतर कोणत्याही गोष्टीकडे लक्ष न देणें ही कडक सूचना श्री. बाबूराव यांना करण्यांत आली होती.

प्रत्येकानें आपली प्रामा-णिक दैनंदिनी लिहिली पाहिजे. जमाखर्च म्हणजे व्यावसा-यिक यशाची गुरुकिल्ली; दैनं-दिनी म्हणजेच बौद्धिक व व्यावसायिक जमाखर्च होय.

'I have not allowed my bones to rust and they are standing me in good need now'. हे श्री. माडगांवकरांचे ६८ व्या वर्षींचे उद्गार बाबू-रावांना फार स्फूर्तिदायक वाटले. त्या वयांत देखील श्री. माडगांवकर एकहि क्षण वायां घालवीत नसत. त्यांच्या या वागणुकीचा उत्तम परिणाम श्री. बाबूराव यांचे जीवनावर झालेला आजहि दिसून येतो.त्या वेळेस ज्ञानेश्वरीवरील त्यांचे इंग्लंडमधून पाठविलेले लेख 'विविधज्ञानविस्तारां'तून प्रसिद्ध झाले होते. ते लेख नुकतेच पुनः कुठेंतरी छापले गेल्याचें त्यांनीं सांगितलें. ज्ञानेश्वरीचें काम चालू असतांना जरी इतर विषयांचा अभ्यास करतां आला नाहीं तरी निरनिराळ्या संस्थांशीं व व्यक्तींशीं पत्रव्यवहार चालूच होता. याच वेळेस (सन १९०८) लंडनमधील "शामजी वर्मा हाऊस"मध्यें स्वातंत्र्यवीर सावरकर,सेनापति बापट, वगैरे मंडळींमध्यें राहण्याची संधि त्यांना मिळाली.

ज्ञानेश्वरीचें काम संपल्यानंतर (जून१९०९) आपल्या साध्याकडे बाबूरावांची दृष्टि वळली. त्या वेळेस सहा प्रमुख धंद्यांचें शिक्षण मिळण्याची "मँचेस्टर टेक" मध्यें सोय होती. Elimination च्या तत्त्वाचा अंगीकार करून शिक-ण्यास कमी खर्चाच्या व पुढें थोड्या भांडवलांतहि सुरू होऊं शकणाऱ्या अशा 'मुद्रण व फोटोग्राफी' या विषयाची त्यांनीं निवड केली. धंदा करावयाचा मग डिग्री कशासाठीं, या मँचेस्टर टेकच्या डायरेक्टरांच्या सूचनेवरून त्यांनीं एका "स्पेशल कोर्स" ची निवड केली. फोटो-ग्राफीच्या डिपार्टमेंटचे प्रमुख सी. डब्ल्यू. गँबल् यांनीं फोटोग्राफीवर एक उत्कृष्ट ग्रंथ लिहिला असून पहिल्या महायुद्धांत ते एरियल फोटो-ग्राफीचे प्रमुखही होते. श्री. गँबलसाहे-बांच्या मार्गदर्शनाचा लाभ श्री.बाबूराव यांनीं भरपूर घेतला.

ब्लॉकमेकिंग, फोटोग्रॅव्ह्यूअर, कोलोटाइप, हाफ-टोन, फोटोलिथो इ० 'प्रोसेस' कामांतील मुख्य अध्यापक श्री. आर.बी. फिशन्डन् यांच्या उत्तम शिक्षण पद्धतीमुळें बाबुरावांना "सिटी गिल्ड ऑफ लंडन इन्स्टिट्यूट"च्या अखिल ग्रेट ब्रिटनमध्यें म्हणून घेतलेल्या दोन्ही परीक्षांत पहिलीं मेडल्स व बक्षिसें मिळालीं म्हणून श्री. फिशन्डन् साहेबांचा बाबूरावांवर फार लोभ होता. त्यामुळें इंग्लंडमधील मुद्रकसंघांच्या महत्त्वाच्या संमेलनांतून त्यांचीं व्याख्यानें होत तेव्हां ते बाबूरावांना चार्ट्स्,स्लाइड्स् वगैरे दाखविण्याकरितां मदतीला म्हणून बरोबर घेत असत. हीं मेडल्स यापूर्वी ८ वर्षें कोणालाच दिलीं गेलीं नव्हतीं. मँचेस्टरमध्यें एक नवीन फोटो एन्ग्रेव्हरची फर्म त्या वेळेस निघत होती व तेथें चीफ ऑपरेटर म्हणून भागीदार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

— ह्या मुद्रण-तपस्व्यांना मुद्रण प्रकाशचे शतशः प्रणाम —

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



वि. ह. बर्वे
वय ७२

द. ग. खांडेकर
वय ७९

शं. ब. सहस्रबुद्धे
वय ६६

बा. भा. जोशी (वय ६३)
मालक—ज्ञानविलास प्रेस



ग. बा. बोरवणकर (वय ६६)
अध्यक्ष—प्रकाशक असोसिएशन

गो. ब. जोशी (वय ६५)
मालक—आनंद मुद्रणालय

वि. मा. नवले (वय ६५)
मालक—दीनबंधु

शं. ह. मुळे (वय ७०)
वृद्ध कल्पक मुद्रक



अ. ग. गद्रे (वय ६८)
मालक—डेक्कन प्रिं. वर्क्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५६५ १०. २०८८४

म्हणून जाण्याची ही संधि बाबुरावांना आली. परंतु त्यांना फोटोंचे कागद व कांचा तयार करण्याचें शिक्षण, लंडन मधील Regent street Polytechnic मध्यें तेव्हांचे प्रसिद्ध फोटो केमिस्ट हॉवर्ड फार्मर, वय ७३, यांच्या खासगी लॅबोरेटरींत घेण्याची संधि मिळाली; म्हणून ते तेथें गेले व त्यांनीं Photo-emulsions चा अभ्यास केला. (त्यांचें शिक्षक श्री. फिशन्डन् हे हल्लीं छपाईच्या शास्त्रांतील इंग्लंडमधील Penrose Annual या अत्युच्च अशा एकमेव वार्षिकाचे संपादक आहेत व त्यांच्याशीं त्यांचा अजूनही पत्रव्यवहार चालू आहे हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.)

इंग्लंडमधून शिक्षण घेऊन आल्यानंतर पुण्यास फोटोझिंकोमध्यें चालू असलेलें जी. क्लॅरीजचें ब्लॉकचें काम, येथील कामाची पद्धत पाहण्याच्या उद्देशानें त्यांनीं अंगावर घेतलें. ब्लॉक खात्याचे व्यवस्थापक त्या वेळेस रजेवर जाणार असल्यामुळें 'टाइम्स ऑफ इंडिया'तील श्री. कोलमन् यांनीं बाबूरावांना मासिक ४५० रुपये पगारावर ठेवण्याची तयारी दर्शविली. परंतु त्यांच्या अटी पसंत न पडल्यामुळें बाबूरावांनीं जी. क्लॅरिज आणि कंपनीशीं फोटोझिंको खातें काढून चालविण्याचा २०० रुपये मासिक वेतन व शिवाय कमिशन या अटींवर पांच वर्षांसाठीं करार केला. त्या वेळेस जी. क्लॅरीजचा कारखाना रेवसजवळील मांडवें बंदरावर काढला गेला. तेथें बाबूरावांनीं १९१२ ते १५ पर्यंत तीन वर्षें काम केलें. हा कारखाना मुंबईस हलविल्यानंतर त्यांनीं 'लक्ष्मी आर्ट प्रेस'मध्यें जाण्यासाठीं ही नोकरी सोडून दिली. त्या प्रेसमधून "सुवर्णमाला" नांवाचें मासिक त्या वेळीं निघत असे. परंतु लढाईमुळें माल मिळेनासा झाला. तेव्हां स्वतःच्या जबाबदारीवर कांहीं कामें करण्याचें त्यांनीं योजिलें. व बाबूरावांनीं पुण्यास येऊन फर्ग्युसन कॉलेजमध्यें प्रयोग करून फोटोच्या कांचा व कागद बनविण्याचें काम सुरू केलें. ब्लॉक्स तयार करवून आर्यभूषण प्रेसला पुरविण्यासहि त्यांनीं सुरुवात केली. त्याच वेळेस प्रो. काथवटे यांची एक मोठी ऑर्डर त्यांनीं मिळविली. ॲडव्हान्स म्हणून प्रो. काथवटे यांचेकडून ३०० रुपये घेऊन त्यांतून त्यांनीं एक २५०रु.चें जुनाट छोटेसें ब्लॉकसाहित्य खरेदी केलें. याप्रमाणें त्यांच्या ब्लॉकखात्याची सुरुवात झाली. प्रोफेसरसाहेबांचें काम पूर्ण केलें. परंतु कलरवर्कचे बाबतींत त्यांना नेहमींच छापण्याची अडचण येत असे म्हणून त्यांनी १९१७ सालीं रामवाडीचा श्री. गुर्जर यांचा लिथो छापखाना २०० रु. सालीना भाड्यानें, (श्री. गुर्जर यांच्या निधनामुळें) चालविण्यासाठीं घेतला. अशा रीतीनें **पूना लिथो वर्क्स**ची मुहूर्तमेढ रोवली गेली. छापखाना सुरू झाला. परंतु बाबूरावांचा आंतील 'शिक्षक' त्यांना स्वस्थ बसूं देईना. लहान मुलांसाठीं सचित्र वाङ्मय, कायमचें काम म्हणून, विशेषतः प्रो. कानिटकर, प्रो. नाईक वगैरे मंडळींच्या प्रोत्साहनानें त्यांनीं जानेवारी १९१८ मध्यें **बालोद्यान** मासिकाचा पहिला अंक २ रंगांत प्रसिद्ध केला. तो अंक त्या वेळचे मध्य-विभागाचे इन्स्पेक्टर श्री. मार्स्टन यांना इतका पसंत पडला कीं त्यांनीं सरकारतर्फे त्या मासिकाच्या ३००० प्रति घेण्याची शिफारस केली.! परंतु शिक्षण-खात्यांतील अधिकाऱ्यांनीं मोठ्या मुष्किलीनें १०० प्रति घेण्याचें कबूल करून नुकसान मात्र दिलें. पण सर्वसाधारण जनतेनें मात्र मासिकाचें फारच उत्साहानें स्वागत केलें. वर्गणीदारांची संख्या लौकरच १३५०पर्यंत गेली.

पुण्यास प्लेगाची जोरांत सुरुवात झाली व कामाला पुरेशीं माणसें मिळेनात म्हणून त्यांनीं (१९१८ सालीं) छापण्याच्या शाईच्या प्रयोगांस सुरुवात केली. त्याचबरोबर अर्थात् व्हॉर्निशेस करण्याचें कामहि त्यांनीं सुरू केलें. मोठ्या प्रमाणावर माल तयार करावयाचा परंतु पॉवरची उणीव भासूं लागली. निराश होणें बाबूरावांना कधींच ठाऊक नव्हतें—त्यांनीं लगेच श्री. राजमाचीकरांचेकडून पॉवर भाड्यानें घेऊन तेथें शाई दळण्याचें एक बरेंसें यंत्र बडोद्याहून आणून बसविलें. लिथो व्हॉर्निशमध्यें तांबूस छटा येत असे ती घालविण्यासाठीं त्यांनीं अनेक प्रयोग केले. या प्रयोगापायीं त्यांना भरपूर वेळ, शक्ति व संपत्तीचा व्यय करावा लागला. या कामीं त्यांना श्री. हरिभाऊ तुळपुळे, व सुदामा पेपर मार्टचे श्री. मगनभाई झवेरी यांची मदत झाली. श्री. हरिभाऊकडून आर्थिक मदत मिळाली व श्री. झवेरींनीं एक ट्रिपल रोलर मिल व एक व्हॉर्निशिंग मशीन सवलतीच्या हप्तेबंदीनें त्यांना दिलीं.

१९२३ सालीं बाबूरावांनीं पहिलें 'कोल्ट'चें ट्रेडल १० × १५ चें-आर्ट ट्रेडल हप्त्यांनीं विकत घेतलें, आणि School of Photography and Printing Crafts सुरू केलें. श्री. नातू यांनीं त्यांना जागा दिली होतीच. आज ज्या ठिकाणीं त्यांचा छापखाना आहे त्या

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जागीं जाण्यासाठीं फक्त २ फुटांची काळ्या दगडांची पाऊलवाट होती. तेथील झाडें कापून त्यांची विक्री करून मालकाला सर्व पैसे दिले, व मग तेथें जोगेश्वरीच्या बोळांतून मशिनरी आणली. मशिनरी देखील त्यांना हातावर न्यावी लागली, व एकदांची १९२४ सालीं नव्या जागेंत कामास सुरुवात झाली. आजच्या भारत प्रिंटिंग छापखान्याचे संचालक श्री गुर्जर, श्री. पंडित वगैरे मंडळी त्यांना लिथो खात्यांत सहकारी म्हणून १९१८ मध्येंच मिळाली होती.

१९२४ सालीं बाबूरावांनीं पुनः इंग्लंडकडे कूच केलें. इंग्लंडला दुसऱ्यांदा जावयास निघतांना त्यांनीं त्या वेळेस प्रसिद्ध असलेल्या तीन नमुन्यांच्या टाईप केसेस, आर्यभूषण, जतचे गोखले व निर्णयसागर यांच्या, तयार करून घेतल्या होत्या. त्यांचा आकार सिगार-बॉक्समध्यें बसण्याइतका होता हें कोणाला सांगूनहि पटणार नाहीं. मशिन कंपोझिंगची कला परदेशांत बरीच प्रगत झाली असल्यामुळें आपण त्याबाबत चौकशी करावी हाच मुख्य उद्देश याच्या मुळाशीं होता. लॅन्स्टन मोनोटाईप कंपनीकडे त्यांनीं समक्ष चौकशी केली. तेव्हां त्या कंपनीनें इंग्रजीच्या भावांतच मराठीची मशिनरी देण्याची तयारी दर्शविली, परंतु त्या किंमतींत ही घेणारा कोणी महाराष्ट्रीय न भेटल्यामुळें नाइलाज झाला.

५ कोटी छपाईचें एक विडी लेबल व २० × ३० चें श्री. औंधकरांचें रामपंचायतन या २ आर्डरींचीं एस्टिमेटें घेण्याकरितां एडिंबरो ते लंडन-पर्यंतच्या रेल्वेमार्गावरील मोठया छापखान्यांस व शायांच्या कारखान्यांसही ते भेटले. त्याची डायरीही त्यांचेजवळ आहे ! पूर्वीच्या मुद्रणालयांचें स्वरूप आतां बरेंच बदललें होतें. ऑफसेट छपाई जोरांत सुरू झाली होती. नार्बरी, नात्सिओ अँड को.च्या लिथोग्राफिक प्रेसमध्यें त्यांनीं पाहिलें कीं पूर्वीच्या त्यांच्या बरोबरीचा गॅरेट नांवाचा फोरमन ४० मशिन्सची व्यवस्था पहात होता. छपाईचा विशेष असा कीं प्रत्येक ठिकाणीं गुणांला जास्त प्राधान्य दिलें जात असे. बाबूरावांनीं मॅलेट्स् व लांकडी फर्निचर बनविण्याच्या कारखान्यांत Seasoning कसें करतात याचेंही बारकाईनें निरीक्षण केलें व हें लाकडी सामान दीर्घकाल टिकण्याचें कारण त्यावर केल्या जाणाऱ्या प्रक्रियाच महत्त्वाच्या होत हें त्यांच्या लक्षांत आलें. लंडनमध्यें एका ठिकाणीं त्यांनीं पाहिलें कीं, Children's Encyclopedia या ग्रंथाचें फक्त बाइंडिंगचें काम १२ 'रोडिअल आर्म' यंत्रांवर चालू होतें. इंग्लंडमध्यें साधारण काम देण्यांत दिरंगाई झाल्यास फक्त १० च मिनिटें जादा अवधि दिला जातो व त्यानंतर करार मोडला असें समजून दुसरीकडून काम करून घेण्यास मुभा असते.

डर्बी येथील बेमरोज आणि कंपनीच्या मालकांचे चिरंजीव या वेळीं त्यांचे सहाध्यायी होते तेव्हां त्यांचा छापखाना ते पहावयास गेले, तेव्हां Times of India च्या नाताळच्या स्पेशल अंकांतील तीन रंगांतील चित्रें तेथें छापत असलेलीं पाहून पुण्यांतील एक फार लहान समव्यवसायी म्हणून त्यांना फार आश्चर्य वाटलें.

तसेंच त्यांनीं स्टोकऑन ट्रेंट येथील छापखान्यांतून Ceramic transfers छापकामाचा मुद्दाम तेथें तेवढ्या करतांच जाऊन अभ्यास केला. तसेंच कार्लाइल येथें मुलांकरितां कापडावरील Rag Books छापणारा छापखानाही त्यांनीं मुद्दाम तेथे जाऊन पाहिला.

जर्मनी मध्यें असतांना हामबुर्ग येथें झिंक कॉपरचे ऐवजीं सेल्युलाइड प्लेटवर लाईन व हाफटोनचे ब्लॉक तयार करण्याचें एका कंपनीनें पेटंट घेतलें होतें तें नीट, पहाण्यास त्यांच्याकडेच बाबुराव गेले होते व परत आल्यावर त्याच्या पद्धतीचे सेल्युलाइड प्लेटवरील हाफटोनचे ब्लॉक त्यांनीं पुण्यांतील १९३७ च्या अखिल भारतीय प्रदर्शनांत ठेविले होते. पण आमचे मुद्रकांचें लक्ष तंत्रशास्त्राकडे नसल्यामुळें एकानेंही त्या पद्धतीविषयीं कुतूहलही दाखविलें नाहीं. ही सर्व साधारण मुद्रकाची आस्था आहे. तसेंच वर्तमानपत्रांत छापण्याकरितां ब्लॉक तयार करण्याची-विशेषतः प्लेटची जाडी व माउंटिंगच्या विशिष्ट पद्धतीचे एक पेटंट हॉलंड मधील होतें तें पहाण्याकरितां, ते पेटंटीच्या गांवीं गेले व त्याचाही त्यांनीं अभ्यास केला. पण स्वतःच्याच ब्लॉकमेकिंगच्या धंद्यावर त्याचा अनिष्ट परिणाम व्हावयाचा म्हणून तो अजून तसाच पडून आहे व येथें हिंदुस्थानांतही आलेला त्यांना अजूनपर्यंत दिसला नाहीं.

पोलिसांच्या सौजन्याची एक गोष्ट त्यांनीं अनुभविली ती सहज सांगितली. साऊथ केन्सिंगटनमधील कांहीं कारखाने पाहून दमल्यामुळें बाबूराव रस्त्याचे कडेस लोखंडी बाकावर विश्रांति घेण्यासाठीं बसले होते; तेवढ्यांत एक पोलीस आला, व त्यानें वेळ घालविण्यासाठीं समोरच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असलेल्या साऊथ केन्सिंगटन म्युझियममध्यें जाण्याचें आपण होऊन सुचविलें. आमच्या हिंदुस्थानांतील पोलीस मार्गदर्शन करणें तर दूरच परंतु विचारल्यानंतरही उत्तर देणार नाहींत ! आतां तरी सुधारणा व्हावी.

कांहीं मशिनरी खरेदी करतां आली तर पहावी या उद्देशानें बाबूराव लंडनला येऊन राहिले. शाईच्या मिश्रणासाठीं ग्राइंडर घ्यावा म्हणून हिंडतांना प्रसिद्ध मँडर ब्रदर्सच्या शाई-कारखान्यास त्यांनीं भेट दिली. तेथें त्यांना बऱ्याच गोष्टी पहावयास मिळाल्या. लंडनमध्यें एक 'मजेशीर' प्रथा आहे. छापखाना बदलणें झाल्यास यंत्रें इकडून तिकडे हालवीत नाहींत. तर पहिल्या ठिकाणच्या मशिनरीचा लिलांव पुकारतात व नवीन जागेंत नवीन यंत्रें बसवून काम सुरू होतें, त्यामुळें अशा लिलावांतून अगदीं थोड्या प्रमाणांत नादुरुस्त झालेलीं यंत्रें देखील भरपूर स्वस्तांत मिळतात. या संधीचा बाबूरावांनीं फायदा घेण्याचें ठरविलें असल्यास नवल नाहीं.

याच वेळीं बाबूरावांनीं पूर्वीच्या मँचेस्टर टेकमध्यें ४ महिन्यांचा ऑफसेट-फोटो-लिथोचा एक स्पेशल कोर्स घेतला. तेव्हां हाफटोन फोटो लिथोचें ४ रंगांतील १७×२३चें चित्र व७रंगांतील ७×५ चें चित्र यांची प्रुफें स्वतःएकट्यानेंच काढलीं. हें काम करतांना हाफटोन स्क्रीन शिवाय साध्या कांचावरूनही प्लेटवर ऑफसेट लिथो प्रिंट करण्याचा एक नवीनच प्रोसेस साध्य झाला. असे इतर कांहीं 'प्रोसेस' आहेत काय याबद्दल त्यांनीं प्रथम लंडनच्या पेटंट आफीसमध्यें जाऊन पाहिलें व नंतर बर्लिनमध्यें शार्लोटेन बर्गच्या प्रिंटिंग टेक्नॉलजीच्या डिपार्टमध्येंही पाहिलें. तेथील प्रमुखांच्या मध्यस्थीपणामुळें सॅक्सनी मधील 'झ्विकौ' येथील Manul Process चे उत्पादक Dr. Ullman यांनींच त्यांच्या छापखान्यांत आपल्या प्रोसेसचें प्रात्यक्षिक दाखविलें. त्याबद्दच्या ५०% भागीदारीच्या कराराचा मसूदाही फार वाचण्यासारखा आहे. डॉ. उलमान यांचे घरीं ते ४ दिवस पाहुणे म्हणून होते. त्या आठवणी अजूनही अगदीं ताज्या सारख्या त्यांना आठवतात. परंतु स्वतःची गैरहजेरी पुण्याच्या छापखान्यांतून जादा वाढवूं नयें म्हणून ते लौकरच परत लिलावांतून घेतलेली यंत्रसामुग्री इकडे पाठवून हिंदुस्थानांत परत आले.

१९२५ सालीं बाबूराव पुनः हिंदुस्थानांत आले. त्यांच्या आवडत्या बालोद्यान मासिकाची विकट अवस्था त्यांच्यापुढें वाढून तयार होती. वर्गणीदारांचा आंकडा एकदम ३५० पर्यंत उतरला होता. तेव्हां बाबूरावांनीं लहान मुलांचेसाठीं दरमहा एक याप्रमाणें ४० सचित्र पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं व बालवाङ्मयांत मोलाची भर घातली.

१९२६ मध्यें इंग्लंडांत खरेदी केलेलीं यंत्रें आलीं, परंतु जवळ पुरेसा पैसा नाहीं तेव्हां कर्ज काढून कसेंतरी काम भागविलें. १९३१ साल म्हणजे धंद्यांतील मंदीचा उच्चांक-उगळीकडे कामासाठीं नुसती हाकाटी सुरू झाली होती. बाबूरावांची देशभक्ति नुकत्याच सुरू झालेल्या चळवळीचें स्वरूप पाहून उचंबळून आली. महिना दोन महिने तुरुंगवासांत काढायच्या तयारीनें कारखान्यांतील लोकांना घेऊन बाबूराव पिकेटिंगसाठीं निघाले. तुरुंगवासाची शिक्षा होण्याचे ऐवजीं सर्वांना दंड ठोठावण्यांत आला. झालें, आर्थिक अडचणींत आणखी भर पडली. सर्वांचा दंड बाबूरावांनाच भरावा लागला हें निराळें सांगणें नकोच.

लिथो छपाईकरितां धोंड्याच्या ऐवजीं झिंकप्लेट्स् तयार करण्याचें बाबूराव शिकून आले होते. त्याचा फायदा त्यांनीं घेण्याचें ठरविलें. सुप्रसिद्ध कारखानदार अनंत शिवाजी देसाई यांनीं त्यांना नवीन धंदा सुरू करून भागी देण्याचीही तयारी दर्शविली होती. परंतु बाबूरावांनीं अशा सर्व गोष्टी डावलून३४-३५सालीं टिनवरसुद्धां ऑफसेट छपाई स्वतः सुरू केली. टिन प्रिंटिंगचें म्हणून मशीन नसतांना साध्या ऑफसेटवर त्यांनीं सुरू केलेल्या या उद्योगानें मुंबईतील मुद्रकांसह सर्वांचेंच कुतूहल वाढलें. कांहीं दिवस हा उद्योग चालला, परंतु पुढें भट्ट्यांचें वगैरे इतर गोष्टींत द्रव्याभावीं पूर्णपणें जमेना तेव्हां त्यांनीं टाईप छपाईकडे जास्त लक्ष द्यावयास सुरुवात केली व इंदिरा प्रेस विकत घेतला व मसूराश्रमाचा प्रेसही भाड्यानें आणला. १९३६सालीं धंद्याचा जम चांगलाच बसला. छपाई वाढली, टाईप वाढला, व प्रभात दैनिक छपाईचा पसारा सुरू केला. या वेळेस त्यांचेकडे ११० माणसें होतीं. हा क्रम सतत चालू असता, पण स्वतः एकसारखे कामांत-त्यामुळें येणें असलेले पैसे लोकांनीं फार बुडविले.

दुसऱ्या लढाईतील कागदटंचाईमुळें व मोठीं मुलें हीं १६ व्या वर्षी छापखान्यांत काम करूं लागलीं म्हणून १९४३ मध्यें बाबूरावांनीं रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सायन्सच्या लॅबोरेटरींत ब्रोमाईड पेपर्स तयार करण्याचें प्रायोगिक काम अंगिकारिलें. जिलेटिन तयार करण्यासहि सुरुवात केली.हें काम त्यांनीं जवळ जवळ २ वर्षें विनावेतन केलें.

याच वेळीं पुण्याजवळच असलेल्या सरकारी 'डिहायड्रेशन फॅक्टरी' मध्यें रोज १५०० गुरें मारलीं जात होतीं. तेथील हाडें रोज ५ ते ६ टनांपर्यंत जमत. त्यांचीं उपयुक्त पदार्थांत रूपांतर करण्यासाठींही योजना तयार करून त्यांनीं येथील लष्करी अधिकाऱ्यांना सादर केली.ती नौशेरा (वायव्यसरहद्द प्रांत) येथील अधिकाऱ्यांकडे पाठविण्यांत आली. तेथून ती योजना मध्यवर्ती सरकारचे अन्नमंत्र्यांकडे गेली. परंतु पुढें प्रगति खुंटली. फोटोचे कागद तयार करण्याचे कामीं त्यांना श्री. व्रिलींनीं आमंत्रण दिलें. प्रसिद्ध क्रिकेटपटू श्री. डीमेलो यांनीं ग्वाल्हेरला फॅक्टरी काढण्याची योजना आखली; जागा घेतली; पाटी लावली. परंतु पुढें प्रगति शून्य. बाबूराव लायकअलीचे पाहुणे म्हणून शिरपुर पेपर मिल्समध्यें गेले. फोटोग्राफिक पेपर्स तयार करण्याचा त्यांचा विचार होता. परंतु तेथेंहि कांहीं प्रगति होऊं शकली नाहीं. तेव्हां स्वतःच कांहींतरी केलें पाहिजे या विचारानें त्यांनीं हडपसर स्टेशनजवळ धंद्यास योग्य अशी जागा मिळवून तेथें ग्लू, जिलेटिन, रुळांचा सरस वगैरे अनेक गोष्टी हाडें व चामडीं यांच्यापासून तयार करण्याचा कारखाना सुरू केला.अशा रीतीनें विविधतेनें परिपूर्ण असें बाबूरावांचें जीवन आहे.

पुणें मुद्रक संघाच्या संस्थापक मंडळींत बाबूराव एक होते. गेलीं ३६ वर्षें पुणें येथील मुद्रकांच्या या संघटनेंत बाबूरावांनीं सेक्रेटरी,उपाध्यक्ष,अध्यक्ष; औद्योगिक प्रदर्शनें, प्रदर्शन परीक्षा समिति, मुद्रणप्रकाश मासिकाचे संपादक, आखिल भारतीय मुद्रक परिषद समिति,मुद्रणशाळा समिति, लढाईच्या टंचाईच्या काळांतील रॉकेल वाटप, कागदासाठीं सरकारकडे शिष्टाई करण्यासाठीं नेमलेली समिति वगैरे निरनिराळ्या भूमिकांवरून संघाची कामगिरी बजावली आहे. त्यांनीं मोठमोठ्या छपाईच्या कामांची जबाबदारी अंगावर घेऊन मुंबईच्या निरनिराळ्या मुद्रकांकडूनसुद्धां तीं कामें पूर्ण करून घेतलीं आहेत. प्रदर्शन कमिटीचे अध्यक्ष असतांना त्यांनीं जगांतील निरनिराळ्या देशांतून पत्रव्यवहार करून वृत्तपत्रांचे अंक फार मोठ्या प्रमाणांत गोळा केले होते. १०० वर्षापेक्षां अधिक काल तग धरून असलेल्या इंग्लंडमधील प्रेसेसना पत्रें लिहून त्यांनीं त्यांचे स्मारक-ग्रंथ (Souvenirs) मागविले. असे १०-१२ ग्रंथ आले होते. त्यांपैकीं एकावर पुढील वाक्य होतें—We are a hundred years' press with a hundred years' customer—सुरुवातीपासूनच्या गिऱ्हाइकास याप्रमाणें पिढ्यान् पिढ्या संभाळून ठेवणारे किती मुद्रक आढळतील !

दुसऱ्यानें लिहिलें होतें—Our litho varnishes are made by the grand-sons of the founders किती हा धंद्याविषयींचा अभिमान !

तिसऱ्यानें लिहिलें होतें—Scent worth a cent is sold for a dollar, so why should a printer be in want of work ? पाहिलात आत्मविश्वासाचा नमुना !

बाबूरावांना स्वतः कामें करण्याचीच हौस फार ! नवनवीन लोकांना हाताशीं घेऊन तयार करण्यांत त्यांचा हातखंडा आहे. एका वेळेस पुण्यांत १६ ब्लॉकमेकर्स होते, त्यांपैकीं १२ त्यांच्या येथें तयार झालेले होते, हें ते मोठ्या गंमतीनें सांगतात.

निरनिराळ्या प्रयोगांत तर त्यांनीं वेळ व पैसा अमाप खर्च केला. आतांपर्यंत किमान एक लाख रुपये प्रयोगांत खर्च झाले असतील. एजन्सी धंद्याचे मात्र बाबूराव स्वतः तीव्र विरोधी आहेत. या धंद्यास त्यांनीं prostitution (वेश्याव्यवसाय) असें नांव दिलें आहे. यामुळें पैसा मिळविण्याचे कित्येक अक्षरशः घरीं चालत आलेले एजन्सीचे व्यवसाय बाबूरावांनीं सोडून दिले.

सभांतून जेवणाची मूळ कल्पना बाबूरावांचीच. त्यांनीं सुरू केलेला एक स्नेह्यांचा क्लब सतत ४८ वर्षें चालला होता ! यांत भिन्न व्यवसायांतील, भिन्न पेशाची मंडळी आठवड्यांतून एकदां (७ ते ९॥ पर्यंत रात्रीं) एकत्र येत, जेवण करीत व निरनिराळ्या विषयांवर मोकळ्या मनानें चर्चा करीत. पुणें मुद्रक संस्थेची कल्पना देखील यांतूनच निघाली. संस्थेच्या सभेला लोकमान्य टिळक, तात्यासाहेब केळकरसारखीं थोर मंडळी छापखान्यांचे मालक म्हणून आत्मीयतेनें येत असत.श्री.आवटे यांनीं आपल्या मुलावर छापखाना सोंपविला, त्या समारंभाचें अध्यक्षस्थान लो. टिळक यांनीं भूषविलें होतें. या सभेंत श्री. बाबूरावांनीं दिलेल्या व्याख्यानांत सांगितलें कीं, पुण्यांतील पर्वतीजवळ गोळा होणाऱ्या हाडांच्या पर्वतप्राय ढिगांतून सरस व इतर पदार्थ मुद्रकांनीं कां बनवूं नयेत ? तो उद्योग आतां ३५ वर्षांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज. श्री. टिळक
सं. त्रिसाताहिक-केसरी



ना. भि. परुळेकर
सं. दै. सकाळ



ह. मो. जोशी
सं. दै. लोकशक्ति

वा. रा. कोठारी
सं. दै. प्रभात

व. प्र. गीत
सं. दै. भारत

ना. ल. कोकाटे
सं. दै. मन्वन्तर

सकाळ

दै. सकाळ १ ला अंक १-१-१९३२



वि. वि. बापट
सं. दै. लोकराज्य

भारत

दै. भारत १ ला अंक
२४-५-१९४८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबूरावांचा चालू आहे ! मुद्रणव्यावसायिकांस त्यांच्या पुढील अनुभवयुक्त सूचना नुसत्या मार्गदर्शकच नव्हे तर उपकारक ठरतील.

(१) छपाईला लागणाऱ्या सर्व प्रकारच्या मालाच व यंत्रांचेंही उत्पादन येथेंच सुरू व्हावयास पाहिजे; व याकरितां या व्यवसायांतील नवीन तरुणांनीं जुन्यांच्याच मार्गदर्शनाच्या साह्यानें पुढाकार घेतला पाहिजे.

(२) मुद्रकांमध्यें आपसांत सुबुद्ध (intelligent) असें परस्पर सहकार्य वाढविलें पाहिजे.

(३) यापुढें Specialization मुळेंच छपाईच्या धंद्यांत कामाची योग्य व प्रमाणशीर विभागणी होऊन दर कमी झाल्यानें आपसांतील स्पर्धेसहि आळा बसेल.

(४) प्रत्येकानें आपली प्रामाणिक दैनंदिनी लिहिली पाहिजे. जमाखर्च म्हणजे व्यावसायिक यशाची गुरुकिल्ली; दैनंदिनी म्हणजेच बौद्धिक व व्यावसायिक जमाखर्चच होय.

सध्या हडपसर स्टेशनजवळ, पुणें कार्पोरेशनचे हद्दींतच—बाबूरावांनीं स्थापिलेल्या "हडपसर केमिकल्स अँड बाय प्रॉडक्ट्स् लि." या कंपनीच्या मेमोरँडममध्यें फोटोग्राफी, प्रिंटिंग व तदनुषंगिक धंद्यांना लागणाऱ्या वस्तु तयार करण्याचा उद्देश अर्थातच घातलेला आहे.व आतां तेथें झालेल्या 'टेक्निकल जेलेटीन' पासून सर्वांना लागणारा रुळांचा सरस व बाइंडर्सना लागणारा फार सोयीचा असा 'कोल्ड ग्लू' तयार होत आहे. हल्लींच्या चमत्कारिक आर्थिक' परिस्थितींतही त्यांनीं एथपर्यंत कारखान्याची प्रगति आणली आहे. या कारखान्यांत मुख्य बाजू जास्त उत्पादक करून हा कारखाना सर्वथैव मुद्रकांच्या स्वाधीन करण्याची त्यांची इच्छा आहे—पण तरुण,उत्साही,ध्येयवादी मुद्रक त्याकरितां पुढें येण्याची जरुरी आहे.

शंकर सखाराम दाते

(लेखक-संशोधक, बी. एस्‌सी.)

सदाशिव पेठेंतील कलागृह छापखान्याचे मालक ! आज सत्तरी उलटून गेली तरी अत्यंत उत्साहांत व छापखान्याबाबत मोठा आशावाद सांगूं शकतात. सुशिक्षितांनीं हात काळे करूनच व्यवसाय करावा हेंच त्यांचें सांगणें. त्यांच्या घेतलेल्या भेटींत ते म्हणालेः—

माझे चुलत सासरे बी. एम्. टिळक हे १९०० सालाच्या सुमारास जर्मनीस जाऊन ब्लॉकमेकिंग वगैरे सर्व शिकून आले. त्यांनीं जर्मनींत शिक्षण घेत असतांना असें पाहिलें कीं, पिढ्यान् पिढ्या एकच धंदा प्रगतिपर पद्धतीनें केला जाई. जर्मनीहून येतांना त्यांनीं सर्व सामुग्री आणली होती. व येथें धंदा चालू केला. पण श्री. टिळक १९०१ मध्यें एकाएकीं वारले व सासऱ्यांच्या सल्ल्यानें त्यांच्या सामानाचा मी उपयोग करावा असें ठरलें. मला त्या धंद्याची गोडी मात्र लागली. १९०४ पासून स्वतःच्या जवळच्या पैशांतून किरकोळ सामान घेऊन मीं धंदा चालूं केला. बाजारांतून साधे तांब्याचे पत्रे आणून सहाणेनें त्याला पॉलिश करून ते मी वापरीत असे. शक्यतोंपर्यंत इथल्याच सामानावर अवलंबून राहावें असें मला वाटे. बी. एम्. टिळक यांनीं सुरू केलेला जर्मनींतील 'वेट प्लेट प्रोसेस' मी प्रथमपासून करीत असे. आजतागायत ती.चालू आहे. बी. एम्. टिळक व नंतर आम्हीच मुंबई इलाख्यांतील पहिले ब्लॉकमेकर असूं.

नंतर पी. व्ही. दाते नांवाच्या गृहस्थामार्फत आम्ही झिंक व तांब्याचे पत्रे व इतर सामान परदेशाहून मागवूं लागलों. १९०८ सालीं माझ्या बंधूंना सहकारी होऊन वैद्यक पत्रिका प्रेस काढला. १९०९ सालीं मी ब्लॉकमेकिंगची सर्व सामुग्री खरेदी केली. तेथपर्यंत स्क्रीनशिवाय म्हणून कोलो टाईप पद्धतीनें मी प्रिंट्स करून देत असे. प्रिझमचा उपयोग मीं पुष्कळ उशीरा सुरू केला. इचिंगच्या सर्व पद्धती मीं करून पाहिल्या. मला जेव्हां कांहीं अडचणी उत्पन्न झाल्या त्या वेळीं मी फोटोझिंको ऑफिसमध्यें जाई व आंत जाण्यास परवानगी नसे म्हणून बाहेरील पोस्टांच्या आवारांत बसून ते प्रिंटिंगला वेळ किती देतात वगैरे गोष्टी पाहिल्या होत्या.

मजकडे येणारीं छपाईकामें बंधूंच्या यंत्रसामुग्रीवर होईनात म्हणून मी एक ३५०० रुपयांला डबल रॉयलचें मशीन १९१५ सालीं आणून त्यावर कामें काढूं लागलों. १९१२ सालापासून पटवर्धनांच्या मोडी पुस्तकाचे ब्लॉक्स करून ते छापण्याचें काम आमचेकडे आजतागायत आहे. त्याचे अगोदर १९१२ मध्यें 'गी सेक' ह्या जर्मन मेकचें ट्रेडल घेतलें होतेंच. १९१९ सालीं मात्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बंधूपासून वेगळे होऊन कलागृह हा छापखाना व ब्लॉकमेकिंग असा धंदा सुरू केला.

माझ्या घरांतील जाणत्या स्त्रिया व मुलें यांना कंपोजिंग, छपाई, बाइंडिंग शिकविण्याची मला हौस प्रथमपासून होती.

१९२७ सालापर्यंत मी जी कांहीं बचत केली होती त्यांच्या साहाय्यानें ऑटोमेटिक सिलिंडर यंत्र, ऑटोमेटिक ट्रेडल, सेक्शन शिलाईचें यंत्र, मॅन्सफील्डचें ३० इंची कटिंग मशिन, अशी साधारण ३० हजारापर्यंत यंत्रसामुग्री घेतली व त्याच वेळीं १२ हॉर्स पॉवरचें एक ऑईल एंजिन घेतलें. अशा तऱ्हेचा अद्ययावत् प्रेस करून सर्व मुलांच्या हातांत द्यावा असा माझा विचार झाला.

मोठमोठीं कामें घेऊन तीं ठरल्याप्रमाणें पार पाडा-वयाचीं, त्यामध्यें घरांतल्या मंडळींचीही भरपूर मदत घ्यावयाची, हें प्रथमपासून माझें धोरण होतें.

छपाई करतांना जगाद्धितेच्छु प्रेस व इतरत्र पूर्वी कागद ओला करून वापरीत असत. पण मी कागद कोर-डाच छापूं लागलों. तसेंच परदेशांतून कागद मागवूं लागलों. १९१७ सालापासून डेक्कन पेपर मिल्चा कागद घेत होतों. पदमजी शेठ फार इमानी गृहस्थ असल्याचा माझा अनुभव आहे.

१९२७ मध्यें घेतलेली यंत्रसामुग्री घरीं येऊन पडली. ती बसवून देण्याकरितां १००० रु. इंडो युरोप ट्रेडिंग कंपनीला द्यावयाचे होते. परंतु मुलाबरोबर विचार करून सबंध आठवडा रात्रंदिवस काम करून आम्हींच ती बसविली. १००० रु. तर वांचविलेच, पण त्यानंतरच्या काळांत माझा मुलगा यंत्रविशारद म्हणून प्रसिद्धीस आला. त्या ज्ञानावर मुंबईसही यंत्रें बसवून दिलीं. आज माझा मोठा मुलगा मुंबईस स्वतंत्र धंदा करीत आहे व त्याच्याही घरांत सर्व कुटुंबीय कामें करतात. आतां आमच्या घराण्याचा असाच हा धंदा झाला आहे. १९४० सालापासून माझ्या दुसऱ्या मुलाकडे सर्व सोंपवून मी पूर्ण निवृत्त आहें. स्वतः रोज काम केलें पाहिजे, हा माझा आग्रह मात्र कायम आहे. मी नुकतेंच काढलेलें हिमालयदर्शन ह्या ४७५ पानी पुस्तकाचें सगळें काम माझ्या कुटुंबियांनीं व मीं मिळून केलें आहे.

१९०४ सालीं २५०० रु. ला ३ हॉर्स पॉवरचें यंत्र घेतलें. पण त्यानंतर सिलिंडर यंत्राहि मी माणसा-करून फिरवून घेत असे. त्यानंतर १९२७ लाच फार विचारानंतर मी ऑइल एंजिन घेतलें. एरवीं माणसांचा उपयोग व्हावा हीच माझी इच्छा !

अशिक्षित यंत्रज्ञांपेक्षां आम्ही सुशिक्षित पुष्कळ काम करूं शकतों, असें माझें म्हणणें आहे. मी नोकराकडून केवळ कामाची अपेक्षा करतों. त्यांनीं तसें न केल्यास लागलीच त्यांना रजा देण्यास तयार होतों. छापखाना बुडावा असा तो धंदाच नाहीं. पांढरपेशांतून नुसती खुर्चीवर बसून 'मॅनेजरी' करणारे लोक निघाले म्हणूनच हा धंदा मागें पडला.

ह्या धंद्यांत तूटहि येण्याचें कारण नाहीं. अपघातानें येईल ती वेगळी. ह्या धंद्यांत सचोटी फार महत्त्वाची आहे.

पुण्यामध्यें छापखान्याचा धंदा केवळ चित्रशाळेचे वासुकाका जोशी यांनींच केला. त्यांना चैन सुचली नाहीं कीं ऐषआराम घ्यावासा वाटला नाहीं. कामाकरितां रात्रंदिवसहि छापखान्यांत राहावें लागे. तसे ते वागले व टिकले.

धंद्यांतील संघटनेबद्दल मला असें वाटतें कीं, केलेले ठराव व नियम जर संघटनेचे सर्व सभासद पाळण्यास तयार असतील तरच संघटनेचा उपयोग आहे. एरवीं संघटने-मुळें धंद्याची प्रगति होणें शक्य नाहीं.

ट्रेड सिक्रेट म्हणजे धंद्यांतील गुपित असें नसतेंच. प्रत्येक विद्या गुरुमुखानच घ्यावी लागते. पुस्तकें लिहिलीं तरी त्यांत खरे अनुभव लिहितांच येत नाहींत. वाङ्मय हवें आहे पण वाङ्मयाचा उपयोग होईल तरच हवें आहे. परदेशांतून शिकून आलेले लोक मला अडचणी विचारीत. याचा अर्थ त्यांनीं शिक्षणाचा उपयोग करण्याची पद्धत अवगत करून घेतली नसावी.

धंद्यांत यशस्वी होण्यासाठीं त्यांत मनच घालावें लागतें. ज्यांनीं मन घातलें ते यश मिळवूं शकले. स्वतःचें हित व धंद्याचें हित एकच मानण्याची वृत्ति होतांच यश मिळतें.

धंद्याला राष्ट्रीय स्वरूप येण्यासाठीं धंदे पिढी-जात टिकविले गेले पाहिजेत. एका कुटुंबांत एकच गोष्ट उत्तम झाली पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा तऱ्हेचे उत्साहपरिपूर्ण विचार मनांत ठेवून श्री. शंकरराव दाते आपलें सत्तरीनंतरचें आयुष्य सार्थकीं लावीत आहेत. असे मुद्रक व धंदेवाले सांपडणें खरोखर मुद्रणधंद्याचें भाग्य समजलें पाहिजे असा विचार करीत मी त्यांचा निरोप घेतला.

रा. बाळकृष्ण भाऊ जोशी

(आत्मकथन)

माझा मुद्रणव्यवसायांत १९१५ सालीं प्रवेश झाला. १९२६ पर्यंत मी श्री. भट यांच्या 'यशवंत' छापखान्यांत मॅनेजर म्हणून होतों. त्यानंतर स्वतःचा 'ज्ञानविलास' म्हणून छापखाना सुरू केला. स्वतःचा छापखाना चालू केल्यावरच्या ५–७ गोष्टी येथें सांगतों.

(१) हल्लीं छपाईचीं सर्व कामें सिलिंडर व ट्रेडल मशीनवरच चोहोंकडे चालू आहेत. परंतु १९२६ सालीं कित्येक प्रेसमधून 'हँडप्रेस'वर छपाई चालत असे. माझ्याही प्रेसमध्यें अशीं कांहीं कामें आम्ही 'हँडप्रेस'वर छापून काढलीं. सिंगल क्रौन ८ पेजी हँडप्रेस अद्याप आमचेकडे आहे. त्यांवर ८ पेज बसवून, हातानें शाईचे रूळ वर फिरवून, नंतर त्यावर टंपिन टाकून हातानेंच मशीनचा दाब देऊन कागद छापून घ्यावयाचा; तो दाब काढून, कागद काढून पुनः दुसरा कागद त्यावर टाकून, पुनः शाई लावून, टंपिन टाकून दाबून काढावयाचा, असा प्रकार चाले. कागद लावणारा एक, शाई लावणारा एक, व दोघांनीं मिळून दाब द्यावयाचा; अशीं २ माणसें ८ तास राबून ५००, ७००, १००० प्रत छापून काढीत. इतका मंद वेग त्या वेळीं असून, धंद्याची प्रगतिही तितकीच त्या वेळीं होती. हल्लीं सिलिंडर मशीनवर फक्त एक मनुष्य प्रेसमन म्हणून असतो; व तो तासीं १ हजार छपाई करतो. शिवाय हल्लीं पुणें शहरांत कागद लावणाऱ्या मनुष्याची गरज नाहीं, अशीं कित्येक छपाईचीं यंत्रें आहेत. त्यांवर तर तासांत ४ हजार छपाई होऊं शकते! आणि हँडप्रेसवर तासांत २०० सुमारें! ही सध्यां धंद्याची केवढी प्रगति आहे पाहा!

(२) त्याच वेळीं, माझ्या छापखान्यांत आरंभीं ट्रेडल मशीन नव्हतें. तेव्हां लहानसहान कामें छापण्याची मजजवळ सोय नव्हती. त्या वेळीं आमचा प्रेसमन एक बाजूला व मी स्वतः दुसऱ्या बाजूला बसें, व दोघांनीं दोन अंगानीं दोन कागद लावावयाचे! मशीनला कागद धरणारे दोन आंगठे असत, त्या एकेक आंगठ्यावर एकेक कागद तें मशीन धरून ओढून घेई, व दोन कागद या प्रकारें कसेबसे छापून निघत! कामाचा वेग तासीं ५००; ट्रेडल खरेदीचा योग येईपर्यंत आम्ही अशीं कित्येक कामें छापून काढलीं! ती गोष्ट आजच्या दिवसांत ध्यानीं घेतली, तर ही छपाईची त्या काळीं फारच कुचंबणा झाली असें दिसून येईल. पण ही कुचंबणा फक्त माझ्या प्रेसपुरतीच मी सांगत आहे.

(३) एकदां रात्रीं १० वाजतां मी घरीं झोंपलों असतां आमचे एक मित्र 'गिन्हाईक' मला उठविण्यास आले. त्यांनीं एक पत्रक रात्रीच्या रात्रीं छापून पाहिजे म्हणून सांगितलें! त्या वेळीं 'रात्रीचें कारण' सांगून काम नाकारण्याची कांहीं तयारी नव्हती. गिन्हाईक तुटूं नये ही मनाला ओढ! मीं तें काम पत्करलें. कंपॉझिटर बोलावला. गॅसची बत्ती आणविली. प्रुफ तपासण्यासाठीं प्रेसमध्यें मी गुंतून राहिलों. प्रेसमन बोलावला, तोहि आला! आणि पहाटे ३ वाजेपर्यंत १ हजार पत्रकें छापून काढून त्या मित्राच्या घरीं पोंचविलीं! रु. ४ चें काम तें होतें, त्याचे रात्रपाळीमुळें रु. ५ केले. एवढ्या कामासाठीं सुद्धां रात्रपाळीचे भलते श्रम आम्हीं घेतले! कारण गिन्हाइकाच्या हाकेला तयार असणें जरूर असतें. नाहींतर धंदा कसा चालेल ही भीति होती. त्याचा हा परिणाम!

(४) आम्ही आमच्या छापखान्याकरतां आरंभीं जें मशीन खरेदी केलें, तें मूळ जागेवर आणून जोडून चालू केलें. ती पहिली शुभ वेळ, म्हणजे सायंकाळीं ८ वाजतां. शनिवारीं अमावस्येचा दिवस! कारण मशीन जोडून त्याच वेळीं तयार झालें. लागलीच पूजनाची तयारी केली! हळदकुंकू, नारळ व पेढे. पण तोच शनवार व तीच अमावास्या व तीच रात्रीची ८ ची वेळ एकंदरींत शुभ वेळच ठरली असें मला आतां म्हणावेंच लागेल. दुसरें सिलिंडर मशीन आम्हीं १९३४ सालीं इंग्लंडहून आणविलें. त्याच्याहि पेट्या स्टेशनवरून प्रेसच्या दाराशीं येऊन पोंचल्या. तोही शनवारच होता. पेट्या पोंचतांच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एक फिटर (गोविंदराव गोगावले) मशीनच्या उभारणीस तयारच होता. त्यानेंही शनवारींच सायंकाळीं काम पत्करून पेट्या (पॅकिंग) फोडण्यास आरंभ केला ! त्यास तोच शुभ मुहूर्त लाभला ! तो फिटरही विलक्षण हुषार होता. त्यानें रविवार सर्व खर्चून सोमवारीं सकाळीं ८ ला मशीन तयार करून चालवून दाखविलें ! इतकीं हुषार माणसें आज पुण्यांत बहुधा दुर्मिळच आहेत ! त्यामुळें त्या फिटरची मला सारखी आठवण होत असते.

(५) दुसऱ्या जागतिक युद्धापूर्वी माझ्या मुख्य कामगारांचे पगार दरमहा २८ च्या सुमारास होते; दुसऱ्या युद्धानंतर ते ५६ ते ६० वर गेले. तिसऱ्या युद्धानंतर, म्हणजे आजला ते पगार ८४ वर आहेत. त्या वेळीं आमच्या श्री. भट यांचे मालकीच्या 'यशवंत' प्रेसमध्यें पंत पराडकर यांचें आर्याभारत छापलें, त्याचा दर एका फॉर्मला (१६ पेजी इ. क्रौन) रु. ११८।१२ होता; पण तशा कामास आजचा पुण्याचा दर रु. ३८ आहे ! दर व पगार कसे वाढले आहेत तें पाहा !

पुण्यामध्यें छापखान्याचा धंदा केवळ चित्रशाळेचे वासुकाका जोशी यांनींच केला. त्यांना चैन सुचली नाहीं कीं ऐषआराम घ्यावासा वाटला नाहीं. कामा-करितां रात्रंदिवसहि छापखान्यांत रहावें लागे. तसे ते वागले व टिकले. त्यांचें विस्तृत चरित्र वाचनीय आहे.

(६) पूर्वी २० च्या आंतील कारखान्यांना फॅक्टरी ॲक्ट लागू नव्हता, त्यामुळें त्या वेळीं आमचे कामगारांच्या कामाचे तास रोज १० ठेवले होते. ८ तासांचा दिवस धरून १। पट पगार देत असूं. काम जास्त असलें कीं, एक दिवसाआड कामगारांनीं १२ तास काम करा-वयाचें. तसें काम करण्यास सारे कामगार खूष असत. कारण, त्यामुळें त्यांस जादा पैसे मिळत व प्रपंच अधिक नीटपणें चालवितां येई. हल्लीं ८ तासांचे वर ५–१० मिनिटें काम करणें हा गुन्हा ठरला असल्यामुळें हल्लीं काम करण्याची लोकांची उमेद दाबून टाकली गेली असून, पैसा जास्त मिळण्याचा प्रामाणिकपणाचा मार्ग बंद झाला आहे. त्यामुळें वाढल्या गरजा भागविण्यासाठीं लोकांनीं संपाचे मार्ग अवलंबिले आहेत व फुकटांत ४।४ महिन्यांचे बोनस गिरणी कामगार मागत आहेत ! ज्यांच्या संघटना नाहींत, ते ८ तासांचा पगार पुरत नाहीं म्हणून दारिद्र्यांत दिवस कंठीत आहेत ! त्यांत जे कुशाग्र बुद्धीचे लोक आहेत, त्यांना आड–मार्ग सोपा झाला आहे; आणि सर्वसाधारण कामगारांचा हा ८ तासांचे वर उरलेला वेळ सिनेमा पाहण्यांत घालवावा लागून त्यांचे प्रपंचांत अशा प्रकारें खर्चाची निष्कारण वाढ झाली आहे. फॅक्टरी कायदा, कामगारांच्या कल्याणासाठीं सरकारनें केला असून त्यायोगें कामगारांचें कल्याण वरील प्रकारें झालें आहे ! असो.

(७) आतां याच निमित्तानें लोकमान्य टिळक यांची एक आठवण सांगतों. टिळक इंग्लंडला चिरोलची केस चालविण्याकरितां गेले होते; त्या अवधींत त्यांनीं आपल्या 'केसरी' करतां एक नव्या तऱ्हेचें मशीन खरेदी केलें. तें परत येतांना येथें आणविलें. पण तें उभें करण्याचें काम कोण करणार ? त्यासाठीं त्यांनीं इंग्लंडहून कोणीहि माणूस बरो-बर आणला नव्हता. त्यांनीं स्वतःच तें फिटिंगचें काम केलें पण कामगारांचें मदतीनें ! त्यांनीं त्यासाठीं मशी-नच्या निरनिराळ्या भागांचे व उभारणीचे फोटो इंग्लंडहून घेऊन ठेवले होते. त्यांच्याच आधारावर त्यांनीं स्वतःच आपली बुद्धि चालवून तें मशीनपूर्णपणें उभें केलें ! हें त्यांचें बुद्धीचें, कष्ट करण्याच्या तयारीचें व स्वावलंबनाचें केवढें मोठें उदाहरण आहे पाहा ! ते इंग्लंडहून परत आल्या-वर त्यांच्या सत्कारप्रसंगासाठीं इंदिरा प्रेसमध्यें एक सभा झाली ! २००।३०० माणसें सभेस होतीं. सर्वांना खुर्च्या ठेवल्या होत्या ! त्या टिळकांनीं प्रसंगीं जें भाषण केलें तें मला सर्व आठवत नाहीं पण तें ऐकल्यावर मला वाटलें कीं, राजकारणांत घुसलेले हे लोक, यांना राजकारणाशिवाय व व्याख्यानें व वादविवाद यांपलीकडे कांहीं कळत नसावें ! परंतु निर-निराळ्या प्रिंटिंग मशीनरीची माहिती, त्यांत क्रमानें परदेशांत होत आलेल्या सुधारणा इ. गोष्टी त्यांनीं सांगितल्यावर लो. टिळक हे कसेसर्व बाजूंनीं चतुरस्र होते, हें ध्यानांत येऊन मला त्यांचें सर्वांगीण महत्त्व कळून चुकलें ! अशीं थोर माणसेंही आमच्या या धंद्यांत होतीं. हें आमच्या धंद्याला अत्यंत अभिमानास्पद व भूषणीय आहे खास. २–११–५१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कै० लक्ष्मण भाऊराव कोकाटे

संस्थापक — हनुमान छापखाना, पुणें.

कर्तृत्ववान् व्यक्तींचीं चरित्रें समाजाला मार्गदर्शक होतात. लक्ष्मणराव कोकाटे यांचें जीवनचरित्र धकाधकीचें होतें यांत शंकाच नाहीं. अगदीं गरीब कुटुंबांत यांचा जन्म इ.स.१८७७ मध्यें होऊन वयाच्या९.-१०व्या वर्षी त्यांना उदरनिर्वाहाकारितां नोकरी करावी लागली.पुण्यांतील केसरी व इंदिरा प्रेस येथें त्यांनीं मशीन खात्यांत काम केलें. ही कला त्यांना कै० कृष्णराव सपकाळ यांनी शिकविली. पुढें ते जगद्धितेच्छु प्रेसमध्यें गेले. तेथें मुख्य प्रेसमन म्हणून ते काम पाहात होते. कांहीं कारणामुळें तेथें बिनसल्यामुळें ती नोकरी त्यांनीं सोडून दिली. नोकरी सोडली तरी गोंधळेकर यांची मर्जी शेवटपर्यंत कायम राहिली. अडीअडचणीला कांहीं मशीनमध्यें बिघाड झाल्यास केव्हांही गोंधळेकर त्यांना सांगत व ते काम चालू करून देत असत. त्यांना छपाईच्या मशीनरींची पुरेपूर माहिती होती. स्वतः हातानें काम करण्याची धमकही होती. गोंधळेकरांची नोकरी सुटल्यानंतर दोन तीन वर्षें ते तसेंच स्वस्थ होते. १९१८ सालीं त्यांनीं आपला स्वतःचा हनुमान छापखाना सुरू केला. जुनाचाना टाईप, हातानें फिरविण्याचें सिलेंडर मशीन अशी प्रेसची स्थिति होती. परंतु त्या कठीण परिस्थितींत त्यांनीं छपाईचें काम नीटनेटकें केलें. गोंधळेकरांचेकडे असतांना बऱ्याच लेखक-प्रकाशकांच्या ओळखी झाल्या होत्या. त्यांतच किताबखान्याचे कै. हरीवंत दामले यांचीही ओळख झाली. हनुमान छापखान्याच्या कामास सुरुवात दामले यांच्या छपाईच्या कामानें झाली आहे. कमकुवत मशीनमुळें पाहिजे तसा कामाचा उठाव होईना म्हणून दुसरें पॉवर-वर चालणारें मशीन आणण्यांत आलें. कामाचा उरक अधिक होऊं लागला. स्वतःची टाईप फौंड्रीही त्यांनीं सुरू केली. कामाचा उरक, सुबकपणा यामुळें अधिक काम येऊं लागलें. १९२६ सालीं नवीन जर्मन मेकचें मशीन आणण्यांत आलें. यामुळें पूर्वीपेक्षां जास्त काम करण्यास हुरूप वाटून खूपच व्याप वाढला. १९२६-२७ च्या सुमारास मुलांचीही मदत त्यांना होऊं लागली. पुढें शालेय पुस्तक छपाईचें काम बरेंच येऊं लागलें.

अशिक्षित माणसानें उत्तम छापखाना चालविल्याचें हें पहिलेंच उदाहरण असावें. परिस्थितीमुळें त्यांना शिक्षण घेतां आलें नाहीं तरी त्यांनीं छपाईच्या कलेचें पुरेपूर शिक्षण घेतलें व इतरांना दिलें. त्यांनीं कितीतरी मंडळी शिकवून तयार केली आहेत. सचोटी व वक्तशीरपणा हे त्यांचे मोठे गुण होते. या धंद्यांतील त्यांचे अनुभव मननीय आहेत.

दिनांक ८-१-१९४३ या दिवशीं ते स्वर्गवासी झाले. त्यांचे मागें त्यांचे चिरंजीव सदुभाऊ, नारायणराव व भाऊराव त्यांचा धंदा नांवारूपानें चालवीत आहेत.

कै. दिनकर जनार्दन दाभोळकर

पुणें लष्करांतील मुद्रक दिनकर जनार्दन दाभोळकर जन्म १८९७. शिक्षण इंग्रजी २ इयत्ता झालें. डॉ.व्ही. डी. फाटक यांचेकडे कंपाउंडर होते. लेबलें छापण्याच्या कामांतून छापखान्याशीं संबंध आला.

मोकळ्या वेळांत गाडीतळावर जाऊन बैलगाड्यांचीं कंत्राटें घेत असत. त्या उद्योगांत पैसे मिळाले तेव्हां पराडकर आणि कंपनी यांचेबरोबर भागीदारी केली. १९२२त ट्रेडल यंत्र घेऊन लष्करमध्यें छापखाना घातला. तो शेवटपर्यंत उत्तम चालविला. १९३८ त करंदीकर राजहंस या छापखान्यांतून बाहेर पडले. १९३८ मध्येंच श्री. दि.ज. दाभोळकर एकाएकी अकालीं स्वर्गवासी झाले.

कै. धोंडो वासुदेव विद्वांस

जन्म ३ जुलै १८६७ (केळशी जि.रत्नागिरी).१८८२ सालीं शिक्षणासाठीं पुणें येथें त्यांचे मामा कै. लोकमान्य टिळक यांचेकडे आले. १८९० मध्यें मॅट्रिक पास. १८९७ सालीं लोकमान्यांना पहिली शिक्षा झाल्यानंतर आर्यभूषण छापखान्यांत केसरी छापण्याचें नाकारल्यानंतर केसरी मराठा पत्राचें स्वतंत्र ऑफिस लो. टिळकांचे राहत्या घरीं विंचूरकरांचे वाड्यांत सुरू केलें, व १९०४ सालीं लो. टिळकांनीं गायकवाडवाडा खरेदी केल्यानंतर १९०६ मध्यें केसरीचा स्वतःचा छापखाना कै. बाबासाहेब विद्वांस यांनीं उभारला. केसरी प्रेस व केसरी मराठा कार्यालय यांची स्थापना व त्यांची दैनंदिन जोपासना लो. टिळकांचे मार्गदर्शकत्वाखालीं करण्याचें श्रेय कै. विद्वांस यांनाच होतें.आज जी केसरी प्रेसमधील सर्व यंत्रसामुग्री आहे ती त्यांच्याच कारकीर्दीतील आहे.१९२०मध्यें विश्वस्त म्हणून नेमणूक झाली. १८९७ पासून मॅनेजर म्हणून सर्व हयातभर व १९२० पासून १९३७ पर्यंत विश्वस्त म्हणून त्यांनीं काम केलें. मृत्यु-२६ डिसेंबर १९४०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यांतील नऊ दैनिकें हें पुण्याचें भूषणच आहे. दैनिक वृत्तपत्रांच्या राष्ट्रहितैषी तंत्रांमध्यें जेवढी सुधारणा होईल ती सर्व समाज-जीवनावर सुपरिणाम करणारी ठरेल यांत संशय नाहीं. या दृष्टी-नेंच पुण्यांतील चालू दैनिकांबद्दल स्वतंत्र ऊहापोह करीत आहोंत.

पुण्यांतील दैनिक वृत्तपत्रें

लेखक—यशवन्त गोपाळ जोशी, बी. ए.

मानवी स्वभावामध्यें कुतूहल ही एक मोठी विलक्षण गोष्ट असत. दुसऱ्याला आपल्याविषयीं काय वाटतें, आपल्यासारखाच दुसरा वागतो कीं नाहीं, आपल्या सारखीच दुसऱ्या एकाद्यावर वाईट किंवा चांगली परिस्थिति आली आहे काय हें जाणण्याचें माणसाला फार कुतूहल असतें. ही जिज्ञासा—वृत्ति मानवी प्राण्यामध्यें जर नसती तर वृत्तपत्रांचा जन्म कधीं झाला असता कीं नाहीं या-विषयीं शंका आहे. या कुतूहलवृत्तीबरोबरच मानवाला दुसऱ्याविषयीं तिसऱ्याला माहिती देण्याची फार हौस असते. ही हौस—ही बातमी देण्याची हौसही—वृत्त-पत्राच्या जन्माच्या बुडाशीं असते असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं.

वृत्तपत्राला जन्म देणारा आद्य संपादक जो कोणी चिनी मनुष्य होता त्याच्या डोक्यांत वृत्तपत्र काढण्याची कल्पना कशावरून आली हें कांहीं सांगतां यायचें नाहीं. पण तेथून ती कला यूरोपभर प्रवास करीत होती हें मात्र खरें. या वृत्तपत्रकलेचें संगोपन नी संवर्धन यूरोपीय कलावंतांनींच केलें आहे. मुद्रणकलेचा शोध जॉन गटेनबर्गनें १४४० मध्यें लावल्यानंतर वृत्तपत्रांच्या संपादकांना स्वर्ग दोन बोटें उरला असेल आणि आपली ही बातमी छापून देण्याची झालेली सोय त्यांना जगांतली अत्यंत महत्त्वाची बाब वाटली असेल. पाश्चात्य देशांतून धर्मप्रसारासाठीं आलेल्या मिशनऱ्यांनीं ही कला मुद्रणकलेबरोबरच आपल्या हिंदुस्थानांत आणली. १५७७ मध्यें कोचीनमध्यें पोर्तुगीज जेजुइट मिशनऱ्यांनीं पहिलें मुद्रणालय स्थापिलें. कलकत्या-जवळ श्रीरामपूर येथें आणि खालीं तंजावर येथें सर्फोजी-राजे भोसले यांच्या राजवाड्यामध्यें अशीं मुद्रणालयें स्थापन करण्यांत आलीं. या मुद्रणकलेच्या झालेल्या परिचयानें मराठी भाषेंत ग्रंथ छापावे नी वृत्तपत्रही प्रसिद्ध करावें अशी कल्पना कोणा बुद्धिवन्ताला आली तर त्यांत नवल तें काय ?

पहिलें मराठी वृत्तपत्र—

आणि ६ जानेवारी १८३२ या शुभदिनीं मराठी वृत्तपत्रांचे पितामह "दर्पण" हें पाक्षिक मुंबई येथें जन्मास आलें. रा. बाळशास्त्री जांभेकर यांच्या संपादकत्वा-खालीं हें पाक्षिक सुरू झालें. त्यांच्या साहाय्यास रा. भाऊराव महाजन होते. पण पुढें त्यांनीं १८३७ सालीं दुसरें मराठी नियतकालिक "दिग्दर्शन" या नांवाचें काढलें. याच महाजनांनीं पुढें १८४१ मध्यें "प्रभाकर" नांवाचें साप्ताहिकही काढलें. दि. १२ फेब्रुवारी १८४९ रोजीं आतां दुर्दैवानें बंद पडलेलें सुप्रसिद्ध दैनिक "ज्ञानप्रकाश" सुरू झालें. १८६३ पर्यंत तें आठवड्यांतून दोनदां शिळेवर छापून प्रसिद्ध होई. पुढें खिळेजुळणी सुरू झाली. १८८१ च्या जानेवारीमध्यें 'केसरी'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. पुण्यांतील दैनिकांशीं संबंधित असलेल्या पुरातन दैनिकांचा इतिहास हा असा आहे.

पुण्यांतील आजचीं दैनिकें :

स्थापनेच्या वर्षांच्या क्रमानें पुण्यांतल्या दैनिकांचा आपण इतिहास व सद्यःस्थिति पाहूं या.

[१] केसरी : १९ व्या शतकाच्या शेवटीं शेवटीं महाराष्ट्रामध्यें जीं लोकजागृतीचीं कार्यें सुरू झालीं होतीं, त्यांमध्यें "केसरी" व "मराठा" (इंग्रजी) या वृत्तपत्रांस फार मोठें स्थान आहे. १८८१ मध्यें केसरी वृत्तपत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निघालें. प्रथम आर्यभूषण छापखान्यांत तें छापलें जात असे. पुढें १८९१ मध्यें त्याची मालकी लोकमान्य टिळकांकडे आली. १९०५ सालीं स्वतःची टाईप फौंड्री लोकमान्यांनीं सुरू केली. या फौंड्रींत त्यांनीं टाइपांत सुधारणा करण्याचे कांहीं प्रयत्न केले. १९०६ मध्यें गायकवाडवाड्यांत मुद्रणालय सुरू होईपर्यंत तें आर्यभूषण मुद्रणालयांत छापलें जात असे. पुढें ट्र फीडर मशीन लोकमान्यांनीं घेतलें. १९२१ पर्यंत त्यावरच केसरीची छपाई चालत असे. "मराठा" साताहिक व "सह्याद्रि" मासिक यांचे छपाईकरितां नवी यंत्रसामग्री व्यवस्थापकांनीं वेळोवेळीं आणविली. आज स्टिरिओ रोटरी मशीनवर केसरी छापला जातो. त्याचप्रमाणें फ्लॅटबेड रोटरी मशीन, काडक्राऊनचें रेकॉर्ड सिलिंडर, २०×३० चें एक सिलिंडर, ट्रेडल्स वगैरे सर्व आधुनिक सामग्रीनें व स्वतःच्या टाइप फौंड्रीनें सुसज्ज असलेल्या मुद्रणालयांत सदर त्रिसाताहिक निघत असतें.

लोकमान्य टिळकांच्या वेळीं केसरींतलें प्रत्येक पान हा महाराष्ट्राच्या कौतुकाचा, उत्साहाचा, स्फूर्तीचा विषय होता. केसरीचे सिंह गर्जना करूं लागत तेव्हां ब्रिटिश राजसिंहासनही डळमळूं लागे. वृत्तपत्राचा जनमनावर, राज्यकर्त्यांवर, समाजस्थितीवर कसा परिणाम होऊं शकतो याचें प्रात्यक्षिक म्हणजे १९०० पासून १९२० पर्यंतचा केसरी होय. हिंदुस्थानच्या राजकीय जागृतीसाठीं केसरीनें फार मोठा हातभार लावला आहे यांत शंका नाहीं.

लो. टिळकांच्या पश्चात् केसरीचें स्वरूप हिंदुमहासभेच्या राजकीय धोरणाचा पुरस्कार करणें हें झालें आहे. केसरी आठवड्यांतून ३ वेळां सध्यां निघतो. बातमीपेक्षां विचारदर्शन हें केसरीचें वैशिष्ट्य आहे. हल्लीं रविवारचा मासिक विभाग निघतो त्यामध्यें बरेच मौलिक लेख प्रसिद्ध होता. सध्यां त्यांत होत असलेल्या बऱ्याच सुधारणा नवसंपादक रा. जयंतराव टिळक यांचे दिग्दर्शनाखालीं होत आहेत.

[२] **सकाळ :** केसरीची स्थापना करतांना लोकमान्य टिळकांपुढें जसें राजकीय व सामाजिक सुधारणेचें धोरण होतें तसें कुठलेंही धोरण न ठेवतां केवळ जनहिताची दृष्टि ठेवून निघालेलें पहिलें वृत्तपत्र म्हणजे सकाळ होय. १ जानेवारी १९३२ रोजीं रा. ना. भि. परुळेकर यांनीं सकाळ सुरू केला. "गेलेली राजसत्ता शंभर वर्षांनीं पुनश्च परत येत असतां तिचा उपयोग केवळ मूठभर स्वार्थसाधु लोकांना न होतां बहुजनसमाजास कसा मिळेल त्याची आम्हीं विवेचना करूं" असें आश्वासन संपादकांनीं पहिल्याच अंकांत दिलें होतें.

ज्याला " लोकल पेपर " असें म्हणतां येईल असें स्वरूप सकाळचें आहे. पुण्यांत, महाराष्ट्रांत, नंतर हिंदुस्थानांत, नंतर जगांत घडणाऱ्या बातम्यांना क्रमाक्रमानें महत्त्व देण्याची या पत्राची प्रथा आहे. बातमी विशेष खुलवून, प्रसंगीं नको असलेल्या माहितीची नोंद करून, देण्याची पद्धति आहे. तीन तीन ओळींचीं शीर्षकें देण्याची विशेष आवड दिसून येते. आरोग्यविभाग सकाळनें चांगला संपादित केलेला असतो. बुद्धिवादी वर्गाला हव्या असलेल्या पद्धतीनें बातम्यांचें संकलन न करतां श्रमजीवि, थोड्याशा साक्षर अशा बहुजनवर्गाला आवडेल अशा पद्धतीनें बातम्या सजविलेल्या असतात. अर्थात् पत्रांतल्या मजकुराला बाष्कळ स्वरूप येऊं नये अशी दक्षता घेतलेली असते. कुठल्याही राजकीय पक्षाची फीत आग्रहानें आपल्या खांद्यावर लावलेली नसल्यानें स्वतंत्र-

Files required in the firms, Ration card files required in cities and village areas. All sorts of Office covers clothlined window Envelopes.

ANGEL ENVELOPES

Taglabels for parcels, Account and Bound books, Daily books, Refill Calendar blocks and for all other paper stationery. Please write or see.

ANGEL FILE



SAVLEY & COMPANY

Purandare Colony, Poona 2.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पणें मतप्रदर्शन करणें हें संपादकीय वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल.

दुसरें महायुद्ध सुरू झाल्यानें या पत्राला इतर वृत्तपत्रांप्रमाणें फारच ऊर्जितावस्था आली. प्रथम फ्लॅटबेड सिलिंडरवर होत असलेली छपाई वेळेवर होईना म्हणून पुढें साधें रोटरी घेण्यांत आलें. १९४१ सालीं मुद्रणालयासाठीं या वृत्तपत्रानें स्वतःची जागा घेतली आणि १९४६ सालापासून कंपोज केलेल्या पानांचे स्टिरिओज बनवून एका अतिशय वेगवान् रोटरीवर या वृत्तपत्राची छपाई सुरू आहे. २२।२३ हजारांपर्यंत या पत्राचा खप आहे. एकाच वेळीं काळ्या व रंगीत शाईंत छपाई होण्याची या यंत्रावर सोय आहे. साताहिक स्वराज्य हेंहि भावंड या वृत्तपत्रास आहे. या सर्व छपाईसाठीं स्वतःची टाईप फौंड्री, ब्लॉक्स व स्टिरिओज तयार करणारी अद्ययावत् यंत्रसामुग्री आणि एक प्रशस्त अद्ययावत् इमारत या गोष्टी जरूरच होत्या आणि या सर्व साधनसाहित्याची जोड या बराच खप असलेल्या वृत्तपत्रास आहे, ही गोष्ट पुण्यास निस्संशय भूषणावह आहे. सामान्य माणसाला काय वाटतें याचा विचार प्रामुख्यानें या वृत्तपत्रांत होत असल्यानें बहुजनसमाजामध्यें ज्या गोष्टीची जरूर अधिक असते तीच गोष्ट हें वृत्तपत्र पुरवितें.

[३] प्रभात : १९३५ सालीं पां. म. भागवत यांनीं अशाच धोरणानें हें वृत्तपत्र सुरू केलें आणि १९३८ सालामध्यें रा. वालचंद्र रामचंद्र कोठारी यांनीं हें विकत घेतलें. या वृत्तपत्राचें धोरण स्वतंत्र राष्ट्रीय वृत्तीचें असतें हिंदुस्थान प्रिंटिंग प्रेस हा छापखाना केवळ या वृत्तपत्रापुरताच आहे. हें पत्र केवळ वृत्तपत्र चालविण्याच्या हेतूनेंच या संपादकांकडून चालविलें जातें. १९४९ मध्यें स्वतःची भव्य इमारत बांधून हें पत्र तेथें गेलें आहे. शिवाजी टाईप फौंड्री व आर्यभूषण फौंड्री यांचेकडील डिग्री टाइपांत हें पत्र छापलें जातें. छोट्या छोट्या स्वरूपांत बातम्या देऊन त्यांना सुटसुटीत शीर्षकें देणें हें या वृत्तपत्राचें वैशिष्ट्य म्हणतां येईल. आपला विचार थोडक्यांत पण खोचकपणें मांडण्यांत संपादकीय कौशल्य प्रगट होतें, यांत शंका नाहीं.

ध्येय व धोरण

—आजपर्यंत पस्तीस कोट हिंदी लोकांचे श्रम, त्यांच्या मनोभावना व भवितव्य यांचा विक्रय जगाच्या बाजारांत मातीमोलानें चालला आहे. तो बंद पडून त्याला उज्ज्वल स्वरूप कसें प्राप्त होईल याचा विचार निर्भीडपणें या पत्रांत मांडला जावा असा आमचा उद्देश आहे.

सकाळ—अग्रलेख, पहिला अंक, १ जानेवारी १९३२

[४] लोकशक्ति :—केवळ काँग्रेसच्या प्रचाराला वाहून घेतलेलें हें पत्र दि राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळीनें २६ जानेवारी १९३५ रोजीं स्थापन केलें. प्रथमतः इतरत्र छापून हें पत्र प्रसिद्ध होत असे. पण आतां स्वतःच्या इमारतींत स्वतःचें मुद्रणालय स्थापून हें वृत्तपत्र तिकडे गेलें आहे.

कुठल्याही राजकीय पक्षाचें मुखपत्र म्हटल्यानंतर त्याचें जें स्वरूप असावें तसेंच या पत्राचें आहे. हें रा. ह. मो. जोशी यांचे संपादकत्वाखालीं निघतें.

[५] काळ : त्याचेचप्रमाणें उघडपणें हिंदुमहासभेचा प्रचार करण्यासाठीं रा. शंकर रामचंद्र दाते यांनीं १६ जानेवारी १९४० रोजीं हें पत्र सुरू केलें. सरकारविरोधी लिखाणामुळें या दैनिकावर जामिनकीचें गंडांतर २।३ वेळां येऊन गेलें. महात्माजींच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रांत जी जाळपोळ झाली त्याचा फटकाही या वृत्तपत्राला १९४८ च्या जानेवारींत बसून तें पांच महिने बंदही पडलें होतें. पण या सर्व संकटांतून तावून सुलाखून हें पत्र आज पुण्यांतलें वृत्तपत्रीय नमुन्याचें चांगलें पत्र म्हणून उभें आहे.

दाते टाईप फौंड्रीमध्यें पाडलेल्या मोनो टाइपांत हें छापलें जातें. मुद्रणशास्त्रांत संपादक रा. दाते हे तज्ज्ञ आहेत हें विख्यात आहे.

राजकीय धोरणाचा विचार बाजूला ठेवला तरी संपादनांतलें कौशल्य हा या पत्राचा एक विशेष आहे. निरनिराळ्या ठिकाणच्या बातम्या देतांना बातमींतलें वैशिष्ट्य शीर्षकामध्यें प्रकट करणें यामध्यें या पत्राचा हातखंडा आहे. राजकीय चष्म्यांतून घटनांकडे पाहिलें जात असल्यानें त्या त्या रंगाचा हात त्या त्या बातमीवर दिसतो ही गोष्ट निराळी. तथापि बातमी वाचल्यानंतर ती सांगण्याची संपादकीय ऐट निस्संशय वाखाणण्याजोगी आहे यांत शंका नाहीं. लोकजागृति करण्याचें धोरण तशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तळमळ संपादकीय लेखणीमागें आहे अशी जाणीव वाचकाला झाल्याशिवाय राहत नाहीं.

[६] **लोकराज्य** : दि राष्ट्रीय विचार प्रसारक मंडळानें पुण्यामध्यें सायंकाळीं एक दैनिक काढण्याचा विचार करून वरील नांवाचें दैनिक १० मे १९४७ रोजीं रा. विष्णु विनायक बापट यांच्या संपादकत्वाखालीं सुरू केलें. विजापुरे टाइपांत हें पत्र लोकशक्ति छापखान्यांत छापलें जातें. कॉंग्रेसच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करणें हें या पत्राचें मुख्य धोरण आहे. सकाळचीं वृत्तपत्रें बातम्या देऊन गेल्यानंतर दुपारीं २।३ वाजेपर्यंत घडलेल्या सार्‍या बातम्या पुरविण्याचें कार्य या सायंदैनिकाचें आहे. पुणें आणि अहमदनगर या दोन ठिकाणच्या बातम्या पुरविण्याचें विशेष धोरण दिसतें. दिवसभर श्रमलेल्या वाचकवर्गाला चुरचुरीत, खुसखुशीत बातम्या पुरविण्याच्या हव्यासामुळें साधारणपणें महाराष्ट्रांत घडलेल्या गुन्ह्यांच्या बातम्याच वैपुल्यानें वाचकास वाचावयास मिळतात, असें या दैनिकाचें स्वरूप दिसतें,ही गोष्ट खरी आहे. तथापि पुण्यासारख्या ठिकाणीं सायंदैनिक चालविण्याचा प्रयत्न निःसंशय स्वागतार्ह आहे यांत शंका नाहीं.

[७] **मन्वन्तर** : १५ मे १९४८ रोजीं या दैनिकाची स्थापना झाली. स्वतःच्या टाईपफौंड्रींत तयार झालेल्या १२ व १४ पॉइंटच्या टाइपांत हें पत्र छापलें जातें. बहुजनसमाजाला पक्षनिरपेक्ष योग्य अशी राजकारणाची व सामाजिक प्रश्नाची दिशा देऊन त्यांचा नागरिकत्वाचा दर्जा वाढविणें या सात्त्विक हेतूनें हें वृत्तपत्र संपादक रा. ना. ल. कोकाटे यांनीं सुरू केलें आहे. या हेतूला सुसंगत असाच मजकूर या पत्रांतून येत असतो. राष्ट्रीय खेळांचें दर रविवारीं एक सदर असतें. साहित्य परीक्षण व ग्रामीण जीवनाचा आढावा हे दोन विशेष होत.

[८] **भारत** : मन्वन्तरचे पाठोपाठ २४ मे १९४८ रोजीं या दैनिकाची स्थापना झाली आहे. प्रथम रा. भा. गो. बापट हे संपादक होते पण आतां रा. व. प्र. गीत यांचेकडे संपादकीय व्यवस्था आहे. स्वतंत्रपणें राष्ट्रीय वृत्तीस पोषक अशा बातम्या व आवश्यक त्या अन्य गोष्टी प्रसिद्ध करून राष्ट्रीय वृत्तीच्या वाचकांची सध्यां भासत असलेली नड भागविणें हा या पत्राचा प्रमुख हेतु आहे. ‘ जें जें भारतीय असेल त्या त्या प्रत्येकाचा पुरस्कार ’ करणें हा संपादकीय प्रयत्न असतो. बातम्यांचें संकलन कांहीं एका विशिष्ट हेतूनें केलेलें आढळतें. अन्यायाला वाचा फोडतांना संपादकीय तळमळ सदैव प्रकट होत असते. मोनोपायका टाइपांत हें छापलें जातें.

[९] **पूना डेली न्यूज** : पुण्यामध्यें प्रसिद्ध होणारें हें एकमेव इंग्रजी भाषेंतील दैनिक दि. १ मे १९५० रोजीं सुरू झालें. हें १० पॉइंट टाइपांत छापलें जातें. हें स्वतंत्र बाण्याचें, राष्ट्रीय वृत्तीचें वृत्तपत्र असून महाराष्ट्राच्या आशाआकांक्षांना, अडीअडचणींना, दुःख संकटांना वाचा फोडण्याची संपादकीय उमेद आहे.पुण्यांत आणि आसपास असणार्‍या मराठी न बोलणार्‍या जनतेस या पत्राचा फार उपयोग होत आहे. दैनिक प्रभातचे मालक रा. कोठारी यांनीं रा. त्र्यं. वि. पर्वते यांच्या संपादकत्वाखालीं हें पत्र सुरू केलें आहे.

पुण्यांतलें इंग्रजी स्थानिक वर्तमानपत्र म्हणून पूना डेली न्यूजचें महत्त्व अधिक आहे. आतांपर्यंत हें इंग्रजी भाषेंतलें पुण्यांतलें दैनिक पहिलेंच आहे. आणि त्या दृष्टीनें चालकांचें व संपादकांचें धाडस पुण्यास भूषणावहच आहे.

Maximum Efficiency at - - - - - -
- - - - - - - - - MINIMUM COST
Can only be obtained with
JAPANESE PRINTING MACHINERY
OF REPUTE
CYLINDER, TREADLE, PAPER-CUTTING,
WIRE-STITCHING, LITHO AND
OFF-SET MACHINERY
HIND STANDARD PRODUCTS LTD.,
VISHNU BAZAR - DELHI 6.
Local Enquiries :—
Dabholkar Bros., **2432, EAST STREET, POONA - - - - - 1.**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्राची संपादकीय व्यवस्था चांगल्यापैकीं असून विविध विषयांवरचीं मतें वाचकांस यांत वाचावयास मिळतात. पत्रास २ वर्षे पूर्ण झाल्यावर डाक एडिशन काढून दक्षिण महाराष्ट्रांत पत्राचा खप करावा असा संपादकांचा मानस आहे.

[१०] **ज्ञानप्रकाश :** १९४९ सालीं १०० वा वाढदिवस साजरा करून १९५० सालीं बंद पडलेलें हें सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीचें मुखपत्र म्हणजे पुण्यासच काय पण महाराष्ट्रास भूषणावह असें होतें. महाराष्ट्राच्या लोकजागृतीच्या काळामध्यें ज्ञानाचा प्रकाश सर्वत्र फैला-वण्याच्या हेतूनें सुरू करण्यांत आलेलें हें दैनिक नेमस्तांचें व मवाळांचें एक स्फूर्तिस्थान होतें. अलीकडे युद्धकाळा-मध्यें कै. काकासाहेब लिमये यांच्या संपादकत्वाखालीं या पत्रास थोडेसें आधुनिक स्वरूप प्राप्त झालें होतें. पण त्यांच्या पश्चात् भारतसेवक समाजास हें तोट्यांत चाल-णारें पत्र नुकतेंच बंद करावें लागलें. सध्यां विद्यमान असलेल्या वृत्तपत्रांचा या लेखांत परामर्ष घ्यावयाचा अस-ल्यानें आणि ज्ञानप्रकाशाचा परिचय आबालवृद्धांस अस-ल्यानें या संबंधांत अधिक लिहिण्याची आवश्यकता नाहीं.

दैनिकाचें महत्त्व—पुण्याच्या दैनिकांची ही सद्यः-स्थिति पाहिली कीं, साहजिकच असा प्रश्न मनापुढें उभा राहतो कीं पुण्यांत वृत्तपत्रांचा हा धंदा सांप्रत कोणत्या अवस्थेंत आहे ? पण या प्रश्नाचा विचार करण्यापूर्वी मानवी जीवनांतल्या दैनिकाच्या महत्त्वाचा प्रथम विचार करूं या.

प्रगतिशील मानव हा इतिहासावरून शहाणपण शिकत असतो आणि भविष्यकाळांतल्या घटनांना त्या ज्ञानाप्रमाणें वळण देण्याचा प्रयत्न करीत असतो. दररोज मानवी समाजांत घटना घडत असतात, इतिहास प्रत्यहीं बनत जातो आणि त्याची नोंद दैनिकाशिवाय कोणी ठेवूं शकत नाहीं. दररोज घडलेल्या बारीकसारीक पण सामाजिक, राष्ट्रीय, जागतिक महत्त्वाच्या घटना तीक्ष्ण नजरेनें हेरून त्यांची प्रामाणिक नोंद साक्षर जनतेपुढें ठेवणें हें वृत्तपत्राचें खरेंखुरें कार्य आहे. सुशिक्षित नी साक्षर जनतेमध्यें दैनिकाचें हें ज्ञानप्रसाराचें महत्त्वाचें कार्य आहे.

मनुष्य साक्षर झाला, तो दुसऱ्याच्या सुखदुःखाचा विचार करूं लागला कीं साहजिकच मानवामानवांत एक प्रकारचें प्रेम निर्माण होतें. क्वचित द्वेषही निर्माण होतो. केव्हां केव्हां सहानुभूतीची जागा मत्सरानें घेतली जाते. या सर्व रागद्वेषादि भावनांना वळण लावणें, सामाजिक हितसंबंधांचें रक्षण करणें, समाजव्यवस्थेमध्यें सौकर्य आणणें, मनुष्याला उत्तम नागरिक बनविणें हेंही महत्त्वाचें कार्य वृत्तपत्राचें असतें यांत शंका नाहीं. हें करीत असतांना समाजांतील शहाणीं माणसें आपल्या मताप्रमाणें, कुवतीप्रमाणें समाज आपल्या पाठीमागें ओढून आणण्याचें कार्य समाजहितैषी बुद्धीनें करीत असतात. याच वेळीं वृत्तपत्र हें मतप्रचाराचें अमोघ शस्त्र बनत जातें; आणि समाजाला वळविणें, अन्यायाचें निर्मूलन करणें, राज्य-यंत्राला प्रसंगीं वठणीवर आणणें हें कार्य करणाऱ्या वृत्त-पत्रांना राष्ट्राची चौथी संपत्ति नी शक्ति मानण्याचा प्रघात पडला आहे.

सर्वसामान्य नागरिकाच्या जीवनावर इतक्या प्रकारानें वृत्तपत्रांचा प्रभाव पडत असल्यानें दैनंदिन जीवनांत मनुष्यानें दैनिकाला अतिशय मानाचें स्थान द्यावें यांत नवल कोणतें !

मनुष्याला दैनिकाची गरज भासूं लागल्यानंतर दैनिकाचें हें सात्त्विक स्वरूप बदलून त्याचीं स्वरूपें समाजघटकांच्या गरजेप्रमाणें बदलूं लागलीं. कांहीं राजकीय मतप्रचारांचीं दैनिकें निघूं लागलीं, तर कांहीं केवळ बातम्या देणारीं दैनिकें निघूं लागलीं. कांहीं वृत्तपत्रें तर केवळ मनोरंजनार्थ निघूं लागलीं. पण अशीं मनोरंजन करणारीं, दैनिकें न राहतां साप्ताहिकें होऊं लागलीं. त्याहूनही चिरस्थायी स्वरूपाचें मनोरंजन करणारीं वृत्तपत्रें मासिकांच्या मुखवट्यांत निघूं लागलीं. एकूण बातमी देणें, कांहीं तरी नवें सांगणें, किंवा मतप्रचार करणें, मनोरंजन करणें या मानवी प्रवृत्तींचे आविष्कार वृत्तपत्रांच्या निरनिराळ्या स्वरूपांत होऊं लागले.

पुण्यांतील दैनिकें—या दृष्टीनें पाहतां पुण्यांतील दैनिकांचा विचार करतां ठळकपणें त्यांत पुढीलप्रमाणें वर्ग पडतात.

(१) राजकीय मतप्रचाराचीं:—केसरी, लोकशक्ति, काळ,

(२) बातम्या देणें हें प्रधान अंग असलेलीं:—सकाळ, भारत, प्रभात, लोकराज्य, मन्वन्तर, पूना डेली न्यूज

राजकीय मतप्रचाराचा विशिष्ट हेतु मनांत धरून चालविलेल्या वृत्तपत्रांना आर्थिक दृष्ट्या थोडेंफार अधिक स्थैर्य असूं शकतें. त्यांचा वाचकवर्ग विशिष्ट मतप्रणालीचा असल्यानें त्या वाचकवर्गाची निष्ठा त्या पत्रावरून हालत नाहीं आणि त्यामुळें दैनिकामध्यें आधिकाधिक सुधारणा (आर्थिक प्रगतीबाबत) होऊं शकते. मतप्रचाराबरोबरच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बातम्यांना विशिष्ट रंग या वृत्तपत्रांत चढलेला दिसून येतो. स्थानिक बातम्या नि जागतिक बातम्या असा भेद यांमध्यें न पडतां आपल्या पक्षाच्या बातम्या आणि इतर पक्षांच्या बातम्या असा भेद या प्रकारच्या वृत्तपत्रांमध्यें पडतो. केसरीसारखें वृत्तपत्र अद्ययावत् यंत्रसामुग्रीनें सुसज्ज असें मुद्रणालय ठेवूं शकतें, उत्तम ग्रंथालय बनवूं शकतें. काळसारखें वृत्तपत्र स्वतःचें मुद्रणालय विस्तृत करूं शकतें. या प्रकारच्या वृत्तपत्रांचा ठराविक वाचकवर्ग हा सुशिक्षित वर्गांत असल्यानें बातम्यांचें संकलन आणि शीर्षकांची योजना यामध्यें अधिक सूचकता, अधिक सार्थकता, अधिक खोचकपणा येऊं शकतो.

याउलट राजकीय रंग नसलेल्या वृत्तपत्रांना स्थैर्य हवें असलें तर फार यातायात करावी लागते. बातम्यांमध्यें अद्ययावतपणा, विविधता, रंजकता हे गुण साक्षेपानें आणावे लागतात. त्याचप्रमाणें सामाजिक, नैतिक, शैक्षणिक महत्त्वाचीं सदरें सुरू ठेवावीं लागतात. सकाळसारखीं वृत्तपत्रें अनेक अभिनव योजना अमलांत आणतें. मुलाखती, आरोग्यविषयक, सामाजिक प्रश्नांचे विषयक सदरें; निरनिराळ्या चढाओढी; इत्यादि प्रकार वाचकवर्ग ओढून आणण्यासाठीं त्यांना करावे लागतात. कारण या अभिनवतेवर त्यांचें आर्थिक जीवन अवलंबून असतें. पुण्यापुरता विचार करावयाचा तर असें म्हणतां येईल कीं 'सकाळ' चढाओढी, विविध सदरें, पत्रव्यवहार, इत्यादि आकर्षक मजकूर सदैव पुरवितो. **प्रभात** बातमी विपुल व आकर्षक शीर्षकांनीं देतो व प्रचलित प्रश्नांवर स्फुटें चुरचुरीत लिहितो. **लोकराज्य** खुसखुशीतपणासाठीं सदैव गुन्हेगार जगांत आणि अपघात-आघातांत वावरत असतें. **मन्वन्तर** भविष्य नी रेसच्या टिप्स देऊन वाचक आकर्षित करतो. **पूना डेली न्यूज** इंग्रजींत असल्यानें इंग्रजी वाचकवर्गाच्या प्रश्नांवर लिहितो. त्याचप्रमाणें मराठी लोकांच्या मराठींत घडणाऱ्या विविध कार्यक्रमांची माहिती इंग्रजी जाणणाऱ्यांना करून देतो. त्याचप्रमाणें राजकीय प्रश्नांवर हीं वृत्तपत्रें निःपक्षपातीपणें व सडेतोड टीका करूं शकतात हा त्यांचा महत्त्वाचा विशेष असूं शकतो. एकंदरींत पाहतां आर्थिक स्थैर्य प्राप्त करून घेण्यासाठीं अतिशय आकर्षक मुखवटा निर्माण करण्याची त्यांची धडपड सदैव असते; अर्थात् यामुळें त्यांच्या अंतरंगांत वैविध्य आणि सरसता येऊं शकते हा फायदा आहे.

> **–गेलेली राजसत्ता शंभर वर्षांनीं पुनश्च परत येत असतां तिचा उपयोग केवळ मूठभर स्वार्थसाधु लोकांना न होतां बहुजनसमाजास कसा मिळेल त्याची आम्ही नेहमीं विवंचना करूं.**
>
> सकाळ–अग्रलेख पहिला
> अंक १ जानेवारी १९३२

पुण्यांतील दैनिकांविषयीं थोडें कडु-गोड

पुण्यांतलें मन्वंतर हें दैनिक एका मोठ्या पुस्तकें वगैरे छापणाऱ्या मुद्रणालयांत छापलें जातें. त्यामुळें तेथील यंत्रसामुग्रीचा विचार फक्त दैनिकापुरता करण्याची आवश्यकता नाहीं. तें दैनिक सोडून सर्व वृत्तपत्रांचीं मुद्रणालयें केवळ वृत्तपत्रांकरतांच प्रामुख्यानें चालतात असें म्हणावयास हरकत नाहीं. आणि तसा विचार केला तर सकाळ व केसरी या वृत्तपत्रांखेरीज इतर सर्व वृत्तपत्रें अगदीं सर्वसामान्य· अशा छपाईच्या साधनांच्या साहाय्यानें चालतात हें खेदानें नमूद करावें लागतें. वृत्तपत्रांची साखळी निर्माण करून व अभिनवता दाखवून 'सकाळ' सर्व यंत्रसामुग्रीनें सुसज्ज झालें आहे. त्याचप्रमाणें मोठ्या संस्थेच्या जोरावर केसरीही अद्ययावत् होऊं शकलें. रोटरी, टाईप फौंड्री, ब्लॉकमेकिंग खातें, मोठ्या इमारती व भरपूर पैसा हीं सर्व साधनें हाताशीं असल्यानें या दोन वृत्तपत्रांना कसलीही कमतरता पडत नाहीं व आर्थिक सुस्थिति लाभल्यानें नव्या योजना हातीं घेणें, संपादक व वार्ताहर वर्गाला भरपूर वेतन देणें, मुद्रणालयें सुसज्ज करणें इत्यादि गोष्टी हीं दोन वृत्तपत्रें करूं शकतात. पण इतर वृत्तपत्रांचा विचार केला असतां अपुऱ्या साधनांनिशीं हीं वृत्तपत्रें झुंज देत असतांना दृष्टीस पडतात. वृत्तपत्रें विकत घेऊन त्यांची साखळी बनविणाऱ्या धनाढ्य व्यापाऱ्यांपुढें या वृत्तपत्रांची परिस्थिति फार हलाखीची होते आणि या स्पर्धेमध्यें ज्ञानप्रकाश, मुंबईचा प्रभात वगैरेंसारखीं दमदार वृत्तपत्रेंही गारद होतात असें दिसून येतें. ध्येयवादी संपादकांनीं नेटानें चालविलीं म्हणून पुण्याचीं वृत्तपत्रें चालू राहिलीं असें म्हटल्यास फारसें वावगें होणार नाहीं. वृत्तपत्राला बाजारी स्वरूप येऊं नये, त्यांतून ज्ञानदानच व्हावें अशी तळमळ असणारीं माणसें पुण्यांतच आहेत, हा पुण्यास अभिमानाचा विषय आहे.

स्थानिक बातम्या सुविस्तृत देणें हें कार्य मात्र पुण्यांतल्या दैनिकांच्याकडून समाधानकारक प्रकारें होत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं हें नमूद करावेंसें वाटतें. पुण्यांत होणाऱ्या कार्यक्रमांचें २–३ ओळींत वृत्त देऊन हिंदुस्थानशीं संबंध नसणाऱ्या जागतिक बातम्यांनीं पानें भरून गेल्याचें आपल्या दृष्टीस नेहमींच पडतें. पुण्यांत अनेक सार्वजनिक संस्था आहेत. त्यांचीं कार्यें पाहून मधून मधून त्यांस प्रसिद्धि देणें, त्यांच्या समारंभांना उजेडांत आणणें हीं कामें वार्ताहर जागरूकपणें करत नाहींत असें म्हणावेंसें वाटतें. पुष्कळ वेळां संस्थेच्या चालकांनींच विशेष प्रयत्न केले तरच त्यांच्या समारंभास प्रसिद्धि मिळते असेही अनुभव आहेत. स्थानिक वृत्तपत्रांनीं स्थानिक कार्यक्रमांविषयीं अशी अनास्था दाखवूं नये. वार्ताहर हा साहित्यिकही असावा लागतो याची कल्पना बऱ्याच वार्ताहरांना नसावी, कारण झालेल्या समारंभाचें चित्र डोळ्यांपुढें उभें करणें पुष्कळ वृत्तपत्रांना जमत नाहीं. वृत्तसंकलनामध्यें फक्त संपादक याकबगार असून चालत नाहीं तर त्याचे सहाय्यकही तितके हुशार लागतात. आपल्या देशांत प्रत्येक बाबतींत तांत्रिक शिक्षणाची जी हलाखी दिसून येते तिनें वृत्तपत्राच्या धंद्यासही सोडलें नाहीं. वृत्तपत्रीय शिक्षण न घेतां इतर कांहीं धंदा जमत नाहीं म्हणून वृत्तपत्रांत तरुण वर्ग शिरला नाहीं ना असा विचार मनांत येतो. तंत्रशिक्षणाची ही अनास्था वृत्तव्यवसायी मंडळींनीं नाहींशीं केल्याशिवाय ही परिस्थिति सुधारणार नाहीं.

पुण्यांत अनेक सार्वजनिक संस्था आहेत. त्यांचीं कार्यें पाहून मधून मधून त्यांस प्रसिद्धि देणें, त्यांच्या समारंभांना उजेडांत आणणें हीं कामें वार्ताहर जागरूकपणें करीत नाहींत असें म्हणावेंसें वाटतें. वृत्तपत्रीय शिक्षण न घेतां इतर कांहीं धंदा जमत नाहीं म्हणून वृत्तपत्रांत तरुण वर्ग शिरला नाहीं ना असा विचार मनांत येतो. तंत्रशिक्षणाची ही अनास्था वृत्तव्यवसायी मंडळींनीं नाहींशीं केल्याशिवाय ही परिस्थिति सुधारणार नाहीं.

पुष्कळ वेळां बातम्या देतांना त्या नीट संकलित केल्या जात नाहींत. सकाळमध्यें शीर्षकें २–३ ओळी देण्याची प्रथा आहे. त्यामुळें बातमींतला रस कमी होतो यांत शंका नाहीं. अनेक वृत्तपत्रांमध्यें एकाच कॉलममध्यें बातम्यांच्या मूलस्थानांचा विचार न करतां एकाखालीं एक निरनिराळ्या प्रदेशांतल्या बातम्या दिल्या जातात. न्यूयॉर्कच्या बातमीखालीं साताऱ्याची, त्याचे खालीं नेपाळची, त्याचे खालीं पुनः ऑस्ट्रेलियांत होणाऱ्या एखाद्या सामन्याची अशा बातम्या विस्कळित स्वरूपांत असतात. वाचकाच्या मेंदूला भूगोलाच्या पृष्ठावर इतक्या वेगानें भराऱ्या मारायला सांगणें तितकेंसें सयुक्तिक नाहीं. त्याचप्रमाणें ठराविक बातम्या ठराविक ठिकाणीं वृत्तपत्रांत सांपडतील असा संकेत बांधूनच बातम्या व सदरें रचावयास हवींत. वाचकांना फसविणाऱ्या अमृतसर, अलीगडकडच्या जाहिरातीही—जरी त्या उत्पन्नाचें चांगलें साधन असल्या तरी—शक्य तों देऊं नयेत. छायाचित्रें देण्याची प्रथा कमी असली तरी जीं दिलीं जातात तीं शक्यतों अलीकडचीं असावींत. कांहीं वृत्तपत्रांत विनोदाचीं सदरें असतात, पण तीं हास्यास्पद असतात, विनोदी नसतात. प्रांतिक बातमीपत्रें छापण्याची कांहीं वृत्तपत्रांची पद्धत आहे. परंतु तींही बातमीपत्रें अत्यंत तुटक स्वरूपाचीं आढळतात. ठिकठिकाणीं वृत्तपत्रांचें स्वागत होणें पुष्कळसें या ठिकठिकाणच्या बातमीपत्रांवर अवलंबून असतें. त्या त्या गांवच्या लोकांना आकर्षक वाटतील अशींच बातमीपत्रें छापलीं गेलीं पाहिजेत. परगांवचे बातमीदार हुडकून काढून त्यांच्या नेमणुका करणें हा अर्थात् संपादकीय कौशल्याचाच भाग आहे. असे अनेक गुणावगुण पुण्याच्या दैनिकांचे सांगतां येतील.

सर्वसाधारणपणें विचार करतां आपल्या दैनिकांबाबत पुढील गोष्टी व्हावयास पाहिजे असें आमचें नम्र मत मांडूं इच्छितों.

वृत्तपत्रांची छपाई सुबोध, स्वच्छ नी नेत्राकर्षक टाइपामध्यें व्हावयास हवी; बातम्यांचें संकलन अधिक पद्धतशीरपणें व्हावयास हवें; बातम्यांचें वैपुल्य आणि वैविध्य यांवर भर हवा; प्रांतिक बातमीपत्रें जागतिक बातमीपत्रांइतक्या महत्त्वपूर्ण दृष्टीनें निवडलीं जावींत; वृत्तपत्रांमध्यें रचनासौंदर्य अधिक वाढावें, आणि मनोरंजनाबरोबर ज्ञानदान हा त्यांचा मनापासूनचा हेतु असावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाईप निवडींतील धागेदोरे

मुद्रण क्रियेच्या अनेकविध उपकरणांपैकीं अक्षरमुद्रणाचें प्रमुख अंग जो टाईप त्याचें अवलोकन उपयुक्तता, परिणामकारकता, आणि सौंदर्य या त्रिकोणांतून पुढें केलेलें आहे.

लेखक : शि. का. संत, प्राध्यापक 'अक्षरमुद्रण'
गव्ह. अॅ. स्कीम, व्ही. जे. टी. इन्स्टिटयूट, मुंबई

विचारवंतांपुढील समस्या

सुसंस्कृत मानवाच्या मनोव्यापारांत सौंदर्यग्राहकता ही विशेष रुजून बसली असून तिचे निकष उपयुक्तता आणि सुयोग्य परिणाम यांच्या दगडावर घासून तपासले, अवलोकले जावयास हवेत याची त्यास निकड भासत आहे. तथापि एखाद्या मुद्रित कृतीमधील खरें मोठेंपण कशांत आहे, तिच्यांतील वास्तव सौंदर्य कशांत सांठलें आहे हेंच कित्येक वेळां त्याच्या लक्षांत येत नाहीं, आणि कांहीं वेळां कळलें तरी वळत वा कां तें उमजत नाहीं अशी परिस्थिति उत्पन्न होते. त्यामुळें मुद्रणांतील मूल्यांचें सौंदर्य, उपयुक्तता नि परिणामकारकता या त्रिकोणी भिंगामधून स्पष्ट दर्शन घडावयास हवें, व प्रत्यक्ष व्यवहारांत त्या अनेकविध मूल्यांचा निःसंदिग्धपणें उपयोग व्हावयास हवा हीच आजच्या मुद्रणव्यवसायांतील विचारवंतांपुढें खरी समस्या उभी राहिली आहे. त्या उलट या व्यवसायांतील कित्येकांना तर काय करावयास हवें याची कल्पनाहि नाहीं. त्यामुळें या समस्येची स्पष्ट उकल करून दाखविण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे आणि त्याचीच आज विशेष गरज आहे. पण मुद्रणांतील या सर्व मूल्यांचा विचार हा एक प्रदीर्घ, अनेक विचारधारा निर्माण करणारा अतीव मोठा विषय असून त्याचा परामर्श स्थलसंकोचामुळें येथें घेणें अशक्य आहे. अशा स्थितींत त्यांतील एक कण बाजूस काढून त्याचीच फक्त विचिकित्सा करावी येवढेंच उद्दिष्ट या ठिकाणीं पुढें ठेवलें आहे.

'सत्यं-शिवं-सुंदरं'ची प्रतिक्रिया

वाङ्मयसेवकांच्या नजरेसमोर सत्यं-शिवं-सुंदरं हें त्रिसूत्र उद्दिष्ट म्हणून जसें उभें राहतें त्याचप्रमाणें मुद्रणामध्यें वर म्हटल्याप्रमाणें उपयुक्तता, परिणामकारकता आणि सौंदर्य ही त्रयी लक्षांत घ्यावी लागते. आपल्या मनोव्यापाराचीं हीं प्रभावी मूल्यें जशीं एका बाजूला असतात तशींच टाईप, शाई, कागद आणि त्या सर्वांची प्रक्रिया घडवून आणणारीं यंत्रें हीं मुद्रणक्रियेचीं दृश्य उपकरणें दुसऱ्या बाजूस असतात, आणि या द्विविधा साहित्याचा, मूल्यांचा नि उपकरणांचा परस्पर संयोग प्रकर्षानें घडवून आणणें हें मुद्रणधंद्यांतील आजच्या पिढीचें मुख्य कर्तव्य ठरलेलें आहे. मुद्रणक्रियेच्या वरील अनेकविध उपकरणांपैकीं अक्षरमुद्रणाचें प्रमुख अंग जो टाईप त्याचेंच तेवढें शक्य तें अवलोकन वर निर्देशिलेल्या त्रिकोणी भिंगामधून करावयाचें ठरविलें आहे. अभ्यासकांना त्याचा उपयोग व्हावा अशी अपेक्षा आहे.

द्विविधा दर्शन

टाइपाची निवड करतेवेळीं आपणांस अनेक गोष्टी विचारांत घ्याव्या लागतात व त्या दृष्टीनें आपणांस निश्चित असे विभाग पाडून घ्यावे लागतात. वृत्तपत्रें, नियतकालिकें आणि ग्रंथ यांच्या भरीव चालू मजकुरासाठीं वापरावयाचे टाईप व त्यांची निवड यांचा विचार एका दृष्टीनें करावा लागत असून प्रदर्शनीय रचनेंत वापरावे लागणारे टाईप व त्यांची निवड ही निराळ्या दृष्टिकोणांतून विचारांत घ्यावी लागते. ग्रंथमुद्रणासारख्या भरीव मजकुरी टाइपाचीं मूल्यें सोबत चौकटींत कार्यकारणपरंपरेसहित दिलीं असून प्रदर्शनीय रचनेंत वापराव्या लागणाऱ्या टाइपाची निवड करतांना मात्र डोकेंखाज खूपच करावी लागते. त्यांत तारतम्यानें अनेकविध मूल्यांचा इष्ट परिणाम घडवून आणण्याचे दृष्टीनें विशेष विचार करावा लागतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानवाला लाभलेली अमूल्य देणगी

वस्तुतः आपली दृष्टि ही मानवाला मिळालेली एक अमूल्य देणगी आहे आणि मुद्रित संदेश मनाला पोंचविण्याचें काम फक्त दृष्टीच करीत असते. त्यामुळें तिची जपणूक वा सुकरता आपणांस जेवढी साधतां येईल तेवढी साधावी हें मुद्रणामध्यें आपलें ध्येयच असावें. वस्तुतः दृष्टीचे प्रयोग, संकेत वा नियम हे मुद्रणांत प्रत्यक्षांत आचरावे लागतात. म्हणून टाइपाचा विचार करतांना सुखावह दृश्याकर्षणच प्रामुख्यें विचारांत घ्यावें लागतें.

स्थित्यंतरें नि टाइपाची सुलभता

ग्रंथ, वृत्तपत्रें आणि नियतकालिकें यांचें वाचन मुद्रणामध्यें आज फार मोठ्या प्रमाणावर होऊं लागलें आहे आणि तसें व्हावयासच हवें. आजच्या गर्दीच्या जीवनांत हें वाचन अनेकविध परिस्थितींतून होत असतें. बरेच वेळां आपण घरांतील वा वाचनालयांतील प्रशांत वातावरणांत वाचीत असतों, तर कांहीं वेळां आगगाडी, ट्राम वा बस यांसारख्या धकाधकी वाहनांमधूनहि वाचण्याचा मोह आपण आवरूं शकत नाहीं. कांहीं वेळां मेणबत्ती वा साध्या कंदिलाच्या मंद प्रकाशांतच वाचतों, तर कधीं विजेच्या झगझगीत प्रकाशांतहि वाचणें भाग पडतें. बहुतेक वेळां दिवसाच्या स्वच्छ प्रकाशांत वाचीत असतों, तर कधीं सायान्हींच्या संधिप्रकाशांतहि वाचणें प्राप्त होतें. अशा स्थितींत वाचनीय टाईप वरील सर्व परिस्थितींत अत्यंत सुलभ कसा होईल वा असेल इकडेच आपलें लक्ष हवें. "काय फांकडा टाईप आहे!" असे उद्गार आपल्या तोंडून बाहेर पडण्यापेक्षां वस्तुतः "किती सुवाच्य मुद्रण!" हे उद्गार आपल्या तोंडून बाहेर पडले जावेत. उत्कृष्ट ग्रांथिक टाईप हे अत्यंत सुवाच्य, सहजसुलभ, फुकट फराटयांव्यतिरिक्त आणि अलंकारविरहित पण साधेसुधे असावेत असा कटाक्ष आपण बाळगला पाहिजे.

सुवाच्यतेचीं प्रभावी गमकें

सुवाच्यतेची ही निकड लक्षांत घेतां इंग्रजीमधील कांहीं वळणें जास्तींत जास्त सुवाच्य केलेलीं असून बहुतेक वृत्तपत्रांना नि कित्येक ग्रंथांना तीं वापरलीं जात आहेत. अक्षर जास्तींत जास्त मोकळें, त्याच्या जाड–बारीक विभागांत अत्यल्प फरक, वर व खालीं येणारे भाग शक्य तों लहान पण सतत आकलन करून वाचावें लागणारें मध्यवर्ति अक्षर शक्य तों मोठें हीं सुवाच्यतेचीं प्रभावी मूल्यें लक्षांत घेऊन Legibility series चीं इंग्रजी वळणें हल्लीं खूपच प्रचारांत येऊं लागलीं असून मुद्रणाचा मूलहेतु साध्य करण्यास तीं मदत करीत आहेत. लायनोटाईपच्या सुवाच्यता श्रेणी, Ionic, Excelsior आणि अन्य old styles इत्यादि अनेक वळणें याची साक्ष देत आहेत. पण आपल्या देवनागरी वळणाचे टाईपहि याचसारखे सहजसुलभ, विशेष सुवाच्य कसे बनतील हा विचार देवनागरी मुद्रणांतील विचारवंतांना अद्यापहि सतावूनच सोडीत आहे.

टाईप नि ओळीच्या लांबीची मजल

वाचतांना आपल्या डोळ्याचा विस्फार वाचावयाच्या अक्षरांप्रमाणें लहान मोठा होत असतो. उदा० चिवळ वा लहान अक्षरें वाचतांना आपली दृष्टि संकुचित होते, उलट आडवट वा मोठीं अक्षरें हीं वाचतांना आपली दृष्टि थोडी फाकवतात तर मध्यम वळणावर दृष्टि नैसर्गिक स्थितींत राहते. यामुळेंच मध्यम वळणें विशेष मान्य झालेलीं आहेत. तथापि दृष्टीच्या विस्फाराचें हें मूल्य लक्षांत घेतां अक्षराप्रमाणें दृष्टीला ओळीचेंहि आकलन सहजगत्या झालें पाहिजे. त्या दृष्टीनें प्रत्येक वळणाची ओळ त्या वळणाच्या प्रमाणांत मोठी असावी, त्याच्या मर्यादेबाहेर मोठी येतां कामा नये असा कटाक्ष बाळगावा लागतो. बेंजामिन शेरबो या फार जुन्या लेखकानें इंग्रजीमधील ओळीच्या लांबीचें स्थूलमानानें जें कोष्टक दिलें आहे त्यांत याच तत्त्वाचा अंतर्भाव केलेला दिसून येईल.

दृष्टीच्या विस्फारांतील ओळींची लांबी

टाइपाची बॉडी		ओळीची लांबी	
६ पॉइंट टाईप	...	८ ते १०	पायका एम्
८ पॉइंट टाईप	...	९ ते १३	,,
१० पॉइंट टाईप	...	१३ ते १६	,,
१२ पॉइंट टाईप	...	१४ ते २१	,,
१४ पॉइंट टाईप	...	१८ ते २४	,,
१८ पॉइंट टाइप	...	२४ ते ३०	,,

वळणाच्या संकुचित वा पसरट धाटणीप्रमाणें वैयक्तिक 'सेट'ची लांबी वरील कमीजास्त फरकांत योग्य त्या मर्यादेंत बसवितां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तथापि आधुनिक अक्षरतज्ज्ञांनीं दाखविलेलें प्रमाण यापेक्षां अधिक कांटेकोर आणि दृष्टीच्या विस्फाराचें अचूक निदर्शक वाटतें. त्यांचे मतें कोणत्याहि वळणाची ओळ त्या वळणाच्या लोअरकेस a ते z अक्षरांच्या दीड पटीपेक्षां जास्त नसावी. कारण अक्षराच्या वळणानुसार झालेला आपल्या दृष्टीचा विस्फार जास्तींत जास्त येवढीच ओळ सहजगत्या ग्रहण करूं शकतो किंवा ही रुंदी त्या त्या वळणावरील आपल्या दृष्टीच्या सहजसुलभ विस्फारांत समावली जाते असें म्हणावयास हरकत नाहीं. तथापि देवनागरीमध्यें a ते z अक्षरांसारखीं मोजकीं अक्षरें नाहींत व त्यामुळें हा आधुनिक पद्धतीचा महत्तम विभाजक निकष त्यांना अगदीं सहज लागू करतां येत नाहीं. पण शेरब्रोचें वरील प्रमाण त्यांना लागू पडावयास हरकत नाहीं. फक्त देवनागरी टाइपाच्या पाडण्याच्या धाटणीमुळें ' बॉडी 'ऐवजीं टाइपाचा ' सेट ' विचारांत घ्यावा इतकेंच.



दृष्टिविस्फाराचें निदर्शन

या आकृतींत या ठिकाणीं वस्तुतः एकच ओळ रेखाटली आहे. प्रारंभींच्या कांहीं रेषा आपल्या दृष्टीच्या विस्फारांत बसत असल्यामुळें तसें स्पष्ट दिसतें पण शेवटीं शेवटीं मात्र दोन दोन रेषांचे ठोकळे एकावर एक अलग अलग ठेवले आहेत असें भासत. याचें कारण हेंच कीं ओळीची लांबी मोठी होते त्या वेळीं सर्व ओळ आपल्या दृष्टीच्या टप्प्यांत समावूं शकत नाहीं. याचसाठीं वृत्तपत्रांत वा नियतकालिकांत लहान लहान रुंदीचे कॉलम्स पाडले जातात, आाण मोठ्या ओळी योजतांना मुद्दाम लेडा टाकून मजकुरास थोडी सुलभता आणली जाते. मुद्रणांत अशा तऱ्हेनें सुवाच्यता कटाक्षानें विचारांत घेणें प्राप्त ठरतें.

ग्रंथ नि टाईप

कार्यकारणभाव

पुस्तकासाठीं वापरावयाचा उत्कृष्ट टाईप हा जास्त बोजड असूं नये वा किरटाहि असूं नये ;

> कारण जाड बोजड टाईप नि कागद यांत अत्यंत विभिन्नता निर्माण होते, तर उलट-पक्षीं किरटा टाईप तुटक, फिकट वा रंगहीन भासतो.

उत्कृष्ट वाचनीय टाईप हा पूर्णपणें मोकळा असावा. अक्षरें वाचतांना दृष्टिक्षेपांत सहज येतील अशीं असावींत ;

> कारण चिवळ टाइपाचें आकलन होण्यास दृष्टि एकवटावी लागते तर अत्यंत आडवट टाईप वाचतांना डोळे विस्फारले जातात आणि दोन्ही वेळां त्यांवर ताण पडतो.

टाइपाचीं अक्षरें कांटेकोरपणें एका रेषेंत आलीं पाहिजेत ; तीं खालींवर येतां कामा नये ;

> कारण रेषा ही गतिमान बिंदूचें निदर्शन करीत असते, व वाचतांना दृष्टि भराभर पुढें खेंचण्याचें कार्य साधतें. सेरिफ्स नि शिरोरेषा या रेषा अधिक दृगोचर करून वाचनसुलभता वाढवतात.

अक्षरें शब्दांशब्दांगणिक चांगलीं गुंफलीं गेलीं असावींत, अक्षरांमध्यें फट राहतां कामा नये ;

> कारण सर्वसामान्य प्रौढ वाचक शब्दांच्या जाणिवेनुसार वाचीत असतो. बालकांप्रमाणें अक्षरन् अक्षर वाचीत नाहीं.

ग्रंथांच्या उत्कृष्ट टाइपांतील जाड बारीक विभागांत अत्यल्प फरक असावा ;

> कारण जाड बारीक विभागांतील फरक वा विरोध यांनीं आपल्या डोळ्यांवर निष्कारण अत्याचार होतो. त्यायोगें डोळेफाड खरी जाणवते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जोडविजोडांची संभावना

नित्याच्या व्यवहारामध्यें जोडविजोडासंबंधींचे आपल्या मनावर जे परिणाम घडून आलेले आहेत, वस्तुतः तेच मुद्रणामध्यें टाईप निवडतांना आचरणांत आणावयास हवेत हें अधिक विचार केला असतां आपल्या लक्षांत येईल.

केव्हांहि जातां येतां एखादें जोडपें आपल्या दृष्टीस पडलें कीं लागलींच आपलें मन स्वाभाविक रीत्या उभयतांचें सौंदर्य परस्पर तुलनेनें जाणूं इच्छितें व त्याचबरोबर उभयतांचें परस्पर साहचर्य आपल्या दृष्टीला सुखावह वाटतें कीं नाहीं हें आपण चटकन् ठरवूं चाहतों, आणि जोड-विजोडासंबंधीं आपण आपलें मत बनवितों. या ठिकाणीं आपणांस उभयतांमध्यें ठराविक बाबतींत भेद वा फरक तर असावासेंच वाटतें, पण त्याचबरोबर परस्परांत भरपूर साम्यहि असावें असें वाटतें. साम्य कोणकोणत्या गोष्टींत हवें आणि विरोधाभास कसकसा असावा हें जिज्ञासू वाचक अधिक जाणतात. या ठिकाणीं साम्य आणि भेद यांची संमिश्र भावना ज्याप्रमाणें आपल्या मनांत असते त्याचप्रमाणें ही भावना टाईप निवडतांनाहि मुद्रणांत अमलांत आणावी लागते. शीर्षकांना वापरावयाचे टाईप मूळ मजकुराशीं विरोधाभास दाखविणारे तर असावेतच पण त्याचबरोबर परस्परांत भरपूर सारखेपणाहि असावा. इंग्रजीमध्यें आज हजारों वळणें निघालेलीं आहेत आणि छापखानदाराला तीं कमीजास्त प्रमाणांत वापरावीं लागतातच. प्रदर्शनीय रचनेंत वा अन्य कोठेंहि एकाच श्रेणी (series) मधील टाईप वापरले पाहिजेत असा संकेतच आहे व कांहीं मर्यादेपर्यंत तो ठीक आहे. पण एकाच श्रेणीमधील टाईप बरेच वेळां पाहिजे तितका विरोधाभास दाखवीत नाहींत. ते दृष्टीला कंटाळवाणे वाटतात. म्हणून अन्य उठावदार श्रेणीकडे शीर्षकांसाठीं आपणांस वळावें लागतें. त्यासाठीं त्याच कुला (family) मधील ठासीव टाईप आपण प्रथम निवडूं चाहतों. यांतील मूळ हेतु हाच कीं विरोधाभासहि साधावा आणि साम्यहि साधलें जावें. थोडक्यांत "Too much harmony tends to monotony" हें सर्वमान्य तत्त्व सुधारलें जावें या दृष्टीनें त्या त्या वळणाच्या उठावदार श्रेणींचीं अक्षरें मिळालीं तर ठीकच, कारण त्यांचा जोडा झटकन चांगला जमतोच, पण तीं न मिळाल्यास थोड्याशा निराळ्या वळणांकडे धांव घेणें प्राप्त ठरतें. अशा तऱ्हेनें एकाच कुलाऐवजीं अन्य कुलामधील ठासीव टाईप अनुपलब्धतेमुळें शीर्षकांसाठीं निवडणें झाल्यास साम्य नि विरोधाभास या दोन्हींचीहि सांगड घालणें प्राप्त ठरतें. एखादा टाईप बरोबर जमतो किंवा आपल्या रूढ शब्दांत ' मॅच होतो ' कीं नाहीं हें ठरवितांना साम्य नि विरोधाभासाची पार्श्वभूमिच आपणांस लक्षांत घ्यावी लागते. तसें करतांना आपणांस अनेक मर्यादा पाळाव्या लागतात. पण त्या कोणत्या हेंच कित्येकांच्या लक्षांत येत नाहीं आणि विक्षिप्तपणाच्या आवडीमुळें कोणतेंहि मिश्रण उपयोजून अभिरुचीचा विपर्यासच केला जातो. कोणतींहि वळणें वापरल्यामुळें रचनेंतील परिणामांत कांहीं तरी खटकतें याची आपणांस जाणीवहि होते, पण उमज मात्र पडत नाहीं. अशा वेळीं निवडीबाबतचीं निश्चित निदानें हेरून घ्यावीं लागतात आणि हेंच प्रथितयश अक्षरतज्ज्ञांच्या मर्मज्ञतेचें लक्षण आहे.

ABCDE abcde

अजोड–विजोडांचें साहचर्य

या इंग्रजीमधील ' निकोलस कोचीन ' वळणांतच खुद्द अजोड–विजोडांचें प्रदर्शन भरपूर आढळून येतें, कारण त्यांत एका भल्या मोठ्या राक्षसी कॅपिटल अक्षरांचें खुजा व नाजूक लोअर केस अक्षराशींच लग्न लावून दिलें आहे. त्यांतील केवळ वैचित्र्य–विभिन्नतेमुळेंच हें वळण कित्येक नावीन्याच्या अंधभक्तांना ' फक्कड ' आहे असें वाटतें, पण ही जोडविजोडांची संभावनाच म्हणावी लागेल. त्यांत अभिरुचीचा विपर्यासच झाला आहे असा अखेरचा निर्णय पडेल, आणि अशीं मिश्रणें प्रथम प्रथम बरीं वाटलीं तरी पुढें पुढें तीं त्याज्य वाटूं लागतील.

साम्यतेची हुडकणी

कोणत्याहि प्रदर्शनीय रचनेमधील टाईप एकमेकांशीं जमत्या वळणांत असले पाहिजेत व त्यांत मनोरम विरोधाभास साधला गेला पाहिजे, त्याचप्रमाणें चालू मजकुराचीं शीर्षकेंहि मनोरम विरोधाभासपूर्ण पण जमत्या वळणाचीं असावींत हें वरील विवेचनावरून सार निघतें; आतां हे जमते टाईप कसे हुडकावेत हें एक गूढच आहे असें कित्येक वेळां वाटतें. पण तसें वाटण्याचें कारण नाहीं. या ठिकाणीं शीर्षकांसाठीं वापरलेल्या अक्षरांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वळणांतील सर्वसामान्य ढब ही चालू मजकुरांतील वळणाच्या धाटणीशीं जमली पाहिजे, हेंच लक्षांत घ्यावयास पाहिजे व त्या दृष्टीनें साम्यतेची हुडकणी करावयास हवी.

वस्तुतः अक्षरांच्या वळणांतील ढब ही वापरावयाच्या टाकाच्या धाटणीवरूनच ठरविली जाते ; आणि त्या दृष्टीनें वापरलेल्या अक्षराच्या टाकाची धाटणी कशी आहे हेंच हुडकावें लागतें.

वळणांतील मूलगामी फरक

इंग्रजीमध्यें अक्षरांच्या टाकाची धाटणी तीन मूलगामी पद्धतींत विभागली आहे हें सूक्ष्मतेनें विचार केल्यास दिसून येईल. जाडबारिकांत अत्यल्प फरक दाखविणाऱ्या वळणांचा एक समूह असून त्याचा संबंध रोमन अक्षराचा आद्य प्रवर्तक निकोलस जेन्सन् याच्या १५ व्या शतकांतील आद्य अक्षरांच्या धाटणीशीं पोंचतो. 'व्हेनिशियन' वा अन्य 'ओल्ड स्टाईल' हीं मोकळीं आणि कमी विरोधाभास जाडबारिकांत दाखविणारीं वळणें याच प्रकारांत मोडतात.

दुसऱ्या समूहांत जाडबारिकांत अत्यंत तफावत असणारीं वळणें येत असून त्यांचा संबंध १८ व्या शतकांतील बोदोनी या आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या वळणाच्या प्रवर्तकाशीं पोंचतो. ९ नंबरच्या निफानें निष्पन्न होणारीं वळणें व 'स्क्रिप्ट' अक्षरें याच प्रकारांत मोडतात व तीं कांहींशीं चिवळच असतात.

तिसरा समूह सारखी जाडी निर्माण करणाऱ्या अक्षरांचा असून या समूहांतील बरींच वळणें हल्लीं विशेष मान्य होत आहेत ; आणि म्हणून तीं 'विद्यमान वळणें' (contemporary) याच नांवानें संबोधलीं जात आहेत. यांमध्यें केवल, फ्युचुरा, गिल् सान्स, गोथिक इ० सेरिफरहित सारख्या जाडीच्या वळणांचा एक गट असून या वळणांमधील सर्व गुण घेऊन अधिक सुवाच्य बनविलेल्या रॉक्वेल, स्टीमी, कायरो, कारनॅक, बेटन, मेंफिस इत्यादि सारख्याच जाडीच्या पण जाड सेरिफ असलेल्या चौसेरिफ अक्षरांचा निराळा गट पडेल.

वळणांतील मूलगामी विभिन्नता

टाकाच्या धाटणीवरून निघणारे असे हे तीन मूलगामी विभाग अलग काढून घेतले म्हणजे जमतीं वळणें हुडकणें सुकर होईल. जाडबारिकांत अत्यल्प फरक असणाऱ्या मजकुरास जाडबारिकांत अत्यंत फरक असणारीं शीर्षकें एकमेकांतील वळणाच्या अगदीं विभिन्न धाटणीमुळें कदापिहि जमणार नाहींत, किंवा त्याविरुद्ध बोदोनीसारख्या अक्षरांतील मजकुरास पहिल्या गटांतील कशी तफावतीचीं old style वळणें विजोड दिसतील. याउलट रॉक्वेल, स्टीमी वगैरे चौसेरिफ वळणांतील चालू मजकुरास गिल् सान्स वा तत्सदृश उठावदार जाड वळणें शीर्षकांसाठीं शक्य तों टाळावींतच, पण वापरलीं तरी तीं एक वेळ क्षम्य ठरतील, कारण त्या उभयतांत सेरिफचे बाबतींत विरोधाभास असला तरी इतर ढब वा टाकाची धाटणी एकसारखी आहे. अशा तऱ्हेनें साम्यें हुडकून काढण्यास टाकाच्या धाटणीचा निकष बराच उपयोगी पडणार आहे. आणि त्या दृष्टीनें विचार करूं लागलें म्हणजे जमतीं वळणें आपोआप उमजून येतील.



१. जाड बारीक विभागांत अत्यल्प फरक दाखविणारी टाकाची धाटणी.

२. जाड बारीक विभागांत भरपूर फरक दाखविणारी टाकाची धाटणी.

३. एकसाथ सारखी जाडी दाखविणारी टाकाची धाटणी.

पण खेदाची गोष्ट ही कीं आपल्या देवनागरीमध्यें वरील धाटणींत अनेकविध प्रकारांतील वळणें आज उपलब्धच नाहींत ! त्यांत फक्त तिरक्या टाकाचीं वळणेंच कायम ठाणें देऊन बसलीं आहेत. त्यामुळें हें तात्त्विक विवेचन नागरी मुद्रणांस पुरेपूर लागू करण्यास बराच कालावधि घालवावा लागणारसें दिसतें. आपल्या टाइपांत त्वरेनें प्रगति घडवून आणण्याची आतां निकड लागली आहे, इकडे डोळेझांक करून चालणार नाहीं.

टाइपाचें दाढर्य नि कागदाची प्रकाशमानता

मुद्रणांत दृष्टीला सुलभता आणून देण्यासाठीं मनोरम विरोधाभास साधणें फार अगत्याचें ठरतें. करड्या, काळसर वा ब्राऊन कागदावर किरटीं अक्षरें स्पष्ट उमगून येत नाहींत, तर पांढऱ्या शुभ्र कागदावर जाड–ओजड

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टाईप काळ्या शाईंत छापले तर कागद आणि टाईप यांत फार मोठा फरक पडून दृष्टीला दचकविलें जातें. या ठिकाणीं काळ्याऐवजीं कमी विरोध दर्शविणारा कोणताहि रंग त्या टाइपास वापरला तर तो दृष्टीला सुखावह वाटेल; किंवा पांढऱ्याशुभ्र कागदाऐवजीं कमी विरोध दर्शविणारा दुसऱ्या कोणत्याहि रंगाचा कागद वापरला तर काळ्या शाईंतहि टाईप दृष्टीला सुखावह वाटतील. कागदाचा रंग आणि टाइपाचा जाडबारीकपणा यांचा सुखावह संयोग वा मनोरम विरोधाभास साधून टाइपाची निवड करणें समंजस व्यक्तीचें मुख्य कार्य होय. या दृष्टीनें पांढऱ्या शुभ्र कागदावर बारीक वळणें, पिवळ्या वा तत्संबंधीं रंगाच्या कागदावर मध्यम वळणें, तर अन्य रंगांच्या कागदावर जाड वा बोजड वळणें मनोरम विरोधाभास साधून देतात. थोडक्यांत टाइपाचें दाढर्य (density) कागदाच्या प्रकाशमानतेच्या (value) व्यस्त प्रमाणांत असावें लागतें हा नियम कटाक्षानें लक्षांत घ्यावा लागतो, आणि त्यानुसार जाड-बारीक वळणें निवडणें प्राप्त ठरतें.

रेखाटणींतील एकता

एकंदरींत मुद्रिताच्या सर्व विभागांत म्हणजे टाईप, आकृत्या व अन्य साहित्य या सर्वांत कलापूर्ण एक-जिनसीपणा वा रेखाटणींतील एकता असणें अगत्याचें आहे. यालाच इंग्रजींत graphic unity असें म्हणतात. त्या दृष्टीनें मजकुरास वापरलेला टाईप, त्याचीं शीर्षकें, हाफटोन ब्लॉक, रेखा चित्रणें, वा अन्य आकर्षणात्मक आकृत्या वा प्रतीकें, हीं सर्व परस्परसंवादी असावींत, त्यांच्या धाटणींत साधर्म्य असावें हें आपणांस पाहून घ्यावें लागतें आणि यांतच रेखाटकाची अभिरुचि दृग्गोचर होते.

टाइपाच्या निवडीबाबतींत कांहीं धागेदोरे हेरून काढण्याचा येथें प्रयत्न केला आहे. विचार करतां आणखीहि धागे निघूं शकताल, पण स्थलावकाशामुळें येथेंच विराम घेणें प्राप्त आहे. लेखकाच्या "मुद्रणांतील सौंदर्याचा शोध आणि बोध" या भावी प्रबंधांत या बाबतींत सखोल विवेचन केलेलें आहे. तत्पूर्वी या इवल्याशा इशाऱ्यावरच वाचक नि अभ्यासक निभावून घेतील अशी आशा वाटते.

या कारखान्यांत सर्व प्रकारच्या ऑफिस फाइली, ग्रामीण व शहर विभागाकरतां रेशनफाइली, सर्व

प्रकारचीं ऑफिस पाकिटें, क्लॉथ लाइन्ड, विन्डो एन्व्हलप्स, पार्सलकरतां टॅग लेबलें, अकौंट व बाऊंड बुकें, रोजमेळ, रिफिल कॅलेंडर ब्लॉक्स व इतर पेपर स्टेश-नरीकरतां लिहा अगर भेटा.



सावळे आणि कंपनी
पुरंदरे कॉलनी
पुणें २

सकाळ प्रिंटिंग प्रेस

(प्रो. सकाळ पेपर्स, लि.)

सर्व प्रकारची छपाईची अद्ययावत् यंत्रसामुग्री

सकाळ छापखान्यांत :

- टाइप फौन्ड्री
- ब्लॉक मेकिंग
- स्टेरिओ कास्टिंग
- सर्व प्रकारचीं छपाई

वगैरे कामें काळजीपूर्वक व वक्तशीर केलीं जातात

भेटा अगर लिहाः—
व्यवस्थापक, सकाळ ५९५ बुधवार, पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रंथप्रकाशन व विक्री
पुस्तकांची सुबक बांधणी

टाईप व लिथो पद्धतीची
वळणदार टाइपांची निर्मिती

गेल्या वीस वर्षांत मराठी व उर्दू शालेय पुस्तकांचे प्रकाशक म्हणून महाराष्ट्रांत अग्रगण्य नांव मिळविलें आहे

१९३६ पासून पुण्यांतील छापखाना व्यवसायांत पदार्पण करून अल्पावधींत स्वतःच्या मालकीची नवी इमारतही बांधली.



साध्या व आटोमेटिक यंत्रसामुग्रींनीं व सोयींनीं विभूषित इमारत १९५१ सालभर बांधणें चालू होतें.

मेसर्स जोशी आणि लोखंडे
प्रकाशन विभाग

प्रतिभा मुद्रणालय
मुद्रण विभाग

नवीन पत्ता—४७९|१० सदाशिव पेठ, टिळक रोड, पुणें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रणालयांतील यंत्र-सामुग्री चांगल्या वंगणानें कार्यक्षम ठेवा

आपल्या यंत्रांच्या सुस्थितीस वंगण तेलच उपयुक्त

रघुनाथ के. जोगळेकर

१९६।७२ टिळक रस्ता, पुणें २.

चांगल्या लुब्रिकेटिंग ऑईल्स व ग्रीझेसचा पुरवठा करणार

स्वस्त व उत्तम टाईप!

- मराठी, हिंदी, कानडी, गुजराथी, उर्दू, इंग्रजी या भाषांतील
- साधा, जाडा, इटॅलिक, स्टँडर्ड बॉडीज-वरील
- बॉर्डर्स, ब्लॉक्स स्टिरिओज

हे सर्व उत्तम प्रकारच्या टाईप मेटलवर पाडलेले सुबक व रेखीव वळणांचे योग्य दरांत मिळतात.

आर्यभूषण प्रेस, टाईप फौंड्री

९१५।१ शिवाजीनगर पुणें ४.

फोन नं. २५१८

सर्व प्रकारचें छपाईकाम

पुस्तकें, जॉब, फोल्डर्स, प्रॉस्पेक्टस्, अकौंट बुकें इत्यादि योग्य दरांत व वेळांत सुबक करून मिळतें.

राजगुरु प्रेस

४०५ नारायण पेठ, पुणें २.

पुस्तकांची गरज

प्रत्येक व्यक्तीस असते
शाळेंतील मुलांना असते
अभ्यासूंना असते

म्हणून

नवीन किताबखाना

बुधवार चौक पुणें २.

भेटा व पाहा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फॉर्म्स धुण्याचे

मेक्सिकन शुभ्र फायबरचे

टिकाऊ ब्रशेस

आकार

ओव्हल ९ × ४

चौकोनी ६॥ × ४

चौकोनी ५ × ३

तयार करणार

टेक्स्टाइल ब्रश मॅन्युफॅक्चरिंग कंपनी

मुंबई ४.

स्टॉकिस्ट–पो. बॉ. नं. ५९३, पुणें २.

" यशवंत म्युचुअल इन्शुअरन्स कंपनी लि. "

५०६ सदाशिव, पुणें २.

म्युचुअल याचा अर्थ सर्वस्वीं विमेदारांची यामधें शेअर्स नाहींत. होणारा सर्व लाभ विमेदारांना मिळतो हें वैशिष्ट्य आहे.

पुष्कळ मुद्रणालयांनीं आमचेकडे त्यांचे कामगारांचे विमे उतरले आहेत. कामगारांच्या करितां तुम्हांलाही आमचे संस्थेंत विमा उतरतां येईल. कामगारांना त्यांच्या कामाचें या पद्धतीनेंच पारितोषिक द्या. तें दोघांनाही सोईस्कर आहे.

द. रा. लिमये
कार्यसंचालक

अमर्यादित मोठें काम

कित्येक मुद्रकांना घाबरून सोडतें... पण इतरांस अवाक्याबाहेर वाटणारें कोणतेंहि मोठें काम आम्ही पाश्चात्य मुद्रणाच्या तोडीचें करतों हें आमचे ग्राहक जाणतात.

ब्लॉकमेकिंग, फोटो-ऑफसेट, लिथो, लेटरप्रेस व पॅकेजिंग वस्तूंचें उत्पादन करणारीं खातीं या सर्वांचे द्वारां २५ वर्षांच्या अनुभवानें सर्व साधनांनीं सज्ज असा... भारतांतील मोठ्यांत मोठ्या छापखान्याइतकी उत्पादन शक्ति पैदा केलेला, हा छापखाना आपलें कोणतेंहि अवघड काम मनपसंत करूं शकतो.

निव्वळ ब्लॉक्स वा ऑफसेटचेंहि काम स्वीकारलें जातें.

न्यू जॅक प्रिंटिंग वर्क्स, लि.

सक्सेरिया मिल कॉंपाऊंड, डिलाईल रोड, ग्लोब मिल्स पॅसेज, मुंबई नं. १३
टेलिफोन : ६००४२–४३,

ताजी बातमी !!!

... कागदावर काळीभोर छापली जाऊन वाचण्यांतही त्रास वाटत नाहीं. छापखानदारही समाधानाचा निःश्वास टाकतो. माफक दर, उत्तम छपाई योग्य व यंत्रावर चालण्यास अत्यंत सुलभ असणारी ब्लॅक अँड व्हाइट कंपनीची शाई वापरतांना हाच अनुभव येतो. आपापल्या नियतकालिकांच्या छपाईत ही वापरली तर सर्वांकडून धन्यवाद येणारच. आपल्या विक्रेत्याकडे चौकशी करा वा लिहा.

दी. ब्लॅक अँड व्हाईट कंपनी

पो. ऑ. बॉ. ४०५

कानपूर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८ इंची परफोरेटिंग मशीन

साधारण वापरलेला नवा टाईप,
कटिंग मशीन ३६ इंची इंग्लिश मेक
विकणें आहे.

लिहा

श्री रामकृष्ण आर्ट प्रिं. प्रेस.
मानवत (परभणी)

सर्व प्रकारचा कागद
व
छ पा ई यं त्रें
या क रि तां

इंपीरिअल स्टेशनरी मार्ट

न्यू कि ता ब बि ल्डिं ग
ल क्ष्मी रो ड, पु णें २.

रॅशनल
आर्ट सर्व्हिस

सर्व तऱ्हेची चित्रकला व छपाईची कामें स्वीकारतात

लेबल्स
पॅकेजेस्
सिने-स्लाइडस्
जाहिरात-कल्पना
व डिझाइन्स
ब्लॉक व छपाई

घेल बिल्डींग, सर फेरोजशहा मेथा रोड, मुंबई १ टेलिफोन : २१४०६

ग्लॉस वार्निश

छापलेलें काम चमकदार दिसावें म्हणून लागणारें वॉर्निश आम्हीं तयार केलें असून तें उत्कृष्ट झालेलें आहे. प्रत्येक मुद्रकाकडे तें असणें जरूर आहे. सर्व प्रकारच्या शायाही आमच्याकडे आहेत.

नमुना व भाव मागवा.

दी युनायटेड इंक अँड वार्निश कंपनी

The United Ink & Varnish Coy.
Vileparle, Bombay 24.
Proprietor-V. G. Sathaye M. A.

एम्. विजय एजन्सीज

टिळक रोड, पुणें २

कागद
शाई
यंत्रें

विविध मुद्रण साहित्य याकरितां लिहा वा भेटा. आपल्याला समाधानकारक अशा तऱ्हेची सामुग्री व वागणूक देणें हेंच आमचें वैशिष्ट्य !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रोलर कांपोझिशन आणि संशोधन

गेल्या ४ वर्षांतील एका शास्त्राच्या पदवीधराचें पुण्यांतील स्मरणीय व अनुकरणीय मुद्रण विषयक संशोधनकार्य.

लेखक : परिचित एम्. एस्सी

प्रथम ३ वर्षांपूर्वी चित्रशाळेमध्यें जेव्हां माझें मुद्रणधंद्याशीं संबंधित अशा एखाद्या विषयावर संशोधन करावयाचें ठरलें तेव्हां मी त्यांतल्या त्यांत सोपा व लवकर पुरा होऊं शकेल असा व तयार होणाऱ्या मालाचें उत्पादन लहान प्रमाणावर करतां येईल असा 'रोलर कांपोझिशन' हा विषय निवडला. पण आज ३ वर्षांमध्यें लहान मोठ्या प्रमाणावर साधारणपणें ५० प्रयोग करून सुद्धां 'रोलर कांपोझिशन' या विषयाच्या पद्धतशीर संशोधनाच्या दृष्टीनें फारच थोडी मजल आपण गांठली आहे व आणखी बरेच प्रयोग करणें आवश्यक आहे याची खात्री पटली. एक प्रयोग केला, त्यामध्यें आलेले अनुभव जमेस धरले म्हणजे दुसऱ्या प्रयोगाची तयारी सुरू होते असाच माझा अनुभव आहे; एकंदरींत या विषयाच्या माझ्या अभ्यासाची रूपरेषा काय होती आणि आहे, याबाबत मुद्रक मित्रांना कल्पना असावी या दृष्टीनें हा लेख लिहीत आहे.

सुरुवात करतेवेळीं मी नुकतीच विद्यापीठांतून रसायनशास्त्रांत पदवी घेतलेला विद्यार्थी होतों व मुद्रणव्यवसाय, त्याची तांत्रिक बाजू, इत्यादि सर्व गोष्टी मला नवीन होत्या; 'रोलर कांपोझिशन' विषय निवडल्यावर चित्रशाळेंतील चालू रोलर, प्रत्यक्ष मशीनवरचें त्यांचें काम, रुळांची ओतणी इत्यादि गोष्टी मी शास्त्रीय दृष्टिकोनांतून पाहूं लागलों. पुण्यांतील मुद्रणव्यवसायांतील कांहीं अनुभविक मंडळींकडून व चित्रशाळेच्या ग्रंथालयातील (Inland Printer) या मासिकाचे जुने नवे अंक चाळून मी या विषयासंबंधीं कांहीं माहिती मिळवूं शकलों; परंतु प्रत्यक्ष या विषयावरचें वाङ्मय मात्र शोधूनहीं फारसें मिळेना, म्हणून (Trial and Error) या पद्धतीनें प्रयोग सुरू केले.

सरस आणि ग्लिसरीन या दोन पदार्थांच्या मिश्रणानें रोलर कांपोझिशन तयार होतें हें बहुतेकांना माहीत आहे; तरी सुद्धां सरसाचे ऐवजीं बाभळ, शेवगा यांच्या डिंकासारखे पदार्थ वापरून काय होतें याही दृष्टीनें अगदीं प्रथम प्रयोग केले; (ते फारसे यशस्वी झाले नाहींत, आणि त्यांमध्यें रोलर कांपोझिशनला आवश्यक असणारा (Receliance) रबरीपणा येऊं शकला नाहीं. सुरुवात केल्यावर एक एक अडचणींना सुरुवात झाली. चित्रशाळेंतील ६।७ महिन्यांच्या प्रयोगांनंतर जरी माझे प्रयोग फारसे 'यशस्वी' या सदरांत मोडण्यासारखे नव्हते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरी मला स्वतःला आणि माझ्या कामांत विशेषपणें लक्ष घालणाऱ्या श्री. वसंतराव देवकुळे यांना त्याच 'अयशस्वी' प्रयोगांमध्यें पुढच्या यशाचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं. आत्तांपर्यंतचे माझे प्रयोग ज्याला 'प्रयोगशाळेंतील प्रयोग' (Laboratory Exps.) म्हणतात त्याप्रमाणें झालें. पण 'रोलर कांपोझिशन' सारख्या विषयावरील संशोधनाकरतां यापेक्षां मोठ्या प्रमाणावरचे प्रयोग व वेगवेगळ्या ऋतूंत वेगवेगळ्या मशीनवर करणें जरूर होतें.

याच सुमारास म्हणजे जानेवारी १९४९ मध्यें पुणें येथें महाराष्ट्र मुद्रण परिषद भरली होती व त्यासंबंधीं एक प्रदर्शन भरविलें होतें. त्या वेळीं मी केलेले प्रयोग, त्यांमध्यें तयार झालेले रोलर कांपोझिशनचे नमुने, त्यांचे अनुभव इत्यादि सर्व श्री. देवकुळे यांनीं आग्रहानें मांडले होते. महाराष्ट्रांतील अनेक मुद्रकांनीं या वेळीं हें काम पुढें चालावें अशी इच्छा प्रदर्शित केली. पुण्यांतील मुद्रकांच्या प्रातिनिधिक अशा पुणें मुद्रक संघानें याबाबत पुढाकार घेतला व त्यांच्या सहकार्यामुळेंच या पुढील प्रयोग सुरू झाले.

यापुढील सर्व स्थित्यंतरें स्थलाभावें टाळून आतांपर्यंत कोणकोणत्या दृष्टीनें प्रयोग केले व पुढें कोणत्या प्रकारचे प्रयोग करण्याची कल्पना आहे याची जंत्री देतों.

(अ) आतांपर्यंत केलेले प्रयोगः—

(१) रोलर कांपोझिशनचे मुख्य घटक तीन; सरस, ग्लिसरिन व पाणी, त्यांचीं Hard, व Medium या दोन प्रकारच्या कांपोझिशनकरतां प्रमाणें निश्चित करणें.

(२) कांपोझिशन वापरतांना अगर तयार झाल्यावर त्यांतील पाण्याचें प्रमाण ऋतुमानाप्रमाणें कमी अगर जास्त होतें (व त्यामुळेंच रूळ कडक अगर लिबलिबीत होतात) त्याचा प्रतिबंध करण्याकरतां वेगवेगळीं मिश्रणें (Stabilizers) वापरणें.

(३) कांपोझिशन तयार करण्याची पद्धत निश्चित करणें.

उदाः—प्रयोगामध्यें तपमान (Temperature) किती असावें, किती वेळ प्रयोग चालू ठेवावा; (Time); मिश्रण तयार झाल्यावर जंतुनाशक पदार्थ कोणते व किती घालावेत; कांपोझिशन 'सेट' करण्याचा काल किती असावा (Time & Temperature for Setting) व त्या वेळीं तपमान किती असावें वगैरे.

(४) बाजारांत जो सरस मिळतो तो मुख्यतः सर्व लोक चिकटविण्याकरतां वापरतात. सरसाच्या गुणधर्माचे दोन भाग आहेत.

(1) Adhesive Property चिकटपणा.

(2) Jellying Property (निवल्यावर घनरूप होणें हा गुणधर्म) यांपैकीं रोलर कांपोझिशनकरतां कोणता गुणधर्म जास्त आवश्यक आहे त्याबद्दल निश्चिति; सरस सर्वसाधारणपणें (अ) कातडीचे (Hidecuttings) तुकडे. (ब) Fleshings कातडी कमवायच्या अगोदर काढलेला कीस). (क) हाड यापासून करतात. यांपैकीं कोणत्या पदार्थापासून केलेला व कोणत्या पद्धतीनें केलेला सरस कांपोझिशनकरतां जास्त चांगला याबाबत प्रयोग व निश्चिति.

(५) विलायती 'रोलर कांपोझिशन' मध्यें दिसून येणारा पारदर्शकपणा आणण्यासाठीं कच्च्यामालामध्यें, मिश्रणांमध्यें व प्रयोगाच्या रीतीमध्यें काय फरक करावा यासंबंधीं प्रयोग व निश्चिति.

वरील सर्व प्रयोग करतांना आदर्श रोलर कांपोझिशनकरतां कोणते गुणधर्म आवश्यक आहेत त्याचीही नोंद होत गेली ती अशी——

(१) रूळ साफ ओतला जाणें——

(२) मशीनवर शाई आणणें वा लावणें हीं कामें चांगल्या तऱ्हेनें होणें—यासाठीं आवश्यक असणारा—नरमपणा, खरीपणा (Receliance) व चिकटपणा आदि गुण असणें व ते तसेच टिकणें.

(३) रूळ पुन्हां पुन्हां कमींत कमी ३।४ वेळां तरी ओतला जाणें.

या बाबतींत एक गोष्ट लक्षांत आली कीं एखादा रूळ (कांपोझिशन) साधारणपणें १ वर्ष तरी टिकावा ही मुद्रकाची इच्छा असते. एखादे वेळेस कामाची रीघ असेल तर ओतणी भराभर होऊन ६ महिन्यांतच रूळ बदलावे लागतात.

वर उल्लेख केलेला कांपोझिशनचा पारदर्शकपणा हा प्रत्यक्ष वापराच्या कामीं विशेष महत्त्वाचा नाहीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

डॉ. कृ. खं. डोळे, एम्. एस्सी., पी. एच्डी.
मुद्रण संशोधन अभ्यासू

दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
देवनागरी हातटंकलेखन वगैरेंचे
कल्पक, जपान प्रवासी

आ. मा. लेले, एम्. एस्सी.
मुद्रण संशोधनकार्यरत

वा. के. सावळे
पहिले पाकीट कारखानदार



वा. ना. कलंत्रे बी. ए
लोकमान्य इंडस्ट्रीज लि० (शाईचे कारखानदार)

म. स. पारखे, खोपोली गिरणीचे मॅ. ए.
जपान प्रवासी–धाडसी धंदेवाले



ना. तु. ठाकूर बी. ए.
टिकलेले पहिले जाहिरातदार

य. गो. जोशी
सत्प्रवृत्त धाडसी प्रकाशक



ज. ग. देवकुळे
मुद्रण-प्रकाशाच्या मुखपृष्ठांचे चित्रकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें मला वाटतें आणि त्यास अनुसरून वर उल्लेखिलेले गुणधर्म कायम ठेवून कांपोझिशनच्या मूळच्या मिश्रणांत कमीजास्त प्रमाणांत रबर, प्लॅस्टिक पावडर यासारखे पदार्थ वापरून पहाणें. त्यांच्या वापराचे फायदे-तोटे काय होत आहेत हें नमूद करणें या दृष्टीनें प्रयत्न झाले आहेत. यांतूनच साधारणपणें एक वर्षभर चांगल्या तऱ्हेनें टिकणारा, पण पुन्हां न ओततां येणारा रूळ तयार करण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यथावकाश अशा तऱ्हेचे रूळ मुद्रकांच्या अभिप्रायासाठीं त्यांच्या सेवेस सादर होतील.

असो. यानंतर या विषयासंबंधीं कोणत्या पद्धतीचें संशोधन करण्याची माझे मनांत योजना आहे त्याचें थोडक्यांत निवेदन करतों.

रोलर कांपोझिशन (किंवा रूळ) वापरांत असतांना त्यावर कोणत्या प्रकारच्या शक्ति (Forces) परिणाम करीत असतात याची नोंद खालिलप्रमाणें करावी लागेल.

(१) हवामानांतील तपमान (Temp.); आर्द्रता (Moisture).

(२) मशीनच्या वेगामुळें, व घसटीमुळें निर्माण होणारा दाब (Pressure); व तपमान (Temp.) इत्यादि.

(३) पुन्हां पुन्हां ओतण्यामुळें होणारा (रुळाच्या) गुणधर्मांमधील बदल.

आतां बाजारांतील (विलायती अगर दुसरे) चांगलें समजलें जाणारें कांपोझिशन व आपण तयार केलेलें कांपोझिशन यांची खालील दृष्टीनें तुलना करायची अशाच धर्तीवर इतरही अनेक (चांगल्या दर्जाचें) कांपोझिशन्स तपासणीसाठीं घ्यावयाचें व नंतर चांगल्या कांपोझिशनचा एक गुणतक्ता (Standered Specification) तयार करायचा. तो कोणत्या प्रकारचा असेल याची थोडीशी कल्पना खालील मुद्यांवरून येऊं शकेल.

नवें रोलर कांपोझिशन:—(१) बाष्पाचें प्रमाण (Moisture)

(२) घनरूप होण्याची पात्रता.(Jelly Power)

(३) चिकटपणा (Adhesive Power)

(४) विशिष्ट बाष्पामध्यें. विशिष्ट वेळ ठेवून झालेला फेरफार.

७०° बाष्प (Humidity) } जास्तींत जास्त.
३०° बाष्प (,,) } कमींत कमी.

वरील दोन्ही आंकडे वातावरणांतील जास्तींत जास्त व कमींत कमी बाष्पाचे आहेत.

(५) विशिष्ट तपमानामध्यें (वातावरणांतील जास्तींत जास्त व कमींत कमी ही दोन्ही टोकें जमेस धरून) विशिष्ट वेळ ठेवून कॉंपोझिशनच्या गुणधर्मांत झालेला फेरफार पाहणें

वरील सर्व गुणधर्मांमध्यें कांपोझिशनच्या पहिल्या ओतणीनंतर व दुसऱ्या ओतणीनंतर झालेले फेरफार नमूद करणें.

वर नमूद केलेला नुसता कच्चा आराखडा आहे. प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यावर यामध्यें कांहीं फेरफार करणें आवश्यक पडेलही; जाणत्या लोकांकडून त्याबाबत सूचना याव्यात अशी माझी इच्छा आहे.

——

सुरीस धार !

ऑटोमेटिक इलेक्ट्रिक शार्पनिंग
मशीनवर पेपर कटिंगच्या सुऱ्यांना
उत्तम धार ताबडतोब लावून मिळेल.

चौकशी

दांडेकर बन्धू एंजिनिअर्स, सांगली

मॉडर्न पेपर मार्ट

न्यूजप्रिंट
क्राफ्ट
लेजर
पॅकिंग व
प्रिंटिंगकरतां
स्पेशालिस्ट

देशी व विलायती
कागदाचा
मोठा साठा
टिशू
मॅनिफोल्ड
फ्लर्ड डेमी
कार्डशीट

२५ बुधवार पेठ, पुणें २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्याच्या भारतीय रसायनशाळेंतील



मुद्रणोपयोगी संशोधन कार्य

१९४७ सालीं जून महिन्याच्या मुद्रणप्रकाशच्या अंकांत आम्हीं पुण्याजवळील भारतीय रसायन शाळेचें छायाचित्र देऊन त्या ठिकाणीं मुद्रकांना उपयुक्त कार्य होऊं शकेल कां असें पृच्छात्मक आवेदन केलें. आज ४॥ वर्षांनीं त्या भारतीय रसायनशाळेंत किंचित् दूरान्वयानें मुद्रकाकरितां चालणाऱ्या कार्यांची महिती या अंकांत देतांना आम्हांला आनंद वाटत आहे. मुद्रकाकरितां अशाच कांहीं गोष्टी केल्या जाव्यात एवढीच चालकांना विनंति. —संपादक.

गेल्या नोव्हेंबर १९५१ च्या पहिल्या आठवड्यांत पुणें येथील भारतीय रसायनशाळेमध्यें (नॅशनल केमिकल लॅबोरेटरी) "हिंदुस्थानांतील तेलें व त्यांचे उपयोग" या विषयावर चर्चा करण्यासाठीं एक कार्यक्रम झाला; या कार्यक्रमासाठीं हिंदुस्थानांतील या विषयाशीं संबंधित असलेले सुमारें ५० शास्त्रज्ञ एकत्र आले होते; व्यापारी संस्थांतर्फे व कारखानदार वर्गापैकींहि कांहीं प्रतिनिधि या चर्चेमध्यें भाग घेतांना दिसत होते.

"हिंदुस्थानांतील तेलें आणि त्यांचे उपयोग" या विषयाचा आणि मुद्रणधंद्याचा कोठें संबंध येतो व त्या दृष्टीनें या कार्यक्रमांत काय काय झालें हें सांगण्याअगोदर त्या वेळीं इतर कोणकोणत्या विषयांवर निबंध वाचले गेले व चर्चा झाली याचा थोडक्यांत गोषवारा देतों म्हणजे एखाद्या विषयाची शास्त्रीय, औद्योगिक, व व्यापारी या तीनही दृष्टींनीं छाननी कशी होऊं शकते याचा अंदाज येईल.

निवेदनाच्या दृष्टीनें सोपें जावें म्हणून तेथें चर्चिल्या गेलेल्या विषयांची आपण खालीलप्रमाणें वर्गवारी करूं.

(१) तेलबिया आणि वनस्पतिजन्य तेलें.

(२) तेल गाळणें.

(३) साबण व ग्लिसरिन.

(४) 'वनस्पति' तूप.

(५) एरंडेल व तत्सम तेलें, रंग, वार्निशें इत्यादि.

(१) यासंबंधीं—

"हिंदुस्थान हा जगांतील सर्वांत जास्त तेलबियांचें उत्पादन करणारा देश आहे; तसेंच या देशांतील अरण्यांमधून अजूनही अनेक प्रकारच्या उपयुक्त तेलबिया प्रतिवर्षीं वाया जातात. (कमला, पिसा, निंबोणी) या सर्वांकडे एक राष्ट्रीय संपत्ति या दृष्टीनें पाहून त्यांचें उत्पादन वाढवणें व त्यांचे जास्त चांगल्या तऱ्हेनें उपयोग करणें हें अगत्याचें आहे अशा आशयाचे विचार मांडले गेले. शिवाय लिंबोणीच्या तेलाचे उपयोग, मोहडा तेलाचा खाण्याकरतां उपयोग. 'कमला' तेलाचे उपयोग वगैरे निबंध वाचले गेले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(२) तेल गाळणें—

बियांपासून तेल गाळण्याच्या एकंदर चार पद्धती आहेत. घाणा; रोटरी; एक्स्पेलर; आणि द्रावणपद्धत (Solvent Extraction) आपल्याकडे अजून शेवटची पद्धत अवलंबिली जात नाहीं; या पद्धतीचे फायदे, तोटे, विशेषत: कोणत्या तेलासाठीं ती वापरावी वगैरे अनेक दृष्टींनीं चर्चा झाली. द्रावणांचा पुरवठा व त्यांचा पुन्हां पुन्हां उपयोग करण्याची शक्यता; (Recovery of Solvent) या दोन गोष्टींवरच या पद्धतीची यशस्विता अवलंबून असते. या सर्व दृष्टीनें नुकत्याच भावनगरला सुरू झालेल्या, वरील पद्धतीनें तेल गाळणाऱ्या कारखान्याचे व्यवस्थापक श्री. पारेख यांचें निवेदन उद्‌बोधक झालें. याचवेळीं कांहीं रसायनांचा उपयोग करून नुसत्या पाण्याबरोबर तापवून तेलबियांपासून तेल काढण्याच्या प्रयोगाची माहिती सांगितली गेली. या पद्धतीनें एरंडेल तेल व दाण्याचें तेल हीं चांगल्या पद्धतीनें गाळलीं जातात अशीहि माहिती दिली गेली.

साबण व ग्लिसरीन या विषयांवरच्या चर्चेत गोद्‌रेज व टाटा या कारखानदारांच्या प्रतिनिधींनीं भाग घेतला. साबणामध्यें कडू तेलांचा वापर करण्यासंबंधीं एक निबंध वाचला गेला.

सर्वांत मनोरंजक चर्चा ' वनस्पति ' तुपांवर झाली. डॉ. दामोदरन् आसि. डायरेक्टर, भारतीय रसायनशाळा यांनीं या विषयावर केलेल्या संशोधनाचा[1] आढावा घेतांना, ' वनस्पति ' या दुसऱ्या तेलांइतक्याच खाण्यास लायक असतात असें सांगितलें, तेलांचें वनस्पतींमध्यें रूपांतर करतांना जें निकेल (Catalyst) वापरतात त्यावरच ' वनस्पतींचा ' दर्जा अवलंबून असतो असेंहि दुसऱ्या एका वक्त्यानें प्रतिपादिलें.

एरंडेल, रंग, वार्निशें—या विषयाशीं मुद्रकांचा धंद्याच्या दृष्टीनें संबंध येतो. आपण जी शाई छपाईसाठीं वापरतों तिचे गुणधर्म बव्हंशीं तीमध्यें वापरलेल्या वार्निशवर अवलंबून असतात हें आपणांस माहीत आहेच. हीं वार्निशें एरंडेल, जवसाचें तेल आदि तेलांपासून करतात. पुण्यांतील मुद्रकांना सुपरिचित असलेले व फर्ग्युसन महाविद्यालयांतील प्राध्यापक श्री. डोळे यांनीं एरंडेल तेलापासून वार्निश अगदीं झटकन् बनवण्याचे प्रयोग यशस्वी रीतीनें करून दाखविले. कांहीं रसायनांच्या सहाय्यानेंच हा फरक इतक्या झटपट होतो. हैद्राबादच्या श्री. शिवसांबन् यांनींहि तिकडील मातीचा याच कामासाठीं यशस्वी रीतीनें उपयोग केल्याचें सांगितलें.

श्री. सालेटोर (हैद्राबाद) यांनीं तेलांच्या वाळण्याच्या क्रियेसंबंधींच्या त्यांच्या प्रयोगांची माहिती सांगितली. याशिवाय तंबाखूच्या बियांच्या तेलाचे उपयोग; काजूच्या टरफलांचे तेलाचा उपयोग वगैरे निबंध वाचले गेले.

अशाच तऱ्हेचे अनेक निबंध व चर्चा यामध्यें तीन दिवसांचा कार्यक्रम झटकन संपला. आपल्या देशामध्यें प्रत्येक क्षेत्रांत अशा तऱ्हेच्या संशोधनात्मक चर्चेची अत्यंत आवश्यकता आहे; त्यामुळें होणारे शास्त्रीय आणि औद्योगिक फायदे उघडच आहेत; पण त्याशिवाय आपणांसारख्या सर्वसामान्य मुद्रकांच्या ज्ञानांत मौलिक भर पडते, हे सुद्धां पुष्कळच महत्त्वाचें आहे; व त्या दृष्टीनें जरी या छोट्याशा लेखाचा उपयोग झाला तरी पुरें.

माहितगार.

WHATEVER SAY PRINTERS YES OR NO?

DABHOLKARS CAN DO THE JOB!

PHONE 2601

Dabholkars Brothers

2432, EAST ST., POONA 1.

PRINTERS • STATIONERS • BOOK-SELLERS.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पदमजी व खराडकर या कुटुंबांनीं ६५ वर्षें चालविलेला एक महनीय उद्योग आज चांगल्या स्थितींत चालूं आहे.

डेक्कन पेपर मिल लिमिटेड

१८८५मध्यें पुण्याजवळ स्थापन झालेली लिमिटेड कागद गिरणी

इ.स.१९८५ते१९१२ : स्थापना व प्राथमिक तयारी

लोकमान्य टिळक, माधवराव नामजोशी, सिताराम-पंत पटवर्धन, सरदार कूपस्वामी मुदालियार, श्री. बुट्टी इत्यादि मंडळी स्वदेशीबद्दल विशेष दक्ष असत. त्यांच्या बैठकींत सर्वसाधारणपणें तसे विषय निघत. अशा गप्पांमधील कागदगिरणीचा प्रश्न कांहीं मंडळींनीं प्रत्यक्ष अमलांत आणण्याचें ठरविलें. त्यामध्यें प्रमुखपणें पाहण्याची तयारी केलेले नौरोजी पदमजी व त्यांचे बंधु दोराबजी पदमजी हे होते. त्यांनीं अनेकांचें सहकार्य घेऊन हडपसर स्टेशनजवळ पाण्याची मुबलकता पाहून कागदगिरणी १८८५ सालीं स्थापन केली.

पदमजी बंधूंचे खासगी कारभारी श्री. बापूराव बाळकृष्ण खराडकर यांनींच गिरणीच्या सर्व गोष्टी सुरवातीस केल्या होत्या. कागद गिरणीकरितां आणलेलें पाहिलें यंत्र 'बर्ट्रम्स लि.' या शेफील्डच्या कंपनीचें होतें. त्या कंपनीनें कंत्राटाप्रमाणें माणसेंही पुरविलीं होतीं, व ल्यूकस नांवाचा एंजिनीयर हा पहिला मॅनेजर होता. त्याचे हाताखालीं श्री. बापूराव खराडकर तयार होत होते. १८९८ मध्यें इंग्लिश कंपनीचें कंत्राट संपलें व त्यामुळें मॅनेजर ल्यूकस ह्यालाही जावें लागलें. तेथपर्यंत त्याच्या हाताखालीं काम करणारे श्री. बापूराव खराडकर हे मॅनेजर झाले.

गिरणींत चालू असलेल्या यंत्रावर फार साध्या प्रकारचा कागद निघत असे, व हा कागद मुंबई प्रांताच्या सरकारी खात्यांत मोठ्या प्रमाणांत खपे. त्या वेळचे गव्हर्नर रे साहेब यांनीं स्वतःच्या सहीनें पेपर मिलशीं केलेल्या करारानुसार हा कागद घेतला जात असे व ही गोष्ट गिरणीला मोठा आधार म्हणून होती.

इकडे पदमजी बंधूंपैकीं दोराबजी पदमजी यांचा मुलगा फर्दुनजी पदमजी (सध्यांचे पदमजी शेठ) यांनीं मुंबईस स्वतःची कागदगिरणी सुरू केली, त्यामुळें बापूसाहेब खराडकर हेच सर्व काम पहात असत.

श्री. बापूराव खराडकर यांनीं कागद गिरणींतील प्रत्येक लहानसहान कामाची माहिती घेतली होती. गिरणीव्यतिरिक्तही अनेक जबाबदाऱ्या त्यांच्यावर होत्या. गिरणीला जोडून डेक्कन बँक ही संस्था होती. ह्या बँकेनें गदगला कॉटन मिल घेतली. त्या गिरणीची पाहणी करण्यास जात असतां वाटेंत अचानक कॉलऱ्याचा विकार होऊन १९०९ मध्यें बापूराव खराडकर निवर्तले.

त्यांचे चिरंजीव रामचंद्र बापूराव ऊर्फ भाऊसाहेब खराडकर यांनींही गिरणींतील कामाची माहिती १९०० सालापासून घेतली होती, १९०९ सालामध्यें त्यांना असिस्टंट मॅनेजर नेमलें गेलें.

बापूराव खराडकरांच्या मृत्यूनंतर पदमजीबंधूंचे इतरही व्यवहार भाऊसाहेब पाहूं लागले. त्यामध्यें थोडे मतभेद होऊन भाऊसाहेब खराडकर यांनीं १९१२ मध्यें गिरणींतील काम सोडून एल. आर्. गोखले यांना एक शुगर फॅक्टरी उभी करून देण्यास गेले. त्यानंतर ते बेळगांवकडे एका शेतीकेंद्रावर कामाकरितां गेले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्याच्या चित्रशाळेमध्ये कै. वासुकाका व शं. न. जोशी ह्यांनीं परस्परांबरोबर सहकार्यानें ४७ वर्षे वागून चित्रशाळेची सर्वांगीण वाढ केली.

कै. वासुकाका जोशी

म १८५४ मृत्यु १९४४

कै. शं. न. जोशी

जन्म १८७४ मृत्यु १९४४

शेठ प्रभुदास मेहता

डेक्कन पेपर मिल्स कंपनीचे आजचे मॅनेजिंग एजंट व मॅनेजर

कै. बा. वा. खराडकर



श्री. रा. खराडकर



रा. बा. खराडकर

दे. श्री जोशी

द. भ. लोखंडे

जोशी–लोखंडे या प्रकाशन संस्थेचे कर्तबगार मालकद्वय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. १९१३ ते १९२३ : वाईट दिवस

मधल्या कांहीं भानगडीमुळें नौरोजी पदमजी आजारी पडून पेपर मिलचें कामही बंद राहिलें. १९१३ ते १९१७ पर्यंत गिरणी बंदच होती. तेव्हां दोराबजींचे चिरंजीव फर्दुनजी पदमजी यांना मुंबईहून परत बोलाविण्यांत आलें. हे फर्दुनजी पदमजी कागदगिरणीबाबत अत्यंत माहीतगार व कष्ट करण्यास तयार असे गृहस्थ होते.

श्री. भाऊसाहेब खराडकर हे बेळगांवकडे होते. त्यांच्या सहकार्याची नवीन पदमजी शेठना फार गरज भासूं लागली बराच पत्रव्यवहार करून १९२४ नंतर श्री. भाऊसाहेब पुन्हां डेक्कन पेपर मिलकडे आले व फर्दुनजीशेठबरोबर त्यांनीं पेपर मिलची संपूर्ण व्यवस्था हातांत घेतली.

इ. स. १९२४ ते १९४२ : नवें यंत्र व प्रगति

१९२४ चे सुमारास गिरणीमध्यें केवळ बदामी कागद निघे. श्री. फर्दुनजी हे तीन वेळां परदेशीं जाऊन कागद धंद्याचा खोल अभ्यास करून आले असल्यानें त्यांचें ह्या रद्दी कागदावर समाधान होईना म्हणून त्यांनीं १९२७ ला एक मोठें नवें यंत्र (Thiry & Co. चें) आणविलें. या यंत्रावर मशीन ग्लेझ्ड पेपर काढतां येण्याची सोय होती.

मॅनेजिंग एजंटस्	मॅनेजर्स
	खराडकर
नौरोजी पदमजी	बापूराव बाळकृष्ण
फर्दुनजी पदमजी	रामचंद्र बापूराव
डॉ. भडकमकर इ.	श्रीनिवास रामचंद्र
प्रभुदास मेहता	श्रीनिवास रामचंद्र

१९२४ पासून जबाबदारी घेतल्यानंतर १८ ते २० तास फर्दुनजी गिरणींत असत व चांगला कागद काढण्याची त्यांची धडपड विलक्षण असे. नव्या यंत्रामुळें चांगला कागद निघण्याची सोय झाली व फर्दुनजी शेठ यंत्रसामुग्रीची दुरुस्ती करीत व त्याचप्रमाणें कागदाच्या रासायनिक क्रिया यासंबंधीं सतत स्वतः अभ्यास करीत असत. हे सर्व ते स्वतः करून कामगारांना प्रत्येक ठिकाणीं मार्गदर्शन करूं शकत असत.

ह्या नव्या यंत्रासाठीं लागणारा पल्प सबई गवताचा केला जाई. याशिवाय चिंधीचा उपयोग होतो म्हणून गांवांतील चिंधी गोळा करून पुरविण्याचें श्री. प्रभुदास केशवजी मेहेता यांनीं सुरू केलें.

श्री. फर्दुनजी यांची उत्तम कागद काढून तो स्वस्तांत देण्याची फार खटपट असे. चिंधीच्या जोडीला 'वेस्ट पेपर' म्हणजे कागदाचीं कटिंगवरील कात्रणें वापरण्याची कल्पना १९३० सालीं काढली व ती कामगिरी श्री. प्रभुदास यांनींच पत्करली. या गिरणीला सरकारी कागद पुरविणें हे प्रथमपासून मोठें काम असे. लोकांना किंचित् जास्त दरानें कागद देऊन त्यांतील विशेष नफा सरकारी कागद स्वस्त दरानें देऊन तोंडमिळवणी केली जाई. १९३० पासून सरकारी कागद पुरविण्याचें मोठें कंत्राटही गिरणीस मिळालें.

१९३० मध्यें ३ आणे ४ पै पौंड पांढरा कागद,
२ आणे ६ पै पौंड बदामी कागद,
१ आणा ६ पै पौंड दिल्ली बदामी

याप्रमाणें कागदाचे दर होते.

यांपैकीं दिल्ली बदामी कागद टनावारी दिल्लीला खपविण्याची सुरुवात व जबाबदारी श्री. प्रभुदास केशवजी मेहता यांनीं पत्करली होती. १९३२ सालापासून वाटेल त्या कागदाला मोठमोठीं गिऱ्हाइकें मिळविण्याचें महत्त्वाचें काम श्री. प्रभुदास करीत असत.

श्री. फर्दुनजी यांची इच्छा परदेशी कागदाशीं स्पर्धा करण्याची! ती यामुळें पुरी झाली. १९२८ पासून परदेशी आयातीवरील निर्बंध व कर वाढले व त्यामुळें १९३०-३१ नंतर गिरणीचा माल पुष्कळ खपूं लागला. मालाची जात कायम टिकविण्याचें काम फर्दुनजी करीत. सर्व व्यवस्थापनाचें काम भाऊसाहेब खराडकर व माल खपविण्याचें कार्य श्री. प्रभुदास मेहता यांनीं करावें, याप्रमाणें व्यवस्था चालू होती.

त्या वेळीं पौंडामागें अर्धा पै एवढाच फायदा होई. पुढें आपसांत स्पर्धा सुरू झाली, तेव्हां १९३६ मध्यें आपसांतील स्पर्धा नाहींशी होण्यासाठीं पेपर मेकर्स असोसिएशन सुरू झाली. त्यामध्यें फर्दुनजी पदमजी यांना बरेंच वरचें स्थान होतें.

या असोसिएशनमध्यें प्रत्येक कागदगिरणीचें उत्पादन, सरकारला द्यावयाचा कागद, प्रांतवार कागदखपाची योजना ह्यांचा हिशोब करण्यांत आला. पेपर मेकर्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असोसिएशनच्या विक्रीचें काम ' किलिक निक्सन ' ह्या इंग्लिश कंपनीकडे देण्यांत आलें होतें.

शेठ फर्दुनजी पदमजी यांचें कार्य

डेक्कन पेपर मिलं या गिरणीची १९२७ मधील परिस्थिति सुधारण्यासाठीं फर्दुनजी यानीं अक्षरशः आपली सर्व एस्टेट पणाला लावली. सहा महिने पगारही देतां आले नव्हते. पण तशाही स्थितींत उत्तम कागद काढण्याची त्यांची खटपट चालूच होती. १९३६ पर्यंत अशा तऱ्हेनें मोठ्या अडचणींतून गिरणी चालली होती. गिरणीच्या प्रत्यक्ष कामकाजाबद्दल श्री. भाऊसाहेब खराडकर यांची मदत होई. १९३६ नंतर त्यांचे चिरंजीव बाबासाहेब बी. एस्सी. झाले, तेव्हां त्यांना फर्दुनजी शेठ यांनीं आपल्या हाताखालीं घेऊन गिरणीच्या कामकाजाची माहिती देणें सुरू केलें.

फर्दुनजी यांनीं गिरणीमध्यें सतत वेगवेगळ्या सुधारणा केल्या. पूर्वी तयार झालेला कागद हातानें ओढून घ्यावा लागे व त्यामध्यें धोका असे. त्यामध्यें एका कामगाराचा हातही मोडला होता, पण पुढें यांत्रिक रीतीनें (Automatic Suction) कागद ओढण्याची सोय करण्यांत आली. फर्दुनजी यांचे हाताखालीं वाझ नांवाचा बीटरवरील मुख्य व फिनिशिंग खात्याचा मुख्य स्किनर हे इंग्लिश कामगार १०-१५ वर्षे होते.

ह्या गिरणीमध्यें कागद तयार करतांना

१ चिंधी जातवारीनें वेगवेगळी करणें
२ तुकडे करणें
३ शिजवून धुणें
४ शुभ्र करणें
५ तंतू वेगळे करणें
६ साइझिंग व रंगमसाला टाकणें
७ मशीनवर सोडणें
८ पाणी चाळणींतून जाणें
९ व्हॅक्यूम पंपाचें पाणी खेंचणें
१० प्रेसदाब देऊन पाणी काढणें
११ वाळविणें
१२ त्यावर भरपूर दाब देऊन गुळगुळीतपणा आणणें
१३ कागदाच्या रुळाचे तुकडे करणें

इतक्या क्रिया होत असतात व यापैकीं पल्प तयार केला जाण्यापर्यंतच्या क्रिया (क्रमांक६ पर्यंतची) फार महत्त्वाच्या असतात. त्याला अनेक शास्त्रीय ठोकताळ्यांची व प्रयोगांची जरुरी असते. पल्प हें कागदगिरणीचें सर्वस्व असून त्याबाबत सरकारचेंही सहकार्य आवश्यक असतें. एरवीं ह्या गिरणीला परदेशी पल्पवर अवलंबून राहावें लागे.

५०० पौंड चिंधीपासून ३०० पौंड कागद तयार होतो. रांधा तयार होण्यास ६ ते ७ तास लागतात.

५०० पौंड तयार पल्प घेतला तर ४५० पौंड कागद तयार होतो व रांधा तयार होण्यास ३ तास पुरतात. माल तिप्पट तयार होतो. हा तयार पल्प परदेशांतून येण्यावर डेक्कन पेपर मिलमधील पांढरा कागद अवलंबून आहे. अलीकडे स्वतंत्र पल्प तयार करण्याची यंत्रसामुग्री आणविण्याचा विचार चालू आहे. यावरून पल्पचें महत्त्व किती आहे हें सहज लक्षांत येतें.

इ. स. १९३९ ते १९४७ : विश्वास आणि कंपनी

१९३९ सालीं दुसरें महायुद्ध सुरू झालें व गिरणीच्या कागदास जास्त जास्त मागणी येऊं लागली.

કા
ર
ખા
ના
માં

ANGEL ENVELOPES



સર્વ પ્રકારની ઑફીસ ફાઇલો, ગ્રામીણ તેમ જ શહેર વિભાગને માટે રેશન ફાઇલો, તમામ જાતના ઑફીસ પાકીટો, ક્લૉથ લાઈન્ડ, વિંડો એન્વેલપ્સ, પાર્સલ માટે ટૅગ લેબલો, એકાઉન્ટ અને બાઉંડ બુકો, રોજમેળ, રિફિલ કૅલેંડર બ્લૉકસ, અને બીજી પેપર સ્ટેશનરીને માટે લખો અથવા મળો

ANGEL FILE



સાવળે
અને કંપની
પુરંદરે કૉલોની,
પૂના ૨.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१९४२ मध्यें डॉ. भडकमकर आदि पांच मंडळी फर्दुनजी शेठजीकडे येऊन वाटाघाटी करूं लागली व पुरेसें भांडवल जमवून त्यांनीं शेठजीकडून मॅनेजिंग एजन्सी मागितली. शेठजींनीं दीर्घ विचारानंतर कॅनरा पेपर ॲण्ड पल्प कंपनी लि. यांना ती दिली. हा व्यवहार पुरा होतां होतांच श्री. भाऊसाहेब खराडकर यांनीं मॅनेजरशिपचा राजीनामा दिला व १९३९ पासून गिरणीचे आसिस्टंट मॅनेजर म्हणून सर्व अंतर्गत व्यवस्था पहात असलेले त्यांचे चिरंजीव श्री. बाबासाहेब खराडकर हे मॅनेजर झाले.

डॉ. भडकमकर, भावे, वैद्य, मोडक या मंडळींनीं विश्वास आणि कंपनी यांना आपले मुख्य विक्रेते बनविलें व गिरणीचा व्यवहार पाहणें सुरू केलें. व्यापारी वृत्तीच्या व धंद्याच्या महत्त्वाचें आकलन होण्याच्या अभावीं त्यांनीं जेमतेम ४–४॥ वर्षें गिरणी चालविली.

१९४७ च्या जानेवारी महिन्यांतच गिरणीला वर्षानुवर्षें कागदाची रद्दी पुरविणारे व दिल्लीकागदासारख्या मालाचा मोठ्यांत मोठा खप करूं शकणारे शेठ श्री. प्रभुदास केशवजी मेहता यांनीं मेहता पारेख आणि कंपनी या नांवानें कंपनीची मॅनेजिंग एजन्सी सुमारें १४॥ लाख रुपयांस विकत घेतली. १९१६–१७ सालापासून कागदकचऱ्याचा उद्योग करणारा मनुष्य कर्तबगारीनें ह्या गिरणीचा चालक झाला.

१९४७ चे पुढें : मेहता पारेख कंपनीची व्यवस्था

१९४७ पासून प्रभुदास केशवजी मेहता यांनीं गिरणीची व्यवस्था हातीं घेतली त्या वेळेपासून कंपनीचे डायरेक्टर बोर्डांत शेठ फर्दुनजी अध्यक्ष आहेत.

शेठ प्रभुदास हे कागदाचा खप करण्यांत अत्यंत तरबेज असल्यामुळें गिरणीजवळ पूर्वीं दोनतीन महिन्यांचा कागदसांठा असे. परंतु गेलीं तीन चार वर्षें ८ ते १० दिवसांपेक्षां जास्त जुना सांठा राहात नाहीं.

> **हा शंभरावा अंक**
>
> **पुण्यांतील अनेक मुद्रक व तत्सम व्यवसायी यांच्या अतुलनीय सहकार्यानें तयार झाला आहे. अंकांतील जी उणीव ती मराठी मुद्रणधंद्यांतीलच उणीव आहे हें कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. मुद्रणकलेंतील टाईप पाडणें, ब्लॉक बनविणें, छपाई करणें इत्यादिपैकीं कोणत्याहि एकेका कामांत परमोत्कर्ष करण्याचें ध्येय ठेवलें गेल्यास पुण्यांतील कामांचा दर्जा वाढेल हेंच अंकाचें सार आहे.**

सध्यां पेपर मिलची स्थिति उत्तम आहे. दरमहा २७५ते ३०० टन कागद तयार होतो, व तो सर्व खपतो.

पूर्वींचे ठेवीदारांचें ८–९ लाख देणें देण्यांत आलें.

गिरणीमध्यें पंप, बीटर्स, कार्डबोर्ड बनविण्याचें यंत्र, व इतर स्पेअर पार्ट्स यांचीही खरेदी ४–५ वर्षांत करून गिरणीची व्यवस्था शेट प्रभुदास यांनीं सुधारली आहे.

इंडियन पेपर मिल्स असोसिएशन व इंडियन पेपर मेकर्स असोसिएशन या दोन्ही संघटनांचें सभासदत्व मिलनें घेतलें आहे. गेल्या १-२वर्षांत मुंबई प्रांतांतील उद्योगधंदे मंत्री यांनीं गिरणीला भेट दिली त्या वेळीं कर्नाटकांतील जंगलाची रॉयल्टी मिळविण्याचा गिरणीकडून प्रयत्न झालेला आहे. तो तडीस गेला तर पल्प तयार करण्याची गिरणीही घातली जाणार आहे.

सध्यां गिरणींत तयार होणाऱ्या मालापैकीं ५० टक्के माल मुंबई सरकार घेतें, २० टक्के इतर राज्यांत जातो व ३० टक्के खुल्या बाजारांत विकला जातो.

कागदाच्या जातीमध्यें ७० टक्के सुपीरियर बदामी व पांढरा, १० टक्के बॉंड, लेजर हे कागद होतात. २० टक्के टी पेपर, क्रॅफ्ट, मिळून होतो.

गिरणींत ६३० कामगार असून त्यांपैकीं निवडण्याच्या कामावर १५० पर्यंत स्त्रीकामगार आहेत. साधारणपणें ३०० कामगार २० वर्षांहून अधिक काळ नोकरींत आहेत.

सध्यां बाहेरील सर्व कामें शेठ प्रभुदास जातीनें पाहतात व खराडकरांच्या वंशांतील तिसरे पुरुष श्री. श्रीनिवास रामचंद्र ऊर्फ बाबासाहेब खराडकर हे गिरणीची उत्पादनासह सर्व अंतर्व्यवस्था पाहतात. थोड्याच काळांत गिरणी आणखी नांवारूपाला येईल अशी आशा आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रणधंद्यांतला शाई – निर्मितीचा विभाग म्हणजे अत्यंत तांत्रिक स्वरूपाचा ! रसायनशास्त्राचा गंधही नसलेल्या एका उत्तम विक्रेत्यानें आपलें विक्रीकौशल्य पणाला लावून एक शाई-कारखाना काढावा हें मोठें भूषणावह होय. या दृष्टीनें आमच्या वार्ताहरानें मुद्दाम घेतलेली खालील मुलाखत सर्वांना मोठी उद्बोधक ठरेल यांत शंका नाहीं.

—संपादक.

पुण्याचा शाई कारखाना

ऐन दुपारच्या रखरखीत उन्हांतून जवळजवळ निर्जन रस्त्यावरून माझी मोटरसायकल दौडवीत मी पर्वतीच्या पायथ्याशीं आलों आणि डाव्या हातास नुकत्याच केलेल्या एका डांबरी रस्त्याच्या मार्गदर्शनाप्रमाणें जाऊं लागलों. जुनाट घरांच्या मधून वळणें घेत एका सिमेंट कॉंक्रीटनें बांधलेल्या मोठ्या इमारतीशीं मी येऊन थांबलों. इतक्यांत तत्परतेनें भय्या आला आणि त्यानें मोठा दरवाजा उघडून मला आंत घेतलें. कारखान्याचें प्रशस्त आवार आणि दुमदार इमारत पाहून मी आंत शिरणार तों सुहास्य मुद्रेनें माझें स्वागत करीत एक पोक्तसे पन्नाशीच्या घराला आलेले गृहस्थ म्हणाले, " या, आपण मुद्रण प्रकाशचे वार्ताहर ना ?"

मी माझी ओळख करून देत म्हटलें, "होय, आपण कलंत्रे ना ? आमच्या संपादकांनीं आपणाला लिहिलें होतें ना मी आज येणार आहे म्हणून ?"

" होय, म्हणून तर मी आपली वाट पाहात होतों. नाहींतर या दुपारच्या वेळीं सगळे मुद्रक आपापल्या ठिकाणीं भेटतात म्हणून वास्तविक मी रोजच्या फिरतीवर असायचा. बरें झालें आलांत. आनंद झाला. या आंत."

आणि नंतर इतर औपचारिक अनौपचारिक गप्पाछप्पा झाल्यावर मीं त्यांना पहिलाच प्रश्न विचारला, "काय हो कलंत्रेसाहेब, हा शाईकारखाना काढण्याची कल्पना आपल्या मनांत कशी आली ?"

रा. कलंत्रे एक क्षणभर थांबून म्हणाले, " तुमचा प्रश्न अगदीं बरोबर आहे. खेड, मुंबई वगैरेसारख्या ठिकाणीं शाईचे कारखाने आहेत आणि आपल मुद्रक विलायती शाईखेरीज इतर शाई वापरावयास उत्सुक नाहींत; या गोष्टी डोळ्यांसमोर असतांना देखील माझ्या मनांत आपणही शाई बनवून पाहूं या, असा विचार कसा आला ? पण हें सांगण्यापूर्वी माझा स्वतः थोडा इतिहास सांगितला तर आपली परवानगी आहे का ?"

त्यांच्या बोलण्यांतला आर्जवी स्वर ऐकून मला जरा विस्मयच वाटला होता. महाराष्ट्रीय कारखानदार म्हणजे जरासे घोड्यावर स्वार असायचे असा माझा समज म्हणा, गैरसमज म्हणा झालेला होता. पण रा. कलंत्रे यांच्या भाषेंतला आणि वागण्यांतला आर्जवीपणा पाहून हे गृहस्थ फार उत्तम ' कॅन्व्हसर ' असले पाहिजेत अशी माझी खात्री झाली.

ते पुढें सांगूं लागले, " ४ ऑगस्ट १९०४ रोजीं बारामतीजवळ नीरा–वागज या गांवीं माझा जन्म झाला. गरिबींत मीं बालपण काढलें. साताऱ्याला फणसळकर वकिलांकडे विद्यार्थी म्हणून प्रथम राहिलों आणि मग कै. रा. ब. सीतारामपंत पटवर्धन, सरदार विंचुरकर, पुरंदरे व इतर धनिकांच्या मदतीनें कॉलेज शिक्षण घेऊन न्यू पूना कॉलेजांतून १९२८ सालीं बी. ए. ला गणित विषय घेऊन पास झालों. नंतर १९२९ ते १९३५ पर्यंत कॉमनवेल्थ विमा कंपनींत सुरवातीपासूनचें काम केलें. पुढें १९३५ सालीं प्रो. नानासाहेब नारळकर व रा. अनंतराव गाडगीळ यांचे साहाय्यानें इंडियन प्रोग्रेसिव्ह विमा कंपनी काढली. १९४३ सालीं त्या कंपनीशीं असलेला संबंध सुटल्यावर १९४७ सालापर्यंत सरकारी कॉंट्रॅक्ट्स पुरविण्याचीं बरींच कामें केलीं. या सर्व उद्योगांबरोबर नॅशनल सेव्हिंग सर्टीफिकेट्स

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि ओरिएन्टल लाइफ इन्शुअरन्स कंपनी यांच्या एजन्सीजही मीं मिळविल्या. आणि हें काम मी अद्यापही करीत आहेच. त्यामधून मला चांगलें उत्पन्नही आजतागायत होत आहे. ''

मीं मध्येंच म्हटलें, '' एकूण बऱ्याच धंद्यांच्या उलाढालींतून आपल्याला विक्रेत्याचें कौशल्य संपादन करतां आलें म्हणायचें. ''

'' होय. त्याचाच मला खरा उपयोग झाला. मी खरा आर्ट्‌सचा विद्यार्थी. माल खपविणें, त्यासाठीं गिऱ्हाईक मिळविणें, गोड बोलणें हीं कामें मला थोडीं-फार जमलीं हेंही खरें आहे. याच उद्योगांतून बऱ्याच बड्या बड्या लोकांशीं ओळखी झाल्या. खेड येथें रा. गोडबोले यांचा एक शाईचा कारखाना आहे. त्यांची माझी अशीच ओळख झालेली आहे. त्यांनीं मला शाई कारखाना काढण्याची कल्पना दिली.

'' आणि एकदां कल्पना डोक्यांत आल्यावर मी कसला स्वस्थ बसतों ? रा. वामनराव वर्दे, भिवंडीचे दांडेकर यांसारख्या बड्या धनिकांजवळ मी ही कल्पना मांडली व त्यांना ती जवळजवळ पसंतही पडली. धनिकांचें सहकार्य मिळेल ही खात्री आल्यावर दि. २७ डिसेंबर १९४७ रोजीं दि लोकमान्य इंडस्ट्रीज लि. ही संस्था कंपनीचे पहिले डायरेक्टर्स डॉ. आबासाहेब नातू, प्रो. सत्तेगिरी, डा. रायरीकर, सबजज्ज व्ही.व्ही गाडकरी, रा. विष्णुपंत काणे आणि मी—वासुदेव नारायण कलंत्रे (मॅनेजिंग एजंट) यांचे नेतृत्वाखालीं रजिस्टर केली. ''

परदेशी माल तेवढा चांगला व देशी माल बेकार असा आमच्या कांहीं मुद्रकांचा जणुं ग्रह झालेला आहे. पण आमचें ध्येय आहे ' अविरत प्रयत्न. ' माझी खात्री आहे कीं या सर्वांना उत्तम वाटेल अशी शाई आम्ही लौकरच बनवूं.

एवढें सांगून ते क्षणभर थांबले. कदाचित् गतेतिहासाचे धागेदोरे जुळविण्यांत त्यांची स्मृति गुंग झाली असेल. पण कथनाचा धागा तुटूं नये म्हणून मीं विचारलें, '' प्रथम कुठें होतें तुमचें ऑफिस ? पहिलें ध्येय काय होतें ? ''

त्यावर ते म्हणाले, '' आमचें पहिलें रजिस्टर्ड ऑफिस होतें कॉमनवेल्थ विमा कंपनीमध्यें, पण पुढें १९४८ सालच्या ३० जानेवारीला दुर्दैवानें गांधीजींचा वध झाला. त्यामुळें ६ महिने आम्ही कांहींच हालचाल करूं शकलों नाहीं. ही कंपनी रजिस्टर केल्यानंतर फर्ग्युसन कॉलेजचे रसायनशास्त्राचे प्राध्यापक डॉ. डोळे यांचें सहकार्य मीं मिळविलें. प्रथमतः शेअर प्रॉस्पेक्टसमध्यें ऑइल मॅन्युफॅक्चरिंग इंडस्ट्री काढण्याचा आमचा विचार आम्हीं जाहीर केला होता. त्याचेचबरोबर पेन्ट्स्, एनॅमल्स, छपाईची शाई वगैरे मालही बनविण्याचें योजिलें होतें. ऑइल मिल काढण्याची आमची योजना फारशी फलद्रूप होणार नाहीं असें आम्हांला लौकरच समजून आलें. कारण शेंगदाणा वैपुल्यानें जवळपास मिळविणें कठीण होतें. त्याचप्रमाणें त्या धंद्याला भांडवलही अतोनात लागणार होतें. म्हणून शेवटीं विचार करून प्रिंटिंग इंक तयार करण्याचा आम्हीं निश्चय केला. खेडच्या गोडबोल्यांनीं माझ्या मनांत रुजविलेल्या अंकुरानें आतां चांगलाच जोम धरला होता असें म्हणायला कांहीं हरकत नाहीं. ''

मीं विचारलें, '' तुम्ही स्वतः रसायनशास्त्राचे विद्यार्थी नसतांना छपाईच्या शाईबाबत कोणातरी तज्ज्ञांचा सल्ला तुम्हांला घ्यावा लागला असेल नाहीं ? ''

'' होय, डॉ. डोळे यांच्या सहकार्यानें आरंभींची उभारणी व जुळवाजुळव आम्हीं केली. त्यांचेच एक विद्यार्थी रा. गद्रे कांहीं काळ आमचेकडे केमिस्ट म्हणून होते. सध्यां आमचेकडे रा. पाटणकर म्हणून केमिस्ट आहेत. ते बी. एस्‌सी. टेक्. आहेत. त्यांना लोकसंग्रह कारखान्याचे रा. बाबासाहेब गांगल यांच्या सल्ल्याचा फायदा मधूनमधून मिळतो. आतां आमचे कारखान्यांत बऱ्याच अंशीं समाधानकारक अशी शाई निर्माण करूं लागलों आहों. न्यूज इंक, हाफटोन ब्लॅक, पोस्टर इंक्स, लेटर प्रेस कलर्ड इंक्स, रोटरी इंक्स वगैरे सर्व तऱ्हेच्या शाया आम्हीं बनवितों. या शाया बनवून पुण्याला नी सबंध महाराष्ट्राला पुरवूं शकूं एवढी यंत्रसामुग्री आमच कारखान्यांत आम्हीं उभी केलेली आहे. दोन वर्षांपूर्वी ही इमारत बांधून ही यंत्रसामुग्री परदेशाहून मागविलेली आहे. आमची यंत्रसामुग्री मात्र सर्व विलायती आहे. कारण आपणाकडे हीं यंत्रें बनविण्याकडे कोणाचें फारसें लक्ष अद्यून गेलेलें नाहीं. ''

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

"आपल्या मालाला खप कसा काय आहे ?" मीं त्यांना मध्येंच विचारलें.

उत्साहानें ते म्हणाले, "वा, फार छान आहे. परदेशी माल तेवढा चांगला व देशी माल बेकार असा आमच्या कांहीं मुद्रकांचा जणुं ग्रह झालेला आहे. पण आमचें ध्येय आहे 'अविरत प्रयत्न.' माझी खात्री आहे कीं या सर्वांना उत्तम वाटेल अशी शाई आम्ही लौकरच बनवूं. पुणें, नगर, नाशिक, खानदेश, सांगली, बेळगांव, कोल्हापूर, धारवाड, हुबळी, गदग, बंगलोर, त्रिवेंद्रम्; वरतीं बडोदा, अहमदाबाद इतक्या विस्तृत क्षेत्रांत आमचा माल आज जातच आहे. आम्हांला कच्चें द्रव्य भरपूर प्रमाणांत मिळतें. पण आमचीं गिऱ्हाइकें उधारी आमच्याजवळून फार अपेक्षितात. मोठ्या कंपन्या "मास प्रॉडक्शन" करून माल आमच्यापेक्षां स्वस्तही देऊं शकतात आणि उधारीही बरीच देतात. आम्हांला या दोन्ही गोष्टी तापदायक होतात. मोठ्या प्रमाणावर आम्ही निर्मिती करूं शकत नसल्यानें स्वस्त किंमतीशीं आम्ही टक्कर देऊं शकत नाहीं. अन् उधारीही फार काळ ठेवतां येत नाहीं. तुटपुंजें भांडवल हा महाराष्ट्राला शाप आहे. त्यामुळें अजून आम्ही स्वतःच्या पायावर उभें राहूं शकलों नाहीं. सरकारनें आम्हांला फक्त रु. १०,०००चें स्टेट-एड-लोन दिलें आहे. कांहीं मुद्रकांनीं आम्हांला ऑर्डरीही चांगल्या पाठविल्या असून आम्हांस प्रोत्साहन दिलें आहे, व त्याबद्दल आम्हीं त्यांचे ऋणी आहोंत. पण वाढत्या मागणीच्या उत्पादनाकरितां जरूर लागणारें भांडवल आम्हांस अपुरें पडूं लागलें आहे. मुलाच्या उच्च शिक्षणाचा सर्व कोर्स व्यवस्थित पार पडत यावा पण त्याच्या शेवटच्या डिग्रीच्या परीक्षेकरितां लागणारी फी अपुरी पडावी तशी परिस्थिति आज आमच्या कंपनीची झाली आहे. प्रथमच तुम्हांला मीं म्हटलें होतें त्याप्रमाणें तुटपुंज्या भांडवलाचा शाप आम्हांलाही बाधत आहे. पण याही परिस्थितींतून आमची कंपनी पार पडून पुढें येईल असा मला आत्मविश्वास आहे."

येवढ्यांत त्यांच्या भय्यानें चहाचे दोन पेले आमचे-समोर आणून ठेविले. एक पेला माझ्या हातांत देऊन ते विचारमग्न झाल्यासारखे स्वस्थ बसले. आणि मग एक घोट घेऊन पुढें म्हणाले, "पण तुम्हांला सांगतों, महाराष्ट्र आमची हांक आज ना उद्यां ऐकेल. आपला भारत आतांशा स्वतंत्र झाला आहे. साक्षरता अजून ८५ टक्के लोकांपर्यंत पोंचायला हवी आहे. साक्षरता सर्वत्र पसरण्यासाठीं मुद्रकांची जरूर आहे. आणि माझा विश्वास आहे, मुद्रकांना आमची जरूर आज ना उद्यां निश्चित लागेल. आज प्रयोगावस्थेंत असलेले आमची शाई खूपच सुधारेल. ऑफसेट शायासुद्धां आम्ही बनवूं. आमच्या आजच्या शायांचीही प्रत सुधारेल. पण यासाठीं मुद्रकांनीं आमच्याशीं आपुलकीनें, सहानुभूतीनें वागलें पाहिजे. देशी मालाबद्दलचे आपले ग्रह बदलले पाहिजेत. आमच्या मालाला उत्तेजन दिलें पाहिजे. महाराष्ट्रांतल्या धनिकांनीं आमच्या या धंद्याला उत्तेजन दिलें पाहिजे. मध्यें ही ठेवीदारांची जी परिषद झाली तीमुळें आमच्यासारख्या छोट्या कारखानदारांना अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. प्रत्येक कारखान्याविषयीं लोकांत अविश्वास फार वाढूं लागला आहे. पण ही परिस्थिति बदलली पाहिजे. आणि आम्ही महाराष्ट्रीय धंदेवाले ही परिस्थिति खात्रीनें बदलूं. कारण 'अविरत प्रयत्न' हेंच आमचें ध्येय!"

आपला भारत आतांशा स्वतंत्र झाला आहे. साक्षरता अजून ८५ टक्के लोकांपर्यंत पोंचायला हवी आहे. साक्षरता सर्वत्र पसरण्यासाठीं मुद्रकांची जरूर आहे. आणि माझा विश्वास आहे, मुद्रकांना आज ना उद्यां आमची जरूर निश्चित लागेल. आज प्रयोगावस्थेंत असलेली आमची शाई खूपच सुधारेल.

रा. कलंत्र्यांसारख्या ध्येयवादी प्रयत्नशील माणसांच्या या आत्मविश्वासाचें चीज आमचा महाराष्ट्र करणार ना एवढाच विचार त्यांचा निरोप घेतांना माझ्या डोक्यांत एकसारखा घोळत होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाहिरात कंपन्या व त्यांचें कार्य

लेखक : श्री. ना. तु. ठाकूर बी. ए. रा. भा. कोविद. मॅ. ए., पॅरॅमाउंट पब्लिसिटी सिं. लि.

मुद्रणप्रकाशाच्या विशेषांकांत 'जाहिरात' विषयाला स्थान कशाला असा प्रश्न वरवर पाहणाऱ्यापुढें उभा राहील; पण जाणत्या लोकांना माहीत आहे कीं उत्कृष्ट छपाई व जाहिरात यांचा संबंध सुईदोऱ्यासारखा निगडित आहे. मुद्रण व जाहिरात क्षेत्रांतील प्रगति एकमेकांवर फार मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. हें पाश्चात्य देशांतील या उद्योगाचा इतिहास पाहतां आढळून येतें. इंग्लंडमधील मुद्रण उद्योगाचें निरीक्षण करतां असें प्रत्ययास आलें आहे कीं छपाईचें सुमारें ३० टक्के काम जाहिरातीसाठीं केलें जातें. अमेरिकेंतील मुद्रकांचाही अनुभव आहे कीं जाहिरात एजन्सीच्या सल्ल्यावरून किती तरी नवीन प्रकारचे टाईप व मुद्रण प्रकार तेथें अस्तित्वांत येऊं शकले आहेत.

भारतांतील उद्योगधंद्यांत मुद्रणास दुसऱ्या क्रमांकाचें स्थान लाभतें आहे एवढी या व्यवसायाची व्याप्ति मोठी आहे, असें इंडियन प्रिंट ॲण्ड पेपरचे संपादक मि. नॉर्मन एलिस यांचें मत आहे. फॅक्टरी ॲक्ट लागूं असलेले पांचशेंपेक्षां अधिक छापखाने नोंदले गेलेले असले तरी लहान छापखान्यांची संख्या हजारोंनीं मोजतां येईल. छापखाना हा एक असा विलक्षण धंदा आहे कीं त्यांत किती भांडवल घालणें पर्याप्त होईल हें ठरविणें कठिण होईल. सुमारें पंधरा हजार रु. पर्यंत भांडवल घातलेल्या चिमुकल्या छापखान्यापासून ते कोटींच्या वर भांडवल सामावलेले छापखाने भारतांत आहेत. या धंद्याची भांडवलाची भूक बकासुरासारखी शमविण्यास दुष्प्राप्य ठरतें. त्यामुळें इतर चिन्तेप्रमाणें भांडवलाची चिंता या क्षेत्रांतील चालकांस कधींच सोडत नाहीं. असो.

छापलेल्या शब्दांवर विश्वास

छापलेल्या शब्दांवर जनतेचा विश्वास असतो, हा अनुभव पुरातन आहे. पण आजच्या जाहिरातीच्या युगांत या म्हणींत एक महत्त्वाची दुरुस्ती करणें आवश्यक झाली आहे ती ही कीं, 'चांगल्या' हा शब्द या वाक्यापूर्वी घालावयास हवा. वाचक एक आणेली टाकून वृत्तपत्र विकत घेतो व चाळून फेकून देतो; पण जाहिरातदार एक एक इंचासाठीं किती तरी रुपये खर्च करीत असतो, व हा खर्च उत्पादक व्हावा अशी त्याची इच्छा असते. त्यामुळें आपल्या पैशाचा उपयोग जास्तींत जास्त झाला पाहिजे असा त्याचा कटाक्ष असतो. कित्येक अमेरिकन मासिकांचीं पानें वाचनीय मजकुरापेक्षां प्रेक्षणीय जाहिरातींनीं विशेष आकर्षक झालेलीं असतात. या अनुभवाचें कारण जाहिरातदारांची वरील उत्कंठा ही होय. मौलिक विचारांचा लेख 'जातीच्या सुंदरांना कांहींही चालतें' या उक्तीप्रमाणें साध्या पेहरावांत वाचक वाचतील, पण विशिष्ट साबणाच्या किंवा टुथपेस्टच्या उपयुक्ततेबद्दल वाचकांची खात्री करावयाची असते तर तो संदेश तशाच आकर्षक सजावटींत दिला पाहिजे. यामुळेंच कित्येक पाश्चात्य मासिकांतील लेख साध्या कागदावर एकरंगी छपाईंत आढळले तर जाहिरातीसाठीं मात्र आर्टपेपर व तिरंगी छपाईचा आश्रय घेतलेला दिसून येईल.

पाश्चात्य कारखानदार व जाहिरात एजन्सी सोडल्या तर येथील कारखानदारांनीं जाहिरातींच्या विषयाकडे परवां परवांपर्यंत म्हणण्यासारखें लक्ष दिलें नाहीं, असें खेदानें म्हणावें लागतें. किंबहुना आजही वंशपरंपरागत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालत आलेल्या कांहीं उद्योगधंद्यांतील श्रेष्ठींना जाहिरातींचें महत्त्व पटवणें अवघड जातें. पूर्वजांनीं धंदा जाहिराती-खेरीज केला, आम्ही तसेंच निभावून नेऊं हें म्हणणें पूर्वी आगगाड्याच नव्हत्या तेव्हां बैलगाडींतून प्रवास करीत होतो तसा आजही करूं असा दुराग्रह धरण्यासारखें हास्यास्पद आहे.

शास्त्रीय पद्धतीची जाहिरात – युरोपीय जाहिरात-एजन्सींनीं प्रथम हाताळल्यामुळें त्यांचें लक्ष प्रथम मोठ्या खपाच्या अँग्लो इंडियन इंग्रजी पत्रांकडे वेधणेंच योग्य होतें. अपवादादाखल ' केसरी, ' ' स्वदेशमित्रन् ' ' आनंदबझार पत्रिका ' यासारख्या देशी भाषांतील पत्रांकडे त्यांचें लक्ष जाई. साहजिकच देशी भाषांतील वृत्तपत्रांना पाव शतकापूर्वी मुख्यतः सरकारी निमसरकारी जाहिराती, वाकिलांच्या काडीमोडीच्या नोटिसा, नाटक कंपन्या, सिनेमा वगैरेंच्या लहानशा जाहिराती व देशी कारखानदारांच्या कायम ठशाच्या छोट्या मोठ्या बेंगरूळ जाहिराती यावर संतुष्ट रहावें लागे. पण गेल्या तपांत या क्षेत्रांत मोठीच क्रांति झाली आहे.

चित्रपट उद्योगाचा प्रभाव

साक्षरतेच्या प्रसाराबरोबर देशी भाषांतील पत्रांचे खप वाढूं लागले. चित्रपट व पुढें बोलपट यांच्या प्रसारास बेफाट जाहिरात हें एक आवश्यक अंग झालें. देशी जाहिरात एजन्सींना आपलें कसब दाखविण्यास चित्रपटांची जाहिरात हें एक मोठेंच क्षेत्र मिळालें. वृत्तपत्रांचे जाहिरातीचे दर बेताचे असल्यानें मोठ्या कंपनीचा चित्रपट प्रथम लागला कीं त्या दिवशीं दैनिकांतून पानभर जाहिरात देण्याची प्रथा पंधरा वर्षांपूर्वी पडूं लागल्याचें दिसतें. एवढी मोठी जाहिरात द्यावयाची कीं तिची सजावट, ब्लॉक्स, टाइप्स वगैरेंचा विचार आलाच आणि त्या दृष्टीनें जाहिरातलेखक आपल्या मगदुराप्रमाणें जाहिरातीचें लेआऊट तयार करीत असे.

परंतु देशी भाषेंतील चित्रपटांच्या जाहिराती अमेरिकन कंपन्यांच्या कँपेन बुकांतील इंग्रजी चित्रपटाच्या नमुन्यांच्या मानानें पाहतां अगदींच फिक्या असतात हें मान्य केलें पाहिजे. त्याचें प्रमुख कारण मराठीसारख्या देशी भाषांतून टाइपांचे प्रकार व वैचित्र्य इंग्रजी टाइपाप्रमाणें आढळत नाहींत. शिवाय मराठीमध्यें असलेले टाइपांचे प्रकार तरी सर्व वृत्तपत्रमुद्रणालयांतून कोठें असावयाचे ? जाहिरातदारानें टाइपांबद्दल स्पष्ट सूचना दिल्या तरी तसे सर्व टाइपच नसल्यामुळें ' निर्वाहः प्रतिपत्रवस्तुपु ' करून मुद्रक मोकळा ! त्यामुळें पुढें पुढें एजंट टाइपांचा उल्लेख करण्याचेंहि टाळूं लागले. हेडिंग टाइप कित्येकदां अपुरा असल्यानें रॉंग फाऊंटचीं अक्षरें कंपॉझिटर दडपावयाचे, त्यामुळें ओळीला नागमोडी स्वरूप न आल्यास आश्चर्य !

गबाळ छपाईनें अनर्थ

वरील परिस्थितीमुळें जाहिरात एजंट कंपोजपेक्षां ब्लॉकवरच अवलंबून राहूं लागले. अलीकडे अग्रेसर जाहिरात एजंट सरसहा मेट्रिसेसचा उपयोग करूं लागले आहेत, त्यामुळें जाहिरातदारांना मुद्रक काय करील याची चिंता करावी लागत नाहीं. परंतु बहुतेक छापखान्यांत अजून मेट्रिसेस वापरण्यासाठीं लागणारी साधनसामुग्री नसल्यामुळें उत्तरोत्तर त्यांचा वापर आवश्यक व सोयीचा असला तरी सध्यां शक्य होत नाहीं.

छापतांना टाईप उडण्याचे जे प्रकार होतात त्यांमुळें जाहिरातदार किंकर्तव्यमूढ होतात. जाहिरातींचें प्रुफ नीट तपासून दिलें तरी वृत्तपत्रांत दुसरे दिवशीं ती त्याच स्वरूपांत आढळेल असा निर्वाळा देतां येत नाहीं. कांहीं 'मात्रागमनी' टाइप तर अनर्थ ओढवतात. स्टीरिओचें रोटरी प्रिंटिंग ज्या छापखान्यांत आहे तेथें हा प्रकार आढळत नाहीं, पण असे छापखाने थोडे असल्यामुळें या उडत्या टाइपाकडे छपाई करणाऱ्यानें लक्ष दिलें पाहिजे. वृत्तपत्र–कचेऱ्यांतून कित्येकदां असें होतें कीं, रात्रीचा संपादक मशीनवरचा पहिला अंक तपासून सही करून पहाटे बाहेर पडतो, पण सकाळीं येणाऱ्या अंकांत कांहीं चमत्कार झालेले दिसतात. यासाठीं प्रेसमनच्या साहाय्यास छपाई सुरू झाल्यावरही एक–दोन हुषार कंपॉझिटर देणें अगत्याचें आहे.

फॉर्म ठोकतांनाही योग्य काळजी घेतली नाहीं तर कांहीं ओळींचा चुराडा होऊन अर्थाचा अनर्थ होतो. भिंतींत चिनण्याचा प्रकार इतिहासांत विदित आहे. पण फॉर्म ठोकतांना टाईप चिनण्याचे प्रकार कमी भयावह नाहींत.

जाहिरात विद्रूप अवस्थेंत प्रसिद्ध झाली कीं जाहिरातदार एजंटावर डाफरतो व पत्रांकडे तक्रार केली कीं ' मेकगुड ' मोफत जाहिरात मिळूं शकते. पण चुकीच्या जाहिरातीमुळें झालेलें वाईट मत त्यामुळें सुधारत नाहीं. प्रस्तुत लेखाचा उद्देश कोणावर दोषारोपण करण्याचा नाहीं. पाश्चात्य जाहिरात एजंटांच्या कार्यक्षमतेबद्दल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुणगान अनेक वृत्तपत्रमुद्रकांकडून ऐकूं येते. पण जाहिराती व्यवस्थेशीर छापण्याची कांहीं अंशीं जबाबदारी मुद्रकांवरही असते हें विसरलें जातें. आपल्याकडील जाहिरातदार, एजंट अगर वृत्तपत्रमुद्रक या सर्वांचेंच कार्यक्षमतेचें प्रमाण पाश्चात्यांपेक्षां कमी आहे, त्यामुळें 'कोण म्हणतो टक्का दिला' या खेळाप्रमाणें दुसऱ्यांवर दोषारोपण करण्याची वृत्तिच अधिक! यासाठीं आत्म-निरीक्षण करून सर्वांनींच सुधारण्याचा प्रयत्न करणें उत्तम!

पुण्यांतील जाहिरातव्यवसाय

आतां संपादकांच्या सूचनेप्रमाणें पुण्यांतील जाहिरात-व्यवसायासंबंधीं थोडेसें विवेचन करूं या. पूर्वीं येऊन गेलेंच आहे कीं, चित्रपटांच्या व्यापक जाहिरातींचे युग सुरू झालें तेव्हां जाहिरात लेखकाची विशेष गरज उत्पन्न झाली. पुण्यांतील नियतकालिकांतून आकर्षक स्वरूपाच्या चित्र-पटांच्या मोठ्या जाहिराती १५-२० वर्षांपूर्वी ज्ञानप्रकाशाचे त्या वेळचे मॅनेजर श्री. म. य. दातार यांनीं चांगल्या प्रकारें केल्या. श्री. दातार कंपन्यांच्या वतीनें कामें करीत, तरी त्यांची स्वतःची अशी एजन्सी नव्हती; तसेंच उद्योग-धंदे व कारखाने यांच्या प्रसिद्धीकडे त्यांना विशेष लक्ष पुरवितां आलें नाहीं. सुमारें १५-१६ वर्षांपूर्वी सध्यांच्या 'वसंत' मासिकाचे संपादक श्री. डी. एस्. काटदरे यांनीं स्वतःच्या नांवाची जाहिरात एजन्सी पुण्यांत कांहीं वर्षें चालविली. त्यांनीं व्यापारी जाहिरातीवर विशेष भर दिला. पण पुढें त्यांनीं हा व्यवसाय सोडून 'वसंत' मासिक काढलें, त्याचा शंभरावा अंक फेब्रुवारींत प्रसिद्ध होईल. सध्यांच्या टॉम अँड बे लि. चे श्री. तांबे यांनीं मेट्रो पब्लिसिटी कांहीं काळ चालविली, पण ती अल्पजीवी ठरली. प्रस्तुत लेखकानें चालविलेल्या पर्सनल प्रेस सर्व्हिस या संस्थेनें १९४१ सालीं जाहिरात एजन्सीचीही एक शाखा चालू केली; व पुढें १९४६ सालीं या कामाचा व्याप वाढल्यामुळें तिचें पॅरॅमाऊंट पब्लिसिटी सिंडिकेट लि. या खाजगी लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें. पुण्यांतली जाहिरात एजन्सीचा व्यवसाय करणारी ही पहिलीच लिमिटेड कंपनी आहे. १९५० मध्यें टॉम अँड बे या जाहिरात करणाऱ्या फर्मचेंही पब्लिक लिमिटेड कंपनींत रूपांतर करण्यांत आलें आहे.

पुण्यांतील जाहिरात एजन्सींना एकूण सुमारें दोन-अडीच लाखांचा धंदा मिळत असावा. सध्यां जितक्या एजन्सीज काम करीत आहेत त्यांची संख्या पाहिली कीं हा धंदा अपुरा पडतो हें उघड आहे. यापुढें विमा एजन्सीच्या व्यवसायाप्रमाणें फावल्या वेळांत करावयाच्या प्रचारकाचा व्यवसाय असें स्वरूप या व्यवसायाचें राहणें शक्य नाहीं. महाराष्ट्रीय जाहिरात एजन्सीच्या व्यवसायाची स्थिति व त्यांच्या अडीअडचणी हा एक स्वतंत्र विषय आहे. तूर्त पुण्यांतील छापखान्यांकडून जाहिरात एजन्सींच्या अपेक्षा काय आहेत याचें थोडक्यांत विवेचन करून हा लेख संपवूं.

छापखान्यांकडून अपेक्षा

एकरंगी छपाई येथील कांहीं छापखान्यांत समाधान-कारक होत असली तरी रंगीत छपाईबाबत सुधारण्यास अजून पुष्कळ वाव आहे. इकडील तिरंगी छपाईचें बव्हंशीं काम मुंबईस जातें व त्यासाठीं चित्रें व ब्लॉक्स वगैरे मुंबईसच करून घेणें सोयीचें होतें. तिरंगी ब्लॉक्स पुण्यांत होतात, पण त्यांनीं मुंबईचा दर्जा मिळविणें अगत्याचें आहे. पुठ्याच्या मेट्रिक्सेसही पुण्यांत म्हणण्या-सारख्या होत नाहींत. ती सोय झाल्यास एजन्सीकडून या प्रकारचें काम अधिक मिळेल. स्टिरिओजचे दरही सध्यांपेक्षां आधिक माफक होणें योग्य होईल. स्टिरिओजचें काम लवकर व वेळेवर मिळणेंही जरुरीचें आहे. येथें लाईन व लेटरिंग काम करणारे चित्रकार चांगले आहेत. पण श्री. मूळगांवकर अगर श्री. दलाल यांच्या तोडीचे रंगीत चित्रें काढणारे चित्रकार पुण्यांत नाहींत. त्यामुळें मासिकांच्या कव्हरची, तसेंच पुस्तकांच्या जॅकेटसची रंगीत छपाई यासाठीं बहुतेक काम मुंबईस जातें. याकरतां अधिक प्रगति करून चित्रकार, ब्लॉकमेकर्स व मुद्रक यांनीं गिऱ्हाइकांची समाधानकारक कामें होते अशी खात्री पटवली पाहिजे. तसेंच नागपूरच्या शिवराज लिथो वर्क्स किंवा मुंबईच्या बॅंबे फाइन आर्ट ऑफसेट वर्क्स या छापखान्यांच्या तोडीची यंत्रसामुग्री व तंत्रज्ञ येथील अग्रेसर छापखान्यांनीं प्राप्त करणें परिणामीं फाय-द्याचें होईल. येथें या प्रकारचे चांगलें काम होऊं लागल्यास बरेंच गिऱ्हाईक मिळेल. विशेषतः कॅलेंडरांचें काम अशा सोयीनें पुण्यांत समाधानकारक होऊं शकेल.

मराठींत विविध वळणाचे नवे टाइप निघावयास पाहिजेत, व त्यांचा नियतकालिकांनीं उपयोग करावयास हवा. तसेंच इंग्रजी मराठींखेरीज अन्य भाषांतील छपा-ईची सध्यांपेक्षां अधिक प्रमाणावर सोय हवी. मुंबई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यांत मराठी, गुजराथी व कानडी या तीनही भाषा रूढ असल्यानें त्या भाषांतील छपाई चांगल्या प्रकारें झाली पाहिजे. हिंदी देवनागरी टाइप तर यापुढें प्रत्येक छापखान्यांत हवा. तात्पर्य, सहकार्य व प्रगति यांची कास धरल्यास जाहिरात धंदा, तसेंच मुद्रणव्यवसाय या दोघांचीही प्रगति निश्चित होईल.

What's Cooking .... ?

SHORT OF PRINTED STATIONERY, HOW TO PROCEED WITHOUT IT ? THE JOBS ARE URGENT.

☆ WE ☆

WILL SOLVE YOUR PRINTING PROBLEMS

PRADEEP PRINTERS, 499 SHANWAR PETH, POONA 2.



"हाईड सीक"

डी लक्स मॉडेल

आर्ट प्रिंटिंग प्रेसेस

ओरिजनल जर्मन मेक

पायानें वा शक्तीनें चालणारें, अद्ययावत् नव्या पद्धतीसह रचना असलेलें, सर्व साहित्यासह तात्कालीन वापरावयास मिळूं शकणारें, साईज १०×१५.

भारतांतील एकमेव विक्रेते

OK

THE EAST ASIATIC CO. (I) LTD.

MADRAS	BOMBAY	CALCUTTA
P. O. B. 146	P. O. B. 639	P. O. B. 64

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऑफसेट की अक्षरमुद्रण ?

सर्वसामान्य मुद्रकांपुढील एक कुतूहलाचा विषय व मुद्रण-ग्राहकांना घोटाळ्यांत पाडणारें कोडें

(लेखक : ज. ग. देवकुळे)

दुसऱ्या महायुद्धानंतर ऑफसेट पद्धतीच्या मुद्रणाचा हिंदुस्थानशीं अधिक परिचय झाला. युद्ध-प्रचाराच्या निमित्तानें अमेरिकन जीवनाची आणि संस्कृतीची हिंदी जनतेला ओळख करून देण्यासाठीं पत्रकें, नियतकालिकें, पुस्तकें यांचे लोटच्या लोट हिंदुस्थानकडे वाहात होते. त्यांतील बरेंचसें साहित्य ऑफसेट पद्धतीनें छापलेलें असे. त्यामुळें या पद्धतीबाबतचें सर्वांचेंच कुतूहल वाढलें. आणि गेल्या सहासात वर्षांत या पद्धतीनें छापण्याची सर्व प्रकारची यंत्रसामुग्री पुष्कळशा मुद्रणालयांतून दिसूं लागली.

मुद्रणकाम करून घेणाऱ्या बहुतेक सर्व ग्राहकांना ऑफसेट पद्धति ही एक अजब आणि कौतुकास्पद चीज वाटत आहे. समोर येणाऱ्या मुद्रकाला या मंडळींचा एक कायमचा प्रश्न आहे : 'तुमच्याकडे ऑफसेट मशीन आहे ! ' ऑफसेटनें अत्यंत जलद, उत्कृष्ट आणि मुख्यत्वें अत्यंत कमी खर्चांत छपाई-काम होतें अशी सर्वांची आवडती समजूत आहे. त्यामुळें कोणतेंहि सुंदर, आकर्षक रंगसंगतीमधील चित्र पाहिलें कीं, तें ऑफसेटनें छापलें गेलें असलें पाहिजे अशी जाणत्या किंवा पुष्कळ काळपर्यंत छपाई काम करून घेणाऱ्या ग्राहकांची कल्पना चालते. सारांश, ऑफसेट पद्धति ही मुद्रणधंद्याला मिळालेली अमूल्य देणगी आहे, अतएव प्रत्येक मुद्रणालयांत त्या पद्धतीचीं यंत्रें असलीं पाहिजेत; असणें हें अद्ययावत्-पणाचें लक्षण आहे अशी सर्वत्र समजूत आहे.

ऑफसेट छपाईनें जी एवढी लोकप्रियता संपादन केली आहे त्यांत अनैसर्गिक कांहींच नाहीं. 'कमी खर्च ' ही त्या पद्धतीमधील आकर्षक बाब आहे. ऑफसेटनें छापण्यासाठीं अक्षरमुद्रणाप्रमाणें (लेटर प्रेस) ब्लॉकचा खर्च करावा लागत नाहीं, रंगीत छपाईसाठीं आर्ट पेपर वापरावा लागत नाहीं, वगैरे मुद्दे प्रथमदर्शनीं ग्राहकाचें मन आकर्षून घेतात. त्यामुळें अक्षरमुद्रण पद्धतीनें होणाऱ्या कोणत्याहि छपाईचें अंदाजपत्रक ग्राहकांसमोर नेतांच, ग्राहकाच्या ओंठावर चटदिशीं ऑफसेटचें नांव येतें किंवा आजूबाजूकडून तशी सूचना होते.

" तुम्ही ब्लॉकचं आणि प्रिन्टिंगचं एस्टिमेट आणलंत. तसेंच ऑफसेटचंहि आणा पाहूं. तें म्हणे बरंच स्वस्त जातं. ब्लॉकचाहि खर्च करावा लागत नाहीं. " अशी त्यांची कायम ठशाची सूचना असते.

ऑफसेट पद्धतीच्या या वाढत्या लोकप्रियतेमुळें अक्षरमुद्रणाची पद्धत मागें पडणार अशी एक रास्त भीति सर्वत्र निर्माण होऊं लागली आहे. त्यामुळें परस्पर व्यावसायिकांत सुद्धां तेढहि सुरू होण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संभव आहे. पण खरें पाहातां प्रत्येक पद्धतींत आपापले स्वतंत्र गुणदोष आहेत, असावेत तेवढे नफेतोटेहि आहेत. दोन्ही पद्धतींत तंत्राची उत्कृष्ट माहिती असावी लागते, आणि उत्कृष्ट मुद्रणसाहित्याची जरूरी दोन्ही पद्धतींना क्षणोक्षणीं भासते. दोन्ही पद्धतींसाठीं मूळ उत्कृष्ट चित्रकृतीची आवश्यकता असते. म्हणूनच उभयपक्षीं मुद्रकांनीं या गुणदोषांचा चौकसपणें विचार करून आपल्या ग्राहकांना मुद्रणकामानुरूप त्या पद्धती स्वीकारण्याचा सल्ला द्यावा. याबाबतचें विवेचन सुस्पष्ट करण्यासाठीं आपण कोष्टक मांडूनच या दोन्ही पद्धतींचे गुणदोष पाहूं:

ऑफसेट	अक्षरमुद्रण
(१) शीट प्रिन्टिंग होत असल्यामुळें ऑफसेटनें काम स्वस्त आणि जलद होऊं शकतें. मात्र कॉपींची संख्या जास्तींत जास्त असणें कमी खर्चाचें होऊं शकतें.	(१) प्रत्येक कॉपी शक्यतों स्वतंत्र रीत्या छापली जात असल्यामुळें छपाई अधिक विश्वसनीय आणि स्वच्छ होऊं शकते. कमींत कमी ऑर्डरहि पुरी करणें गैरसोयीचें होत नाहीं.
(२) ऑफसेट पेपरमुळें छपाई दर्शनी चांगल्या प्रतीची (Rich) वाटते. पण मूळ चित्राचें ' रिप्रॉडक्शन ' तंतोतंत होतेंच असें नाहीं.	(२) ब्लॉकमेकिंगचें बहुतेक काम यांत्रिक साह्यानें होत असल्यामुळें चांगला मुद्रक मूळ चित्राबरहुकूम छापूं शकतो.
(३) ब्लॉकमेकिंगचा खर्च नाहीं. परंतु ऑर्डर बरीच मोठी असावी लागते. तरच तें काम स्वस्त पडतें. शिवाय ऑफसेट प्लेट्स् मुद्रकाजवळच राहतात.	(३) ब्लॉकवर ग्राहकालाच खर्च करावा लागतो. परंतु ब्लॉक गिऱ्हाइकाजवळ राहूं शकतो. तो त्यापासून केव्हांहि कोठूनहि छपाई करून घेऊं शकतो.
(४) ऑफसेट पद्धतींत जितके रंग, तितक्या प्लेट्स्, तितक्या वेळा छपाई करावी लागते. मूळ चित्राबरहुकूम चित्र वठवायचें झाल्यास रंगांचा हिशेब १४|१५ प्लेटपर्यंत जातो. त्या मानानें किंमतहि वाढते.	(४) अक्षरमुद्रणांत चार रंगी ब्लॉकमुळें अनेकविध रंगछटा मिळूं शकतात. चार ते पांच रंगांत उत्कृष्ट छपाई होऊं शकते. त्यामुळें ब्लॉकचा खर्च पडला तरी छपाईचा खर्च फारसा वाढत नाहीं.
(५) ऑफसेट पेपरमुळें छपाईला शाईचा तेजस्वीपणा येत नाहीं. त्यासाठीं वॉर्निशिंग करावें लागतें.	(५) रंगावर रंग आल्यामुळें व आर्ट पेपरमुळें वॉर्निश न करतांहि छपाई तेजस्वी दिसूं शकते.

वरील कोष्टकाप्रमाणें दोन्ही पद्धतींचे असे अनेक गुणविशेष आणि फायदे–तोटे सांगतां येतील. त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होईल; ती अशी कीं, छपाईच्या प्रकारानुरूपच ऑफसेट आणि अक्षरमुद्रण या पद्धतींची निवड करणें अधिक इष्ट आहे. पोस्टर्स, शोकार्ड्स्, कॅलेंडर्स वगैरे मोठ्या आकारांतील साहित्यासाठीं अक्षरमुद्रणापेक्षां ऑफसेट पद्धतीच कमी खर्चाची आणि सोयीस्कर ठरेल. उलटपक्षीं लेबल्स, कार्टून्स (बॉक्सेस), फोल्डर्स, लिफ्लेटस, ब्लॉटर्स वगैरे गोष्टींसाठीं अक्षरमुद्रणपद्धति उपयुक्त आणि सोयीची आहे. साधारणपणें एक लाख संख्येवरील कॉपीज, किंवा १६"×२३" यापेक्षां मोठ्या आकाराचीं चित्रें ब्लॉक करून छापण्यापेक्षां ऑफसेट पद्धतीनें छापणें आवश्यक आहे.

ऑफसेट आणि अक्षरमुद्रण या पद्धतीसाठीं करण्यांत येणारीं चित्रें किंवा डिझाइन्स त्या त्या पद्धतीच्या तंत्रांना उपयुक्त असावींत, त्यामुळें काम करणाऱ्या मंडळींचें काम तर सुलभ होतेंच, पण अंतिम छपाईहि यथातथ्य आणि निर्दोष होऊं शकते. फोटो ऑफसेटसाठीं करण्यांत येणारें चित्र पाहिजे असलेल्या मूळ आकारापेक्षां फारसें मोठें असूं नये. कारण त्याचें ' रिडक्शन ' (लहान प्रमाण) झाल्यावर त्यांतील तपशील अस्पष्ट होतात व प्रत्यक्ष छपाईत तर ते नाहींसे होतात. ऑफसेटच्या छपाईमध्यें या मुद्याबाबत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आक्षेप घेतला जातो. पण कित्येक वेळां मुद्रणदोषांपेक्षां चित्रकृतीमध्येंहि हा दोष राहूं शकतो. अर्थात् हेंहि खरें कीं, प्लेटवर काम करणाऱ्या तंत्रविशारदांच्यावरहि मुद्रणांतील यशाची जबाबदारी अवलंबून असते.

रंगीत ब्लॉकसाठीं तयार करण्यांत येणाऱ्या चित्राचा आकार दीडपटीपासून दुप्पटीपर्यंत मोठा असला तरी चालतो. त्याचप्रमाणें त्यांत तपशीलांत काम केलें तरी चालतें. रंगाची विविधता जरूर असावी, पण मुद्रणांत सहजपणें मिळूं शकणारे मिश्र रंग वापरण्यावर कटाक्ष ठेवावा. वाटेल त्या रंगाच्या ब्रशाचे फटकारे मारण्यांत फायदा नसतो.

हाफ्टोन ब्लॉक किंवा फोटो ऑफसेटच्या चित्रासंबंधीं वरील सूचना करतां येतील. पण ज्या वेळीं सॉलिड (लाइन) टिंट, बॅकग्राउंड किंवा लाइन ड्रॉइंग पद्धतीचीं चित्रें किंवा डिझाइन्स छापावयाचीं असतात त्या वेळीं मुद्रकाचें खरें कसब असतें. ऑफसेट पद्धतीनें सॉलिड भाग सुलभपणें छापतां येतात. रंगावर पट्टे वगैरे येण्याचा संभव कमी असतो.

अशा वेळीं ब्लॉकपेक्षां ग्राहक ऑफसेट पसंत करतात. या उलट टाइपांतील मजकूर वगैरे असेल तर तो अक्षरमुद्रणांत अधिक स्पष्ट आणि रेखीव छापतां येतो. ऑफसेटनें धांवता मजकूर छापणें बरेंच जड जातें. मजकुराची छपाई अजूनहि फारशी चांगली होत नाहीं असेंच आढळून आलें आहे. कारण तो मजकूर ऑफसेट निगेटिव्हनें प्लेटवर उठवला जातो त्या वेळीं त्यांतील अक्षरें स्पष्टपणें उठत नाहींत, मोडक्या किंवा झिजलेल्या टाईपनें छपाई करावी, तशीं दिसतात. मात्र हा दोष अधिक काळजी घेतल्यावर बराच कमी होऊं शकतो असा अनुभव आहे.

> पण कोरा कागद आणि अंतिम आकर्षक छपाई यांत कल्पकता, परिश्रम, उत्कृष्ट तांत्रिक ज्ञान, साधनांची विपुलता आणि चांगल्या कामाची हौस इतके टप्पे असतात. हे टप्पे ओलांडल्यावरच यशाचा साक्षात्कार होतो.

सारांश, मीं पूर्वीं म्हटल्याप्रमाणें ऑफसेट काय किंवा अक्षरमुद्रण (म्हणजेच लेटरप्रेस) पद्धति काय, दोन्हीहि पद्धती आपापल्या परीनें अत्यंत उपयुक्त आहेत, विशिष्ट मुद्रण–कामांच्या दृष्टीनें सोयीच्याच आहेत. आपल्याकडे ऑफसेट मशिनरी नाहीं, आतां आपला निभाव लागणें शक्य नाहीं असें अक्षर-मुद्रकांना मानण्याचें कारण नाहीं. ऑफसेट मुद्रकांना, आपण या नावीन्यपूर्ण पद्धतीनें कोणत्याहि चित्राची छपाई उत्कृष्ट करूं अशी ग्वाही देतां येणार नाहीं. मुद्रणग्राहकांनाहि, ज्याच्याकडे ऑफसेट मशीन असेल तोच खरा आधुनिक मुद्रक अशी समजूत करून घेऊन चालणार नाहीं किंवा ऑफसेटनें नेहमींच खर्चांत बचत करतां येते असें मानतां येणार नाहीं. ऑफसेटनें कमी संख्येचें कामहि स्वस्त होतें ही समजूत पूर्ण खोटी आहे. उलट कित्येक वेळां कांहीं मोठीं कामें अक्षर–मुद्रणाच्या साह्यानें अधिक स्वस्त, अधिक आकर्षक करतां येतात असा प्रस्तुत लेखकाचा अनुभव आहे. ऑफसेट पद्धति कांहीं अशी जादूची कांडी घेऊन आली नाहीं कीं तिनें कागदाला स्पर्श केल्याबरोबर त्याचें चलनी नोटांत रूपांतर व्हावें. चलनी नोटा ऑफसेट पद्धतीनेंच छापतात. पण कोरा कागद आणि अंतिम आकर्षक छपाई यांत कल्पकता, परिश्रम, उत्कृष्ट तांत्रिक ज्ञान, साधनांची विपुलता आणि चांगल्या कामाची हौस इतके टप्पे असतात. हे टप्पे ओलांडल्यावरच यशाचा साक्षात्कार होतो. होतकरू मुद्रकांनीं कोणतीहि पद्धति स्वीकारली तर तिच्या शास्त्रशुद्ध अभ्यासावर लक्ष द्यावें. दोन्ही पद्धतीं-मधील फरक ग्राहकांना समजावून देण्याची कसोशी करावी.

ग्राहकांनींहि दोन्ही पद्धतीं मधील इष्टानिष्टता पाहावी. दूरदृष्टीनें कागदावर गणित मांडावें व मगच पुढचें पाऊल टाकावें.

डोळस दृष्टि प्रगतीची वाट सदोदित चालत असते !

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सायक्लोस्टाइलिंग

छपाईचा हा एक सुलभ प्रकार असून त्याचें वैशिष्ट्य लेखकांनीं सांगितलें आहे.

लेखक—द. गो. जोशी

पूर्वी म्हणजे ब्रिटिश राज्य येथें असल्यापासून त्यांच्या प्रत्येक डिपार्टमेंटच्या हेडक्वार्टर्स सेक्शनमध्यें निदान एक तरी सायक्लोस्टाइलिंग मशीन असे व त्यावर त्यांना लागणारे लोकल फॉर्म्स, रोजच्या डेली ऑर्डर्स, ऑफिस रूटिन ऑर्डर्स व १५ ते २० पेक्षां जास्त कॉपीज असलेलें काम बहुधा सायक्लोस्टाइल करून घेत असत व हल्लींही बहुधा तसाच प्रकार सर्वत्र चालू आहे. त्यामुळें गव्हर्मेंट ऑफिसेसमध्यें काम करीत असलेल्या याविषयीं थोडीफार तरी माहिती आहे. तथापि आपल्या देशांतील सर्वसामान्य जनतेला तरी सायक्लोस्टाइलिंग म्हणजे काय ह्याविषयीं फारच थोडी कल्पना आहे, परंतु कम्युनिस्टांच्या प्रचाराचें साधन; त्यानंतर १९४२ सालीं झालेली भूमिगत चळवळ व १९४८ सालीं झालेल्या देशव्यापी संघ-सत्याग्रहाचे वेळीं देनंदिन पत्रकांचा देशावर जो पाऊस पडला व हल्लीं म्हणजे हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यापासून इंग्लंड, अमेरिका, रशिया इत्यादि देशांच्या भारतांतील वकिलातीमार्फत त्या त्या देशाचें प्रसिद्ध होणारें बरेचसें प्रचार-वाङ्मय प्रिंटिंगपेक्षां सायक्लोस्टाइल होऊनच येत असल्यामुळें सर्वसामान्य जनतेचें लक्ष कुतूहलानें या विषयाकडे लागलें असल्यास नवल नाहीं.

कित्येक शाळा, कॉलेजेस्, म्युनिसिपालिट्या, लोकल-बोर्ड्स् यासारख्या संस्थांकडेही क्वचित् प्रसंगीं हीं यंत्रें पूर्वी ठेवीत असत. हल्लीं तर असतातच, परंतु त्याशिवाय सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, व्यापारी इत्यादि संस्था, तसेंच बँका, विमा कंपन्या, न्यूजपेपर्स, ऑक्शनर्स, कॉन्ट्रॅक्टर्स इत्यादि क्षेत्रांतील लोकही या यंत्रांवर काम करून घेऊं लागले आहेत. परंतु किंमतीच्या मानानें हीं यंत्रें महाग असल्यामुळें व त्याकरितां लागणारें सामान त्या त्या कंपनीचेंच वापरावें लागत असल्यामुळें, भरपूर काम नसेल तर सर्वसामान्य संस्था व खाजगी व्यक्तींना हीं यंत्रें ठेवणें परवडत नाहीं.

या यंत्राचा **विशेष** म्हणजे कोणचाही मजकूर छपाईस जेवढा वेळ लागेल त्यापेक्षां कमी वेळांत तेवढाच मजकूर सायक्लोस्टाइल करून मिळूं शकतो. म्हणून अर्जंट कामाच्या बाबतींत तर प्रिंटिंगपेक्षां सायक्लोस्टाइलचा मार्ग जास्त सोयीस्कर.

जो मजकूर छापून पाहिजे असेल तो सर्व प्रथम स्टॅन्सिल पेपरवर हातानें किंवा टाइपरायटरवर लिहून काढावयाचा असल्यामुळें खिळेजुळणीचा व इतर बराच वेळ सायक्लोस्टाइलिंगचे बाबतींत वांचतो व म्हणून काम लवकर मिळूं शकतें.

हल्लीं या यंत्रांच्या बाबतींत फारच झपाट्यानें सुधारणा झाली असून गेस्टेट्नर, रोनिओ, स्पीडो प्रिंट, इत्यादि कंपन्यांचीं हँडफीडिंग, ऑटोमॅटिक, इलेक्ट्रिक वगैरे निरनिराळीं मॉडेल्स हल्लीं बाजारांत मिळूं शकतात.

या अद्ययावत् यंत्रांवर कॉपीज मोजण्याचें काम, कागद एकामागून एक सारण्याचें काम व छापलेल्या कॉपीज एकावर एक व्यवस्थित गोळा करण्याची व्यवस्था असून शिवाय प्रिंटिंग वर खालीं जमवून घेण्याचीहि सोय असते. यांतीलच कांहीं मॉडेल्सवर रंगीत काम करण्याचीही सोय आहे.

या धंद्याला शहरांत, विशेषतः जेथें शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, व्यापारी इ. निरनिराळ्या प्रकारच्या संस्थांचें अस्तित्व असेल अशाच शहरांत भरपूर वाव आहे. निदान पुण्यांत तरी अशा संस्था शेंकडोंनीं असल्यामुळें व दिवसेंदिवस प्रिंटिंगचें काम वाढत जात असल्यामुळें सायक्लोस्टाइलिंगचें महत्त्व वाढूं लागलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बऱ्याच संस्था, कंपन्या, प्रसिद्ध व्यक्ती आपलें काम सायक्लोस्टाइलच करून घेतात.

सर्वसाधारणपणें सायक्लोस्टाइलच्या कामाचे दर प्रिंटिंगप्रमाणेंच शेंकड्यावर (१००) आकारला जातो व हल्लींच्या कागदमहर्गतेमुळें फूलस्केप साईझच्या १०० कॉपीजचा दर ४ रु. शेंकडा आहे. कागद फारच सुपीरिअर वापरला असेल तर ५ रु. शेंकडा याप्रमाणें कामही केलें जातें.

फायदे:–(१) एकदां ठराविक कॉपीज् काढून झाल्यावर सुद्धां नंतर जर कॉपीज् कमी पडत आहेत असें दिसून आलें तर परत कॉपीज काढून मिळूं शकतात. (मात्र स्टेन्सिल राखून ठेवावा लागतो.)

(२) या धकाधकीच्या मामल्यांत अर्जंट कामाचे बाबतींत वेळेची बचत.

(३) संस्कृत, पाली, अर्धमागधी या भाषेंत छापण्याचें काम कांहीं ठराविक छापखानेच करीत असतात, परंतु सायक्लोस्टाइलिंगमुळें ही अडचण दूर झाली आहे.

(४) शाळा, कॉलेजेस्, क्लासेसच्या प्रत्येक वर्गाची संख्या मर्यादित असल्यामुळें कैक शाळा, कॉलेजेस् व क्लासेसना तिमाही, सहामाही व नऊमाही परीक्षांच्या प्रश्नपत्रिका छापून घेणें परवडत नाहीं. विशेषतः संस्कृत, पाली, अर्धमागधी, फ्रेंच, अलजिब्रा व जॉमेट्री या विषयांच्या क्वेश्चन पेपर्सचे काय करावें हा मोठाच प्रश्न चालकांपुढें असतो; परंतु जे अध्यापक पत्रिका सायक्लोस्टाइल करून घेतात त्यांच्या मागचा हा प्रश्न तरी कायमचा सुटला आहे.

(५) पोस्टकार्डावर व आपल्या नांवाच्या लेटर हेड्सवरही सायक्लोस्टाइलिंग करून मिळूं शकतें.

(६) दैनिकें, साप्ताहिकें यांचे वर्गणीदार व मोठ्या संस्थांचे सभासद यांच्या पत्त्यांच्या लिस्ट्स् आवश्यकते प्रमाणें सायक्लोस्टाइल करून घेतल्यास रोजच्या रोज पत्ते लिहिण्याचें किचकट व अवघड काम वांचतें.

(८) ज्याच्या सहीनें मजकूर प्रसिद्ध व्हावयाचा त्यानें एकदांच फक्त स्टेन्सिल पेपरवर स्टायलस–पेननें सही केली म्हणजे प्रत्येक कॉपीवर निराळी सही करण्यांत होणारा श्रम व वेळ वांचतो.

या बाबतींत आणखी कांहीं माहिती पाहिजे असल्यास मिळूं शकेल.



★
मुद्रकांना सदैव उपयुक्त
मुद्रणालयांतील कामांचे
नवे दरपत्रक
किं. ८ आणे ट. ख. ४
मुद्रण शिक्षणांतील
प्रात्यक्षिकाचे धड
किं. २ रु. ट. ख. १० आणे.
तावडतोब मागवा
व्यवस्थापक
मुद्रणप्रकाश पुणें २
★

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देवनागरी टाइपाच्या

संशोधन कार्यांतील माझे कांहीं अनुभव

लेखक— - - - - - - - - - - - - शं. रा. दाते बी. ए.

२७ वर्षांचा दीर्घकाळ ज्यांनीं देवनागरी टाइपाला आपल्या यंत्रज्ञ बुद्धीमध्यें अत्युच्च स्थान दिलें आहे, त्यांनीं स्वतःचीच आत्मकथा सांगितली आहे. ती प्रत्येक देवनागरी मुद्रकाला मार्गदर्शक ठरणारी आहे. लेख लक्षपूर्वक वाचावा हीच विनंति.

'मुद्रणप्रकाश'च्या वाचकांना टाइपासंबंधींचे माझे प्रयोग व त्या बाबतींतील माझे कांहीं अनुभव निवेदन करण्याच्या उद्देशानें हा लेख लिहीत आहे. हेतु इतकाच कीं, नवे प्रयोग करणारांना जुन्यांनीं काय केलें आहे हें समजावें व त्यांना आलेले अनुभव हिशेबांत घेऊन नव्यांनीं नवे प्रयोग करावेत; म्हणजे त्यांचा वेळ व श्रम वाया जाणार नाहींत. आपल्याकडे संशोधनात्मक काम एकंदरीनें फार कमी होतें, म्हणून प्रयत्नपूर्वक त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

मला या विषयाची गोडी १९२४ सालीं प्रथम लागली. सन १९२३ सालीं मी स्वतंत्र छापखाना सुरू केला, तेव्हां मला छापखान्याच्या व्यवसायाची फारच थोडी व तीही पुसट कल्पना होती. त्या वेळीं निदान पुण्यांत तरी छापखान्यांतून नागरी अक्षरांच्या जुळणीचें काम प्रायः डिग्री पद्धतीच्या टाइपांतच चाले. त्या टाइपाची जुळणी किचकट असे व वेलांट्या-मात्रा नेहमीं मागें पुढें सरकलेल्या आढळत. त्या बरोबर बसवावयाच्या म्हटलें तर त्यास वेळ बराच लागे. आजही त्यांत विशेष फरक पडला आहे असें नाहीं. जुळणीचें काम करणारे सामान्यतः वेतावातानें शिकलेले, फक्त संवयीनें व पाहून पाहून जुळणीचें काम करण्यास सरावलेले असे असत. त्यामुळें पहिल्या छापांतून चुकांच्या रांगाच रांगा लागत. त्यामुळें जुळणीचेंही काम किचकट, छाप तपासण्याचेंही काम कंटाळवाणें व त्या चुका दुरुस्त करण्याचें काम तर त्याहून अधिक कंटाळवाणें, किंबहुना कधीं न संपणारें असें होई!

यांत कांहीं सुधारणा होईल काय? हा त्या वेळीं अनेक मंडळींच्या पुढें प्रश्न असे. मराठी लिपीच्या बाबतींत व टाईप पाडण्याच्या पद्धतींत सुधारणा करण्याचे अनेक प्रयत्न त्या काळांत चालू होते. खुद्द लो. टिळक यांनीं मुद्दां या विषयांत मन घातलें होतें व त्यांनीं टाईप पाडण्याच्या पद्धतींत अनेक सुधारणा सुचविल्या होत्या. त्यांपैकीं कांहीं अतिशय अभिनव अशा होत्या. नागरी लिपि यंत्रसिद्ध करावी, ती मोनोटाईप, लिनोटाईप यांसारख्या यंत्रावर बसवावी हें त्यांना अभिप्रेत होतें. या दृष्टीनें त्यांनीं केलेल्या प्रयत्नांचे तीन टप्पे पडतात. त्यांनीं १८९४।९५ सालीं सुचविलेली एक पद्धति, त्यानंतर त्यांनीं १९१४।१५ सालीं सुचविलेली दुसरी पद्धति, व त्यांनीं मरणापूर्वीं सुचविलेली पण त्यांच्या पश्चात् १९२६ सालीं प्रसिद्ध झालेली त्यांची तिसरी पद्धति होय.

मी छापखान्याचें काम पाहूं लागल्यावर जुळणी (कंपोझिंग) करण्याचें काम शिकलों. त्यामुळें डिग्री पद्धतीच्या जुळणींतील अडचणी मला चांगल्या समजून आल्या. त्या कशा दूर करतां येतील यासंबंधाचे अनेक विचार माझ्याहि मनांत वावरूं लागले. मनाशीं कांहीं योजना आखून मी टाइप पाडण्याच्या पद्धतींत सुधारणा करण्याचें योजिलें. त्याच सुमारास देशांत नागरी लिपीच्या ऐवजीं रोमन लिपीचा सार्वत्रिक प्रसार करण्याची चळवळ सुरू झाली होती. लष्करांत रोमनउर्दू सर्रास चालू झालें होतें व ती लाट अन्यत्रही फैलावण्याचे वारे वाहूं लागले होते. या लाटेला परतविण्यासाठीं म्हणून देशभर चळवळ सुरू झाली. परंतु नागरी लिपीपेक्षां रोमन लिपीचें श्रेष्ठत्व ती यंत्रसिद्ध आहे यांत असल्यामुळें जोंपर्यंत नागरी लिपि यंत्रसिद्ध होऊं शकत नाहीं तोंपर्यंत रोमन लिपीचें उच्चाटन करण्याची चळवळ मूळ धरूं शकणार नाहीं हें स्पष्ट दिसून येऊं लागलें. नागरी लिपि यंत्रसिद्ध करण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

यांनींच विचार करण्यासारखें कांहींतरी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

॥ श्रीं ॥

शि. का. संत
देवनागरी खिळे तज्ज्ञ



शं. रा. दाते, बी. ए.
देवनागरीचे युगप्रेरक

श्रीकालिदासविरचितं

अभिज्ञानशकुन्तलं नाम नाटकं

ना. स. पिंपळे
टाइपाचे पंचमेकर

म. वि. पाडावे
टाईप फौंड्रीकामाचे तज्ज्ञ

श्रीषेज़िनाम्ना राजकीयमहामठे

संस्कृतभाषाध्यापकेन

विदुषां मनःप्रसादहेतोः

प्रकाशीकृतं

य. रा. दाते, बी. ए. एल्एल्. बी.
मराठी भाषेच्या कोशाचें कार्य

चिं. ग. कर्वे, बी. ए.
मराठी भाषेच्या कोशाचें कार्य

परिसाख्यातायां राजधान्यां

श्रीदोन्दैदुप्रेनाम्ना मुद्रितं

ईश्वब्दः १८२७

पॅरिसमध्यें दोन्दैदु छापखान्यांत १८२७ त देवनागरी टाईप करून घेऊन छापलेलें शाकुंतल ग्रंथाचें पहिलें पान

—म. सा. परिषदेचें कृपेनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साठीं प्रयत्न करण्यास मला या चळवळींतून प्रोत्साहन मिळालें व मीं त्या दिशेनें विचार करूं लागलों.

पण माझ्याजवळ साधनें कांहींच नव्हतीं. मी मनाशीं कांहीं योजना आखून नव्या पद्धतीचे कांहीं टाईप पाडून घेण्याचें ठरविलें. त्यासाठीं पुण्यांतील सुप्रसिद्ध पंचगीर श्री. नारायणराव चिंपळे यांजकडून कांहीं पंच तयार करून घेतले. त्यांनींही ते तत्परतेनें दिले. या कामांत ते तरबेज होते. पण त्या वेळीं मला माझ्या अपेक्षेप्रमाणें टाईप पाडून मिळूं शकले नाहींत. मी ज्या टाईप फौंड्रींतून नेहमीं टाईप घेत असे तेथें नित्याच्या ठराविक चाकोरीच्या बाहेर कांहीं नवी पद्धत स्वीकारून टाईप पाडून देण्यास सदर फौंड्रींतील कामगार वर्ग तयार होईना. शास्त्र या दृष्टीनें त्यांना त्या कामाची कांहींच माहिती नव्हती. त्यामुळें मला काय करून हवें व उपलब्ध साधनांनीं तें कसें करतां येईल हें त्यांना समजूं शकेना. कांहीं दिवस मी तशाही स्थितींत जवळ बसून टाईप पाडून घेतले. पण त्यांत माझें समाधान होईना. अखेर साधनें उपलब्ध नाहींत म्हणून मी निराश होऊन स्वस्थ बसलों. काय करावें हें सुचेना.

तेवढ्यांत एक जुनी टाईप फौंड्री विक्रीस निघाल्याची वर्तमानपत्रांत जाहिरात वाचली, व आपण स्वतःच टाईप फौंड्री विकत घ्यावी म्हणजे आपल्याला मनाप्रमाणें प्रयोग करण्यास सांपडेल असें माझ्या मनानें घेतलें. जवळ पैसे नव्हते. तथापि कर्ज काढून मीं ती फौंड्री विकत घेतली, व तेथें माझे प्रयोग करूं लागलों.

मला अखंड टाईप पाडावयाचा होता. मी घेतलेल्या फौंड्रींतील साहित्य डिग्री पद्धतीनें पाडावयाच्या टाइपांचें होतें. तथापि हातीं असलेल्या मोल्डवरच मी अखंड अक्षरें पाडूं लागलों. कान्यावरील स्वरचिन्हांच्या कांहीं मेट्रिसा मी पंचांच्या साहाय्यानें करून घेतल्या होत्या. पण मजजवळ असलेल्या सर्व मोल्डांची उंची व मेट्रिसांची खोली सारखी नसल्यामुळें अखंड मोल्डांवर (त्यांची उंची अधिक असल्यामुळें) कमीअधिक खोलीच्या जुन्या नव्या मेट्रिसांचा मेळ जमेना. कांहीं अक्षरें कमी उंच तर कांहीं अधिक उंच होऊं लागलीं.

मला असा अनुभव आला कीं त्या फौंड्रींतील डिग्री टाइपाचे मोल्ड उंचीला थोडे अधिक, व मात्रा-वेलांट्यांच्या मेट्रिसा तितक्याच प्रमाणांत कमी खोल होत्या. त्यामुळें जुन्या पद्धतीनें टाईप पाडतांना टाईप बरोबर येई; पण मोल्ड व मेट्रिसा बदलल्या कीं टाइपांची उंची बदले. मोल्डमधील हा फरक कित्येक दिवसपर्यंत माझ्या लक्षांत आला नाहीं. त्यामुळें माझें चुकतें कोठें हेंच कळेना ! पुन्हा पुन्हा मी टाईप पाडून पाही; पण अनुभव तोच ! टाईप एकदां पाडून पाहावयाचा म्हणजे ८।१० दिवस लागत. कारण कमी अधिक प्रमाणांत सर्व, निदान बरींच अक्षरें पाडावीं व त्यांची जुळणी करून पाहावी तेव्हां अनुभव यावयाचा ! अखेर कांहीं ना कांहीं कारणानें मोल्ड तपासण्याची बुद्धि झाली व चूक सांपडली ! पण ही अगदीं साधी चूक लक्षांत येण्यांत एक वर्ष गेलें व शेंकडों रुपये खर्च झाले !

जुनीं साधनें हातीं घेऊन प्रयोग करावे लागले म्हणजे नेहमीं असें होतें. कारण जुन्यांतील कमी अधिक दोष किंवा त्यांतील वैशिष्ट्यें जोंपर्यंत पूर्णपणें लक्षांत आलेलीं नसतात, तोंपर्यंत अशा चुका अपरिहार्य ठरतात. म्हणून प्रयोग करणारानें साधनें नवीं असोत किंवा जुनीं असोत, ती प्रथम सर्व नीट तपासून व त्यांची पूर्ण माहिती करून घेऊन प्रयोग करावेत. त्याशिवाय त्याचे प्रयत्न केव्हां व किती वाया जातील याचा नेम नसतो.

हें माझें प्रयोगाचें काम १९२६ पासून १९२८ पर्यंत सतत चालू होतें. त्यांत अनेक चुका झाल्या. काना टाइपाची रुंदी मी एकदां प्रमाणापेक्षां जास्त ठेवल्यामुळें तो टाईप पायका असूनही ग्रेटसारखा मोठा दिसूं लागला. कारण मराठींत काना जवळजवळ दर अक्षराआड येतो. एकदां मी तो प्रमाणापेक्षांही अरुंद घेतला, तेव्हां तोच टाईप एकदम उभट व अगदीं वेगळ्या वळणाचा दिसूं लागला. मराठींत टाइपाचें स्वरूप कान्याची रुंदी व अक्षरांतील कान्यापुढील जागा

हेतु इतकाच कीं, नवे प्रयोग करणारांना जुन्यांनीं काय केलें आहे हें समजावें व त्यांना आलेले अनुभव हिशेबांत घेऊन नव्यांनीं नवे प्रयोग करावेत, म्हणजे त्यांचा वेळ व श्रम वाया जाणार नाहींत. आपल्याकडे संशोधनात्मक काम एकंदरीनें फार कमी होतें, म्हणून प्रयत्नपूर्वक त्याकडे लक्ष देण्याची आ व श्य क ता आ हे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यामुळें फार बदलतें; व म्हणून टाइपाचें वळण ठरवितांना याकडे विशेष लक्ष द्यावें लागतें.

माझ्या टाईपविषयक सर्व प्रयोगांत मला एक सहकारी लाभले. त्यांचें नांव नारायण रामचंद्र जोशी. हा मुलगा वयानें लहान, पण प्रयोग करण्यांत अतिशय उत्साही होता. यंत्राशीं खेळण्यांत त्याचें मन अतिशय रमे. त्याच्या बुद्धीचा उपजत कलच यंत्रविषयक होता. त्यामुळें नित्य नवे प्रयोग करण्यांत आमचे तासन्तास जात! अखेर १९२८ सालीं आम्ही कमींत कमी मेट्रिसांच्या साहाय्यानें अखंड टाईप पाडण्याची एक योजना निश्चित केली. परंतु ही लिपी यंत्रसिद्ध कशी करावयाची हा मोठाच प्रश्न होता. या बाबतींत श्री. गोखले (जतचे माजी न्यायाधीश) यांनीं पुष्कळ प्रयोग केले होते. विलायतेस मोनो टाईप कंपनीशीं पत्रव्यवहार करून त्यांनीं टाईप तयार करवून घेतले होते, व यंत्रावर कांहीं मजकूर जुळवूनही पाहिला होता. परंतु त्या पद्धतींत अनेक दोष राहिल्यानें त्यांच्याही पदरीं निराशा आली व त्यांनीं अशक्य म्हणून तो उद्योग सोडून दिला. यासंबंधांत साहित्यसंमेलनाच्या (सन १९२७-२८) एका वृत्तांतांत त्यांनीं लिहिलेला लेख मोठा उद्बोधक आहे.

याच सुमारास मला एक अतिशय उपयुक्त ग्रंथ अभ्यासावयास मिळाला. त्याचें नांव "Typographical Surfaces by Legros and Grant." हें पुस्तक या शास्त्रावरील एक श्रेष्ठ पुस्तक आहे असें म्हणतां येईल. त्याच्या वाचनानें मला तर खरोखर जणूं नवी दृष्टि आली. त्यांतील कांहीं कांहीं भाग मीं अनेक वेळां वाचला, व त्यामुळें मराठी लिपि लिनो टाईप व मोनो टाईप यंत्रांवरही खास बसवितां येईल असें माझ्या मनानें घेतलें. पण हें घडून येणार कसें!

पुढें १९२९ सालीं मी लोकसंग्रह छापखाना पुणें अनाथविद्यार्थिगृहास विकत दिला व मी त्या संस्थेचा एक घटक बनलों. छापखान्याचें नित्य नैमित्तिक काम चालू होतें. पण मराठी लिपि यंत्रसिद्ध करावी अशी मनांतील इच्छा दिवसेंदिवस तीव्र होत होती. तशांत एक दिवस परदेशीं शिक्षणासाठीं जाऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना परतफेडीच्या बोलीनें एक छात्रवृत्ति मिळूं शकेल अशी केसरींत जाहिरात प्रसिद्ध झाली. ती वाचून करपलेल्या झुडपाला एकदम पालवी फुटावी तसें मला झालें आपण अर्ज करून पहावा असें मी मनाशीं ठरविलें. ही छात्रवृत्ति कै. श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर यांची होती. ती मला मिळूं शकली व मी थोडा आधीं पत्रव्यवहार करून, पण प्रत्यक्ष भेटूनच सर्व कांहीं घडवून आणण्याच्या आशेनें १९३१ सालीं ऑगस्ट महिन्यांत युरोपला प्रयाण केलें.

लिनो टाइपासारखेंच टायपोग्राफ नांवाचें एक यंत्र होतें. तें जर्मन यंत्र असून लिनो टाइपापेक्षां स्वस्त आहे. त्यावर नागरी लिपि बसवून पाहावी असें मीं ठरविलें व त्यासाठीं जरूर तो खर्च करण्याचीही तयारी केली. मोनो टाईप व लिनो टाईपवाल्यांकडेही मी आधीं पत्रव्यवहार केला होता; पण नागरी लिपीच्या यंत्रांना हिंदुस्थानांत मागणी येणार नाहीं या समजुतीनें त्यांच्या मुंबई येथील कार्यालयांनीं मला आधींच नकार दिला होता. त्यामुळें तो मार्ग आधींच बंद झाला होता. म्हणून पत्रव्यवहार करून टायपोग्राफ कंपनीकडूनही नकार येण्याचा मार्गच राहूं नये म्हणून मी पत्रव्यवहारांत फार न पडतां प्रत्यक्ष जाऊनच कांहीं साधत कां तें पाहावें असें ठरविलें होतें.

तथापि अडचणी माझ्या मागें हात धुऊन लागल्याच. टायपोग्राफ कंपनीनेंही माझें काम हातींही घेण्याचें नाकारलें. आमच्या यंत्रांना पुरेसें गिऱ्हाईक नागरी टाइपासाठीं मिळेल असें आम्हांस वाटत नाहीं असें सांगून त्यांनींही माझी बोळवण केली. अशा स्थितींत काय करावें हें मला सुचेना. लिनो टाईप, मोनो टाईप कंपन्यांनीं हिंदुस्थानांत असतांनाच नकार दिला होता तेव्हां टायपोग्राफ कंपनी तरी मी जर्मनींतच गेल्यामुळें माझें काम हातीं घेईल, मी त्यांना वळवूं शकेन, कांहीं यंत्रें खपविण्याची हमी देईन असें मी मनाशीं योजून होतों. पण कांहींच जमलें नाहीं. बर्लिनसारख्या शहरीं काय करावें या चिंतेंत माझे दिवस जाऊं लागले. आपली योजना फसली व ती चुकीची किंवा अयशस्वी ठरली असा अनुभव मला आला असता तरी मला इतकें वाईट वाटलें नसतें. पण माझें कामच कोणी हातीं धरीना त्यामुळें माझी फारच कुचंबणा झाली.

जर्मनींतही लिनो टाईप, इंटर टाईप व मोनो टाईप कंपन्यांचे कारखाने होते. त्यांना मी भेटलों व माझ्या योजनेप्रमाणें टाईप करून द्या म्हणून त्यांस विनंती केली. तेव्हां ते म्हणाले तुम्ही इंग्लंडांत जा व तेथें विचारा. कारण आम्ही येथील बनावटीचीं यंत्रें भारतांत विकूं शकत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जगांतील मोठमोठ्या कारखानदारांनीं संयुक्त विचारानें व परस्पर सहकार्यानें जगांतील आपापलें व्यापारक्षेत्र वाटून घेतलें असून निदान त्यावेळीं तरी फक्त विलायतच्या कारखानदारांकरतां भारताचें क्षेत्र खुलें होतें. जर्मनींतील कारखानदार आपलीं यंत्रें फक्त युरोपांत विकूं शकत. त्यामुळें त्यांच्याकडूनही नकार मिळाला व माझी निराशा दिवसेंदिवस वाढत गेली.

अखेर एक दिवस असाच विचार करीत बसलों असतां विलायतच्या मोनो टाईप कंपनीला पत्र टाकून तरी पाहावें असें मनांत आलें व त्याप्रमाणें त्यांनीं नागरी लिपि यंत्रसिद्ध करण्याच्या बाबतींत काय काय प्रयत्न केले होते त्याची माहिती मागविली. ती हातीं आल्यावर तिचें गुणदोषात्मक परीक्षण करून मी तपशीलवार माझें म्हणणें कळविलें व अमुक इतके दोष दूर कराल तर मी तें यंत्र घेईन असेंही लिहिलें. तसेंच मी लौकरच विलायतेस येत आहे, तेव्हां समक्ष भेटून दोष कोणते व ते कसे दूर करावयाचे यासंबंधानें विचारविनिमय करीन असेंही त्यांस आश्वासन दिलें व तेवढ्याच आधारावर विलायतेंत जाऊन मोनो कंपनीच्या अधिकाऱ्यांना भेटलों.

माझें सुदैव इतकेंच कीं मोनो टाईप कंपनीच्या त्या वेळच्या मुख्यानें माझें म्हणणें ऐकून घेतलें, व आपल्या एंजिनीअरला बोलावून माझ्या म्हणण्याप्रमाणें काय करतां येईल हें पाहण्याची सूचना केली. या चर्चेच्या वेळीं त्यांचें काम कसें चालतें याची मी त्यांना तपशीलवार माहिती सांगितल्यानें मला या विषयाची फारच चांगली माहिती आहे व मी कांहीं करूं शकेन अशी त्यांची खात्री पटली. माझ्या साऱ्या माहितीचा आधार 'टायपोग्राफिकल सरफेसेस '' ह्या पुस्तकाचा होता. प्रत्यक्षांतील असें ज्ञान मला फारसें नव्हतें पण माझ्यासंबंधानें तेथें अनुकूल ग्रह होऊन मला प्रयोगाची संधि मिळाली. एंजिनिअरनें मला सर्व कारखाना दाखविला, व त्यांनीं नागरीबाबत पूर्वी केलेले प्रयत्न कोठें, कसे व कां फसले व ती पद्धति कां चुकीची ठरली हें समजावून सांगितलें. त्यामुळें पुन्हां पुढें काय हा प्रश्न माझ्यापुढें राहिलाच. त्यानंतर मी पुन्हां तीन चार दिवस विचार करून सर्वांची चालूं योजना आखली व ती कंपनीच्या मुख्याला व त्यांच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांना समजावून सांगितली. ती त्यांनाही पटली. त्यामुळें ते माझे प्रयोग करण्यास तयार झाले, व नंतर दोन महिन्यांत मराठी लिपि मोनो टाईप यंत्रावर सिद्ध झाल्याचें प्रसिद्ध झालें.

माणसाला प्रयोग करण्याची हौस पाहिजे, तळमळ पाहिजे, व तशींच साधनें व संधिही पाहिजे. यांपैकीं कांहीं नसेल तर संशोधन अशक्य आहे.

मोनो टाईप कारखान्यांत अक्षरांच्या आकृती काढीत असतां तेथील एका तज्ज्ञानें मला वेळोवेळीं पुष्कळच सूचना केल्या. त्याला नागरी लिपि येत नव्हती. पण अक्षराचा केंद्रबिंदु कसा काढावा, त्याचा तोल, वजन, जाडी बारीक रुंदीचें प्रमाण, उभ्या आडव्या रेषांचें परस्परप्रमाण, गोलाईचीं स्वरूपें, इत्यादि संबंधांत त्यांनीं केलेल्या सूचना अत्यंत मार्मिक व शास्त्रशुद्ध होत्या. या विषयांतील माझे गुरु म्हणून त्यांना समजतां येईल.

या लढ्याला परतविण्यासाठीं म्हणून देशभर चळवळ सुरू झाली. परंतु नागरी लिपीपेक्षां रोमन लिपीचें श्रेष्ठत्व ती यंत्रसिद्ध आहे यांत असल्यामुळें जोंपर्यंत नागरी लिपी यंत्र सिद्ध होऊं शकत नाहीं तोंपर्यंत रोमन लिपीचें उच्चाटन करण्याची चळवळ मूळ धरूं शकणार नाहीं.

सारांश, लेग्रॉस व ग्रँट यांच्या पुस्तकानें मला या विषयाची दृष्टि दिली. प्रयोगांत माझे मित्र कै. नारायणराव जोशी यांच्या निरलस उद्योगाचें मला अमोल साह्य झालें, व मोनो कंपनींतील निरनिराळ्या खात्यांतील तज्ज्ञांनीं मला आपल्या अनुभवाचे धडे शिकविले. नागरी लिपि यंत्रसिद्ध करण्यांतील माझ्या श्रेयांत हे सर्व वांटेकरी आहेत.

पुढें १९३८ सालपर्यंत माझें हें प्रयोगकार्य कमी अधिक प्रमाणांत चालूच होतें. मराठी टाईप रायटर सोपा करणें, नव्या वळणाचे टाईप तयार करणें, इत्यादि प्रयोगकार्यांत माझे मुख्य स्नेही श्री. शंकरराव केतकर व श्री. शि. का. संत हे होत. लोकसंग्रह छापखान्यांत आजपर्यंत झालेल्या संशोधनकार्यांत माझ्याइतकाच याही मंडळीचा वांटा आहे, हें येथें कृतज्ञतापूर्वक उल्लेखणें जरूर आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काल आणि आज

—प्रभावी प्रचारशक्ति—

लेखक— गणेश विठ्ठल तांबे डायरेक्टर (टॉम ॲण्ड बे (ॲडव्हर्टायझिंग) लि.)

मुद्रण-प्रकाशाचा शंभरावा अंक व त्या अंकाचें वैभव पाहतांना आपणाला जो एक प्रकारचा आनंद वाटणें साहजिक आहे, त्या आनंदाच्या मागें जो कांहीं एक इतिहास आहे किंवा ज्या कांहीं व्यक्तींच्या तपश्चर्येचे धागेदोरे विणले गेले आहेत, त्या ऐतिहासिक धागेदोऱ्यांची कल्पना सर्वसाधारणपणें कां होईना मुद्रण-प्रकाशाचा पहिला अंक आपण पाहिला असल्यास आपणांस येईलच. ही झाली एका संस्थेची हकीगत, परंतु आपण एखाद्या शास्त्राच्या प्रगतीमागील ऐतिहासिक आंदोलनें पाहूं गेल्यास, त्याच विवक्षित शास्त्राचा उपयोग आपले पूर्वज कशा पद्धतीनें व कोणत्या प्रकारांनीं करीत आले व त्याच शास्त्रामध्यें आज आपण किती घडामोडी व प्रगति करून ठेवली आहे, याचें सिंहावलोन केल्यास मनुष्याची झेप, कुठल्याही सजीव प्राण्यापेक्षां किती लांबरुंदच नव्हे, तर आडवीतिडवी आहे याचा अंदाज लागल्याशिवाय राहात नाहीं; आणि त्याचमुळें एका आंग्लकवीच्या "What Man has made of Man" या उद्गारांची सत्यता पटते.

इतर शास्त्रांप्रमाणें जाहिरात-बाजी हें कलात्मक शास्त्र इतिहासाइतकेंच जुनेंपुराणें आहे. या शास्त्राचा उपयोग फार प्राचीन काळापासून चालत आला असल्याचे पुरावे आजही उपलब्ध आहेत. जगाचें चित्त वेधण्यासाठीं जाहिरात-शास्त्राच्या मूळ कल्पनांचा उपयोग, नकळत कां होईना धाडसी व्यापाऱ्यांकडून स्वतःच्या व्यापारविषयक कल्पना, वस्तू, अगर तत्सम विषयांचा प्रचार करण्यासाठीं निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करून, आज वर्षानुवर्षें प्रत्यक्षांत आणण्यांत येत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें.

लिहिण्याची कला उपलब्ध होतांच दूतांकरवी संदेश पोहोंचविण्याचें कार्य सुरू झालें, पण तत्पूर्वी लढाया, नवीन शोध, लूटमारीसंबंधित सूचना वगैरे सर्वसाधारण बातम्या तोंडातोंडी अगर जासुदांकरवीं सर्वत्र पोहोंचविण्याची प्रथा होती, हें आपण इतिहासांत वाचतोंच. त्यानंतर रोजच्या बातम्या सर्वत्र पसरविण्याचे दृष्टीनें दवंडी पिटण्याची प्रथा अमलांत येऊं लागली व आज देखील खेडोपाडीं नाटक, सिनेमा, सर्कसचे कार्यक्रम अगर गांवांतील खळबळजनक बातम्यांचा दवंडीच्या माध्यमानें प्रचार केला जात असल्याचें आपल्याला बऱ्याच ठिकाणीं दृष्टोत्पत्तीस येतें.

जाहिरातीची व्याख्या कांहीं मंडळींना विचारल्यास निरनिराळीं उत्तरें आपल्या कानांवर पडतील. कांहीं मंडळींच्या दृष्टीनें केवळ "दुसऱ्याला सांगणें" म्हणजेच जाहिरात. तर कांहीं म्हणतील कीं येन केन प्रकारेण आपणांस विकावयाच्या वस्तू दुसऱ्यांना माहिती करून देणें तर छापील-विक्रेते अशी कांहींची समजूत ! समाजाचा एक भाग समजतो कीं प्रत्यक्ष विक्री सोडली तर केवळ दुसऱ्याला माहिती देणें हाच जाहिरातीचा उद्देश, तर दुसरा वर्ग समजतो कीं माहिती व प्रत्यक्ष विक्री या दोन्हींचा समावेश जाहिरातीच्या पोटीं आहे. 'ॲडव्हर्टर' (Adverter) म्हणजे to turn towards या मूळ लॅटिन शब्दापासून ' ॲडव्हर्टायझिंग ' या शब्दाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदय झाला आहे. म्हणजेच येण्याजाणाऱ्याला अगर कुणाही व्यक्तीला अशा एखाद्या मार्गाचा अवलंब करून, आपल्या कांहीं वस्तू, कल्पना अगर धंद्याकडे वळविणें. म्हणजेच त्याचें चित्त वेधणें म्हणजेच adverting, त्याच्याच अर्थी advertising असा शब्द वापरला आहे.

आधुनिक शास्त्राला अनुसरून ॲडव्हर्टायझिंगचा अर्थ केवळ सांगणें, समज देणें, स्तुति करणें किंवा कोणतीही वस्तु अगर विशिष्ट कल्पना लोकांना माहीत करून देणें एवढाच नसून कोणत्याही जाहिरात केलेल्या मालाची लोकांना समज देऊन त्यांचें चित्त अशा तऱ्हेनें वेधून घेणें कीं जाहिरात पाहतांच, जाहिरात केलेल्या मालाबद्दलची जनतेची जिज्ञासा वाढून, सदरहू माल वापरून पहाण्याकडे लोकांचा कल झुकावयास लागला पाहिजे. चालू काळांत, कीं ज्याला जाहिरात-युग म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं, जाहिरातीची कला इतकी पुढें गेलेली आहे कीं, या कलेचे अफाट धंद्यांत परिवर्तन झालें असून, जाहिरातीची शक्ति अमर्याद झाली आहे. इतकेंच नव्हे तर सर्वसाधारणपणें जगाच्या बाजारांवर, दुसऱ्या कुठल्याही शक्तीनें एवढें प्रभुत्व निर्माण केलें असेल किंवा नाहीं याची निदान मला तरी शंकाच आहे.

व्यापारी दृष्टीनें विचार करतां जाहिरातींचे परिणाम मनुष्याच्या गरजा वाढविण्याकडेच जास्त प्रभावी ठरतात. उदाहरणार्थ, एक दोन पिढ्यांचे पूर्वी ज्या हजारों वस्तू अगर सेवाभाव (Services) कीं ज्या कधींही उपयोगांत नव्हत्या व ज्यांची कधीं आवश्यकता देखील भासली नाहीं, त्याच गोष्टींची रोजची मागणी आज इतकी वाढली आहे, इतकेंच नव्हे तर अशा बऱ्याच गोष्टी रोजच्या जीवनांत आज आवश्यक होऊन बसल्या आहेत.

> **जाहिरात प्रचाराचा उपयोग केल्यामुळें विक्रीच्या किंमती खालीं येतात, मालाची निर्मिति योग्य प्रमाणावर वाढल्यामुळें निर्मितीवरील खर्च, प्रमाणबद्ध तेनुसार बराच कमी येतो; त्यामुळें कारखानदाराला कमी किंमतींत मालाचा पुरवठा करणें शक्य होतें व पर्यायानें एकंदरींत माणसाच्या राहणीचा दर्जा वाढतो.**
>
> **ग. बि. तांबे**
> **डायरेक्टर टॅाम ॲंड बे**

उदाहरणार्थ, फाउन्टन-पेन्स घ्या. आज प्रत्येक धंदेवाइकाच्या खिशांत ते कमींत कमी एक तरी पाहिजेच; परंतु जुन्या पिढींतील लोक याच फाउन्टन-पेनकडे, ते एक नावीन्य अगर सौख्याची बाब या नात्यानें चष्म्याच्या वरच्या भिंगांतून तिरप्या नजरेनें पहात असत. सत्तर टक्के पुरुषांना सिगरेट वगैरे धूम्रपान म्हणजे नित्याची गरज होऊन बसली आहे. आणि या सर्वांला कारण जाहिरात-प्रचार; कारण तंबाखू व सिगरेटच्या गेल्या तीस चाळीस वर्षांतील अपरंपार जाहिरात-प्रचाराचा लोकांच्या संवयीवर इतका परिणाम झाला आहे कीं अन्य राष्ट्रांच्या बरोबरच, किंवा भारताची सुवर्णभूमि हें नांव पुढें चालू ठेवण्याचे दृष्टीनें, सुवर्ण गेलें तर गेलें, निदान गोल्ड-फ्लेकचीं पाकिटें खलास करून कां होईना भारताचा दर्जा कायम ठेवण्याचा प्रयत्न आम्ही करीतच आहोंत.

ॲडव्हर्टायझिंगचा उपयोग आतां तर सामाजिक व राजकीयसंबंधित प्रत्येक शाखेंतून सर्रास केला जात असल्याचें आपण पहातोंच.

जाहिरातद्वारा कारखानदार आपल्या कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाचें वाटप जगाच्या कानाकोपऱ्यांतून करतो. डिपार्टमेंट स्टोअर्समधून सबंध दिवसभर माणसांच्या झुंडीच्या झुंडी, आंत व बाहेर जातांना दिसतात. याखेरीज पत्रद्वारें निरनिराळ्या प्रांतांतून येणाऱ्या ऑर्डर्सचा पुरवठा चालू असतो, तो निराळाच. बाजारांतील चढाओढीला टक्कर देऊन स्वतःचा गल्ला वाढविण्याचे दृष्टीनें किरकोळ व्यापारी जाहिरातीच्या मार्गाचा अवलंब करतात. रेल्वे कंपन्या, आगगाडीनें प्रवास करण्याकडे तुम्हांला परावृत्त करण्याचा प्रयत्न करतात, तर विमान संस्था विमानानें प्रवास करण्यासंबंधीचे पाठ शिकवितात. सुट्टीचे दिवस समुद्र-पर्यटन अगर नौकानयन करून कसे आनंदांत व मजेंत घालवावेत, ही शिकवणूक स्वखर्चानें शिपिंग कंपन्या देत असतात, तर निरनिराळ्या ठिकाणचीं वैशिष्ट्यें तुमच्या नजरेस आणून सिमला, नाशिक, महाबळेश्वर या ठिकाणीं तुमचा वेळ कसा उमेदींत व गमतींत जाईल हें सहल कंपन्या आपल्या नजरेंतून सुटणार नाहीं, अशा पद्धतीनें जाहिरात करून आपणांस सहकुटुंब निरनिराळ्या सहलींच्या ठिकाणीं खेंचतात.

एकंदरीत ज्यांना आपला माल अगर सेवा विकावयाची असते, ते या किंवा त्या मार्गानें जाहिरात योजना अमलांत आणतात. परस्पर-सहाय्यक जाहिरातीच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रोग्रल्यांवर (ही प्रथा एकाच धंद्यांतील लोक असोसिएशन स्थापून, समाजाच्या खिशांवर प्रभुत्व गाजविण्यासाठीं अंमलांत आणतात.) जनतेच्या संवयी बदलल्या जातात. उदाहरणार्थ 'अधिक धान्य पिकवा' "Any Time is a Tea Time" स्वदेशीला उत्तेजन देऊन, भारताचे हात बळकट करा. "Help the Railways to Help You" वगैरे वगैरे.

सामाजिक जीवनांत, नॅशनल सेव्हिंग्स असोसिएशन जनतेला पैशाचा संचय करण्याकडे परावृत्त करते. 'Safety First' संबंधित प्रचार करून लोकांना रस्त्यांतून शिस्तींत कसें चालावें, हें शिकविलें जातें. मोटार डायव्हर्सना वाहनें काळजीपूर्वक हांकण्यासंबंधीं सूचना दिल्या जातात.

नुकत्याच पार पडलेल्या दोन्ही महायुद्धांत कोट्यावधि रुपये व अपरंपार मनुष्यबळ उभें करण्यास पद्धतशीर जाहिरात-प्रचारच यशस्वी ठरला.

राजकीय शाखेंत, निरनिराळे पक्ष आपलीं प्यारीं पुढें आणण्यासाठीं, पोस्टर्स, लीफलेट्स्, रेडिओ, सिनेमा, वर्तमानपत्रें वगैरे प्रचार-साधनांचा कसा उपयोग करतात, हें आपण भारताच्या पहिल्या प्रचंड निवडणुकींत समक्षच पहात आलों आहोंत, आणि हें एकच प्रात्यक्षिक जाहिरातीची शक्ति, ॲटम बॉम्बपेक्षांहि किती प्रभावी आहे, हें सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

जाहिरातशास्त्रासंबंधीं ज्या व्यक्तींना खरोखरीच कांहीं समजत नाहीं, अगर थोडेंफार समजतें असें म्हणा, त्या लोकांच्या दृष्टीनें (सर्वसाधारणपणें त्यांची अशी समजूत असते) दरवर्षी कारखानदारांकडून जो इतका पाण्यासारखा पैसा जाहिरातीवर खर्च केला जातो, ही निव्वळ उधळपट्टीच आहे व अजूनही फार लोकांची अशी वेडी समजूत आहे कीं हा पैशाचा अपव्यय, मालाच्या किंमती वाढवून, अखेर त्याचा भुर्दंड पर्यायानें थोड्याफार प्रमाणांत गिऱ्हाइकांकडूनच वसूल केला जातो. इतकेंच नव्हे तर त्यांची अशी पक्की खात्री असते कीं, कारखानदारांनीं जाहिरातीवर इतका पैसा खर्च केला नसता, तर त्यांच्या गरजा त्यांना फार स्वस्त किंमतींत उपलब्ध झाल्या असत्या. अशा तऱ्हेची ही समजूत अत्यंत खोटी असल्याबद्दल पुष्कळ वेळां सिद्ध झालें आहे. मालाच्या किंमतीवर जाहिरातीचा कितपत परिणाम होतो, हें त्यांतील तज्ज्ञ मंडळींनीं निरनिराळ्या मार्गांनीं चौकशी करून, असें तात्पर्य उजेडांत आणलें आहे कीं बऱ्याच बाबतींत बहुतांशीं मालाच्या किंमती तर खालीं येतातच, इतकेंच नव्हे तर जवळजवळ प्रत्येक बाबतींत मालाची क्वालिटी देखील सुधारत जाते; आणि याचें कारण मालाबद्दलची झपाट्यानें वाढणारी मागणी आणि मालाचा मोठ्या प्रमाणावर होत असलेला प्रसार हें एकच दाखवितां येईल. तेव्हां अशा तऱ्हेनें मोठ्या प्रमाणांवर मालाची मागणी वाढविण्यासाठीं जाहिरातीचा या ना त्या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय गत्यंतरच नाहीं.

छोट्या कारखानदारांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं पूर्वं पुण्याईवर धंदा चालविण्याचा काल संपला असून धंद्याची ज्योत कायम तेवत ठेवायची असेल तर त्याला जाहिरातरूपी प्रचार तेलाचा कायम पुरवठा करीत राहणें अत्यंत आवश्यक आहे. इतःपर उद्यां जाहिरातीच्या जोरावर देदीप्यमान प्रकाशानें जगाचे डोळे दिपविणारे दिवे बाजारांत येतांच तुमचा निरांजन थंड होण्याचा संभव आहे याची जाणी व असली म्हणजे बस्स !

ग. वि. तांबे.

डायरेक्टर, टॉम अँड बे.

जाहिरात-प्रचाराचा उपयोग केल्यामुळें विक्रीच्या किंमती खालीं येतात, मालाची निर्मिति मोठ्या प्रमाणांवर वाढल्यामुळें निर्मितीवरील खर्च प्रमाणबद्धतेनुसार बराच कमी येतो, त्यामुळें कारखानदाराला कमी किंमतींत गिऱ्हाइकाला मालाचा पुरवठा करणें शक्य होतें व पर्यायानें एकंदरींत माणसाच्या राहणीचा दर्जा वाढतो.

पद्धतशीर व प्रचंड जाहिरातीवरील खर्चाशिवाय, मालाची मागणी वाढवून, निर्मिती खर्चांत बचत करून, आज भारतांत तयार होणारे किर्लोस्कर पेटर हें एक सर्वोत्कृष्ट ऑइल एंजिन बाजारांत फक्त रु. ११५०/- किमतींत देणें, मेसर्स किर्लोस्कर ऑइल एंजिन लि. या कंपनीला शक्य झालें असतें का ? हीच गोष्ट रेडिओ, टाइप रायटर्स, मोटर कार्स, रिस्ट वॉचेस् वगैरे उपयुक्त वस्तूंच्या किंमतीबाबत विचार करतां आपल्या निदर्शनास येईल.

तात्पर्य काय कीं, धंद्याचा पसारा वाढविण्यासाठीं, व गिऱ्हाइकाला माल शक्य तितक्या कमी किमतींत देतां यावा या दृष्टीनें, निर्मितीवरील खर्च कमी केला जाणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आवश्यक आहे व त्यासाठीं मालाची मागणी भरमसाट वाढणें जरूर आहे, व जसजशी मागणी वाढेल तसतशी व्यापारांतील चढाओढीच्या या जगांत, इतर तत्सम वस्तूंपेक्षां आपला माल कमी किंमतींत देणें आपणाला परवडेल आणि मगच राष्ट्राचे एक महान् उद्योगपति म्हणून जनता कौतुकानें आपलें स्वागत करील. पण तत्पूर्वी... जाहिरातशास्त्रांतील तज्ज्ञांचा सल्ला घेणें व त्याबर-हुकूम मालाचा पद्धतशीर प्रचार करणें हा केवळ एकच अंतिम उपाय आपणांपुढें आहे. "आज मागणी पुरव-तांना नाकीं नऊ येतात, तेव्हां जाहिरातींत व्यर्थ पैसा घालून काय उपयोग" म्हणणाऱ्या छोट्या कारखान-दारांच्या हें लक्षांत येत नाहीं कीं, पूर्वपुण्याईवर धंदा चालविण्याचा काळ संपला असून, धंद्याची ज्योत कायम तेवत ठेवावयाची असेल, तर त्याला जाहिरात प्रचाररूपी तेलाचा कायम पुरवठा करीत राहणें अत्यंत आवश्यक आहे; इतःपर उद्यां जाहिरातीच्या जोरावर देदीप्यमान प्रकाशानें जगाचे डोळे दिपवणारे दिवे बाजारांत येतांच तुपचा निरांजन थंड होण्याचा संभव आहे, याची जाणीव असली म्हणजे बस्स्!

मुद्रणालयांतील उमेदवाराचे अर्जाबरोबरचें माहितीपत्रक

(खालील माहितीपत्रक सकाळ प्रेसच्या कृपेनें घेतलें आहे.)

प्रत्येक सदर सुवाच्य, संपूर्ण व स्वतःचे हस्ताक्षरांत भरावें.

१ संपूर्ण नांव—
२ आजचा पत्ता
३ कायमचा पत्ता
४ जन्मतारीख
५ ठिकाण
६ उंची
७ वजन
८ शिक्षण तपशील
९ परीक्षा व त्यांचीं वर्षे
१० कॉलेजमधील ऐच्छिक विषय
११ सध्यां काय शिकतां
१२ पुढें कोठपर्यंत शिकणें आहे ?
१३ शिक्षणाबरोबर दुसरा कोणता व्यवसाय व किती काळ करीत होता ? त्याचा तपशील
१४ छापखाना व वर्तमानपत्र यांतील विषयांपैकीं कोणतें काम अधिक पसंत याचा क्रमशः खुलासा (१) हिशोब व्यवस्था, (२) जाहिरात पत्रव्यवहार, (३) बातमीदार, (४) इंग्रजी मराठी भाषांतर, (५) कंपोजिंग जॉबवर्क, (६) प्रुफ करेक्शन, (७) फोटोग्राफी-ब्लॉक मेकिंग, (८) मशीन प्रिंटिंग, (९) बाइंडिंग
१५ निकट परिचयाच्या पांच गृहस्थांचीं नांवें व पत्ते
१६ प्रवास केला असल्यास कोठें, केव्हां, कां ?
१७ शॉर्ट हँड, टाईपरायटिंग येतें का ? गति व अभ्यास किती काल ?
१८ सायकलिंग येतें का ? स्वतःची सायकल ?
१९ मराठीखेरीज कोणत्या भाषा येतात ?
२० आवडीनें वाचलेल्या ग्रंथांचीं नांवें
२१ फोटोग्राफी, ड्रॉइंग कार्टून्स, यापैकीं काय येतें ?
२२ खेळांचें ज्ञान व आवड ?
२३ वक्तृत्वाची आवड ?
२४ वक्तृत्वाचे प्रसंग ?
२५ लेख वा इतर गुणांबद्दलचीं बक्षिसें ?
२६ कुटुंबांतील जवळचीं माणसें व नातीं

वरील माहितीपत्रकाच्या नमुन्यावरून एक महत्त्वाची गोष्ट आम्ही पुण्यांतील व इतर सर्व मुद्रकासमोर मांडूं इच्छितो कीं मुद्रणालयांतील शिकाऊ लोक वाटेल ते असे न घेतां त्यांच्या माहितीनुसार जास्तींत जास्त गुणांचे असे लोकच मुद्रणालयांत घेतले पाहिजेत.

मुद्रण धंदा सुधारण्याचा तो एक मार्ग आहे.

—संपादक.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यांतील

★

जुने नवे चित्रकार

★ ★ ★

प्रगतिपर मुद्रणधंद्यास चित्रकार हाच खरा आधार असतो. चित्रकार, हा, पूर्व योजना व प्रत्यक्ष काम, ब्लॉक्सचें इचिंग, रंगसंगति या सर्व गोष्टींची सुंदर जुळवाजुळव करील तर मुद्रणालयांतील कामांचा दर्जा वाढतो असा अनेकांचा अनुभव आहे. पुण्यांत मुद्रणधंद्याला असलेलें आजचें स्वरूप देण्यास कांहीं चित्रकार कारणीभूत झाले. त्यांची उपलब्ध झालेली माहिती पुढें दिली आहे. पुण्यांत चांगले चित्रकार निपजले पाहिजेत, असें म्हणण्यासाठींच पुढील माहिती दिली आहे.

कै. विष्णु गोविंद ऊर्फ आप्पासाहेब काशीकर

पुण्यांतील अनेक चित्रकारांचें गुरुस्थानीं असलेले हे लिथो चित्रकार १८८६ ते १९२५ पर्यंत जीवनसूत्रांत होते. शाळेपासूनच त्यांना चित्रकलेचा नाद होता. आजारीपणामुळें शाळा सोडून द्यावी लागली व त्यांनीं चित्रशाळेंत लिथो खात्यांत काम मिळविलें. त्यांनीं स्वतःची फार लवकर प्रगति केली. लोकमान्य टिळकांचें सहा रंगांतील चित्र, पुढें एक ११ रंगांतील कॅलेंडर त्यांनीं केलें. या कामाबद्दल सरकारी खात्यांतही त्यांची प्रशंसा झाली होती.

संकेश्वर येथील शंकराचार्यांचे फोटो, लो. टिळकांची पेस्टल पोर्ट्रेट असलींही अवघड कामें ते करीत. त्यांना गुरुस्थानीं मानणारे श्री. बागाईतकर यांचा महाराष्ट्र लिथो वर्क्स हा छापखाना पुण्यांतच असून त्यामध्यें सुंदर प्रकारचीं कामें होतात. काशीकरांचे कनिष्ठ बंधु श्री. चिं. गो. काशीकर हे आजही चित्रशाळेमध्यें उत्तम लिथो आर्टिस्ट म्हणून आहेत. श्री. आप्पासाहेब काशीकर फार अल्प वयांत स्वर्गवासी झाले.

कै. श्री. विष्णु रंगनाथ ब्रह्मे

इ. स. १९०४ ते १९४८ पुणें शहरांतील सुप्रसिद्ध अक्षरचित्रकार यांनीं पुण्यांतील चित्रशाळा प्रेसमध्यें अत्यंत इमानेइतबारें प्रथमपासून शेवटपर्यंत नोकरी केली. पण त्यांना असलेल्या सवलतीप्रमाणें त्यांनीं चित्रशाळेबाहेर जवळ जवळ प्रत्येक प्रकाशकाला अक्षरांचीं कामें करून दिलीं आहेत. त्यांची आठवण पुण्यांतील प्रत्येक ब्लॉकमेकर व प्रकाशक सांगूं शकेल. त्यांचें हस्ताक्षर अत्यंत हुकुमी व सफाईदार असे. हव्या तितक्या वळणाचीं अक्षरें ते काढूं शकत असत.

त्यांचे चिरंजीव रं. वि. ब्रह्मे यांचाही हात वडलांप्रमाणेंच तयार असून ते सरस्वती आर्ट्स् या नांवानें पुण्यांतच स्वतंत्र उद्योग करतात.

कै. रा. मधुसूदन (मास्तर)

व कै. ए. एम्. माळी हेही चित्रशाळेंतच नांवाजलेले आर्टिस्ट होते.

रा. हुदलीकर

हेही पूर्वी कांहीं वर्षें चित्रशाळेंत असलेले एक अति उत्तम लिथो आर्टिस्ट म्हणून प्रसिद्ध आहेत. ते लिथो क्लास मुंबईस चालवतात. जे. जे. स्कूल आर्ट्स्मध्यें लिथोग्राफीचे शिक्षक आहेत.

बी. बी. जुवेकर

पुण्यांतील चित्रशाळा प्रेसमध्यें इ. स. १९०८ ते १९२२ पर्यंत होते. ते उत्तम डिझाइनर होते. सध्यां मुंबईस दुकानांत लावण्यास लागणाऱ्या चित्रांचे सेट करून विक्री करतात. कंत्राटी पद्धतीनें लिथोच्या चित्रांचीं कामें करतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नारायण रामचंद्र नाडगौडा

यांना न ओळखणारा छापखानदार पुण्यांत नाहीं. इतका श्री. नाडगौडा यांनीं आपला गोड स्वभाव व रेखाचित्रांवरील प्रमुख लोकांच्या परिचयाचें करून दिलें आहे. चित्रशाळेमध्यें इ. स. १९१९ सालापासून आजतागायत ते आहेत. लिथोवरील सर्व कामांची माहिती त्यांना असून दरदामाचाही त्यांचा अभ्यास खोल आहे.

पुण्यांतील अनेक प्रदर्शनांत त्यांच्या रेखाचित्रांना बक्षिसें मिळालेलीं आहेत.

भास्कर वामन खाडिलकर

सरकारी फोटो झिंको ऑफिसमध्यें उपव्यवस्थापक आहेत. पण मूळचे उत्तम चित्रकार असून त्यांनीं चांगलीं चांगलीं कामें केलेलीं आहेत. तीन रंगी ब्लॉकचें चित्राच्या बराबरीचें काम चित्रकार किती उत्तम करूं शकतो याचे उत्तम नमुने त्यांचेजवळ आहेत. जोशी आणि लोखंडे प्रकाशनांतील बरींचशीं चित्रें व नकाशे त्यांनीं काढले आहेत.

शंकर कृष्णाजी दाणी

राहणारे बेळगांवकडील. चित्रशाळा संस्थेमध्यें इ. स. १९२५ पासून १९४८ पर्यंत होते. सध्यां स्वतंत्र धंदा करतात. रेखाचित्र, रंगीत चित्रें, आकृत्या, पेस्टल वर्क या सर्व कामांत तरबेज आहेत. चित्रशाळेमध्यें थोडें-बहुत लिथो वर्कही त्यांनीं केलें. पुण्यांतील चांगल्या प्रकाशकांच्या प्रकाशनांत त्यांची चित्रें सफाईदार पद्धती-वरून स्पष्ट रेषेवरून ओळखतां येतात.

श्री. दत्तात्रय शंकर गलांडे

जोशी आणि लोखंडे प्रकाशन यांना इतिहास व भूगोल यांच्या अभिनव तक्त्यांची रचना व चित्रकला करून देणारे कल्पक चित्रकार. चित्रकार ज्ञानी असेल, इतिहासभूगोलाशीं परिचित राहील तर शिक्षणाला केवढी मदत करील हेंच त्यांच्या कामावरून प्रत्ययास येतें.

जे. बी. दीक्षित

पुण्यांतील जुने चित्रकार, जोशी लोखंडे प्रकाशन, शब्दकोशमंडळ, प्रसाद मासिक यांतील चित्रकलेचीं सर्व कामें त्यांनीं केलीं आहेत. तीन रंगी चित्रेंही ते करतात.

दत्तात्रय रामजी धनवटे

यांनीं आपलें आत्मचरित्र प्रसिद्ध केलें असून त्यांच्या वयाचीं ६० वर्षें संपलीं आहेत. ते आज शिवराज फाईन आर्ट अँड लिथो वर्क्स या १ कोटीवर भांडवलाच्या छापखान्याचे मालक आहेत. पुण्यांतील चित्रशाळा प्रेसमध्यें सन १९०८ चे सुमारास त्यांच्या चित्रकलेस सुरुवात झाली होती.

आज त्यांचेसारखे ते एकटेच आहेत.

माधव गोविंद काशीकर

हेही नामांकित लिथो आर्टिस्ट आहेत. त्यांनीं लेबलांचीं व चित्रांचीं चांगलीं कामें केलीं आहेत. ते मुंबईस होते. त्यांनीं एम्. ए. जोशी बोल्टन वगैरे प्रेसमध्यें चांगलीं कामें केलीं आहेत. त्यांचें वय सुमारें ६५ वर्षांचें आहे.

कै. ग. गो. अधिकारी

हे चित्रशाळेंत नकाशाचीं व लेबलाचीं अक्षराचीं कामें उत्तम करीत असत. त्यांनीं चित्रशाळेंतच आपलें आयुष्य घालविलें. हे आर्टिस्ट जन्मतः मुके होते.

श्री. गणेश रामचंद्र गुर्जर

हे प्रथम बालोद्यान प्रेसमध्यें, नंतर स्वतःच्या भारत प्रिंटिंग प्रेसमध्यें उत्तमपैकीं नकाशे व अक्षरांचीं कामें करणारे नांवाजलेले लिथो आर्टिस्ट आहेत.

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संघटना टिकाऊ होण्यास परस्परांचे दोष आत्मसात करण्यास शिकावें लागते व गुणांचाच तेवढा फायदा घेण्याची वृत्ती बळावणें इष्ट असतें.

पुण्यांतील मुद्रण व संलग्न संस्थांचा परिचय

पुणें मुद्रक संघ

पुण्यांतील मुद्रण व तदनुषंगिक धंद्यांच्या हितसंरक्षणार्थ वरील नांवाची संघटना आहे. परस्परांत द्वेष वाढूं नये, खेळीमेळीनें सर्व व्यवहार व्हावेत, आणि समव्यावसायिकांना एकमेकांचा भरपूर उपयोग व्हावा या दृष्टीनें संघटनांची फार आवश्यकता असते. पुणें मुद्रक संघ या बाबतींत एकंदरीत बरें कार्य करीत आहे. या संघाचा त्रोटक परिचय पुढें देत आहोंत.

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर मुद्रण व्यावसायिकांना निरनिराळ्या अडचणी भासूं लागल्या, आणि त्यांचा परिहार एकेका मुद्रकास करणें अवघड झाल्यावरून पुण्यांतील मुद्रकांची संघटना करण्याच्या हेतूनें ता. १८-५-१९१९ रोजीं पुणें प्रेस ओनर्स असोसिएशन या नांवाच्या संस्थेची रीतसर स्थापना करण्यांत आली. या असोसिएशनचे पहिले अध्यक्ष व चिटणीस म्हणून कै. अनंत विनायक ऊर्फ वामनराव पटवर्धन आणि कै. केशवराव बाळ यांना अनुक्रमें निवडण्यांत आलें. संस्थेच्या पहिल्या १०।१२ वर्षांच्या आयुष्यांत मासिक सभा घेणें, सरकारकडून मुद्रण धंद्यावर आघात करणाऱ्या कायद्यांबद्दल मतप्रदर्शन करणें, मुद्रणालयांकडून जामीनक्या घेण्यांत आल्या तर त्याबद्दल सरकारकडे तक्रार करणें, वगैरे कामें प्रामुख्यानें होत असत. साधारणतः १९२९ ते १९३४ पर्यंतचा काळ असोसिएशनला अत्यंत मंदीचा गेला असें म्हणावयास हरकत नाहीं. पण या खडतर परिस्थितींतूनहि बाहेर येण्याचा योग जानेवारी १९३४ मध्यें आला. समर्थभारत प्रेसचे श्री. दत्तोपंत सरदेसाई, राजगुरु प्रेसचे श्री. बापूराव राजगुरु व आनंदचे श्री. गो. ब. जोशी यांनीं असोसिएशनचा जीर्णोद्धार करण्याचें ठरविलें आणि ता. २७-१-१९३४ रोजीं भरलेल्या सभेंत पुणें प्रेस ओनर्स असोसिएशनची सभा होऊन श्री. सरदेसाई व गोपाळराव जोशी यांची चिटणीसपदावर निवड करण्यांत आली. यानंतर प्रथम एक वर्षभर मासिक सभा व नंतर पाक्षिक सभा होत असत आणि त्यामध्यें विविध प्रश्नांची चर्चा होत असे. संघटना टिकाऊ होण्यास परस्परांचे दोष आत्मसात् करण्यास शिकावें लागतें, आणि गुणांचाच तेवढा फायदा घेण्याची वृत्ति बळावणें इष्ट असतें. सन १९३४ ते १९३७ च्या काळांत असोसिएशनच्या सभासदांमध्यें बराच एकोपा वाढला आणि कांहीं तरी विधायक कार्य करावें असें सभासदांस वाटूं लागलें. या सामुदायिक इच्छेचा परिपाक सन १९३७ च्या एप्रिल महिन्यांत अखिल भारतीय मुद्रण परिषद व प्रदर्शन भरविण्यांत झाला. या परिषदेचें अध्यक्षस्थान मद्रासचे श्री. शास्त्रलू यांनीं स्वीकारलें होतें. परिषदेंत बरेच ठराव पास करण्यांत येऊन शिवाय कांहीं उद्बोधक निबंध वाचण्यांत आले. परिषदेला जोडून भरविलेल्या निरनिराळ्या छपाई यंत्रांचें प्रात्यक्षिक दाखविण्यांत आलें होतें.

ही परिषद व प्रदर्शन यशस्वी झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यानंतर १९३९ मध्यें दुसरी मुद्रण परिषद कलकत्त्याचे श्री. तुषार कांति घोष, संपादक 'अमृत-बझार पत्रिका' यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली. या अधिवेशनाच्या वेळीं 'भारतीय प्रेस डिरेक्टरी' असोसिएशनतर्फे प्रसिद्ध करण्यांत आली. या 'डिरेक्टरी' चें संपादन श्री. वि. अ. पटवर्धन यांनीं केलें होतें. जानेवारी १९३८ पासून असोसिएशनतर्फे 'मुद्रणप्रकाश' मासिक सुरू करण्यांत येऊन त्याची संपादकीय व व्यवस्थापकीय जबाबदारी श्री. शं. ब. सहस्रबुद्धे, शं. रा. दाते व वि. अ. पटवर्धन यांनीं घेतली होती. तीन चार वर्षें मासिकांचें काम व्यवस्थितपणें चाललें होतें, पण पुढें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत तें कांहीं काळ स्थगित झालें. १९३९ मध्यें दुसऱ्या महायुद्धास सुरवात झाल्यानंतर जे नवीन प्रश्न उपस्थित झाले, त्यांचा योग्य तो समाचार मुद्रणप्रकाशनें घेतला. विशेषतः कागदाचा काळा बाजार सुरू झाल्यानंतर मुद्रण प्रकाशनें त्यावर टीका करून या प्रश्नास जाहीरपणें वाचा फोडली. गेल्या सहा वर्षांपासून मुद्रणप्रकाश नवीन स्वरूपांत श्री. देवकुळे यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत आहे.

सन १९४२ मध्यें कागदाची दुर्मिळता फार झाल्यावर कागद मिळविण्याची विवंचना लागली. मुंढवा, म्हैसूर, शिरपूर येथील गिरण्यांच्या चालकांना भेटून योग्य ती खटपट करण्याकरतां असोसिएशननें श्री. पटवर्धन, सरदेसाई व पंडित या सदस्यांची एक समिति नेमली. या समितीच्या खटपटीस यश येऊन मुंढवा कागद गिरणीचे श्री. पदमजी व डॉ. भडकमकर यांनीं कागद देण्यास जी सुरुवात १९४२ मध्यें केली, ती आजतागायत चालू आहे. म्हैसूर कागद गिरणीकडूनही १९४३ ते १९४५ या काळामध्यें थोडाबहुत कागद मिळाला. म्हैसूर गिरणीची पुण्यापुरती एजन्सी असोसिएशनकडे आहे. रॉकेलची चणचण जेव्हां भासूं लागली तेव्हां स्थानिक अधिकाऱ्यांना भेटून कांहीं सामायिक व्यवस्था करण्यांत आली आणि तें काम श्री. शं. व. सहस्रबुद्धे यांच्या देखरेखीखालीं पांच वर्षें चाललें होतें. या व्यवस्थेमुळें वैयक्तिक सभासदांचा बराच त्रास वांचला आणि सोयही पुष्कळ झाली.

सन १९४४ च्या जूनमध्यें कागदनियंत्रणाचा हुकूम प्रसिद्ध झाल्यावर सर्वत्र मुद्रकवर्गांत अत्यंत खळबळ उडून गेली. ता. ११-७-१९४४ रोजीं सर अकबर हैदरी यांनीं मुंबईस जी सभा बोलाविली होती, त्या सभेंत असोसिएशननें भाग घेतला होता. या हुकुमांतील निरनिराळ्या कलमांविरुद्ध एक विस्तृत टीका करून ती हिंदुस्थान सरकारला सादर करण्यांत आली. त्या वेळचे व्यापार खात्याचे चिटणीस डॉ. बी. एन्. कौल यांना भेटण्यासाठीं एक शिष्टमंडळ असोसिएशननें पाठविलें होतें. असोसिएशननें केलेल्या टीकेबद्दल योग्य प्रशस्ति सरकारच्या एका पत्रांत करण्यांत आली आहे. यावरून असोसिएशननें या प्रश्नाचा विचार किती मुद्देसूदपणें केला होता याची कल्पना येईल. युद्धधोका विम्याबाबत सरसरकारनें जो वटहुकूम काढला होता, त्याबद्दलही एक मार्मिक कैफियत सरकारला सादर करण्यांत आली होती.

मुद्रण साहित्यभांडाराची स्थापना ता. १०-९-१९४५ रोजीं करण्यांत येऊन असोसिएशनच्या सभासदांना स्वस्त दरानें मुद्रणोपयोगी माल मिळण्याची तजवीज करण्यांत आली आहे. या मुद्रण साहित्यभांडारांतील नफ्याचा विनियोग मुद्रणशाळा काढणें, मुद्रण वाङ्मय प्रकाशित करणें व तत्सम कामासाठींच व्हावा अशी सभासदांची इच्छा आहे व असें कांहीं विधायक कार्य करण्यासाठींच भांडाराचा जन्म झाला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

कारखान्यांचा कायदा, छापखान्यांकडून मागितलेल्या जामिनक्या, प्रेस ॲक्ट वगैरेबाबत सरकारकडे संस्थेकडून कैफियती सादर करण्यांत आल्या आहेत. शिक्षित कामगारांचा अभाव असल्याची तक्रार आहे. हा दोष आपला एका धंद्यांतच आहे असें नसून हरएक बाबतींत असल्याची तक्रार ऐकूं येते. पण ही तक्रार दूर करण्याचा मार्ग म्हणजे आम्ही आमच्या मुद्रणव्यवसायाची शिक्षण देणारी शाळा काढणें हा होय. मुद्रणशाळा काढणेचें मोठें कार्य पुणें मुद्रक संघानें आपल्या डोळ्यांसमोर ठेवलें आहे, आणि तें शक्य तितक्या लवकर तडीस जावें अशी इच्छा आहे.

संस्थेचें एक ग्रंथालय ठेवलें असून वाढविण्याची खटपट होत असून त्या दिशेनें खटपट चालू आहे.

महाराष्ट्र स्कूल बुक्स पब्लिशर्स असोसिएशन

सप्टेंबर १९३९ मध्यें महायुद्ध सुरू झालें आणि सर्वत्र धंद्यांचे समोर अडचणी उभ्या राहूं लागल्या. त्या संकटांना सांघिक रीतीनें तोंड देण्यासाठीं दिनांक ११-१०-४४ रोजीं वरील संस्थेची स्थापना झाली आहे.

या संस्थेनें वेळोवेळीं प्रकाशकांच्या हितरक्षणासाठीं पुढीलप्रमाणें गोष्टी केलेल्या आहेत. पेपर कंट्रोल इकॉनमी ऑर्डर १९३९ प्रमाणें पुस्तकप्रकाशकांचा कोटा ५० टक्के केला होता तो वाढवून घेतला. सभासदांना कंट्रोल दरांत कागद मिळण्याची व्यवस्था केली. कागदाच्या किंमतींत वाढ जसजशी झाली तसतशी पाठ्यपुस्तकांच्या किंमतींतही सरकारकडून वाढ करवून घेतली. नवीन निर्माण झालेल्या पाठ्यपुस्तकांच्या मंजुरीवर सरकारनें लादलेला निर्बंध रद्द

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करावयास लावला. त्याचप्रमाणें वेळोवेळीं सरकार करीत असलेल्या पुस्तकें लावण्याच्या धोरणाबाबत तक्रारी, गाऱ्हाणीं करून प्रकाशकांचे हितसंबंध या संस्थेनें संरक्षिले आहेत.

असोसिएशनचे प्रमुख हेतु व ध्येय पुढीलप्रमाणें आहेतः—

(१) प्रकाशन धंद्याचे हितासंबंधींचे सर्व प्रश्नांचा सामुदायिक विचार व वाटाघाट करणें.

(२) समासदांच्या हिताचें रक्षण करणें,त्यांचें एकंदरीनें सार्वत्रिक कल्याण करणें व धंद्याची पातळी वाढवून सर्वांगीण उन्नति करण्याचा प्रयत्न करणें.

(३) धंद्यास उपयुक्त अशी माहिती सभासदांना पुरविणें, त्यांतील ध्येय साधण्यासाठीं जरूर ते ठराव करणें व हल्लींच्या सरकारी नियमांत जरूर त्या दुरुस्त्या घडवून आणणें.

या असोसिएशनतर्फें दि. ७ व ८ जुलै १९५१ रोजीं मुंबई राज्य शालेय पुस्तक परिषद, पुणें येथें डॉ. सर रघुनाथराव परांजपे यांचे अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली.

या परिषदेची फलश्रुति पुढीलप्रमाणें आहे—

(१) मुंबई राज्यांतील शालेय पुस्तकांचे लेखक, प्रकाशक, पुस्तकविक्रेते, शिक्षणतज्ज्ञ व पालक एकत्र येऊन एकमेकांचा परिचय झाला. शालेय प्रकाशनाचें महत्त्व व या धंद्यांतील अडचणी व त्यांचें निवारण सांघिक कार्यानें त्वरित होतें हें निदर्शनास आलें.

(२) मुंबई राज्याचें शिक्षण खात्याचें सरकार यांनीं परिषदेनें पास केलेल्या ठरावांचा सहानुभूतिपूर्ण विचार करून सन १९५२–५३ सालांकरितां सर्व प्रादेशिक विभागांत एका इयत्तेस एका विषयास एक पुस्तक लावण्याचें धोरण मागें घेऊन प्रत्येक भाषिक विभागास प्रत्येक इयत्तेस प्रत्येक विषयास तीन पुस्तकांची निवड करण्याचें ठरविलें.

देवनागरी टाईप फाऊंडरी

'स्वातंत्र्य' पी. वाय्. सी. ग्राऊंडजवळ पुणें ४

आमचेकडे

- १४ व १६ पॉईंट डिग्री पद्धतीचा साधा व ब्लॅक
- २४ पॉईंट संत अगर पँटर टाईप डिग्री
- ग्रेट फेस इंग्लिश बॉडी डिग्री
- १२ पॉईंट अखंड साधा व ब्लॅक
- १४ व १६ पॉईंट अखंड साधा व ब्लॅक तयार होत आहे.

★ उच्च दर्जाचें अलॉय मेटल ★ सुंदर वळण ★ माफक दर

आमचेकडील प्रत्येक टाईप पॉईंट पद्धतीवर पाडला जातो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यावसायिक आत्मपरीक्षण

पुण्यांतील मुद्रण धंद्याचा आढावा घेणारा हा अंक काढण्याचा विचार मनांत येतांच पुण्यांतील मुद्रणव्यवसायाची माहिती गोळा करण्यांत २-३ महिने घालवावे लागले. ती सर्व माहिती मिळाल्यानंतर त्या माहितीवरूनच पुण्याच्या मुद्रणधंद्याच्या एकंदर स्वरूपाबद्दलची कांहीं मुद्यावरून संपादक मंडळांत चर्चा झाली. त्या चर्चेचा निष्कर्ष म्हणजेच हें व्यावसायिक आत्मपरीक्षण आहे. सुधारणा झाली पाहिजे हें ध्रुव वाक्य आहे, परंतु ती सुधारणा बरोबर कोणती हवी व ती कशी होईल याचेंच विवेचन या आत्मपरीक्षणांत वाचावयास मिळूं शकेल.

कृतज्ञता

मुद्रणप्रकाशाचा आजचा शंभरावा अंक आमच्या व्यवसायबंधूंच्या हातीं देतांना आम्हांस फार आनंद होत आहे. मुद्रणप्रकाशाचा पहिला अंक जानेवारी १९३८ मध्यें निघाला आणि दुसऱ्या महायुद्धाच्या त्रासदायक काळांत मुद्रणप्रकाशाचें प्रकाशन योग्य वेळीं कांहीं कांहीं वेळां न झाल्यामुळें हा शंभरावा अंक एकशें तेरा महिन्यांनीं निघत आहे. मध्यें पडलेला हा खंड खेदजनक असला, तरी त्याची भरपाई सध्यांचे मुद्रणप्रकाशाचे व्यवस्थापकांनीं उत्तम तऱ्हेनें भरून काढली आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो. सन १९३७ मध्यें भारतीय मुद्रण परिषदेचें अधिवेशन पुण्यास भरल्यानंतर, ज्या संस्थेच्या आश्रयाखालीं मुद्रणप्रकाश प्रसिद्ध होत आहे, त्या पुणें मुद्रक संघास आपलें एखादें मुखपत्र असावें असें वाटून, मुद्रणप्रकाश त्रैमासिकाच्या स्वरूपांत प्रथम प्रकाशित होऊं लागलें. सव्वा वर्षानंतर तें मासिक पत्रिकेच्या स्वरूपांत प्रसिद्ध होऊं लागलें आणि गेलीं पांच वर्षें सध्यांच्या स्वरूपांत दरमहा प्रसिद्ध होत आहे. मुद्रणप्रकाशाची ही ज्योत प्रथम श्री. शं. ब. सहस्रबुद्धे यांनीं लावली आणि ती जागती ठेवण्याचें कार्य श्री. मामाराव दाते, वि. अ. पटवर्धन, दि. दा. गांगल, प्रा. र. ना. चाफेकर यांनीं आजवर केलें; आणि तेंच कार्य आपल्या शक्त्यनुसार सध्यांचें मुद्रणप्रकाशाचें संपादकमंडळ करीत आहे. पुणें मुद्रक संघाची आर्थिक बाजू विशेष भरभक्कम कधींच नसल्यामुळें संघाच्या आशीर्वादानें पण स्वतःच्या जबाबदारीवर मुद्रणप्रकाशाची आर्थिक धुरा श्री. शं. ब. सहस्रबुद्धे, मामाराव दाते, वि. अ. पटवर्धन, आणि व. ग. देवकुळे यांनीं आपल्या शिरावर आपापल्या व्यवस्थापकीय काळांत घेतली होती व आहे; व म्हणूनच आजचा मुद्रणप्रकाशाचा शंभरावा अंक प्रकाशित होण्याचा योग आला आहे. या सर्व मंडळींनीं पुणें मुद्रक संघाच्या प्रेमाखातर ही जी आपुलकीची भावना प्रकट केली, त्याबद्दल त्यांचें कृतज्ञतापूर्वक स्मरण करून त्यांचे आम्हीं या प्रसंगीं आभार मानीत आहों. शिवाय गेल्या बारा वर्षांच्या काळांत ज्या लेखकांनीं आम्हांस साहाय्य केलें, त्यांचेही आम्ही अत्यंत आभारी आहों. त्यांच्याच मदतीमुळें मुद्रणप्रकाशाला आजचें स्वरूप आलें आहे हें आम्ही विसरूं शकत नाहीं; आणि भविष्यकाळांत या व भावी लेखकांच्या सहकार्यानें मुद्रणप्रकाशाला सध्यांपेक्षां जास्त मोहक स्वरूप येईल असा आम्हांस भरंवसा वाटतो.

मुद्रकांचें सहकार्य

या शंभराव्या अंकाची कल्पना जेव्हां मनांत आली, तेव्हां या अंकाकरतां कोणत्या तऱ्हेची माहिती मिळेल, याची कल्पना नव्हती; आणि जी माहिती मिळेल, त्याचा उपयोग आम्हांस कसा करून घेतां येईल याचीही आम्हांस कल्पना नव्हती. कारण अशा तऱ्हेची माहिती मिळवून त्यावरून कांहीं प्रमेयें बांधणें हा आपल्याला नवीन अनुभव आहे. आम्हीही या प्रांतांत अगदीं नवखे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहों. परदेशांत निरनिराळ्या धंद्यांची पाहणी करून त्यावरून निघालेले सिद्धांत हे धंदासुधारणेला उपयुक्त ठरत असतात. पाश्चात्यांनीं प्रत्येक गोष्टीचें शास्त्र करून अवडंबर केलें आहे अशा प्रकारची टीका जरी कोणीं केली, तरी पाश्चात्य देशांत हरएक बाबीची चिकित्सा केली जाते, ही महत्त्वाची गोष्ट दृष्टीआड करून चालणार नाहीं. त्यांच्याकडे माहिती मिळविण्यास अडचण पडत नाहीं, तर आपल्याकडे आपलें धंद्याचें गुपित फोडलें जाईल काय, या भावनेनें कोणत्याही माहितीचा स्फोट करण्यास कोणी तयार होत नाहीं. आपली उन्नति व्हावयाची असेल, तर आपल्या मागील लोकांना कोणत्या अडचणी आल्या याची माहिती होणें अवश्य आहे. 'मागच्यास ठेच, पुढला शहाणा' ही म्हण आपण वाचतों! पण तिचा व्यवहारांत अवलंब मात्र करीत नाहीं; आणि त्यामुळें 'मागचा शहाणा' होण्यास त्याला परत ठेचकाळतच जावें लागतें. पण आम्हांला आनंदानें येथें नमूद करावेंसें वाटतें कीं, या शंभराव्या अंकाकरतां पुण्यांतील मुद्रणव्यवसायाची माहिती गोळा करण्याचें ठरविलें आणि मुद्रकांच्या समक्ष भेटी घेण्यांत आल्या, त्या वेळीं आमच्या व्यवसायबंधूंनीं आमचें चांगलें स्वागत करून आम्हांला बरीच माहिती दिली हें येथें नमूद करणें आवश्यक आहे. या पहाणीच्या निमित्तानें आणि जी माहिती मिळाली त्यावरून आपला व्यवसाय होता कुठें, आज कोठें आहे, त्यामध्यें सुधारणा किती झाली आणि इतरत्र गांवांच्या मानानें आपलें स्थान कोठें आहे याचें व्यावसायिक आत्मपरीक्षण करणें हाच या लेखाचा प्रधान हेतु आहे. हें आत्मपरीक्षण करतांना मुद्रकांनीं कोणते मार्ग आपल्या पायाखालीं तुडवले याचाही थोडाबहुत विचार प्रसंगानुरूप आम्ही करूं.

छापखान्यांबद्दलचा दृष्टिकोण

पुणें हें महाराष्ट्राचें विद्याकेंद्र असून येथें सन १८२० ते १८३० च्या दरम्यान पहिला सरकारी छापखाना सुरू झाला आणि १०३ वर्षांपूर्वीं कृष्णशास्त्री चिपळूणकरांच्या खटपटीनें ज्ञानप्रकाश छापखान्याचा व दैनिकाचा जन्म झाला. पुण्यांत ज्या कांहीं नवीन चळवळी झाल्या, अगर नवीन नवीन गोष्टी प्रचारांत आल्या, त्याचा पाया सार्वजनिक जीवनाचा असल्यामुळें, त्या नवीन चळवळींची उभारणी व वाढ ही उपयुक्ततेच्या दृष्टीनें होत गेली, आणि सौंदर्याच्या दृष्टीनें अगर कलात्मक दृष्टीनें त्या प्रश्नाकडे पाहिलें न गेल्यामुळें, त्या त्या व्यवसायाची कलात्मक



वाढ होऊं शकली नाहीं असें दिसून येतें. मुद्रण हीही एक कलाच असल्यामुळें मुद्रणाची पुण्यांतील वाढ कलात्मक दृष्टीनें व्हावी अशी झाली नाहीं हें नाकबूल करून चालणार नाहीं. गेल्या सुमारें सव्वाशें वर्षांत किती तरी छापखाने निघाले आणि अस्तंगत झाले, पण त्यांचें वैशिष्ट्य कोणत्या स्वरूपाचें होतें आणि ते निजधामास कोणत्या कारणानें गेले याची माहिती मिळणें फार अवघड आहे. आर्यभूषण, चित्रशाळा व केसरी हे तीन छापखाने असे आहेत कीं ज्यांची षष्ठ्यब्दिपूर्ति झाली आहे. वर सांगितलेंच आहे कीं सार्वजनिक जीवनाचा पाया अगर साधन म्हणून छापखान्याकडे पाहण्याचा प्रघात होता आणि राष्ट्रीय जीवनांत कलेचें महत्त्व या दृष्टीनें मुद्रण धंदा हाताळला गेला नाहीं. छापखाना हें साधन होतें, साध्य नव्हतें. पारतंत्र्यांतील वृत्तपत्रांचें जीवन स्वतंत्र आणि स्वावलंबी होण्यास पूरक म्हणून छापखान्याकडे पाहिलें जात असे. स्वतंत्र वाङ्मय प्रकाशित करतां यावें हीच भावना या मुद्रणालयांच्या बुडाशीं होती. केसरीकरतां म्हणून आर्यभूषण छापखाना विष्णुशास्त्री चिपळूणकर, टिळक, आगरकरांनीं काढला; चित्रशाळेच्या स्थापनेबाबत

अशाच विचाराची राजकीय बैठक चिपळूणकरांची होती. केसरी व आर्यभूषण छापखाना, यांची फारकत होऊन, पुढें कित्येक वर्षांनीं भारत सेवक समाजानें आर्यभूषण छापखाना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व ज्ञानप्रकाश आपल्या मालकीचा केला, तेव्हां हीच सार्वजनिक तळमळ या छापखान्याच्याबाबत होती. केसरीचें अपवादात्मक उदाहरण सोडलें तर वृत्तपत्रीय जीवन हें नेहमीं आंतबट्ट्याचें असे; आणि वर्तमानपत्रांतील तूट भरून काढण्यासाठीं छापखान्याचा फायदेशीर धंदा उपयोगी पडेल अशी तेव्हांपासूनची कल्पना होती आणि ती आजतागायत कायम आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं.

मुद्रणकलेची अपेक्षा

लो. टिळकांनीं 'केसरी' करतां केसरी छापखाना काढला आणि तो धंद्याच्या दृष्टीनें मुळींच चालविला नाहीं. केसरी छापखान्यांत टिळकांच्या हयातींत अगर

नंतरही बरेच वर्षेपर्यंत 'केसरी' शिवाय इतर कोणतेंही मुद्रण होत नसे. आजही केसरीनें तीच परंपरा चालविली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. टिळकांचें सर्वच अलौकिक. त्यांनीं 'केसरी' समृद्ध केला; छापखाना काढला, पण मुद्रण धंदा केला नाहीं, इतकेंच काय पण स्वतःचें 'गीतारहस्य' ही दुसऱ्या छापखान्यांत छापून घेतलें. पण अशा तऱ्हेचें अलौकिकत्व सर्वांच्या वांट्याला कसें येणार ? आर्यभूषण छापखाना हा भारत सेवक समाजाच्या 'ज्ञानप्रकाश' ला व समाजाच्या विविध कार्यांना आर्थिक दृष्ट्या हितकारक झाला हें सर्वश्रुत आहे. भारतसेवक समाजाचे संस्थापक ना. गोखले काय अगर लो. टिळक काय यांची आपापल्या छापखान्याकडे पाहण्याची दृष्टि ही साधनाच्या स्वरूपाची असल्यानें, त्यांच्या या विचाराची छाया ही इतरत्र उमटली असल्यास नवल नाहीं. त्या काळांत वर्तमानपत्रें म्हणजे राजकीय जागृतीचें अमोघ साधन असल्यामुळें, त्या काळांत

चित्रशाळा प्रेस

इ. स.

१८७७ सालीं कै. विष्णुशास्त्रींनीं भागीदारांबरोबर काढला. ऐतिहासिक चित्रें छापण्याचा उद्देश !

१८८० वासुकाका जोशी यांचा प्रवेश

१८९० वासुकाकांचे चित्रकार रविवर्मा व इतरांचें सहाय्य घेण्याचे प्रयत्न.

१८९७ शं. न. जोशी यांचा चित्रशाळेंत प्रवेश

१८९८ मध्यें शालापत्रक चित्रशाळेंत छापणें सुरू झालें.

१९०१ ते १९०३, १९१८ ते १९१९ (वासुकाकांचा परदेश प्रवास.)

१९०५ १२ जूनला इतरांची भागीदारी नष्ट होऊन करारमदार झाले व वासुकाका कर्जबाजारी चित्रशाळेचे मालक झाले.

१९०५ मध्यें चित्रशाळेंत फोटो काढण्याचें काम चाले. मोडी पुस्तकांचें मोठें टेंडर मिळालें.

१९०६ पुस्तक-प्रकाशनाचा उद्योग सुरू.

१९१० सालीं ब्लॉकमेकिंग खातें सुरू.

१९१० चित्रमयजगत् मासिक सुरू.

१९११ सालीं टाईप फौंड्री सुरू.

१९२० पर्यंत चित्रशाळा स्टीम प्रेस बॉयलरवर (पाण्याच्या वाफेचें यंत्र) यंत्रें चालत.

१९१५ बालवाङ्मय, नकाशे, तक्ते छापणें सुरू.

१९२२ यंत्रें ऑइल एंजिनवर चालू.

१९२८-१९३५ स्फूर्ति व नंतर ध्रुव सुरू.

१९३०-४० यंत्रें इलेक्ट्रिकवर सुरू केलीं.

१९४४ १२ जानेवारी वासुकाकांचा मृत्यु

१९४४ १० फेब्रुवारी शं. न. जोशी यांचा मृत्यु

१९४४ पांच ट्रस्टींच्या देखरेखीखालीं सुरुवात.

१९४७ प्रकाशनांची पुनर्रचना व व्यवस्था

आज छापखान्यांत छपाईचीं सर्व प्रकारचीं कामें होतात. लहान लहान सुधारणाही चालू आहेत व १७५ कामगार आहेत. १९४४ पासून दा. त्र्यं. जोशी हे व्यवस्थापक आणि व. ग. देवकुळे हे उपव्यवस्थापक आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छापखाने व वृत्तपत्रें यांची वाढ झाली; पण छापखान्याकडे साधनाच्या दृष्टीनें पाहिलें गेल्यामुळें छापखान्याच्या धंद्याची म्हणून ज्याला प्रगति म्हणतां येईल, अशी झाली नाहीं. केसरी छापखान्याचा प्रश्न जरी अपवादात्मक सोडला, तरी इतर जे ज्येष्ठ छापखाने आहेत, त्यांची प्रगति आर्थिक दृष्टीनें जरी झाली असली, तरी मुद्रणकलात्मक दृष्टीनें झाली आहे असें म्हणणें फार अवघड आहे. मुद्रणांतील अद्ययावत् यंत्रसामुग्री आपणांस पुण्यांत पाहावयास मिळत नाहीं. नवीन नवीन सुधारणा केल्या गेल्या आहेत असें दिसत नाहीं. मुद्रणव्यवसायावर ज्यांनीं पैसा मिळविला; त्यांनीं आपल्या पुढील पिढीला मुद्रणकलेच्या अध्ययनासाठीं परदेशीं पाठविलें आहे असें फारसें आढळत नाहीं. या सर्व कारणांनीं पुण्यांतील मुद्रणकलेची वाढ सौंदर्यात्मक दृष्टीनें झाली नाहीं असें दिसतें. आज मुंबईकडे पाहिलें आणि तेथें प्रतीत होणारी मुद्रण-कलेची वाढ जर पाहिली, तर पुणें मागें कां पडलें असावें असा विचार मनांत येतो आणि त्याची चिकित्सा करतांना छापखान्याकडे पाहण्याची दृष्टि वेगळी असल्यामुळें हें असें घडलें असावें अशी शंका येऊं लागते. मुंबईच्या वातावरणांत जसें सौंदर्याचें अधिष्ठान हरघडीं दिसतें, तसें तें पुण्याच्या वातावरणांत नाहीं असा आक्षेप येण्याचा संभव आहे. पण तो आम्हांला तितकासा पटत नाहीं. प्रखर ध्येयवादाच्या परिपूर्ततेकरतां झटतांना साधनाची वाढ करण्याकडे साहाजिकच दुर्लक्ष झालें असेल असा आमचा समज आहे. पण आतां स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मुद्रणकलेकडे अशा उपेक्षित बुद्धीनें पाहून चालणार नाहीं, तर त्याचा दर्जा आणि वाढ ही परदेशाप्रमाणें व्हावयास पाहिजे आहे हें कोणीही विसरून चालणार नाहीं.

मुद्रणालयांचें सातत्य कां नाहीं ?

गेल्या शंभर वर्षांत कितीतरी मुद्रणालयें निघालीं आणि गेलीं. पुण्यांतील छापखान्यांची इतरत्र जी जंत्री दिली आहे, त्यावरून किती छापखान्यांनीं आपली पंचविशी गांठली आहे याची माहिति मिळेल; आणि गत कालाकडे नजर टाकल्यास किती तरी मुद्रणालयें काळांच्या गर्तेत नामशेष झालेलीं पाहून खेद झाल्याशिय रहाणार नाहीं. परदेशांत संस्थांची शंभरावी साजरी करतात, तर आपल्याकडे पंचविशी (रौप्यमहोत्सव) साजरी होते. आपल्याकडे वर्षानुवर्षें सातत्य कां राहूं शकलें नाहीं बरें ? जगद्धितेच्छु प्रेस, विजय प्रेस, गणेश प्रेस यांसारखे आमच्या आठवणींत एका काळीं पूर्ण भरभराटीत असलेले छापखाने दिवंगत कां झाले बरें ? धंद्यांत अकस्मात् ठोकर बसली म्हणून कीं इतर कांहीं परिस्थितीमुळें ? कीं धंद्यांतील परंपरेच्या अभावानें ? याची कारणमीमांसा संशोधली जावयास पाहिजे. आज जे छापखाने साठ सत्तर वर्षें तग धरून आहेत त्यांच्या दीर्घायुष्याचें कारण काय ? गेल्या शंभर सव्वाशें वर्षांत फार मोठ्या नांवारूपास न चढलेले, पण मुद्रणव्यवसायांतील किती तरी छापखाने असे आहेत कीं, ज्यांचा नामनिर्देशही कोणास आठवूं शकत नाहीं. मुद्रणव्यवसाय हा कांहीं अगदीं बिनभांडवली आणि कलाशून्यतेचा धंदा नव्हे कीं, ज्यांत आज पदार्पण करावें आणि उद्यां तो फुंकून टाकावा ? श्री. चिं. ग. कर्वे यांच्या पहिल्याच लेखांत जुन्या काळीं अस्तित्वात असलेल्या छापखान्यांची यादी दिली आहे, त्यावरून आज त्यांपैकीं किती जिवंत नाहींत याची कल्पना येऊं शकेल. तेव्हां मुद्रणव्यवसायांतील मुद्रणाल-यांच्या जन्ममरणाचें प्रमाण जास्त कां असावें याचा विचार करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अशा प्रकारचा विचार करतांना आणि जुन्या माहीतगार माणसांशीं याबद्दल विचारविनिमय करतांना असें आढळून येतें कीं, या मरणाचीं तीन कारणें असावींत:–(१) आपला धंदा पुढें चालविण्यास आपली पुढील पिढी तयार नाहीं. (२) धंद्यांत नुकसानी आली म्हणून; व (३) मुद्रणव्यवसाय करतांना तो एकनिष्ठतेनें न करतांना, इतर धंदे केले म्हणून. या तिसऱ्या कारणांत मुद्रण मालकांनीं सट्टेबाजी करणें, शर्यतीचा नाद लावून घेणें इत्यादि तत्सम कारणांचा समावेश होतो.



अशा माणसांचा आपल्याला विचार कर्तव्य नाहीं; पण या विधानांतून एक सत्य मात्र बाहेर पडलेलें दिसतें कीं, ' धंदेबाजी करून या महाभागांना पैसा मिळाला, पण त्याचा विनियोग योग्य तऱ्हेनें करण्याची अक्कल न राहिल्यामुळें, त्यांचा धंदा रसातळाला गेला. दुसऱ्या प्रकारांतील मुद्रणालयांची संख्या किती आहे आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थीं छापखान्यांना कशा तऱ्हेनें नुकसानी सोसावी लागली आणि त्यामुळें किती छापखान्यांना आपला व्यवसाय गुंडाळावा लागला याची माहिती मिळत नाहीं. पण व्यवस्थितपणें जर व्यवसाय केला, तर सर्वसाधारणतः हा व्यवसाय मानानें चालवितां येणें शक्य आहे असें आढळून येतें. या शंभराव्या अंकाकरतां ज्या मुद्रकांनीं आपली माहिती पाठवून देऊन आपला या धंद्याबद्दलचा सर्वसाधारण अभिप्राय कळविला आहे, त्यावरून असें दिसतें कीं, हा मुद्रणव्यवसाय जर नीट केला, तर चार पैसे गांठीं पडण्यास हरकत नाहीं. आज ७० च्या उमरींत असलेले कलागृह प्रेसचे श्री. दाते यांचाही असाच अभिप्राय आहे. असें असूनही ज्यांनीं हा धंदा केला, त्यांना तो पुढें कां सोडून द्यावा लागला त्याच कारण पहिल्या प्रकारच्या कारणमीमांसेंत आढळून येतें. मुद्रणव्यवसायांत सुशिक्षित माणसें फारशीं पडलीं नव्हतीं; हा अशिक्षितांचा धंदा अशीच साधारण समजूत होती.

चिपळूणकर आणि मुद्रणकला

आर्यभूषण छापखान्याची स्थापना करतांना कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर लिहितात. "गेल्या वर्षाच्या उपसंहारांत सांगितलेला छापखाना तो हा होय. यांत पूर्वोक्त विद्यालयीन (न्यू इंग्लिश स्कूलची) मंडळीच भागीदार असून, त्यांच्या परिश्रमावर हेंही अवाढव्य काम सुरूं झालें आहे. आजपर्यंत इतर सर्व व्यापाराप्रमाणें छापखान्यांचा उद्योगही अविद्वान् व अडाणी लोकच प्रायः करीत आले आहेत. त्यामुळें अज्ञानध्वंसनाविषयीं केवळ वज्रच असें जें मुद्रणयंत्र त्याचा प्रभाव व्हावा तितका प्रकट झाला नाहीं." (निबंधमाला ६ वें वर्ष–शेवटचा अंक) ही जी स्थिति ७५ वर्षांपूर्वी होती, ती आज पूर्णपणें बदलली आहे असें मानण्याचें कारण नाहीं. मुद्रणव्यावसायिकांना आजही वरच्या मानानें लेखलें जात नाहीं, हें कटु सत्य आहे. या कटु सत्याच्या बुडाशीं मुद्रणकला परंपरागतरित्या न चालण्याचा दोष असेल, अगर उज्ज्वल परंपरा उत्पन्न न होण्याची परिस्थिति असूं शकेल. वैद्याचा मुलगा वैद्य होत गेला, वकील बापानें आपल्या मुलास आपल्या पेशाचा धंदा शिकविला, स्थापत्यविशारदानें आपल्या भावी पिढीस परंपरागत धंदा चालविण्याची सोय केली; पण मुद्रणालयांच्या मालकांनीं मात्र तशी वृत्ति धरली नाहीं. उलट आपल्याला शालेय अगर महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ मिळाला नाहीं, तेव्हां आपल्या चिरंजीव मंडळींना तरी बौद्धिक शिक्षणाचा लाभ मिळावा म्हणून मुद्रकांनीं तशा प्रकारचें शिक्षण आपल्या भावी पिढीला दिलें आणि पिढीला पुढील आपला धंदा चालविण्यास असमर्थ केलें. हा कांहीं केवळ मुद्रण-व्यावसायिकांचा दोष नव्हे, तर समाजानें या व्यवसायाकडे ज्या हीनतेनें पाहिलें, त्यामुळें उत्पन्न झालेल्या सामाजिक रोगाचा हा परिणाम आहे. या कारणानें परंपरा निर्माण झाली नाहीं. आपला मुलगा आपला धंदा पुढें चालवीलच अशी खात्री नसल्यामुळें, तर उलट तो धंदा पुढें चालविला जाणार नाहीं अशा खात्रीमुळें–एका पिढीच्या आयुष्यांत जेवढी वैयक्तिक व्यावसायिक उन्नति होणें शक्य आहे तेवढीच झाली, आणि पुढील पिढी तो चालवणार नाहीं या कल्पनेनें तो वाढविण्याची महत्त्वाकांक्षा वृद्धिंगत तर झालीच नाहीं; तर उलट मुद्रकांनीं आपल्या आयुष्याच्या अखेरीस आपल्या छापखान्यांची विल्हेवाट लावण्याचा विचार केला असला पाहिजे. यामुळेंच वर्षानुवर्षें, पिढीच्या पिढी हा व्यवसाय चालला आहे असें दिसत नाहीं. मागील काळांत काय, अगर सध्यांच्या काळांत काय, वैद्यकीय, वाकिली, सावकारी अगर इतर व्यवसाय करणारीं 'घराणीं' दृष्टोत्पत्तीस पडतात, पण पाऊणशें वर्षांपूर्वी असलेलें काम वा पन्नास वर्ष वयाचे छापखानेही फार दिसतात असें नाहीं. एका मुद्रकाच्या हयातीइतकें छापखान्याचें आयुर्मान असल्यासारखें दिसतें. याचा परिणाम मात्र असा कीं, पारंपरिक शिक्षणाची प्रथा राहिली नाहीं. आणि प्रत्येक नवीन मुद्रण धंदेवाल्यास नेहमींच 'श्रीगणेशा' पासून सुरवात करावी लागल्यामुळें जुन्या चुकांची पाऊलवाट तुडवून नवीन शिकण्याकरतां बराच काळ घालावा लागला आणि हें सर्व होत आहे तोंवर तो चाळिशीच्या पुढें जाऊन आपल्या धंद्याकडे औदासीन्य दृष्टीनें पाहूं लागला.

मुद्रण शिक्षणाचा अभाव

पुण्यांत मुद्रणधंदा सुरूं होऊन इतकीं वर्षें झालीं, पण मुद्रण शिक्षणाची सोय विशेष नसल्यामुळें मुद्रण-कलेची विशेष वाढ होऊं शकली नाहीं. पारंपरिक शिक्षणाची प्रथा नाहीं, आणि मुद्रणकलेच्या अभ्यासाची सोय नाहीं; यामुळें या धंद्याच्या वाढीला फार मोठा अडसर पडला असल्यास नवल नाहीं. मुद्रण मालकांना या मुद्रणकलेची तितकी विशेष माहिती नसल्यामुळें आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्वस्वीं कामगारावर अवलंबून रहावें लागल्यामुळें तेही या धंद्यांत धडाडीनें भाग घेऊं शकले नाहींत, असें पुण्यांतील धंद्यांची पाहणी करतांना दिसून येतें. पण हा धंदा जो चालला गेला आहे, तो कामगारांच्या पारंपरिक ज्ञानामुळेंच; पण या ज्ञानवाढीला जें सदैव वंगण घालावें लागतें, त्याची चणचण पडल्यामुळें, कामगारांच्या पारंपरिक ज्ञानालाही जास्त तजेला येऊं शकला नाहीं. आमचेकडे पुण्यांतील छापखान्यांचीं जीं पहाणीपत्रकें भरून आलीं आहेत, त्यावरून एक गोष्ट मात्र स्पष्टपणें दिसतें कीं, पुण्यांतील मुद्रण कामगार हा आपापल्या मालकाशीं फार मोठ्या प्रमाणावर एकनिष्ठ राहिला आहे. वीस वर्षांपेक्षां जास्त काळ ह्या धंद्यांत राहिलेल्या कामगारांची जी यादी इतरत्र दिली आहे, त्यावरून वरील विधानाची प्रचीति आमच्या वाचकांस येऊं शकेल आणि याबद्दल मालकवर्गानें आपल्या कामगारांचे आभारी असलें पाहिजे.

आर्यभूषण, चित्रशाळा व केसरी या तीन छापखान्यांशिवाय ज्यांची पन्नाशी उलटली आहे, असे छापखाने म्हणजे पुणें म्युनिसिपल प्रेस, आनंदाश्रम, दीनबंधु, इस्लाईट, लॉ, कालिका प्रसाद, इंदिरा व कमर्शिअल हे होत. म्युनिसिपल प्रेस हा निमसरकारी स्वरूपाचा छापखाना असल्यानें त्याबद्दल कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं. चित्रशाळेचे कै. वासुकाका जोशी यांना परमेश्वरकृपेनें दीर्घायुष्य दिल्यामुळें त्या छापखान्यास दीर्घायुष्य मिळालें. तीच गोष्ट लॉ, दीनबंधु व इंदिरा या छापखान्यांची आहे. दीनबंधूचे डॉ. नवले यांचे दोन्ही मुलगे मुद्रणधंद्यांत फार दिवसांपूर्वीं पडले असल्यानें त्या छापखान्यांचें सातत्य पुढेंही चालूं राहील अशी अपेक्षा करण्यास मुळींच हरकत नाहीं; पण वाढत्या वयाच्या मानानें या तीन छापखान्यांचा व्याप कां वाढला नाहीं हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आनंदाश्रम हा त्या संस्थेच्याच कामाकरितां छापखाना असून तो व्यवसाय म्हणून तेथें केला जात नाहीं. श्री. मोती यांचा कमर्शिअल प्रेस व रा. मोदी यांचा इस्लाईट हे दोन्ही छापखाने आपलें सातत्य चांगल्या तऱ्हेनें टिकवून आहेत ही समाधानाची गोष्ट आहे.

संस्थांचे छापखाने

आर्यभूषण, समर्थभारत व लोकसंग्रह हे छापखाने मुख्यतः त्या त्या संस्थांची आर्थिक गरज भागविण्यासाठीं पूरक म्हणून काढले गेले आहेत. सार्वजनिक संस्थांचे छापखाने हे त्यांच्या सार्वजनिक कार्यास आर्थिक मदत देण्यास उपयुक्त असल्यानें त्या छापखान्यांचा संसार वाढता होण्यास आपोआपच पायबंद असतो. संस्थांमधील छापखान्यांचे व्यवस्थापक हे ध्येयनिष्ठ असल्यामुळें त्यांच्या अमदानींत या छापखान्यांची वाढ होण्याची जरी अपेक्षा असली, तरी हा छापखान्याचा धंदा केवळ धंद्याकरतां केला जात नसल्यामुळें मुद्रण धंद्यांत मिळविलेला पैसा त्या धंद्याच्या वाढीकरतां केवळ खर्च होईल असें असूं शकत नाहीं. कारण त्या संस्थांचें ध्येय मुद्रणसेवेपेक्षां वेगळें असून, मुद्रणव्यवसाय हा त्यांच्या बाबतींत साधनस्वरूपाचा आहे. धंद्याकरतां धंदा करावयाचा ही वृत्ति वाढल्याशिवाय धंद्याची प्रगति होऊं शकत नाहीं, हें सर्वसामान्य तत्त्व आहे. ध्येयनिष्ठ संस्था–चालकांनीं मुद्रणसेवेचें कंकण हातीं घेतलें असतें, तर संस्थांच्या छापखान्यांची वाढ चांगल्या तऱ्हेनें झाली असती आणि त्यामुळें मुद्रणकलेचा भाग्यरवि तेजानें तळपला असता. थोरांच्या कृतीचे पडसाद आंवतीं भोंवतीं उमटतात हा नेहमींचा अनुभव आहे. त्याच अनुभवांचा प्रत्यय मुद्रणकलेच्या बाबतींत आला असता. आणि मुद्रणव्यवसायाविषयीं जो न्यूनगंड पसरला, तसा तो पसरला गेला नसता. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं ज्यां मुद्रणयंत्राचा आणि मुद्रणसामर्थ्याचा उल्लेख केला,

नवीन किताबखाना
(पुस्तक विक्री दुकान)

१८८० सालीं शालीग्राम यांच्या भागीदारीमध्यें कै. विष्णुशास्त्री यांनीं स्थापित केला.

१९०५ सालीं भागी सोडून हरि कृष्ण दामले हे एकटे मालक झाले.

त्यानंतर

विद्याधर हरि दामले व आज श्रीकृष्ण विद्याधर दामले हे नवीन किताबखाना उत्तम चालवीत आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याची पकड मुद्रणव्यावसायिकांवर बिंबली गेली नाहीं असें दिसून येते. असो.

आशादायक बदल

पूर्वीच्या मुद्रण मालकांची या बाबतींत वृत्ति काय होती याचें थोडेसें विवेचन वर केलेलेंच आहे; आणि पाहणीपत्रकांवरून पहातां व या बाबतींत वृद्ध छापखानदारांशीं चर्चा करतांना असें दिसतें कीं, या परिस्थितींतही गेल्या पांच दहा वर्षांत थोडथोडा पालट होत आहे. छापखानदारांची चिरंजीव पिढी ही आपल्या वडिलांचा धंदा पुढें चालविण्यास तयार होत आहे ही फार समाधानाची गोष्ट आहे. बालोद्यान, आनंद, ज्ञानविलास, आर्यसंस्कृति, कलागृह, दाभोळकर या छापखान्यांमध्यें दुसरी पिढी आपला वडिलार्जित धंदा चालवीत असल्याचें आनंदजनक दृश्य दृष्टीस पडतें. ही पद्धत जर जास्त वाढली, धंद्याकरतां धंदा केला आणि आपली मिळकत धंद्याच्या वाढीकरतांच खर्च केली, तर पुण्यांतील मुद्रणव्यवसाय वृद्धिंगत होण्याची आणि 'शतायुषी' होण्याची आशा वाटते.

मारक स्पर्धा करावी काय ?

मुद्रणव्यवसाय आज आर्थिक संकटांतून जात आहे अगर नाहीं याची आम्हांस कल्पना नाहीं. आज शंभराव्या अंकानिमित्त पुण्यांतील छापखान्यांची पहाणी करतांना, त्यांची आर्थिक स्थिति काय आहे याचें विहंगमदृष्ट्याही परीक्षण करावें अशी कल्पना नाहीं. पण मुद्रणधंद्याची खरी परिस्थिति कळावयाची असेल, तर मुद्रणव्यवसायाची आर्थिक व औद्योगिक खानेसुमारी होणें अत्यंत इष्ट आहे. त्याशिवाय आपला व्यवसाय कोणत्या अवस्थामधून जात आहे, याची कल्पना येणार नाहीं. गोखले राजकारण व अर्थशास्त्रमंदिर (पुणें) या संस्थेनें पंधरा वर्षांपूर्वी पुणें शहराची सामाजिक व आर्थिक पहाणी करून आपला वृत्तान्तही प्रसिद्ध केलेला आहे. त्या वृत्तान्तांत पुणें शहरांतील मुद्रणव्यवसायाची थोडीफार माहिती देण्यांत आली आहे. भारत सरकारनें नेमलेल्या भारतांतील सरकारी छापखान्यांच्या चौकशीचा अहवालही (रेगे समिति अहवाल) कांहीं वर्षांपूर्वी प्रसिद्ध झाला होता. या अहवालावरून महत्त्वाची माहिती मिळते. राष्ट्राची दर दहा वर्षांनीं जशी खानेसुमारी होते, व ती फार उद्बोधक असल्याचें जसें दिसतें, त्याप्रमाणेंच मुद्रण धंद्याची पाहणी जर केली, तर तीही त्या व्यवसायांत पडलेल्यांना आणि पडूं इच्छिणाऱ्यांना मार्गदर्शक होईल अशी आमची समजूत आहे. पण तशा प्रकारची आर्थिक पहाणी करण्याचा या शंभराव्या अंकाचा विचार नाहीं. पण जीं पाहणीपत्रकें भरून आलीं आहेत, व ज्या छापखानदाराशीं धंद्याच्या बरेंवाईटपणाबद्दल चर्चा करण्याचा प्रसंग आला आहे, त्यावरून असें निदान काढण्यास हरकत नाहीं कीं, हा मुद्रणधंदा वाईट नसून त्यांत बऱ्या प्रमाणांत बरकत होत असते; आणि इतर कोणत्याही व्यवसायाप्रमाणें हाही व्यवसाय जर आर्थिक जमाखर्चाचा विचार करून केला, तर त्यांत बूड येऊं नये. गेल्या वीस पंचवीस वर्षांत जे छापखाने जन्मास आले आणि विलयास गेले, त्याबद्दल व्यवसायबंधूंशीं चर्चा करतां, ते याबद्दल दोन कारणें देतात:—(१) धंद्यांत मिळालेला पैसा हा इतर उद्योगांत उधळला गेला आणि त्यामुळें मूळ धंद्यास जेव्हां रक्कम लागली, तेव्हां टंचाई पडली; (२) मारक स्पर्धा. पहिल्या कारणाबद्दल आम्हांला विचार करावयाचा नाहीं; कारण जाणून बुजून ही धंद्यांची व स्वतःची आत्महत्या केल्यासारखी आम्हांस वाटतें; पण दुसऱ्या कारणाबद्दल मात्र आम्हांस एवढेंच म्हणावयाचें आहे कीं, स्पर्धा असावी, पण ती स्वतांला तरी निदान मारक असूं नये. मंदी आली म्हणून नुकसानीनें काम करण्यानें स्वतःला फायदा न होतां गिऱ्हाइकांचाच नफा मात्र होतो. आमचे एक प्रकाशक स्नेही होते; ते म्हणत कीं 'घोंगडीवर गेलेला' (घसरगुंडीस लागलेला) छापखाना त्यांना फार चांगला.' असा छापखाना थोड्या किंमतींत काम करून देतो असें त्यांचें म्हणणें. हें म्हणणें व्यवहारी गृहस्थाला अत्यंत शोभेसें जरी असलें, तरी परस्पर धंद्यांचा विचार केला असतां हें बरोबर नाहीं हें कोणीही मान्य करील. निदान आजच्या तीव्र वर्गकलहाच्या काळांत तरी ही वृत्ति निंद्य आहे असेंच कोणीही म्हणेल. मुद्रकांनीं आपापसांत स्पर्धा करतांना हिरोत्री अहमहमिका करावी, तरच त्यांचा धंदा टिकेल आणि धंद्यांत सुधारणा होईल. मुद्रक नफातोटापत्रकही काढीत नाहींत असें कित्येकांशीं झालेल्या चर्चेंत दिसून आलें. नफातोटापत्रकाच्या अभावीं आपल्या धंद्यांची स्थिति नफ्याची आहे कीं नुकसानीची आहे, अगर स्पर्धा करण्याकरतां म्हणून! आपण किती तोटा सोसतों याची कल्पनाही होऊं शकणार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. येईल ती जमा व होईल तो खर्च अशी वागणूक ठेवल्यानें आपल्या धंद्याची परिस्थिति कशी कळणार बरें! आपला धंदा स्थिर व्हावयाचा असेल तर आपली आर्थिक बाजू बळकट व्हावयास पाहिजे आहे. मिळालेला नफा धंद्यांत गुंतवून धंदा वाढविला गेला पाहिजे. धंद्यांत गुंतलेलें भांडवल हें दरसाल होणाऱ्या नफ्यांतून वेगळें काढण्याची योजना असावयास पाहिजे. नहून तो धंदा नीट चालणार नाहीं. धंद्यांत मिळालेल्या स्वतःच्या नफ्यावर कोणीही चैन करावी, पण घसारा वगैरे सारख्या काढलेल्या रकमा या आपल्या नव्हेत असें समजलें गेलें पाहिजे. पण याकरतां आपल्या मुद्रणाचा हिशोब काटेकोरपणें पहाण्याची संवय लागली पाहिजे. असें केलें तरच कोणतीही स्पर्धा स्वतःला अगर दुसऱ्यालाही मारक होणार नाहीं.

स्पर्धेकरतां स्पर्धा अयोग्य

स्पर्धेकरतां स्पर्धा करावयाची जरी ठरली, तरी त्यांत सुद्धां आपल्याला किती घालवावयाचें आहे याची खूणगांठ मनाशीं बांधलेली असलेली पाहिजे. स्पर्धेचा कैफ एकाद्या वेळीं दाखवावा; पण तो रोजच्या रोज दाखविला गेला तर तो आपलें स्वतःचेंच केवळ नुकसान करतो असें नसून, तो त्या व्यवसायाची अप्रतिष्ठा करीत असतो आणि हाच सामाजिक विचार धंदेवाईक इसमानें करावयास पाहिजे आहे. एकाद्या कंपनीनें दिवाळें काढल्यावर त्याचे धक्के त्या कंपनीच्या चालकांसच केवळ बसतात असें नव्हे, तर नवीन कंपन्या काढणाऱ्यावरही जनतेचा विश्वास बसण्यास वेळ लागतो. एकाद्या शहरांतील समजा चार-पांच छापखानदारांनीं इतरत्र कामें करतांना जर करार मोडले, तर त्या शहरांतील मुद्रणव्यवसायाबद्दल एकदम अंदेशा घेतला जातो कां नाहीं! तीच स्थिति मारक स्पर्धेपायीं होते. आपला हिशोब न करतां जो केवळ स्पर्धेसाठीं स्पर्धा करतो, तो स्वतां रसातळास जातो, एवढेंच नव्हे तर, बरोबरीच्या कांहींना तरी गटंगळ्या खावयास लावतो. तेव्हां स्पर्धा करणारानें आपल्यापुरतें केवळ न पहातां, आपण एक व्यवसायाचे घटक आहोंत, ही कल्पना सदैव उराशीं बाळगली पाहिजे आणि आपल्यावरील सामाजिक जबाबदारीची जाणीव जर ठेवली गेली, तर मारक स्पर्धा होईल असें वाटत नाहीं.

छापखान्याच्या आर्थिक बाजूचा विचार करतांना, छापखान्याची जास्तींत जास्त काम करण्याची शक्ति किती आहे तें प्रत्येकानें पाहिलें पाहिजे. आमच्याकडे जीं पत्रकें भरून आलीं आहेत, त्यांत पुष्कळांनीं या प्रश्नाचें उत्तरच दिलें नाहीं. छापखान्याच्या कामाचें प्रमाण हें त्यास लागणाऱ्या कागदखपावर अवलंबून आहे; पण हाही आंकडा कित्येकांनीं दिला नाहीं. या दोन्ही प्रकारांबाबत मुद्रकांशीं चर्चा करीत असतां असें दिसतें कीं, त्यांनीं या प्रश्नाचा कधीं विचारच केला नाहीं अगर आंकडे मांडलेले नाहींत असें आढळून आलें. या माहितीचा उद्देश असा होता कीं, आपली कार्यशक्ति सर्वस्वीं उपयोगांत आणली जात आहे कीं नाहीं हें कळावें; पण ज्यांनीं ही माहिती दिली आहे, त्यावरून आपली कार्यशक्ति पुरी वसूल केली जात नसावी असें दिसून येतें. म्हणजे पुरेपूर कामाच्या अभावीं आपलीं यंत्रें गंजून जात आहेत. आणि अशी जर सार्वत्रिक ओरड असेल, तर धंद्यांत नव्यानें पडूं इच्छिणारांना या परिस्थितीची जाणीव करून दिली जाणें अत्यंत आवश्यक आहे. छापखान्याचा धंदा हा कांहीं बिनभांडवली धंदा नव्हे. तेव्हां पैसे गुंतवितांना नवीन इच्छुकांस व्यावसायिक परिस्थितीची माहिती असावयास पाहिजे. असल्या प्रश्नांचा विचार मुद्रक-संघटनाच करूं शकतील आणि त्यांचेंच हें खरोखर काम आहे. धंद्यांत पडलेल्यांनींही सुद्धां आपल्या धंद्याच्या वाढीकरतां असल्या सर्व प्रश्नांकडे बारकाईनें लक्ष पुरविणें अगत्याचें आहे.

टाइपाच्या टांकसाळी

आतांपर्यंत मुद्रणव्यवसायांतील मूलभूत तत्त्वांचा आम्हीं विचार केला. यापुढें जीं पाहणीपत्रकें आलीं आहेत, त्यांतील माहितीच्या अनुरोधानें व समक्ष जी माहिती मिळाली त्यावरून कांहीं विचार प्रदर्शित करणार आहों. पुणें शहरांत टाईप पाडण्याच्या २२ टांकसाळी असून त्या बाबतींत विशेष प्रगति झाली नाहीं हें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. पुण्यांतील साधारणतः मोठ्या छापखान्यांत टांकसाळ आहेच, पण ती प्रत्येक फारच तुटपुंजी आहे. गणितांत दोन अधिक दोन मिळून चार होत असले, तरी या सर्व तुटपुंज्या टांकसाळींची एक भक्कम व समृद्ध टांकसाळ होऊं शकत नाहीं. टाइपाच्या वळणांत विशेष नाविन्य आलेलें नाहीं. येथील टाइपांचे दर कमी होऊं शकत नाहींत; व टाइपाच्या हरएक गोष्टीसाठीं मुंबई अगर मद्रासकडे पहावें लागतें. जुने पंचगीर गेले, नवीन तयार होऊं शकले नाहींत; त्यामुळें फार पुरातन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काळापासून जी निर्णयसागरच्चीं वळणें ठरून गेलीं आहेत त्या चाकोरीच्या बाहेर आपण गेलेलों नाहींत. टाइपाच्या धंद्यांत सुधारणांस आणि प्रगतीस फार वाव आहे. छापखाना काढण्याऐवजीं तेंच भांडवल जर नवीन तऱ्हेची टांकसाळ स्थापण्यांत बुद्धिमान् माणसानें घातलें, तर त्याचा जास्त उपयोग होईल असें वाटतें. नाहीं म्हणायास सुपर कास्टरसारखें आधुनिक यंत्र आणून दाते टाईप फौंड्री आणि प्रकाश टाईप फौंड्री यांनीं गेल्या तीन चार वर्षांत धडाडीनें आपला धंदा सुरू केला आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो. टाइपाच्या बाबतींत लोकसंग्रह कारखान्यानें केलेली कामगिरी प्रशंसनीय आहे. लोकसंग्रहमध्यें मामाराव दाते असतांना त्यांनीं व नंतरच्या चालकांनीं टाइपांचे नवीन प्रकार करावयाच्या बाबतींत बरीच आघाडी मारली आहे. लोकसंग्रहानें दोन वर्षांपूर्वीं एक जपानी टाईप कास्टर आणून जोरानें काम



सुरू केलें आहे. पुण्यांतील पिंपळे घराणें हें पंचगीर म्हणून प्रसिद्ध आहे. त्यांच्या तीन पिढ्यांत हाच धंदा चालूं असून आज त्यांची स्वतांची टाईप फौंड्री आहे. श्री. नारायणराव व गोपाळराव पिंपळे (पितापुत्र) हे नवीन टाईप तयार करण्यांत वाकबगार आहेत. आर्यभूषणमधील टाईप फौंड्री ही पिंपळ्यांच्या कारागिरीची निदर्शक आहे. श्री. गोपाळराव यांनीं आपल्या हाताखालीं नवीन होतकरू कल्पक तरुण घेऊन आपल्या वाडिलार्जित कलेचा जास्तींत जास्त प्रसार करावा अशी आग्रहानें विनंती करावयाची आहे. सध्यां अशी पारिस्थिति आहे कीं, कोरावयाच्या (Engraving) पद्धतीनें (लोकसंग्रहव्यतिरिक्त) नवीन टाईप तयार होत नाहींत आणि पंचगीर संस्था प्रायतः नष्ट झाली आहे. त्यामुळें या दुहेरी कार्यांत पुण्यांतील टाईप फौंड्रीचा व्यवसाय पुढारत नाहीं अशी मोठी शोचनीय स्थिति आहे.

केसरी व मराठा संस्था

१८८१ मध्यें केसरी कै. विष्णुशास्त्री यांनीं सुरूं केला.

१८९१ केसरीची मालकी, बाळ गंगाधर टिळक यांचेकडे.

१९०१ केसरीच्या छपाईकरितां टू फीडर यंत्र आणविलें गेलें.

१९०५ केसरी टाईप फौंड्री सुरूं झाली— टिळक टाईप.

१९०६ २७ नोव्हेंबरपासून वर्षांतील ४७ व्या अंकापासून केसरी स्वतःच्या इमारतींत व छापखान्यांत निघूं लागला.

१९१९ लो. टिळकांनीं विलायतेंतून रिबिल्ट स्टिरिओ व मराठा पत्राकरितां सिलिंडर यंत्र घेतलें. मात्र तें त्यांच्या मृत्यूनंतर सुरूं झालें. त्या यंत्रावर तासीं ९००० प्रती निघत असत.

१९२१ पर्यंत केसरी छपाई टू फीडरवर चालू होती.

१९३४ केसरीमार्फत ११२ पानांचा खास अंक औद्योगिक विषयावर काढला.

१९३५ मध्यें सह्याद्रि मासिक निघालें. त्याकरितां रेकॉर्ड मशीन व फोनिक्स ट्रेडल घेतलें.

१९३९ मध्यें डुप्लेक्स फ्लॅटबेड रोटरी मशीन आणलें. दोन रंगी छपाईची सोय असते. तासीं ६००० प्रती निघतात.

१९५० मध्यें केसरी त्रिसाप्ताहिक सुरूं झाला. कै. श्री. विद्वांस यांच्या २०–२५ वर्षांच्या व्यवस्थापनेनंतर आज रा.आ. रा. भट व्यवस्थापक आहेत. कामगार १०८ असून ते अत्यंत समाधानी वृत्तीमध्यें असतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इंग्रजीमध्यें निरनिराळ्या टाइपांच्या माला (Series) असतात, तशा मराठी टाइपांत दिसत नाहींत; शोभिवंत टाइपाच्या बाबतींतही (ornamental) अशाच प्रकारची दुरवस्था दृष्टीस पडते. इंग्रजी टाइपाचे कॅटलॉग आणि मराठी टाइपाचे कॅटलॉग घेऊन तुलनात्मक विचार केला, तर आपलें दैन्य किती आहे याची तीव्रतेनें जाणीव होऊन स्वतांचीच खंत वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. ही परिस्थिति बदलली जावयास पाहिजे. नवीन टांकसाळी घालणारांनीं जुनीच चाकोरी तुडवीत न बसतां, नवीन टाईप काढून प्रगति केली, तर ती त्यांना उपकारक तर होईलच, पण या धंद्यालाही उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

आमचा मागासलेपणा

छापखाना म्हटला कीं, त्यांत तीन खातीं किमान पक्षीं तरीं असावींतच. अशी अपेक्षा असते. टंकजुळणी (कंपोझिंग), छपाई व बांधणी हीं तीं तीन खातीं होत. केवळ बांधणी काम करणारे कारखाने असूं शकतात, पण ते छापखाने या सदरांत सर्वस्वीं पडतातच असें नाहीं. टाईप पाडण्याचा धंदा जसा मोठ्या प्रमाणावर छापखान्यापासून अलग असूं शकतो तसा मात्र बांधणी कारखाना अगदीं स्वतंत्रपणें असत नाहीं. जर तसा तो असलाच, तर त्याचें प्रमाण लहान प्रमाणावर असतें. पण जेथें स्टेशनरी मालच मुख्यतः तयार होतो (डायरी, रोजमेळ, चोपड्या), तेथें बांधणी काम जास्त प्रमाणावर असून छपाई अगर टंकजुळणी हीं कामें विशेष प्रमाणांत नसतात. कांहीं कांहीं ठिकाणीं फक्त टंक-जुळणी करून दुसरीकडून छपाई करून आणतात. पण अशा अपवादात्मक बाबींचा विशेष विचार करावयाचा नसून सर्वसाधारणतः 'छापखान्या'चा विचार करावयाचा आहे. आमच्याकडे जी पहाणी पत्रकें आलीं आहेत त्यावरून पुणें शहरांत १२४ छापखाने असून, त्यांतून १०७ सिलेंडर यंत्रें व १९४ ट्रेडल यंत्रें काम करीत असल्याचें दिसतें. या सर्व छापखान्यांतून काम करणाऱ्या कामगारांची संख्या २८०० पर्यंत आहे. पुण्यांत प्रथम छपाई सुरूं झाली, ती लिथोची; लिथोची जागा टंकांनीं घेतली आणि त्यापुढील यांत्रिक टंक–जुळणीची प्रगति मात्र विशेष झाली नाहीं असें दिसून येत आहे. पुण्यांत सर्वत्र हातानेंच टंक-जुळणी केली जात आहे. लोकसंग्रह छापखान्यांत मात्र एक मराठी मोनो टाईप असून कांहीं प्रमाणांत मराठी टंक-जुळणीचें काम तेथें यांत्रिक सहाय्यानें होत आहे. सुमारें सोळा वर्षांपूर्वी त्या वेळचे लोकसंग्रहाचे व्यवस्थापक श्री. शंकर रामचंद्र तथा मामाराव दाते यांनीं स्वतः मराठी मोनो टाईप संशोधिला आणि एक यंत्र घेतलें. पण त्यानंतर तेथें अगर इतरत्र दुसरें तसलेंच यंत्र चालूं झालें नाहीं. इंग्रजी टंक-जुळणी यांत्रिक साह्यानें संगम, ओरिएंटल वॉचमन, कमर्शिअल या छापखान्यांतून होत आहे. सन १९२५ मध्यें अस्तंगत झालेल्या जगद्धितेच्छु छापखान्यांत मात्र त्या काळीं इंग्रजी मोनो टाईप यंत्र होतें हें लक्षांत ठेवण्याजोगें आहे. जगद्धितेच्छु छापखान्याची सविस्तर माहिती इतरत्र दिली आहे, त्यावरून या एका काळीं उदयास चढलेल्या छापखान्याची माहिती आमच्या वाचकांस होईल. त्याचा अस्त कसा झाला, याबद्दलचा विचार दीपस्तंभाप्रमाणें मार्गदर्शक होईल अशी आमची कल्पना आहे. असो. गेल्या पंचवीस वर्षांत छापखान्यांची संख्या किती जोरानें वाढली याची कल्पना परिशिष्टावरून येणार आहे. गेल्या पंचवीस वर्षांत निघालेल्या छापखान्यांपैकीं ९२ छापखाने अस्तित्वांत आहेत. यांपैकीं गेल्या बारा वर्षांतील निघालेल्या छापखान्यांची संख्या ६३ आहे, हें लक्ष्यांत घेण्याजोगें आहे. छापकामांत वाढ झाली, पण ती छापखान्याच्या प्रमाणांत झाली नाहीं असें आंकड्यांवरून दिसून येतें. आपण पूर्वीं पाहिलेंच आहे कीं, छापखान्याच्या कमाल कार्यशक्तीचा वापर केला जात नाहीं. खरोखर सबंध वर्षभर समप्रमाणांत सारखें काम मिळत राहिलें, आणि छापखान्याच्या कार्यशक्तीचा पुरेपूर उपयोग करतां येऊं शकला, तर आमची अशी समजूत आहे कीं, सध्यां जी यांत्रिक शक्ति उपलब्ध आहे, त्याच्या तीन चतुर्थांश यंत्रसामुग्रीवरच आपला कार्यभाग होऊं शकेल. पण निरनिराळ्या कारणांस्तव एकाचीं दोन दुकानें जशीं होतात, तसे एकाच छापखान्याचे चार छापखाने होतात, आणि त्याचा परिणाम प्रत्येकाचें काम घटण्यांत होतो. छापखाना ही सुद्धां एक कला आहे, त्यांतही बुद्धिमान् माणसांस आपलें डोकें चालवितां येणारें आहे, अशा विचारानें या मुद्रणकलेला वाहून घेतलेले मुद्रक फारसे मिळाले नाहींत. इतर कामाप्रमाणेंच हेही एक वेठबिगारीचे, निर्वाहाचें एक साधन म्हणून बरेचजण या व्यवसायांत पडले आणि त्यामुळें त्यांची दृष्टि पोटापुरते चार पैसे मिळविण्यापलीकडे गेली नाहीं. सोनार त्याप्रमाणें आपलें कसब लढवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निरनिराळ्या चिजा करून आपलें कौशल्य दाखवूं इच्छितो, तशी कल्पना या धंद्यांत पडलेल्यांना विशेष न आल्यामुळें म्हणा अगर इतर कांहीं कारणांमुळें म्हणा, पण या मुद्रण-व्यवसायाला कलेचें स्वरूप येऊं शकलें नाहीं आणि छापखान्याला समाजांत प्रतिष्ठा पण प्राप्त होऊं शकली नाहीं. हें कटु सत्य लिहितांना फार वाईट वाटतें, पण आपल्या व्यवसायाचें आत्मपरीक्षण करतांना जें दिसलें, जें ऐकलें, जें अनुभवलें, तें येथें नमूद करणें आवश्यक वाटतें. याचमुळें छापखाने वाढले तरी मुद्रणकला पुण्यांत फोफावली नाहीं, तिला सौंदर्याचें अधिष्ठान लाभलें नाहीं आणि प्रतिदिनीं विकसन पावणाऱ्या मुद्रणकलेला आपण पाठमोरे राहिलों तें राहिलोंच. परदेशांत टंक–जुळणीचा प्रघात लुप्त होत चालला आहे, तरी आम्ही त्या ' टाईप केसीस 'च्या चौकटीच्या बाहेर पडूं शकलों नाहीं. जी स्थिति टंक–जुळणीची, तीच छपाईची. छपाईचीं आधुनिक यंत्रें फारच थोड्या ठिकाणीं असलेलीं दृष्टीस पडतात. आपोआप कागद घेणारीं (Automatic) सिलेंडर व ट्रेडल यंत्रें पुण्यांत दहा पंधरांपेक्षां जास्त नाहींत. बांधणी खात्यांतही तीच रडकथा. पुण्यांत लिथो छापखाने किती तरी वर्षें आणि चांगल्या स्थितींत चालू असलेले दृष्टीस पडतात, पण त्यांपैकीं कोणाची परिणति ऑफसेट यंत्र बसविण्यांत झाली आहे असें मात्र दिसत नाहीं.

पुणेकरांच्या या सर्व पराङ्मुखतेला काय कारण असावें बरें ? हा विचार मनांत आल्याशिवाय रहात नाहीं. खरोखरच पुणेकर मुद्रकांच्यामध्यें धंद्याची घडाडी नाहीं कां ? त्यांना कलेची जोपासना करतां येत नाहीं कां ? त्यांना मुद्रणव्यवसायाची आवड नाहीं कां ? इतर बाबतींत दिसणारी पुणेकरांची आघाडी या सर्व आशंका आणि कुशंका मनांत आल्याबरोबर विलीन करून टाकते.

पण मग मुद्रण व्यवसायानें एवढें काय पाप केलें आहे कीं त्या बाबतींत प्रगति होऊं शकली नाहीं ! आमच्या मतें त्याचें कारण असें असावेसें वाटतें कीं, मुद्रण-व्यवसायाकडे कलेच्या दृष्टीनें न पाहतां, सार्वजनिक जीवनांतील साधन म्हणून पाहिलें गेलें; त्याच कारणानें छापखान्यांच्या बरोबरीनें अगर मागोमाग वृत्तपत्रांची निर्मिति झाली आणि या व्यवसायांत पडलेल्या बुद्धिमानांचें मुद्रणकलेकडे दुर्लक्ष झालें. पुण्यांत निरनिराळ्या शिक्षणसंस्था निघाल्या. शिलाईचें शिक्षण देणाऱ्या संस्था काढल्या गेल्या, पण टंक–जुळणी, अगर छपाईचें शिक्षण देणाऱ्या शिक्षणसंस्था निघाल्या नाहींत अगर मोठमोठ्या छापखान्यांतून त्याबद्दलची पद्धतशीर व्यवस्था केली गेली नाहीं. लोकसंग्रहानें मात्र टंक–जुळणी शिक्षण-संस्था काढून ती आजवर पद्धतशीरपणें चालविली आहे. पुण्यांतील मुद्रणव्यवसायांत २८०० पर्यंत कामगार आणि १५० मालक मंडळी काम करीत आहेत, पण त्यांना शिकविणारी, त्यांच्या ज्ञानांत भर टाकणारी आणि मुद्रणकलेचें स्वरूप समजावून देणारी कसलीही सोय पुण्यांत उपलब्ध नाहीं. मुद्रणकलेचा प्रसार होण्यास त्यांतील अज्ञान आड येत असण्याचा संभव असेल कां ? असेल ! नाहीं कोणीं म्हणावें ?

प्रकाशकांची कामगिरी

हें आत्मपरीक्षण करतांना आपल्यांतील उणीवा प्रामुख्यानें नजरेस आल्या म्हणून त्यांचा उल्लेख केला आहे. पण या अनुभवास अपवादात्मक असे छापखाने नाहींत असें मात्र नव्हे. गेल्या दहा बारा वर्षांत मात्र ही स्थिति बदलूं लागली आहे. या धंद्यांत जास्त शिक्षित माणसें पडूं लागलीं आणि त्यांच्या व्यापक दृष्टिकोणामुळें व कलात्मक दृष्टीमुळें छापखाना हा मुद्रणकलेच्या दृष्टीनें प्रगत पावत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. प्रकाशकांनीं अलीकडे प्रकाशित केलेल्या विविध पुस्तकांकडे विहंगम दृष्टीनें जरी पाहिलें, तरी या विधानाची सत्यता आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येणार आहे. पुण्यांत प्रकाशनव्यवसाय हा फार मोठ्या प्रमाणावर चाललेला असून महाराष्ट्राला बौद्धिक, शालेय, ललित वगैरे वाङ्मय पुरविण्याचें काम अव्याहत चालविलें आहे आणि हा व्यवसाय वाढत्या प्रमाणावर आहे. ललित वाङ्मयांत देशमुख आणि कंपनी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, शास्त्रीय वाङ्मयांत दास्ताने ब्रदर्स, शालेय वाङ्मयांत जोशी आणि लोखंडे, शिवाजी प्रकाशन, व्हीनस बुकस्टॉल, राणे लेखन वाचन भांडार, जगताप कारले प्रकाशन, वगैरे प्रकाशकांनीं सारा महाराष्ट्र काबीज केला आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. पुण्याबाहेर (मुंबई सोडल्यास) प्रकाशन-व्यवसाय विशेष जोरांत चालू नाहींच असें म्हटलें तरी चालेल. आणि या प्रकाशक मंडळींनीं आपलें साहित्य आकर्षक रीतीनें छापून घेण्याची जारीनें खटपट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चालविली आहे व त्यामुळें त्यांच्या प्रकाशनांत मुद्रण-कलेला संचार करावयास अवसर मिळत आहे.

मुद्रणव्यवसाय व वृत्तपत्रें

मुद्रणव्यवसायाला पूरक म्हणून प्रकाशनाचा जसा व्यवसाय आहे, तसाच वृत्तपत्रांचें प्रकाशन हाही आहे. पुस्तकप्रकाशनाचा व्यवसाय हा लाभदायक, तर वृत्तपत्र व्यवसाय हा तोट्याचा व्यवसाय आहे. दैनिकें, साताहिकें, अगर मासिकांचें प्रकाशन हें विशिष्ट ध्येय डोळ्यापुढें ठेवून आजवर झाल्यामुळें, वृत्तपत्रव्यवसायांत आर्थिक लाभ संपादकांस झाला आहे असें दिसत नाहीं. गेल्या शंभर वर्षांच्या वृत्तपत्रव्यवसायाकडे पाहिल्यास, अल्पायुषी वृत्तपत्रांचें फार मोठें प्रमाण दिसतें. कांहीं वृत्तपत्रें परकीय सरकारच्या धोरणामुळें मृत झालीं असलीं, तरी त्यापेक्षां किती तरी जास्त वृत्तपत्रें आर्थिक बोजाखालीं चिरडून आज नामशेष झालेलीं दिसत आहेत. आणि ज्यांनीं आर्थिक संकटाला टक्कर दिली, त्यांच्या पाठीमागें त्यांचा छापखाना उभा होता हें विसरून चालणार नाहीं. याला अपवाद फक्त केसरी. लोकमान्य टिळकांचें असामान्यत्व सर्वच बाबतींत प्रभावी जसें ठरलें, तसें केसरीच्या बाबतींत ठरलें आहे. टिळकांच्या मागून साहित्यसम्राट श्री. तात्यासाहेब केळकर यांच्यासारखे सव्यसाची संपादक केसरीला लाभल्यामुळें तो आजही निधड्या छातीनें पुढें जात आहे. ‘ चित्रमयजगत् ’, ‘ दीनबंधु ’ आपल्या छापखान्यांच्या जोरावर पुढें मार्गक्रमण करीत आहेत. शंभर वर्षें चाललेला ज्ञानप्रकाश बंद पडला. त्याला वर्षानुवर्ष किती तोटा सोसावा लागला याची माहिती एकदां प्रसिद्ध झाली होती. हरिभाऊ आपटे यांची ‘ करमणूक ’ लोक मिटक्या मारीत वाचीत, पण करमणुकीच्या संपादकाला मात्र चणेफुटाणेच

आर्यभूषण व ज्ञानप्रकाश छापखाना

१८४७ मध्यें ज्ञानप्रकाश छापखाना कै. कृष्णशास्त्री, गो. ह. देशमुख, इत्यादींनीं स्थापिला.

१८७९ मध्यें आर्यभूषण प्रेस कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लो. टिळक इत्यादींनीं सुरू केला. केसरी छापण्यासहि सुरुवात.

१९०६ मध्यें भारतसेवक समाजाचे संस्थापक नामदार गोखले यांनीं आर्यभूषण व ज्ञानप्रकाश, संस्थेकरितां भागीदारीसह विकत घेतले.

१९०९ राहिलेल्या हरि नारायण गोखले यांची भागीदारी संपवून केवळ भारत सेवक समाज मालक झाला.

१८८८ कै. केशवराव बाळ व्यवस्थापक झाले.

१९१० मध्यें कै. वामनराव पटवर्धनही व्यवस्थापक झाले.

१९३४ कै. बाळ यांचा मृत्यु

१९३९ कै. वामनराव पटवर्धन यांचा मृत्यु.

१९१५ विठ्ठल हरि बर्वे व्यवस्थापक

१९२६ मध्ये किबे वाड्यास आग लागून आर्यभूषण प्रेसचे २ लाखांचें नुकसान झाले. अनेकांचें बहुमोल साहाय्य त्या वेळीं झालें.

१९२९ मध्यें नवीन बिल्डिंग वि. ह. बर्वे यांचे देखरेखीखालीं तयार झाली.

१९२९ पासून वि. अ. पटवर्धन मदतनीस व्यवस्थापक

१९३८ पासून के. ग. शारंगपाणी यांची सह व्यवस्थापक म्हणून नेमणूक

१९४९ वि. ह. बर्वे निवृत्त—के. ग. शारंगपाणी व्यवस्थापक

सध्यां छापखाना अत्यंत जोमानें चालू आहे. १८० कामगार आहेत. छापखान्याचे जमाखर्च, हिशोब व पद्धति उत्तम आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आ. रा. भट
व्यवस्थापक–केसरी



वा. ग. थोरात
व्यवस्थापक–सकाळ प्रेस लि०

के. ग. शारंगपाणी; बी. ए. एलूएल्. बी.
व्यवस्थापक–आर्यभूषण प्रेस

श्री. ज. गानू
व्यवस्थापक–राजगुरु प्रेस

य. ग. वझे, बी. ए., एल्एल्. बी.
सुपरिंटेंडेंट–कॉर्पोरेशन प्रेस

दा. त्र्यं. जोशी, बी. ए.
व्यवस्थापक–चित्रशाळा प्रेस

डी. के. प्रधान
व्यवस्थापक–येरवडा प्रिं. प्रेस

गो. तु. सकपाळ
व्यवस्थापक–कॉर्पोरेशन प्रेस

कै. के. म. बाळ, जन्म १८६७
आर्यभूषण प्रेस व्यवस्थापक १८८८ ते १९३४

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लावे लागत असत. रत्नाकरासारखें मराठी साहित्यांत रत्नासारखें तळपलेलें मासिक आज कोठें आहे ? लोक-शिक्षण मासिक कां बंद पडलें ? अशा किती तरी ध्येय-प्रधान नियतकालिकांचा अस्तंगत झालेला आहे. आजही चालू असलेल्या नियतकालिकांकडे पाहिल्यास मोठी आशादायक स्थिति असल्याचें दिसत नाहीं. आपल्याला लोकांना कांहीं शिकवावयाचें आहे या उद्देशानें प्रसिद्ध होत असलेल्या व झालेल्या वृत्तपत्रांचा अंत झाल्याबरोबर त्यांच्या मुद्रणभावंडांस जोराचा आर्थिक तडाखा बसल्या-शिवाय रहात नाहीं. पण ध्येय हें अमर आहे आणि त्या ध्येयाच्या पाठीमागें लागणारे ध्येयवादी लोक पुणें शहरांत प्रकर्षानें दिसतात आणि हेंच मुळीं पुण्याचें वैशिष्ट्य आहे. आजही पुण्यांत प्रसाद, नवभारत, सृष्टिज्ञान, शिक्षक यासारखीं केवळ ध्येयप्रधान नियतकालिकें चालविलीं जात आहेत. हें आत्मपरीक्षण करतांना असाही विचार मनांत आल्याशिवाय रहात नाहीं कीं, ही सर्व खटपट, हा सर्व खटाटोप अकारण तर होत नाहींना ? पण ध्येयवादापुढें हा कोटिक्रम फिकाच पडणार आहे. वृत्तपत्रव्यवसायाची एकंदरींत बिकट परिस्थिति असतांनाहि आज पुणें शहरांत सुमारें ४२वर वृत्तपत्रें, मासिकें प्रसिद्ध होत असून विविध क्षेत्रांतून ज्ञान देण्याचें पवित्र कार्य करीत आहेत.

पुणें शहरांतील मुद्रणव्यवसायाचें परीक्षण करतांना आम्हीं वर कांहीं मुद्द्यांचें विवेचन केलें आहे. आतां या शेवटच्या भागांत आपल्या या व्यवसायांतील महत्त्वाच्या व्यक्तींचें आणि संस्थांचें वैशिष्ट्य थोडक्यांत नमूद करा-वयाचें आहे. पण हें संकलन करतांना आम्हांस कोणाची जाहिरात करावयाची नाहीं, अगर कोणास प्रसिद्धि देण्याचाही पण उद्देश नाहीं. आत्मपरीक्षण हें स्वतांच्या चुका सुधारण्याकरतां जसें उपयोगी पडतें, तसेंच योग्य गोष्टी कोणत्या तें कळल्यानें, व त्या दृष्टीनें आपलें कर्तव्य बजावण्यास कोणासही हुरूप येतो. असो. पूर्वी असें म्हटलेंच आहे कीं पुण्यांतील मुद्रणव्यवसायाचें प्रस्थान हें साधनाच्या स्वरूपाचें आहे आणि मुद्रणकलेचा एक घटक म्हणून तिकडे पाहिलें गेलें नाहीं. ही वैचारिक भूमिका अजूनही प्रभावी दिसत असली, तरी या धंद्यां-सही राष्ट्रीय भूमिका आहे आणि मुद्रणकलेची सेवा करून तिला श्रेष्ठ दर्जा मिळवून देण्याची आवश्यकता आहे हें आतां मुद्रकास पटूं लागलें आहे.

श्री मामाराव दाते

कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं या मुद्रणव्यवसायाच्या प्रतिष्ठेबद्दल ज्या हिरीरीनें आपलें मत प्रदर्शित केलें, आणि आस्था प्रकट केली, ती तीव्रता त्यांच्या समकालीनांमध्यें अगर अनुयायांमध्यें पुढें प्रकर्षानें दिसली नाहीं. त्या वेळच्या बुद्धिमानांचें लक्ष आपल्यांतील मुद्रण दोष सुधारण्याकडे विशेष गेलें नाहीं. मात्र आवश्यकता निर्माण झाली, तेव्हां लोकमान्य टिळकांनीं आपल्या टंकांतील दोष सुधारण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आपल्या मराठी टाईपांत सुधारणा करण्याची आवश्यकता निर-निराळ्या प्रसंगानें साहित्यिक आणि मुद्रक प्रतिपादितात, पण या दोघांची एकत्र बैठक होऊन कांहीं सामायिक आणि अत्यंत उपयुक्त मार्ग निघाला आहे असें मात्र घडलें नाहीं. पुण्यांतील टाईप फौंड्रींनीं आपल्या टाइपांत सुधारणा करण्यास अजून अवसर आहे, हें विसरून चालणार आहे. अगदीं अलीकडील विजापुरे टाइपाचे पंच व मेट्रिक्स या आर्यभूषण छापखान्यांत श्री. नारायणराव पिंपळे यांनीं तयार केलेल्या आहेत. टाइपांच्या बाबतींत श्री. मामाराव दाते यांनीं केलेले प्रयत्न महशूर आहेत. बी. ए. झाल्यानंतर लोकसंग्रह छापखान्यांत कंपॉझिटरच्या कामाची त्यांनीं माहिती करून घेतली; मराठी मोनो टाईप संशोधिला; लोकसंग्रहाशीं संबंध असे-पर्यंत श्री. दाते यांनीं मुद्रणकलेची वाढ करण्यास फार मोठी खटपट केली आहे. त्यांच्याच परिश्रमामुळें लोक-संग्रहाची मुद्रणशाळा जन्मास आली आणि वाढीस लागली. टाईप पाडण्याचें सुपर कास्टर यंत्र श्री. दाते यांनीं प्रथम पुण्यांत आणलें आणि आपली दाते टाईप फौंड्री सुरू केली. श्री. मामाराव दाते हे आज 'काळ' चे यशस्वी संपादक आणि एक हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते म्हणून प्रसिद्धीस आलेले असले, तरी त्यांचा मूळचा पिंड मुद्रकाचा आणि वृत्ति संशोधकाची. ते हिंदुमहासभेच्या राजकारणांत ओढले गेले नसते, आणि मुद्रणव्यवसायांतच राहिले असते, तर त्यांनीं मराठी मुद्रणकलेला विविध तऱ्हेच्या अलं-कारांनीं भूषविलें असतें, त्यांनीं 'मुद्रणप्रवेश' नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे, आणि तें आपल्या व्यवसायांत प्रमाणभूत मानलें जात आहे. श्री. दाते यांच्यासारखा संशोधक मुद्रक आपल्या मुद्रणव्यवसायापासून दुराव-ल्यामुळें आपल्या धंद्याची फार मोठी हानि झाली आहे यांत शंका नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री. बाबूराव सहस्रबुद्धे

श्री. दाते यांचें कार्यक्षेत्र अक्षरमुद्रणापुरतें विशेषतः मर्यादित आहे, तर श्री. शंकर बळवंत ऊर्फ बाबूराव सहस्रबुद्धे (चालोद्यान प्रेस) यांच्या बुद्धीनें अत्यंत स्वैरसंचार केलेला दृष्टीस पडतो. श्री. सहस्रबुद्धे हे इंग्लंडमध्यें राहून मुद्रणकलेचें शिक्षण घेऊन आलेले आहेत, ते मुंबई विद्यापीठाचे पदवीधर आहेत; त्यांनीं मुद्रणविषयक सर्व प्रश्नांवर स्वतांच्या छापखान्याच्या चंद्रमौळी जागेंत विविध तऱ्हेचे प्रयोग केले आहेत. त्यांनीं छपाईची शाई तयार केली; रोलर कॉम्पोझिशन तयार केला. पत्र्यावर छपाई (Tin Printing) करून पाहिली आहे; फोटोग्राफीच्या कांचा तयार केल्या आहेत. श्री. बाबूराव सहस्रबुद्धे यांनीं केलेल्या अनंत प्रयोगांची त्यांना सुद्धां आठवण असणार नाहीं, तर आम्हीं तरी काय आणखी वर्णन करूं शकणार ! हे त्यांचे सर्व प्रयोग केवळ ज्ञानार्जनाच्या लालसेनें झालेले आहेत. त्यांतून नवीन धंद्यांची प्राणप्रतिष्ठा करण्याच्या बुद्धीनें झालेले नाहींत. त्यामुळें धंदेवाईक रेखीवपणा या सर्व प्रयोगांच्या शेवटीं जो यावयास पाहिजे असतो, तो आलेला नाहीं. या सर्व प्रयोगांचें फल आत्मसंतोषापलीकडे त्यांना मिळालें नाहीं. पण हा आत्मसंतोष वैयक्तिक रीत्या कितीही उच्च पातळीचा असला, तरी त्यामुळें व्यवसायाचें पाऊल प्रगतिपथावर पडलेलें नाहीं, याची रुखरुख इतरांना सदैव वाटल्याशिवाय रहात नाहीं. पण तें कांहीं जरी असलें, तरी कांहीं अडचण आल्यास श्री. सहस्रबुद्धे यांचा सल्ला मुद्रकांना घ्यावासा वाटतो हें निश्चित. श्री. सहस्रबुद्धे यांच्याजवळ इतक्या विविध तऱ्हेच्या कल्पना आहेत कीं, त्यांचा सर्वांगीण विचार करून वागावयाचें जर ठरविलें, तर खरोखर आपल्या व्यवसायाची उन्नति झाल्याशिवाय रहाणार नाहीं, पण...पण या कल्पना अत्यंत उच्च ध्येयवादी असल्यामुळें सामान्य इसमाच्या आटोक्याच्या बाहेर असतात.

श्री. मामाराव दाते व बाबूराव सहस्रबुद्धे हे पुण्यांतील मुद्रणव्यवसायाचे तेजस्वी अलंकार आहेत.

पुणें शहरांत असलेल्या छापखान्याकडे बघतांना असें दिसतें कीं, येथें एकंदर १२४ छापखाने असून त्यांपैकीं ५५ छापखाने कारखान्यांच्या कायद्याखालीं येणारे आहेत (१० पेक्षां जास्त कामगार असलेले). या छापखान्यांतून १०७ सिलेंडर यंत्रें व १९४ ट्रेडलें आहेत. ६२ छापखाने हे केवळ ट्रेडलवरच काम करणारे असून दोन छापखाने केवळ सिलेंडर यंत्रावर काम करतात; आणि राहिलेल्या बाकी छापखान्यांतून सिलेंडर व ट्रेडल यंत्रें आहेत. कामगारांच्या संख्येप्रमाणें पुढीलप्रमाणें वर्गवारी होते.

कामगारसंख्या	छापखाने
१ ते १०	६५
११ ते २५	२९
२६ ते १००	२४
१०१ च्या पुढें	६

या वर्गवारीवरून व ट्रेडल छापखान्यांच्या संख्येवरून असें दिसून येईल लहान छापखान्यांचें प्रमाण फार मोठें आहे. या लहान छापखान्यांतून पुस्तकछपाईविरहित कामें (जॉब) केलीं जातात. शशिकांत, प्रकाश यासारख्या कांहीं ट्रेडल छापखान्यांतून पुस्तक–छपाईचें काम केलें जातें, पण तें अपवादात्मक स्वरूपाचेंच समजलें पाहिजे. साधारणतः २५ पेक्षां जास्त कामगार असलेल्या व सिलेंडर छापखान्यांतून पुस्तकछपाईचें काम केलें जातें. नेहमींची सामान्य यंत्रसामुग्री या सर्व छापखान्यांतून आहे. त्यांत उल्लेख करावयाचा झाल्यास आनंद, प्रतिभा, आर्यभूषण, कलाग्रह, ओरिएण्टल वॉचमन या छापखान्यांतून ॲटोमॅटिक यंत्रें आहेत. कलाग्रह छापखान्यानें चोवीस वर्षांपूर्वी छपाई, शिलाई व घडी पाडण्याची ॲटोमॅटिक यंत्रें आणलेलीं होतीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ओरिएण्टल वॉचमन या छापखान्यांत चवदा भाषांतील कंपोझिंग काम होतें हें वैशिष्ट्य आहे. त्या खालोखाल सहा भाषांतून काम आर्यभूषण प्रेसमध्यें होत असतें. छपाईचें काम सौंदर्यपूर्ण व कलात्मक दृष्टीनें करण्याच्या बाबतींत राजगुरु छापखान्यानें लौकिक संपादन केलेला आहे. आर्यभूषण, केसरी, समर्थभारत, लोकसंग्रह, चित्रशाळा हे छापखाने संस्थांच्या मालकीचे असून त्यांची धंद्यांतील भूमिका वेगळ्या स्वरूपाची असण्याचा संभव आहे. कांहीं चार पांच छापखाने कंपन्यांच्या मालकीचे आहेत आणि बाकीचे सर्व खासगी मालकीचे आहेत. पुणें म्युनिसिपल प्रेस, आनंदाश्रम, पुणें युनिव्हर्सिटी प्रेस हे त्या त्या संस्थांच्या छापकामाकरतांच केवळ उपयोगांत आणले जात असून ते धंद्यांतील प्रतिस्पर्धी नाहींत.

छापखान्याला पूरक असलेल्या इतर धंद्याबाबत (प्रकाशन, ब्लॉकमेकिंग, आर्टिस्ट) सध्या विशेष कांहीं लिहावयाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे असें नाहीं. प्रकाशन व्यवसाय हा साधारणतः वैयक्तिक मालकीचा असून शालेय अगर ललित वाङ्मय प्रकाशित करणें हेंच मुख्य काम चालू असतें. सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाले-मार्फत मात्र नेहमींच्या चाकोरीच्या बाहेरचीं पुस्तकें थोडी प्रकाशित केलीं जात असतात. दास्ताने ब्रदर्स यांनीं केवळ महाविद्यालयीन शास्त्रीय क्रमिक पुस्तकें प्रकाशित करण्याचा धंदा यशस्वीपणें चालविला आहे.

कामगार व मालक

पुण्यांतील धंद्याची पाहणी करतांना कामगार व मालक यांचे संबंध चांगल्या तऱ्हेचे आहेत असें दिसतें, ही फार समाधानाची गोष्ट आहे. कामगारामध्यें चंचलता नसून ते एकाच ठिकाणीं चिकटून राहतात ही त्यांच्या निष्ठेची व म्हणून कौतुकाची गोष्ट आहे. छापखाने आपल्या कामगारांना बोनस, प्रॉव्हिडंट फंड, इन्शुअरन्स वगैरे देतात काय, याबद्दल पाहणीपत्रकांतून जीं उत्तरें आलीं आहेत, ती विशेषशीं समाधानकारक मात्र नाहींत असें मोठ्या कष्टानें म्हणावें लागतें. जास्तींत जास्त म्हणजे तीन महिन्यांचा बोनस आर्यभूषणमध्यें दिला जातो असें दिसतें. प्रॉव्हिडंट फंड व इन्शुअरन्स अशी योजना चित्रशाळा व वि. ल. जोग यांचेकडे, प्रॉव्हिडंट फंड योजना आर्यभूषण, केसरी, न्यू हशेमीमध्यें; व आदर्श, महाराष्ट्र लिथो, दाभोळकर ब्रदर्स यांचेकडे फक्त इन्शुअरन्स योजना आहे. पण इतर छापखान्यांतून तशी कांहीं योजना असल्याचें दिसत नाहीं. अशासारख्या योजना छापखाना मालकांनीं तातडतोब करणें हें अत्यंत आवश्यक आहे. बदलत्या काळाचा ओघ लक्षांत घेण्यापूर्वी ही आपल्याकडे पूर्वी अशा प्रकारची पद्धति दिवाळी अगर मालकाच्या घरांतील मंगलकार्य या प्रसंगीं बक्षिसें देण्याच्या स्वरूपांत अस्तित्वांत होती, हें मालकांनीं लक्षांत घेणें जरूर आहे. या सर्व प्रकारांत प्रेमाचा आणि आपुलकीचा भाग फार मोठ्या प्रमाणावर असे. ती पद्धत मागें पडली, पण नवीन कोणत्या तरी पद्धतीला स्थान मिळालें नाहीं. अशा तऱ्हेची ही अभावात्मक परिस्थिति ही संघर्षाला नेहमींच कारणीभूत होते. मुद्रण मालकांनीं जुनी पद्धत आणि बदलता काळ ओळखून कामगारांच्या प्रेमाची देवघेव करून घेण्याचा मार्ग चोखाळला पाहिजे. कामगार-वर्ग हाही मुद्रण व्यवसायाचा एक प्रमुख घटक आहे हें विसरून चालणार नाहीं.

चित्रशाळा, आर्यभूषण, केसरी, किताबखाना या कै. चिपळूणकरांनीं संस्थापिलेल्या चारी संस्था पुण्यामध्यें आज नांवारूपानें चालू आहेत. या संस्थांनीं मुद्रणधंद्यांतील संशोधन, शिक्षण व मुद्रणसाहित्य निर्मिति याकरितां निधि निर्माण करून तें कार्य घडवून आणावें; त्यांतच कै. चिपळूणकरांचें खरें स्मारक या संस्थांकडून होईल.

पुढें काय करावयास पाहिजे ?

हें आत्मपरीक्षण संपविण्यापूर्वी येथील मुद्रकांनीं पुढें काय केलें असता, येथील व्यवसायाची उन्नति होईल याचा थोडासा विचार करणें गैर होणार नाहीं. आमच्या धंद्याचें शास्त्रशुद्ध शिक्षण मालकांना व कामगारांना देण्याचा पद्धतशीर प्रयत्न व्हावयास पाहिजे. तो जर झाला नाहीं, तर आपण आपली प्रगति कधींच करूं शकणार नाहीं. मुद्रणकला ही केवळ बौद्धिक कला नसून हस्तव्यवसायप्रधान कला असल्यामुळें इतरत्र कोठें काय चाललें आहे याचें प्रात्यक्षिक मुद्रण-मालक आणि कामगार यांना दिलें गेलें पाहिजे. इंजिनियरिंग कॉलेजांत आणि स्थापत्य शाळेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निरनिराळ्या ठिकाणीं नेऊन प्रत्यक्ष बांधकामें दाखविलीं जातात, शेतकीच्या विद्यार्थ्यांना प्रायोगिक शेती दाखविली जाते, तद्वतच मुद्रकांनीं इतरत्र ठिकाणचे नामवंत छापखाने पाहणें हें उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो. नवीन गोष्टी पाहिल्यानें व्यापक दृष्टिकोन होऊं शकतो. मुद्रणाकडे साधन म्हणून केवळ न पाहतां साध्याच्या दृष्टीनें पाहिलें तरच या धंद्याची उन्नति होईल. राष्ट्राच्या जीवनांत मुद्रणकलेलाही एक महत्त्वाचें स्थान आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. स्वतंत्र भारतांतील प्रत्येक अवयव हा तेजस्वी झाला तरच भारत सामर्थ्यवान् होऊं शकेल, नाहीं तर होणार नाहीं. तेव्हां मुद्रणकलेची सेवा हीही राष्ट्रसेवाच होय. मुद्रणांतील शैक्षणिक दर्जा मान्य होण्याजोगी परिस्थिति आजवर नसल्यानें मुद्रकांच्यामध्यें एक प्रकारचा न्यूनगंड उत्पन्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालेला दिसत आहे. पण हीही न्यूनता लवकरच जाईल अशीं चिन्हें दिसत आहेत. पुणें विद्यापीठानें संगीत कलेला ज्याप्रमाणें पदवी देण्याचें ठरविलें आहे, त्याप्रमाणें मुद्रणकलेला आपल्या विद्यापीठीय अभ्यासक्रमांत स्थान देण्याची योजना चालविली आहे. पण केवळ एवढ्यानें भागणार नाहीं. मुद्रकांनींच आपल्या धंद्याचा अभिमान बाळगून आपला न्यूनगंड झिडकारून टाकला पाहिजे. त्याशिवाय खरोखर मार्ग नाहीं; आणि आपला धंदा हा सातत्यानें टिकेल याबद्दल व्यवस्था मुद्रकांनीं करावयास पाहिजे आहे. एक माणूससुद्धां धंदा किती ऊर्जितावस्थेस नेतो याचें मूर्तिमंत उदाहरण म्हणजे नागपूर येथील श्री. धनवटे (शिवराज आर्ट लिथो प्रेस) हें होय. दुसऱ्याच्या कर्जाच्या भांडवलावर व दोन तीन कामगारांवर उभारलेल्या या छापखान्याचें आजचें भांडवल एक कोटीच्या घरांत आहे आणि तेथें पांचशें कामगार काम करीत आहेत. या छापखान्याची यंत्रसामुग्री ही अगदीं अद्ययावत् असून श्री. धनवटे यांचे मुलगे, वडिलांच्या वयोमानामुळें, हा छापखाना जबाबदारीनें चालवीत आहेत. हा छापखाना लिथो व ऑफसेट छपाईत अखिल भारतांतच काय, पण आशिया खंडांत अग्रगण्य समजला जातो. अशा तऱ्हेचा आदर्श मुद्रकांच्या डोळ्यांपुढें नेहमीं येणें अत्यावश्यक आहे. धंद्यांतील मारक स्पर्धा कशी कमी होईल याचा विचार करून, व त्याचें ज्ञान इतरांना देण्याची तजवीज झाली, तरच असल्या घातक स्पर्धेपासून आपण लांब राहूं.

पुणें मुद्रक संघाच्या कार्याचा आढावा इतरत्र जो देण्यांत आला आहे, तो प्रत्येक मुद्रकानें मनन करण्यासारखा आहे, या संघानें दुसऱ्या युद्धाच्या काळांत धंद्याची फार मोठी सेवा बजावली असून संघाचें कार्य फार उपयुक्त ठरलें आहे. संघाचें ग्रंथसंग्रहालय असून त्यांत सुमारें १०० वर पुस्तकें आहेत. अशा तऱ्हेचें मुद्रण ग्रंथ संग्रहालय हें पहिलेंच असावें अशी समजूत आहे. संघाच्या मुद्रणप्रकाशाबद्दल लिहिण्याचें कारणच नाहीं. संघाचें मुद्रण साहित्य भांडार ही मुद्रकांची मोठी गरज भागवीत आहे. संघाचें कार्य प्रभावी व्हावयाचें असल्यास 'गरज सरो व वैद्य मरो' अशी भावना ठेवून चालणार नाहीं. एक गरज संपली, तर दुसरी उभी रहात असते. संघाचें कार्यक्षेत्र हें यापेक्षां किती तरी व्यापक होण्याची शक्यता आहे. आणि पुणें मुद्रक संघ हा इंग्लंडांतील 'पत्रा' (P. A. T. R. A.) संस्थेप्रमाणें मुद्रकांच्या विविध शास्त्रीय आणि बौद्धिक गरजा भागविणारा व्हावयास पाहिजे आहे. (मुद्रणप्रकाश–मे १९४९ अंक पहा.) तें ध्येय डोळ्यांपुढें ठेऊन संघाची कार्यशक्ति व्यतीत व्हावयास पाहिजे आहे.

ही पुणें शहरांतील मुद्रणधंद्यांची चौकशी करतांना ज्यांनीं आम्हांस पाहणीपत्रकें भरून दिलीं, समक्ष भेटींत ज्यांनीं आम्हांस माहिती दिली, त्या सर्वांचे आम्ही फार फार आभारी आहों. पण कांहीं मुद्रकांनीं आम्हांस मदत केली नाहीं हें नमूद करण्यास खेद वाटतो. पुण्यांस दोन सरकारी छापखाने (येरवडा प्रिझन प्रेस व फोटो झिंको प्रेस) आहेत. त्यांच्याकडून आम्हांस माहिती मिळाली नाहीं. पण असे हे अपवादात्मक दोन मुद्रक सोडल्यास, बाकी इतरांनीं केलेलें सहकार्य हें खरोखर कौतुकास्पद आहे, आणि त्याबद्दल त्यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतों. या पाहणी–पत्रकांची बारकाईनें तपासणी करून असें वाटलें कीं मुद्रणव्यवसायाची जास्त सखोल व आर्थिक भूमिकेवरील पाहणी होणें आवश्यक आहे. पण तें काम जास्त अधिकारी व्यक्तींनीं अगर संस्थेनें करणें समुचित होईल. प्रो. धनंजयराव गाडगीळ यांच्या गोखले राजकारण व अर्थशास्त्रसंशोधन मंदिरासारख्या संस्थेनें हें काम घेणें जास्त योग्य होईल. असो.

आमचें हें व्यावसायिक आत्मपरीक्षण करतांना चूक होण्याचा संभव आहे याची जाणीव आहे. चूक सुधारून दिल्यास फार आभारी होऊं. निदान प्रत्येक मुद्रकास आपल्या व्यवसायाच्या उन्नतीच्या दृष्टीनें अंतमुर्ख होण्याची इच्छा वरील विवेचनामुळें जरी झाली तरी या शंभराव्या अंकाचें सार्थक होईल. पुण्यनगरींत ज्या व्यवसायाची सुंदर तत्त्वावर प्रतिष्ठापना विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं केली, तो व्यवसाय पुण्यांत वैभवास चढावा हीच इच्छा.

आभार

हा अंक तयार करतांना सुमारें ४–५ महिन्यांत अनेक मंडळींचें सहकार्य लाभलें. श्री. चिं. ग. कर्वे, द. वा. पोतदार, न. र. फाटक, शं. रा. दाते, शं. स. दाते, शि. का. संत यांच्या सारख्यांनीं आपला वेळ आम्हांला दिला. श्री. मुनोत, गानू, यांच्यासारख्या मंडळींनीं केलेले सहकार्य तर अवर्णनीयच आहे. त्याशिवाय अंकाला मजकुरच मिळाला नसता. फोटोग्राफर श्री. राजाभाऊ दाते, श्री. कान्हेरे, तसेंच चित्रकार ज. ग. देवकुळे, चित्रशाळा व आनंद मुद्रणालय यांतील कामगार यांनीं श्रमांची पराकाष्ठा केली आहे. या सर्वांचे व ज्यांचा उल्लेख राहिला असेल त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

संपादक व व्यवस्थापक मुद्रण प्रकाश.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

— मुद्रणप्रकाशचे संपादक —

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व. ग. देवकुळे, बी. एस्‌सी.

वि. अ. पटवर्धन, बी. एस्‌सी.

य. गो. जोशी, बी. ए.

निर्णयसागर प्रेसचे दोन आधार १ महिन्याच्या अवधींत देवाघरीं गेले. त्यांना श्रद्धांजलि



कै. सत्यभामाबाई पांडुरंग चौधरी

१८९८ मध्यें जन्म

१९१४ सालीं पांडुरंग जावजी यांचेशीं विवाह.

१९४० मध्यें पांडुरंग जावजींचें निधन

गेलीं १० वर्षें उत्तमोत्तम कामगारांच्या नेमणुका करून निर्णयसागर संस्थेची कीर्ति वाढविली.

१८-११-५१ रोजीं निधन.

कै. रामचंद्र येसू शेडगे

१८७३ मध्यें जन्म

१८८८ निर्णयसागर प्रेसमध्यें ४ रु. पगारावर नोकरी

१९१२ मध्यें मॅनेजर.

१९४३ मध्यें बद्रीनारायणाची यात्रा.

१९४३ मध्यें निर्णयसागर कर्जमुक्त केला.

१९४६ मध्यें कामगारातर्फे मानपत्र.

११-१२-५१ रोजीं निधन.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुद्रणधंद्यांत विसांहुन जास्त वर्षें घालविलेले पुण्यांतील राष्ट्रबांधव

* आम्ही केलेल्या दीर्घ प्रयत्नानंतरही ज्यांचीं नांवें आम्हांला न मिळाल्यानें घातलीं नाहींत त्यांनीं रागावूं नये

* प्रेसचें नांव, कामगाराचें संपूर्ण नांव, वय, कामाचा विषय व घालविलेलीं वर्षे यापैकीं उपलब्ध तेवढी माहिती दिली आहे.

लॉ प्रिंटिंग प्रेस—

१ दत्तात्रय गणेश खांडेकर वय ७९ कायद्याचें पुस्तक-प्रकाशन ५४ वर्षें चालू. सर्वांत वयोवृद्ध मुद्रक.

दीनबंधु प्रेस—

२ विठ्ठलराव मारुतराव नवले. वय ६५ सेवानिवृत्त-व्यवसाय ४० वर्षें.

३ अर्जुन बाळोबा थोरात. वय ५०. बाइंडर—३० वर्षें काम.

४ रामचंद्र गोविंद नागडे.वय ३५. मशीन चालविणें—२१ वर्षें व्यवसाय.

चित्रशाळा—

५ त्र्यंबक रघुनाथ देवगिरीकर वय ५५ सध्यां ट्रस्टी—संपादक चित्रमयजगत् ३२ वर्षें.

६ दामोदर त्र्यंबक जोशी वय ४३ सध्यां व्यवस्थापक २१ वर्षांवर व्यवसाय

७ राजाराम प्रल्हाद कानिटकर वय ४५ संपादकखात्यांत २१ वर्षें

८ भालचंद्र गजानन कांबळे वय ३८ जमाखर्च व हिशोब २२ वर्षें.

९ यशवंत नारायण रानडे वय ५२ सुपरवायझर—कंपॉझिटर एस्टिमेटर ३२ वर्षें नोकरी

१० विश्वनाथ विष्णु भोमे वय ४३ मशीन फोरमन—कंपॉझिटर ३० वर्षें

११ नारायण रामचंद्र नाडगौडा वय ५७ चित्रकार मुख्य, रेखा व लिथो चित्रें, ३१ वर्षें

१२ महादेव विश्राम पाडावे वय५३. चालू टाईप फौंड्री कामांत अत्यंत निष्णात. उत्तम माहीतगार. ३९ वर्षें नोकरी. हाताखालीं अनेक लोक तयार करून वागविण्याची विशेष पद्धत अवगत आहे.

१३ नारायण नरहर कुंजीर वय ५२ लिथो प्रिंटर—अनुभवी ३५ वर्षें

१४ गणपत सावळाराम गायकवाड वय ५० प्रेसमन ३० वर्षें

१५ महादेव तुकाराम शिवदे वय ४० ब्लॉकमेकर २३ वर्षें

१६ शंकर परशुराम सुतार वय ३५ सुतार व ब्लॉक बसाविणें २५ वर्षें

१७ बापू गणेश खडकतकर वय ४० पुस्तक भांडार २६ वर्षें

१८ महादेव धोंडो जोशी वय ६४ खरेदी व स्टेशन काम ३४ वर्षें कारकून

१९ दिगंबर माधव कुलकर्णी वय ४६ स्टोअरकीपर व कारकून २५ वर्षें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२० रघुनाथ गणेश खडकतकर वय ३८
पेपर स्टोअर व मजूर प्रमुख २१ वर्षें
२१ विष्णु नरहर जोशी वय ६९
परदेशप्रवास–ब्लॉक व लिथो ३७ वर्षें व्यवसाय
२२ हरि मोरेश्वर पाटील वय ४९
कंत्राटी कंपॉझिटर ३० वर्षें
२३ महादेव गंगाराम परमाणे वय ३९
कंत्राटी कंपॉझिटर २१ वर्षें
२४ आत्माराम भिकाजी दळवी वय ५५
बाइंडिंग फोरमन ४१ वर्षें
२५ चिंतामण गोविंद काशीकर वय ५९
लिथो आर्टिस्ट ३० वर्षें
२६ महादेव पर्वती सोनवणे वय ४७
लिथो आर्टिस्ट २९ वर्षें
२७ रंगनाथ खंडू रणसिंग वय ३५
बाइंडिंग खातें २५ वर्षें
२८ श्रीधर धोंडदेव साठे वय ६१
कंपॉझिटर ४० वर्षें
२९ गंगाराम विठोबा चांदेरे वय ३७
बाइंडिंग खातें २४ वर्षें
३० पुरुषोत्तम नारायण रानडे वय ४१
कंपॉझिटर ३१ वर्षें
३१ गजानन रघुनाथ कुलकर्णी वय ३६
कंपॉझिटर २३ वर्षें
३२ तुकाराम रामजी माने वय ५५
इंग्रजी कंपॉझिटर ३५ वर्षें
३३ रघुनाथ विठ्ठल नाईक वय ४४
इंग्रजी कंपॉझिटर ३० वर्षें
३४ दौलतराव भाऊराव सकपाळ वय ५०
फार्म ठोकणारे ३५ वर्षें
३५ गुरुशांत शिवप्पा तडवळकर वय ३३
आर्ट प्रिंटर २२ वर्षें.
३६ नारायण तुकाराम साळुंके वय ४१
सर्व प्रकारची छपाई कामें २३ वर्षें.
३७ आवडाजी कान्होजी अष्टेकर वय ५२
ट्रेडलमन २५ वर्षें.
३८ कृष्णा शंकर काटे वय ४६
फिटर व टर्नर २५ वर्षें
३९ भिकाजी त्रिंबक शाळीग्राम वय ४४
फिटर व मोल्डर २८ वर्षें
४० बाबूराव महादेव कोष्टी वय ५५
नकाशे कापड रुळपट्टी खातें ३० वर्षें
४१ शंकर गणपत मते वय ४९
टाईपकास्टिंग–स्टिरिओ २७ वर्षें.
४२ लक्ष्मण मारुती महाडीक वय ४८
टाईपकास्टिंग–लेड पाडणें ३६ वर्षें.
४३ नरहरी सखाराम यादव वय ५०
टाईप पाडणें २५ वर्षें.
४४ सदाशिव रामभाऊ भिलारे वय ४५
टाईप पाडणें २६ वर्षें.
४५ गोविंद महादेव पेंडसे वय ५८
कंपॉझिटर ३१ वर्षें.
४६ प्रल्हाद गणेश काळे वय ४२
कंत्राटी कंपॉझिटर २१ वर्षें.
४७ महादेव गोपाळ आडकर वय ४४
कंपॉझिटर ३० वर्षें
४८ हरि कृष्ण रत्नपारखी वय ४५
प्रुफ दुरुस्ती २४ वर्षें.
४९ भालचंद्र काशिनाथ टुमणे वय ४७
प्रुफ दुरुस्ती २३ वर्षें.
५० नरहर व्यंकटेश खेडलेकर वय ५५
प्रकाशनविभाग कारकून २९ वर्षें
५१ मारुती मनाजी खिरीड वय ४५
फॉर्म जुळणी खातें २२ वर्षें.

आर्यभूषण प्रेस

५२ विठ्ठल हरि बर्वे वय ७२
निवृत्त व्यवस्थापक १९१५ ते १९४९
५३ गणेश त्रिंबक गोन्हे वय ६१
३७ वर्षें आज अकौंटंट
५४ विनायक सदाशिव लेले ३० वर्षें कारकून
५५ लक्ष्मण विष्णु घाटपांडे २० वर्षें.
५६ विनायक गणेश करमरकर ३७ वर्षें टाईमकीपर
५७ बाळकृष्ण अनंत कुलकर्णी २२ वर्षें टाईमकीपर
५८ पांडुरंग कोंडिबा सुतार वय ३६ वर्षें सुतार
५९ गंगाधर केशव बाळ २६ वर्षें प्रुफकरेक्टर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

६० यशवन्त एकनाथ धायगुडे २१ वर्षे प्रूफकरेक्टर
६१ यशवंत नारायण दाणी २० ,,
६२ रामचंद्र हरि चक्रदेव २१ ,,
६३ गणेश दामोदर कुलकर्णी २८वर्षे इं. कंपॉझिटर
६४ हरि गोविंद दिनकर २७ वर्षे इंग्रजी कंपॉझिटर
६५ विष्णु वामन ठुले २९ वर्षे इंग्रजी कंपॉझिटर
६६ दामोदर व्यंकटेश बेटदुर २३ वर्षे इंग्रजी जुळणी
६७ मुरलीधर श्रीधर कीर्तने ३१ वर्षे इंग्रजी जुळणी
६८ शंकर पांडुरंग चास्कर २५ वर्षे मराठी जुळणी
६९ बाबू अनंत पंदरकर ३८ वर्षे मराठी जुळणी
७० देवबा राजबा जगताप ३६ वर्षे प्रेसमन
७१ बाबू राघूजी जाधव २८ वर्षे प्रेसमन
७२ गोविंद बाबू सुतार ३२ वर्षे गॅली काढणार
७३ बाबू गुणाजी सावंत २७ वर्षे प्रेसमन
७४ बन्नू अनवरखान पठाण ३० वर्षे गॅलीमन
७५ भाऊ विनायक भुतकर २३ वर्षे ट्रेडलमन
७६ यशवंत एकनाथ आवटे २० वर्षे ट्रेडलमन
७७ विठ्ठल गेनूजी गाडे ३० वर्षे ट्रेडलमन
७८ काशीनाथ महादेव दाते २० वर्षे प्रेसमन
७९ राजाराम बाळकृष्ण कुलकर्णी २७ वर्षे गॅलीमन
८० खंडू कृष्णा दौंड ४१ वर्षे बायंडर
८१ बापू काशीराम गायकवाड ३२ वर्षे बायंडर
८२ नारायण नथु सोरटे २७ वर्षे बायंडर
८३ बाबू दत्तू मोरे ३६ वर्षे बायंडर
८४ जगन्नाथ बाळा तारू ३४ वर्षे टाईप कास्टर
८५ भिकू रंगोबा जसवंते ३५ ,, ,,
८६ मारुती बापू तारू २४ ,, ,,
८७ महादु तुकाराम साळुंके २० वर्षे ,, ,,
८८ बा. म. पोटभरे ३० वर्षे इंग्रजी कंपॉझिटर
८९ दिगंबर रघुनाथ पलंगे २१ वर्षे ,, ,,
९० बाबू नामदेव बडदे ३३ वर्षे मराठी कंपॉझिटर
९१ रामचंद्र बाळाजी कामठे ३० वर्षे ,, ,,
९२ बापू कृष्णा सगरे ३० वर्षे ,, ,,
९३ रामचंद्र कृष्णाजी पवार २२ वर्षे इंग्रजी ,,
९४ केशव रामचंद्र घरत वय ६९ कंपॉझिटर

३९ वर्षे –१९५१ मध्ये सेवानिवृत्त.७० लोकांसह कंत्राटी कामें करीत असत. ज्ञानप्रकाश व आर्यभूषण ह्यामध्यें 'कंपॉझिटर निर्माते' असें काम त्यांनीं ४० वर्षे केलें. त्यांना 'जुळणीस-महर्षि' हीच पदवी सार्थ.

९५ महादेव विठ्ठल पाटील ३९वर्षे मराठी कंपॉझिटर
९६ शंकर लक्ष्मण जाधव २५ वर्षे ,, ,,
९७ लक्ष्मण धर्माजी ठाकूर २० वर्षे ,, ,,
९८ विश्वनाथ अनंत पटवर्धन वय ४६–२३ वर्षे आर्यभूषणमध्यें व्यवस्थापन, पुणें मुद्रक संघ या मुद्रक संघटणेचे महनीय कार्यकर्ते. त्या संघटणेमध्यें सर्व प्रकारचें विविध कार्य करीत आले. ४–५ वर्षे लागोपाठ अध्यक्षही होते. संस्थेच्या मुद्रण-साहित्य भांडार या उद्योगाचे प्रवर्तक व वर्धक

आनंदाश्रम छापखाना

९९ रामभाऊ सखाराम सरोदे वय ५२
बॉलर व नंतर प्रेसमन ४० वर्षे

कमर्शिअल प्रि. प्रेस

१०० शेख शमसुद्दीन शेख हुसेन वय ४०
सर्व प्रकारचें छपाई काम २५ वर्षे
१०१ शेख महंमद युसफ वय ३७
कंपॉझिटर २४ वर्षे ३ ठिकाणीं काम केलें.

शारदा विलास छापखाना

१०२ शंकर हरि मुळे वय ७० मालक
जुळणी, छपाई, व्यवस्थापन ४२ वर्षे

कलागृह छापखाना

१०३ नामदेव पांडुरंग करपे वय ५५
जुळणी खातें प्रमुख ३० वर्षे काम

हरिहर प्रेस

१०४ नारायण बळवंत चव्हाण वय ७५ मालक
४१ वर्षे सर्व प्रकारचीं कामें केलीं.

ओरिएन्टल वॉचमन प्रेस

105 S. K. Poddar Age 55
Fac. Asst. Suptd. 35 years service
106 P. A. Dass Age 55
Pressman 35 years service
107 C. N. Abraham Age 49
Fac. Suptd. 25 years service
Travelled U.S.A. good management.
108 S. Job Christian Age 45.
Intertype operator, 24 years

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

09 Dasharath Kamble Age 42
Store Keeper 24 years
110 Dada Borge Age 42
Despatcher 24 years
111 C. K. Kurian Age 38
Binding Dept. 21 years service
112 Phillimon Walekar Age 38
Binder 24 years service
113 P. M. Dason Age 39
Compositor 20 years service
114 Gangaram Shinde Age 42
Pressman 27 years service
115 G. S. Dason Age 45
Tamil Editor 20 years service

आनंद मुद्रणालय

११६ गोपाळ बळवंत जोशी वय ६५ मालक व व्यवस्थापक ३३ वर्षे केलें. मासिक-इतर प्रकाशन या कामीं लक्ष पुरविलें.
११७ महादु गेनु काळे वय ४८
बाइंडर २२ वर्षें नोकरी
११८ दगडू सदु सावंत वय ५५
प्रेसमन ३६ वर्षें नोकरी
११९ शिवराम मारुती सावंत वय ४२
ट्रेडलमन २४ वर्षें.
१२० शंकर गोविंद आनासपुरे वय ५६
बाहेरचीं कामें ३४ वर्षें.
१२१ धोंडिबा शिवराम लोखंडे वय ४०
प्रेसमन २० वर्षें.

केसरी छापखाना

१२२ शंकर बळवंत गायकवाड वय ४६
प्रेसमन २६ वर्षें – मशीनखातें प्रमुख यंत्रतज्ज्ञ म्हणून अनेक ठिकाणीं जातात.
१२३ चंद्रभान गेनुजी भोंगळ वय ६०
मशीन खात्यांतील मुख्य, ४६ वर्षें नोकरी
१२४ शंकर तुकाराम खोले २० वर्षें कंपॉझिटर
१२५ विठ्ठल गणपत शेळके २२ वर्षें ,,
१२६ भीमराव कृष्णराव मठाधिकारी २१ वर्षें कंपॉझिटर
१२७ बाबू काळूराम गायकवाड २१ वर्षें कंपॉझिटर
१२८ शंकर कृष्णा पेंडसे 'मराठा' २२वर्षें कंपॉझिटर
१२९ भास्कर महादेव कुलकर्णी 'सह्याद्रि' २२ वर्षें कंपोझिंग
१३० गजानन भालचंद्र क्षीरसागर २६ वर्षें मुद्रित परीक्षक
१३१ सदाशिव मारुती जाधव फौंड्री खातें २० वर्षांवर
१३२ बाबू लक्ष्मण राऊत फौंड्री खातें ,,
१३३ सदाशिव ठकाजी नवले, स्टिरिओ व मशीन खातें
१३४ बाबू दगडू परदेशी, ,, ,,
१३५ किसन तुकाराम खोले ,, ,,
१३६ शंकर बाळोबा मोरे ,, ,,
१३७ मारुती सजनाजी भोई, स्टिरिओ व मशीन
१३८ मुरलीधर बळवंत जोंधळे, ,, ,,
१३९ खंडू पांडू घाटे ,, ,,
१४० सहादु महादु मांढरे टपाल खाते
१४१ सदाशिव धोंडिबा कोकाटे ,,
१४२ दगडू मारुती शिंदे ,,
१४३ रामभाऊ विनायक गोगावले ,,

म्यु. कार्पोरेशन प्रेस -

१४४ यशवंत गणेश वझे वय ४३ सुपरिंटेंडेंट B.A.LL.B. २३वर्षें धंद्यांत अभ्यासू, मर्मज्ञ, लेखक व चित्रकार
१४५ गोविंद सखाराम पासलकर वय ३९ कंपोझिंग फोरमन २७वर्षें कंपॉझिटर (विस्तृत परिचय सप्टेंबर १९४७ मध्यें)

संगम प्रेस

१४६ बाबूराव हरिभाऊ हंडे वय ५० कंत्राटी कंपॉझिटर ३९ वर्षें.
(विस्तृत परिचय जुलै १९४७ मध्यें दिला.)

सारडा लिथो वर्क्स

१४७ महादेव पुरुषोत्तम ढोले वय ३८
